म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८५२
REFBK-0026977

# उत्तरायण

अर्थात,

उत्तर भारतातील सदाबहार थंड हवेची ठिकाणं

शैला कामत

REFBK-0026977

उन्मेष प्रकाशन

उत्तरायण

प्रकाशक / मुद्रक
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
२६ पर्वती
पुणे ४११००९

© डॉ. सौ. नीला पांढरे
मैफल, साक्रीरोड
धुळे - ४२४००१

प्रथमावृत्ती
फेब्रुवारी १९९३

किंमत ७० रुपये

मुखपृष्ठ
धनंजय सस्तकर

टाइपसेटिंग
प्रमोद प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
११२०, सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक
पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

*स्नेहद प्रा. सौ. सिंधू सरदेसाई*
*आणि*
*प्रा. सौ. मंदाकिनी शिरोळकर*
*यांना सस्नेह अर्पण—*

# अंतरंग


विभाग १ ■ हिमाचल प्रदेश व चण्डीगड ९ ते ७४

- हिमाचल प्रदेश
- कसौली
- सिमला
- मनाली
- नग्गर
- कूलू
- धरमशाला
- डलहौसी
- 'खाज्जीयार'
- चंबा शहर
- चण्डीगढ - एक नवनिर्मित शहर

विभाग २ ■ दिल्ली आणि काश्मीर ७५ ते १३२

- दिल्ली
- काश्मीर
- जम्मू
- साईटसीइंग टूर्स

विभाग ३ ■ बंगाल आणि सिक्कीम १३३ ते १६६

- कलकत्ता
- मिरीक
- दार्जिलिंग
- कॉलीपाँग
- गंगटोक किंवा गान्तोक

विभाग ४ ■ कुमाऊ प्रदेश १६७ ते १८८

- कुमाऊ भाग
- लखनौ
- नयनरम्य नैनीताल
- अल्मोडा, कौसानी व राणीखेत

विभाग ५ ■ १८९ ते २०४

- हरिद्वार-ऋषिकेष-डेहराडून व मसुरी

# पाथेय

माझ्यामध्ये एक जिप्सी लपून बसला आहे. वसंत ऋतूची चाहूल लागली की, मला महाविद्यालयीन उन्हाळी सुट्यांचे वेध लागतात आणि या सुट्टीत प्रवासाला कुठे जायचे, याचे बेत सुरू होतात. प्राध्यापिकेचे जीवन विसरून एक वेगळेच मुक्त जीवन मला जगायचे असते. सुदैवाने माझ्या पतीलाही प्रवासाची आवड आहे. त्यामुळेच लग्नापूर्वी पुण्या-मुंबईबाहेरचे जग न पाहिलेली मी 'आसेतुहिमाचल' भ्रमंती करू शकले आहे. आम्ही दोघेही एकाच व्यवसायात आणि एकाच महाविद्यालयात असल्याने आम्हाला सुट्ट्या एकाच वेळी असतात. रजा मिळेल की नाही याची चिंता नसते. प्राध्यापकांना भले छानदार पगार मिळो न मिळो - सुट्ट्या मात्र भरपूर मिळतात.

आमची स्थिती आता 'करून करून भागलो' अशी असल्याने आम्ही पेपरसेटिंग, परीक्षकपद वगैरे जबाबदाऱ्या स्वीकारत नाही. त्यामुळे पूर्ण सुट्टीचा आनंद मुक्तपणे घेऊ शकतो.

पुन्हा आमचे कुटुंबही कसे आहे ? तर छोटे कुटुंब-सुखी कुटुंब, 'हम दो हमारी एक' असे त्रिकोणी कुटुंब. आतातर लेकीचे शिक्षण पूर्ण होऊन तिचा विवाहही झाला आहे. त्यामुळे तिचीही जबाबदारी नाही. त्यामुळे नव्या क्षितिजांचा शोध घेत, नवेनवे प्रदेश पादाक्रांत करीत आमची भ्रमंती चालू असते. प्रवासाच्या ह्या छंदापायी आम्ही संपूर्ण भारतच नव्हे, तर नेपाळ, सिलोन इथेही भटकलो आहोत. त्या सगळ्याच प्रवासाचे अवलोकन एकत्र करणे शक्य नाही, म्हणून आमच्या फक्त उत्तरेवरील चढाईचे वर्णन मी इथे करणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत इतरत्र कुठेही जाण्यापेक्षा हिमालयात जाणे चांगले. हिमालयाच्या कुशीतील या स्थळांचे वर्णन करताना, जे नवखे लोक त्या प्रदेशात जाणार आहेत, त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या शहराचे धावते वर्णन इथे आले आहे; परंतु मुख्य भर आहे तो

हिमालयातील 'गिरिस्थानांवर'- हिमाचलला जाताना चण्डीगडला थांबावे लागते. काश्मीरला जाताना दिल्लीत मुक्काम करावा लागतो. दार्जिलिंग, सिक्कीम येथे जाताना कलकत्त्याहून जावे लागते, तर नैनीतालसारख्या कुमाऊ भागात लखनौमार्गे जावे लागते. केवळ एवढ्यासाठी चण्डीगढ, दिल्ली, कलकत्ता आणि लखनौ या शहरांची वर्णने अपरिहार्यपणे आली आहेत.

अशी ही निवडक शहरे आणि बाकीची निसर्गरम्य गिरिस्थाने असा हा प्रवास आहे. विवेचनाच्या सोयीसाठी थोडेसे वर्गीकरण करून चार विभाग केले आहेत.

१. पहिला विभाग हिमाचल प्रदेशचा-ज्यामधे सिमला, कुलू, मनाली, डलहौसी वगैरे स्थळांचा विचार केला आहे.

२. दुसऱ्या विभागात नयनरम्य काश्मीर खोऱ्यातील स्थळांचे वर्णन आहे.

३. तिसऱ्या विभागात प.बंगालमधील दार्जिलिंग व मिरीक ही गिरिस्थाने आणि सिक्कीम राज्यातील प्रेक्षणीय स्थळांचे वर्णन आले आहे.

या प्रवासात निसर्गातील वेगवेगळी रूपे तर न्याहाळता येतातच; पण वेगवेगळ्या स्वभावाची माणसेही भेटतात. हे नवे प्रदेश आणि नवी माणसे पाहताना प्रवासासाठी घेतलेले कष्ट आणि केलेली पदरमोड यांचा कधी विसर पडतो कळत नाही. हिमालयातील हिलस्टेशन्स्चा सीझन १५मे नंतर सुरू होतो. त्याच्या आत आपण जाऊ शकलो, तर गर्दी टाळता येते आणि खर्चही कमी येतो, असा अनुभव आहे. हिमालयात पाऊस कधी येईल याचा नेम नाही, वीज कधी जाईल हेही सांगता येत नाही, तेव्हा फोल्डिंग छत्री व टॉर्च जवळ असलेला चांगला. घाटात दरडी कोसळल्यामुळे अडकून पडावे लागले, तर जवळ थर्मास आणि खाद्यपदार्थ असल्यास फजिती होत नाही. गरमागरम व ताजे पदार्थ त्या हवेत कधीही उत्तमच; पण अडचणीसाठी जवळ थोडीफार टिकाऊ शिदोरी असावी.

आम्ही प्रवासात काटकसर करत नाही, पण अनावश्यक उधळेपणाही करत नाही. कौटुंबिक चिंता, कॉलेजचे राजकारण हे विषय चुकूनसुद्धा आमच्या बोलण्यात येत नाहीत. त्या सगळ्या चिंतांचे आणि विचारांचे गाठोडे घरीच ठेवून आम्ही बाहेर पडतो. थोडा पैसा जास्त खर्च झाला, तरी प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र खोल्या घेतो. मध्यम दरात चांगली जागा मिळावी म्हणून चार लॉजेस् फिरतो. त्यामुळे आपले प्रेस्टीज जाते, असे आम्हाला वाटत नाही. एखादे स्थळ

फारच आवडले, तर मूळ बेतात फरक करून आम्ही दोन दिवस मुक्काम वाढवतो. कंटाळा आला तर प्रवासाच्या काही भागात काटछाट करतो. आम्ही बहुतेक प्रवास स्वतंत्रपणे केला आहे आणि तरीही कोणत्याही प्रवास कंपनीपेक्षा जास्त सुखसोयी आणि किमान ३०% खर्च कमी, असा आमचा अनुभव आहे.

एका जुन्या पंडिताने असे म्हटले आहे की-

*केल्याने देशाटन पंडितमैत्री, सभेत संचार ।*
*शास्त्रग्रंथ विलोकुन, मनुजा चातुर्य येतसे फार ॥*

या श्लोकातील तत्त्वांवर आमची पूर्ण श्रद्धा आहे. प्राध्यापक असल्यामुळे पंडीतमैत्री, सभेत संचार आणि शास्त्रग्रंथविलोकन हे रोजचेच आहे. आता राहता राहिले 'देशाटन'. भ्रमंतीच्या हौसेपायी हे दर सुट्टीत चालूच असते. दोन वर्षांपूर्वी आम्ही हौसेने गाडी घेतली-त्यामुळे आता तर आमचे 'मारुतीउड्डाण' अधिकच वाढले आहे. या भ्रमंतीपैकी उत्तरेकडील प्रवासाची ही कथा. यातील बरीचशी प्रवासवर्णने- रसिक दिवाळी अंक, पिसारा मासिक, अमरेंद्र मासिक, सा.गावकरी आणि 'स्वतंत्रभारत' धुळे यांतून प्रसिद्ध झाली आहेत व वाचकांना आवडली आहेत. हे पुस्तकही रसिक वाचकांना आवडेल आणि मला अधिक लिहिते करेल, अशी आशा आहे.

उन्मेष प्रकाशनच्या उत्साही प्रकाशिका मेधा राजहंस ते प्रसिद्ध करत आहेत, त्याबद्दल ऋणी आहे.

**शैला कामत**
मैफल, साक्रीरोड, धुळे.

विभाग १

# हिमाचल प्रदेश
# व
# चण्डीगड

# हिमाचल प्रदेश

हिमाचल प्रदेशात जाण्याची इच्छा बरेच दिवस मनात होती— विशेषतः सिमल्याला जाण्याची. दोन वर्षांपूर्वी नैनीताल आणि सिमला पाहायचे असे ठरवून आम्ही नैनीतालला गेलो होतो; पण तो परिसर मला इतका आवडला की सिमल्याचा बेत रद्द करून, आम्ही 'कुमाऊ रेंज' मध्येच फिरत राहिलो. अल्मोडा, राणीखेत, कौसानी वगैरे ठिकाणे पाहिली. त्यामुळे सिमल्याला जाण्याची इच्छा अपुरीच राहिली.

मध्यंतरी 'सिमला खचते आहे' हे वाचून मी अस्वस्थ झाले. आधीच खचणाऱ्या सिमल्याला आपल्या वाढत्या वजनाचा भार झेपणार नाही, या भावनेने १९८६ मध्ये आम्ही सिमल्याची तयारी जोरात सुरू केली. धुळ्याच्या कडक उन्हाने वाहणाऱ्या घामाच्या धारा पुसत असतानाच, स्वेटर, मफलर, बूट-मोजे, हातमोजे वगैरे सामान गोळा केले. लेक होस्टेलवर एम.ए. चा अभ्यास करत होती. तेव्हा आम्ही दोघे, सुट्टी लागल्याबरोबर दुसऱ्याच दिवशी दिल्लीला निघालो. एक दिवस दिल्लीत मुक्काम करून, तीन आठवड्यांनंतरच्या परतीच्या रिझर्वेशनची व्यवस्था केली आणि आमची 'हिमाचलावरील स्वारी' सुरू झाली.

काश्मीर खोऱ्याइतकी प्रसिद्धी हिमाचलाला मिळालेली नाही; पण मला तरी हिमाचलमधील निसर्गरम्य स्थळे काश्मीरच्या तोडीस तोड वाटली. अशांत काश्मीरमुळे आता पर्यटकांचा लोंढा हिमाचलकडे वळला आहे. आम्ही तिकडे गेलो तेव्हा तेवढी गर्दी नव्हती.

भारत हा उष्णप्रदेश आहे, असे मानणाऱ्यांना हिमाचल प्रदेश म्हणजे एक सुखद आश्चर्याचा धक्का आहे. येथील बहुतेक शहरे डोंगराळ भागातच आहेत. हिरव्यागार टेकड्या आणि मागे हिमाच्छादित रुपेरी कडे, वळणावळणांचे घाटाचे

रस्ते-- असा हा प्रदेश आहे. पूर्ण हिमाचल प्रदेश पाहायचा, तर महिना तरी हवा. तेवढी सवड आम्हाला नव्हती. त्यामुळे 'भाक्रानानगल धरण' पाहता आले नाही. एका बाजूला असलेली पोन्तासाहिब-रेणुका आणि नहान ही छोटी शहरेही राहून गेली. 'रोहतांग पास' जवळ असलेले 'केलाँग' बर्फाच्छादित रस्त्यांमुळे बसच जात नसल्याने, इच्छा असूनही पाहायचे राहून गेले; पण बाकी ७५% प्रदेश आम्ही पादाक्रांत करू शकलो.

## हिमाचल - एक सुरेख लॅन्डस्केप

'हिमाचल' हा हिमभूमी आणि देवभूमी म्हणून ओळखला जातो. Sak and Puran नावाचा लेखक म्हणतो की, 'In a hundred ages of the Gods I could not tell thee of the glories of Himachal.' इथल्या डोंगरदऱ्या आपल्यावर अशी काही जादू करतात की, वास्तवाचे भान विसरून आपण कधी स्वप्नांच्या दुनियेत प्रवेश करतो, कळतच नाही. इथल्या कांग्रा व्हॅली, चंबा व्हॅली आणि कुलू व्हॅली या काश्मीर खोऱ्याइतक्याच सुंदर आहेत. श्रीनगर आणि सिमला या शहरांना बाजारी स्वरूप आले आहे; पण हिमाचलमधील कुलू, मनाली, धरमशाला, डलहौसी, चंबा आणि खजियार ही निसर्गरम्य स्थळे शांत, प्रसन्न आणि मध्यमवर्गीय खिशाला परवडतील अशी आहेत. या डोंगराळ भागात मंदिरे तर इतकी आहेत की, त्याला देवभूमीच म्हणतात. येथील वुलन कपडे, भरतकाम, मिनिएचर पेंटिंगची कला आणि लाकडावरील कोरीव काम जगप्रसिद्ध आहे. ट्रेकिंग, माऊंटेनिअरिंग (पर्वतारोहण), गोल्फचा खेळ आणि बर्फातील स्केटिंग किंवा स्कीइंगसारखे खेळ खेळणाऱ्यांना हा प्रदेश मोहित करतो. सतलज, रावी, बियास, चिनाब यांसारख्या खळाळणाऱ्या नद्या; पाईन, देवदार, चेरी वृक्षांची घनदाट जंगले; सफरचंद, प्लमपीच वगैरे फळझाडे, स्केटिंगसाठी नैसर्गिक उतार, छोटी छोटी खेडी आणि तेथील कष्टाळू, श्रद्धावान, आतिथ्यशाली खेडूत, मेंढ्यांचे कळप घेऊन फिरणारे धनगर या सर्वांमुळे हिमाचल म्हणजे एक सुरेख निसर्गचित्र-- लॅन्डस्केप-- बनले आहे. त्याचे वर्णन शब्दांच्या माध्यमातून करणे अवघडच आहे.

## देवभूमी

हिमाचलमधील डोंगरदऱ्यांत लहान-मोठी अशी सुमारे दोन हजार मंदिरे आहेत आणि त्यांमधून त्या त्या भागातील ग्रामदेवतांची स्थापना केलेली दिसते.

कुलू आणि चंबा ही शहरे मंदिरांसाठी विशेष प्रसिद्ध आहेत. चंबा खोऱ्याला शिवभूमी मानतात.

तेथील मंदिरांची एक वेगळी शैली आहे. त्यांना 'शिखारा टेंपल' म्हणतात. या पद्धतीच्या मंदिरांमध्ये दगडी बांधकाम आणि देवदार लाकूड यांचा आलटूनपालटून वापर केलेला असतो. त्यांची छपरे उतरती असतात आणि त्यांना लाकडी बीमने व तुळ्यांनी आधार दिलेला असतो. चंबाचे प्रसिद्ध 'लक्ष्मीनारायण टेंपल' हे शिखारा टेंपल आहे. काही मंदिरांभोवती कोरीवकाम केलेले लाकडी व्हरांडे असतात. मंदिराची स्थापना एखाद्या टेकडीवर केलेली असते आणि वर चढण्याची तपश्चर्या केल्याशिवाय आपण तिथपर्यंत पोहोचू शकत नाही. कुलूचे 'बिजली महादेव मंदिर' अशा तऱ्हेचे आहे. वैजनाथचे शिवमंदिरही असेच आहे.

काही मंदिरे पॅगोडा टाईप आहेत– खाली रुंद व वर अरुंद होत गेलेली. जपानी पॅगोडासारख्या रचनेची ही मंदिरे सुरेख दिसतात. मनालीला एका टेकडीवर असलेले 'हिडंबामंदिर' अशा तऱ्हेचे आहे. 'मंडी'ला शिवरात्रीला, तर 'कुलू'ला दसऱ्याला जत्रा भरते. हिमाचल प्रदेशातील ७५% लोक हिंदू आहेत. डोंगरी प्रदेशातील वास्तव्यामुळे ते काटक, साहसी, कष्टाळू आणि धर्मश्रद्ध आहेत. घाटांतून प्रवास करताना बस सुरू करण्यापूर्वी ड्रायव्हर ईश्वराला नमस्कार करणारच. कारण रस्ते वळणावळणांचे व अरुंद असल्याने एक छोटीशी चूकसुद्धा बसला प्रवाशांसह दरीत फेकून देऊ शकते.

## परधर्मसहिष्णु लोक

येथील लोक परधर्मसहिष्णु आहेत. दलाईलामांसह अनेक तिबेटी रिफ्यूजी (निर्वासित) 'धरमशाला' या ठिकाणी कायमच्या वास्तव्यासाठी आले आहेत. तिबेटी लोकांच्या येथील वस्त्या व बाजार यांमुळे 'अपर धरमशाळेला' 'लहान तिबेट' असेच म्हणतात. तेथील बौद्ध मॉनेस्ट्री पाहण्यासारखी आहे. तिथे बौद्ध धार्मिक विद्यांचे प्रशिक्षण देणारे केंद्र आहे. 'सिमला' ही ब्रिटिशांची उन्हाळ्यातील राजधानी होती. 'डलहौसीत'ही ब्रिटिशांचे चिरकाल वास्तव्य होते. त्यामुळे ह्या दोन्ही ठिकाणी असलेली चर्चेस पाहण्यासारखी आहेत. हिंदू, तिबेटी आणि ख्रिश्चन संस्कृती इथे एकोप्याने नांदत आहेत.

## निवासव्यवस्था

हिमाचल प्रदेश टूरिझम डिपार्टमेंट कार्पोरेशन म्हणजेच 'HPTDC' या नावाने ओळखली जाणारी संस्था, हिवाळ्यात 'सिमला' व 'मनाली' या ठिकाणी हिमाच्छादित भागातील खेळांचे प्रशिक्षण देते. HPTDCचे सुंदर व कलात्मक बंगले प्रवाशांच्या स्वागतासाठी सिद्ध असतात. 'कसौली'चा टूरिस्ट बंगला, 'ज्वालामुखी'चे 'ज्वालाजी हॉटेल', 'बारोग' येथील 'पाईनवुड हॉटेल', 'चायल'चे 'पॅलेस हॉटेल' सिमल्याजवळचे 'हॉटेल वाईल्ड फ्लॉवर हॉल', 'मंडी' व 'कुलू' येथील टूरिस्ट बंगले, 'मनाली'चे 'बियास हॉटेल' आणि 'सुंदर हट्स लोअर धरमशाला'येथील 'हॉटेल धौलाधर' आणि 'अपर धरमशाला'चे 'हॉटेल भागसू' 'खाज्जीयार'चा सुरेख 'टूरिस्ट बंगला' अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ही हॉटेल्स जितकी भव्य व सुंदर आहेत तितकीच ती महागही आहेत. १०० ते १५० रुपये हा तेथील सूटचा रेट आहे; पण बऱ्याच ठिकाणी टूरिझम कार्पोरेशनने हट्स आणि डॉरमेटरीची सोयही उपलब्ध करून दिली आहे. सिमला, मनाली आणि डलहौसी या ठिकाणी उत्तम खाजगी हॉटेल्स उपलब्ध आहेत. त्यामुळे निवासव्यवस्थेचा प्रश्न आम्हाला कुठेच आला नाही. डलहौसी आणि खाज्जियार या दोनच ठिकाणच्या टूरिस्ट बंगल्यांचा रेट ६० ते ७५ या दरम्यान होता. तिथे राहणे आम्हाला परवडले. एरवी आम्ही खाजगी हॉटेलांनाच आश्रय दिला. साधारणपणे ४० ते ५० रुपये या दराने आम्हाला त्या वेळी अटॅचबाथ उत्तम खोल्या मिळाल्या. साईटसीईंगसाठी लक्झरी बसेस व टॅक्सीज उपलब्ध असल्याने प्रवासाचा शीण जाणवला नाही.

## शॉपिंग

माझा आवडता कार्यक्रम शॉपिंगचा. 'कुलू' आणि 'चंबा' येथील विणलेल्या शाली, पश्मीने व ब्लँकेट्स प्रसिद्ध आहेत. पुढील बाजूने भरतकामाची रुंद पट्टी लावलेल्या कुलूच्या टोप्याही प्रसिद्ध आहेत. 'चंबा'चे, दोन्ही बाजूने सारखे भरतकाम केलेले रुमाल खूपच महाग वाटले; पण भरतकाम केलेल्या चपला आणि चामडी वस्तू खिशाला परवडणाऱ्या होत्या. रिफ्युजी सेंटरमधील गालिचांच्या किमती अफाट होत्या. काही स्त्रिया हौसेने तिबेटी ड्रेस विकत घेत होत्या. तिबेटी बाजारात कोणतीही इंपोर्टेड वस्तू बार्गेनिंग करून स्वस्त मिळत होती. लाकडी कोरीव काम केलेल्या वस्तू स्वस्त व मस्त होत्या, पण त्यांच्यामुळे

ओझे वाढले असते. काश्मीरच्या तुलनेने हिमाचलमध्ये फारसे शॉपिंग करायला वाव नव्हता, त्यामुळे माझे बरेच पैसे वाचू शकले.

**मार्ग कसा आखावा ?**

हिमाचलमध्ये जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक म्हणजे, सरळ पठाणकोटपर्यंत रेल्वेने जायचे. तिथून तीन-चार तासांचा बसप्रवास करून डलहौसीला जायचे. डलहौसीहून चंबा, खाज्जीयार पाहून धरमशालेला जायचे. तिथून डिलक्स कोचने मनालीला- मग कुलूला- नंतर लक्झरी बसने सिमला- मग व्हाया चंदीगड- अंबाला दिल्लीला परत यायचे- हा एक मार्ग.

किंवा दुसरा आम्ही स्वीकारलेला- फक्त दिल्लीपर्यंत रेल्वेने जायचे आणि पुढचा सगळा दऱ्याखोऱ्यांचा प्रवास लक्झरी बसेसनी करायचा. आम्ही दिल्लीहून प्रथम व्हाया चंदीगड 'कसौली' या छोट्याशा हिलस्टेशनला गेलो. तिथे एक दिवस मुक्काम करून व्हाया धर्मपूर सिमल्याला गेलो. सिमल्याच्या आजूबाजूचा परिसर पाहिल्यानंतर चार दिवसांनी मनालीला गेलो. त्या परिसरातील स्थळे पाहून चार दिवसांनी धरमशालेला, तिथून कांग्रा-ज्वालामुखी वगैरे पाहून डलहौसीला, शेवटी चंबा, खाज्जीयार पाहून पुन्हा डलहौसीला परत आलो. नंतर डलहौसी ते लुधियाना प्रवास लक्झरी बसने केला. एक दिवस लुधियानात राहून पुन्हा बसनेच दिल्लीला आलो आणि दिल्लीहून पंजाबमेलने चाळीसगावला परतलो. बसेसच्या प्रवासामुळे या खोऱ्यांमधील निसर्गसौंदर्य मनमुराद लुटता आले. लोकजीवनाचे निरीक्षण करता आले.

काही ठिकाणी अवघड घाट चढत असताना एखाद्या चिमुकल्या मंदिराजवळ बस थांबायची. पुजारी बसमधे शिरून सर्व प्रवाशांना प्रसाद द्यायचा. कुठे थंड पाण्याच्या झऱ्याजवळ बस थांबायची आणि प्रवासी आपली तहान भागवायचे. एखाद्या नाजूक पुलाजवळ प्रवाशांना खाली उतरविण्यात यायचे. लाकडी डुगडुगणाऱ्या पुलावरून रिकामी बस पलीकडे जायची आणि प्रवासी धावतपळत जाऊन तिला गाठायचे. कुठे मेंढरे हाकणारे धनगर दिसायचे, तर कुठे म्हशी हाकणाऱ्या देखण्या, गोऱ्यापान, सरळ नाकाच्या, रंगीबेरंगी कपड्यांतल्या खेडुत गवळणी. रस्ते तर इतके अरुंद होते की, समोरून एखादे वाहन आले, तर त्याला रस्ता देण्यासाठी बसला फर्लांगभर मागे जावे लागायचे तेव्हा कुठे एखादे वळण असे यायचे की दोन गाड्या एकमेकींना घसटून जाऊ

शकतील. दर दोन मिनिटांनी नवे वळण असल्याने, ड्रायव्हरच्या कौशल्यावरच प्रवाशांचे जीवन अवलंबून होते. एका बसवर ड्रायव्हरला उद्देशून एक सुरेख शेर लिहिलेला होता– 'बस' त्याला म्हणत होती की–

*'प्यारसे देख, नजर मत लगा मुझे ।*
*बडी सुंदर हूँ, पीके मत चला मुझे ॥'*

खरोखरच ड्रायव्हरची लहानशी नजरचूक प्रवाशांना स्वर्गात पोचवायला पुरेशी ठरली असती. हिमाचलचे ते वळणावळणाचे रस्ते आजही नजरेपुढून हलत नाहीत.

# कसौली

### 'कसौली'कडे कूच

दिल्लीत आमचा मुक्काम बृहन्महाराष्ट्र भवनात होता. परतीचे रिझर्वेशन केल्यानंतर आम्ही 'आंतरराज्यीय बसअड्ड्या'वर व रेल्वेस्टेशनवर चक्कर मारली. 'पठाणकोट'चे बर्थ मिळाले, तर आधी डलहौसीला जायचे आणि 'कालका मेल'चे मिळाले, तर आधी सिमल्याला जायचे, असे आम्ही ठरवले होते; पण दोन्ही ठिकाणी बर्थस् मिळू शकले नाहीत. तेव्हा बसने व्हाया अंबाला–चंदीगड 'कसौली'ला जायचे, तिथे मुक्काम करायचा आणि दुसऱ्या दिवशी सिमल्याला जायचे, असा बेत आम्ही केला.

'कसौली'ला जाण्यासाठी दिल्लीहून एकच डायरेक्ट गाडी होती आणि ती होती सकाळी ८.५० ला. चंदीगडला किंवा 'कालका'ला गेले, तर तिथून कसौलीला कनेक्टिंग बस मिळेल असे समजले, तेव्हा आम्ही २५ तारखेला सकाळी आठ वाजता 'दिल्ली-सिमला' बस पकडली. अंबाला, चंदीगड, कालका या मार्गाने आम्ही त्या बसने धर्मपूरला उतरलो, तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते. धर्मपूर ते कसौली बस लगेच आली. ते अंतर जेमतेम अर्ध्या तासाचेच होते.

सहा वाजता आम्ही 'कसौली'ला पोहोचलो.

## चिमुकले पण शांत हिलस्टेशन

समुद्रसपाटीपासून सुमारे दोन हजार मीटर्स उंचीवर असलेले 'कसौली' हे हिमाचलमधील चिमुकले हिलस्टेशन आहे. ज्यांना शांतता आणि विश्रांती हवी असेल- गर्दीपासून दूर दूर जायचे असेल, त्यांच्यासाठी ते आदर्श आहे. सिमल्याचे हवामान बऱ्याच वेळा ढगाळ आणि अभ्राच्छादित असते, पण इथे मात्र नेहमीच स्वच्छ सूर्यप्रकाश असतो. थंडगार वाऱ्याचे झोत वाहत असतात. उंचावरून उत्तर दिशेने पाहिले म्हणजे खालच्या दरीत झुळझुळणारी सतलज नदी दिसते. समोर हिरव्यागार टेकड्या दिसतात आणि टेकड्यांच्या मागे हिमाच्छादित पर्वतशिखरे खुणावतात. असे तिहेरी सौंदर्य इथे अनुभवता येते.

धर्मपूर ते कसौली घाट फारच सुंदर आहे– झालरीवजा डोंगर. हिमालयातील उत्तुंग वृक्षराजी, त्यातही चेरीची झाडे विपुल आहेत. रस्त्याच्या दुतर्फा निलगिरीची झाडेही आहेत. येथील रस्ते वळणांचे असले, तरी रुंद असल्यामुळे एकाच वेळी दोन वाहने जाऊ शकतात. दिल्ली ते कसौली बसचे तिकीट सुमारे पन्नास रुपये आहे. येथील, पानांपेक्षा फुलेच जास्त असलेली जांभळ्या रंगाची फुलांची झाडे वेगळीच वाटली. कोपऱ्याकोपऱ्यावर एकेरी पाकळीच्या पांढऱ्या रानगुलाबांची झाडे होती. त्यांचा मंद सुगंध रस्ताभर येत होता. धर्मपूरपासूनच बरोब्बर समोरच्या टेकडीवर असलेले 'कसौली' दिसत होते. कसौलीचा टीव्ही-टॉवर, मिलिटरीच्या इमारती लांबूनही ओळखू येत होत्या. कसौलीहून सिमल्याला जाताना 'धर्मपूर' दिसत होते. हा घाट घोड्याच्या नालाच्या आकाराचा असून, एका टोकावर धर्मपूर आणि समोरच्या टोकावर 'कसौली' आहे. 'कसौली' सोलन जिल्ह्यात येते. 'सोलन' हे जिल्ह्याचे गाव २८ किलोमीटरवर असून तिथे महाविद्यालयही आहे. 'कालका मेल' ने सोलनपर्यंत रेल्वेने येता येते आणि तिथून बसने 'कसौली'ला जाता येते. 'कसौली' हे चंदीगडपासून ६१ कि.मी., तर सिमल्यापासून ७७ कि. मी. वर आहे.

'कसौली'ची 'सेंट्रल रिसर्च इन्स्टिट्यूट' प्रसिद्ध असून तिथे टायफॉईड, कॉलरा, देवी, सर्पदंश वगैरे रोगांवरील प्रतिबंधक औषधे व इंजेक्शने तयार केली जातात. 'कसौली' पासून पाच कि. मी.वर 'लॉरेन्स पब्लिक स्कूल' असून, ते शिक्षणक्षेत्रात प्रसिद्ध आहे. कसौली गावची लोकसंख्या फक्त पाच हजार आहे.

तेथील मिलिटरी एरिया स्वतंत्र असून ती गावापासून ४-५ किलोमीटर अंतरावर आहे.

## निवास व भोजनव्यवस्था

कसौली बसअड्डा खोलगट जागेत असून, छोटासाच आहे. काही पायऱ्या चढून वर गेले की, समोरच 'टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर' लागते. आम्ही गेलो तेव्हा तिथे 'मृणालिनी शर्मा' ही टूरिस्ट ऑफिसर होती. ती काही काळ ठाण्याला शिकायला असल्याने, तिला मराठी येत होते. तिने आम्हाला खूपच मदत केली. फोनने आमचे सिमल्याच्या 'साईट सीईंग टूर'चे रिझर्वेशनही करून दिले. हिमाचलची माहितीपत्रके आणि पोस्टकार्ड्स घेऊनच आम्ही 'लॉज'च्या शोधात निघालो.

कसौलीला पी. डब्ल्यू. डी.चे रेस्टहाऊस आहे. सर्किट हाऊस आणि डाकबंगलाही आहे. तिथला HPTDC चा टूरिस्ट बंगला, 'Ross Common' फारच सुंदर आहे. तिथे चार सूट असून प्रत्येक सूटचे भाडे दीडशे रुपये आहे. बाहेर सुरेख गार्डन, तिथे गार्डनचेअर्स ठेवलेल्या, ठिकठिकाणी गुलाब फुललेले, हिरवळीवर डुलणारी विविधरंगी फुले, कुठूनही खाली डोकावले, तरी बसल्या जागेवरून दिसणारे दऱ्याखोऱ्यांचे सौंदर्य— असे त्याचे विलोभनीय स्वरूप होते. हा टूरिस्ट बंगला गावापासून व स्टँडपासून बराच दूर आणि चढावर आहे. दीडशे रुपये आमच्या खिशाला जडच होते. त्यामुळे आम्ही तिथे राहिलो नाही. दुसऱ्या दिवशी तिथे जाऊन चहापान मात्र केले. कसौलीतील 'अलासिया' किंवा 'मॉरिस' ही खाजगी हॉटेल्सही शंभर, दीडशे रुपये आकारणारी पॉश हॉटेल्स होती. बसस्टँडपासून सर्वांत जवळ, स्वस्त व मस्त हॉटेल म्हणजे 'कल्याण'. ऑफ सीझनमुळे तिथे चाळीस रुपयांत रूम उपलब्ध होती. आम्ही उतरलेल्या 'ग्यान हॉटेल'चा दरही तोच होता. मालकही बोलका व आतिथ्यशील होता. हे लॉज गावात असल्यामुळे, 'लोअरमाल'ला असल्यामुळे, जेवण्याखाण्याची सोय होण्याच्या दृष्टीने चांगले वाटले. प्रत्येक हिलस्टेशनला 'लोअरमाल' आणि 'अप्परमाल' असे दोन भाग असतात- अप्परमाल हा उच्चवर्गीय लोकांसाठी असतो. इथेदेखील 'अलासिया', 'मॉरिस' ही हॉटेल्स आणि मिलिटरीतील लोकांसाठी असलेले 'हॉलीडे होम' हे अप्पर माललाच आहेत.

लोअर मालचा रस्ता दगडी असून तिथे कोणतेही वाहन जाऊ शकत नाही.

या उताराच्या रस्त्यावर या गावातील दहा-बारा दुकाने आहेत. दुकाने संख्येने कमी असली, तरी तिथे कपडा, भांडी, औषधे, किराणा, लोकरी वस्तू इथपासून ते निकीताशा गॅस शेगडी आणि दूरदर्शन संचापर्यंत सर्व वस्तू दिसत होत्या. चार-पाच मैलांवरील मिलिटरीतील मंडळींसाठी ही सोय असावी. कसौलीला त्यामुळेच टी. व्ही. टॉवरही आहे.

'ग्यान' हॉटेलमधे चहा-नाश्ता मिळत होता, पण जेवणाची सोय नव्हती. आमच्या स्वभावाप्रमाणे आम्ही बाजारात चक्कर मारून 'आनंद ढाबा' शोधून काढला आणि गरमागरम फुलके, मटरपनीर, अलू गोबी असे छान जेवण केले. बिल झाले दहा रुपये फक्त. स्टँडवरून लॉजवर येताना संपूर्ण उतार असल्याने छान वाटले. लॉजबाहेरच्या दगडी बाकावर बसून रस्ता न्याहाळता येत होता. अंधारात चमकणारे चंदीगडचे दिवे दूरवर दिसत होते. हवेत छानदार गारवा होता. उबदार स्वेटर चढवूनच फिरावे लागले. खिडकीतून डोकावणाऱ्या आकाशातील चंद्रकोरीकडे पाहताना, कधी डोळा लागला ते कळलेच नाही.

**'कसौली-दर्शन'**

कसौली म्हणे देवानंदचे आवडते गाव आहे. विश्रांतीसाठी तो इथे येतो, असे कोणीतरी सांगितले. इथे लोक येतात ते निवांत राहायला. तब्बेत सुधारायला. आम्हालाही एका गृहस्थाने विचारले की, एक महिन्यासाठी रूम हवी का? कल्पना छानच होती. चढउतारांच्या रस्त्यांमुळे येथील माणसे सडपातळच राहणार. ब्लडप्रेशर नाही की हार्ट अटॅक नाही. निवांत इथे रहावे, काहीतरी छानसे लिहावे, जाडेपणा कमी करावा असे विचार मनात येऊन गेले. ते प्रत्यक्षात आणणे शक्य नव्हते हे अलाहिदा !

कसौलीत पाहण्यासारखे एकच ठिकाण आहे ते म्हणजे 'मंकी पॉइंट'. ही जागा स्टँडपासून सुमारे पाच किलोमीटर लांब आहे, पण तिकडे जाणारा रस्ता आणि वाटेत दिसणारे सृष्टिसौंदर्य इतके छान आहे की, घेतलेल्या परिश्रमांचे चीज होते. वाटेत 'अपरमाल' लागतो. मग छान छान हॉटेल्स, टूरिस्ट बंगला, नंतर मिलिटरीच्या ऑफिसर लोकांची मेस, टी. व्ही. टॉवर, नंतर मिलिटरी क्वार्टर्सच्या प्रचंड इमारती, फ्लॅट्स वगैरे सगळे ओलांडताना आपण सुरेख टाररोडवरून फिरत असतो. निसर्गाची साथ चालूच असते. थकल्यासारखे वाटले तर कुठेही बसावे, विश्रांती घ्यावी. निर्मनुष्य रस्त्यावरील एखाद्या झोपडीवजा हॉटेलात

चहापाणी करावे आणि पुढे चालू लागावे. मंकी पॉइंटवरच्या टेकडीवर मिलिटरीतील जवानांनी एक हनुमानमंदिर बांधले आहे. तिथे जाणारा शेवटचा चढ मात्र थकविणारा होता. बाकी रस्त्यात फारसे चढउतार नव्हते. प्रसन्न वातावरणातील ही सायंकालीन रपेट छानच झाली. मंकी पॉइंटवरून हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचे व दरीतील खळाळणाऱ्या सतलजचे दर्शन झाले. परत येताना वाटेत जेवण करूनच लॉजवर आलो.

### सिमल्याकडे प्रयाण

दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० ची बस पकडून आम्ही सिमल्याला किंवा तिकडच्या लोकांच्या भाषेत शिमल्याला निघालो. कसौली ते धर्मपूर प्रवास छान झाला. धर्मपूरला मात्र खूपच गर्दी होती. धर्मपूरहून जवळच 'सोलन' हे जिल्ह्याचे गाव आहे. तेथील महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची ती गर्दी होती. मुलांच्या परीक्षा सुरू होत्या.

हिमाचल प्रदेशात 'शिमला युनिव्हर्सिटी' ही एकमेव युनिव्हर्सिटी असून, सर्व महाविद्यालये तिला संलग्न आहेत. आपल्या महाराष्ट्राप्रमाणेच तिथे उच्च माध्यमिक बोर्ड असून ते 'धर्मशाला' इथे आहे. बोर्डाच्या या परीक्षेनंतर तिथेही तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असतो.

धर्मपूर ते कसौली या रस्त्यावर चेरीची भरपूर झाडे होती, तर धर्मपूर-सिमला रस्त्यावर ख्रिसमस ट्रीज खूप होत्या. 'सोलन' हे एकमेव मोठे गाव रस्त्यात लागले. आम्ही पावणेदहाच्या सुमाराला सिमल्यात पोहोचलो.

# सिमला

नऊ वाजेपर्यंत आपण सिमल्यात पोहोचू या अंदाजाने, नस्ता शहाणपणा करून कसौलीहूनच साईटसीईंग टूरचे रिझर्वेशन केलेले होते. ती टूर १०.१५

वाजता निघणार होती आणि आम्ही पावणेदहाला सिमल्याला पोचलो होतो. आमची टूरची तिकिटे ताब्यात घ्यायची होती, लॉज शोधायचा होता आणि सिमल्याचे रस्ते इतके प्रचंड चढ-उताराचे आहेत की, मी या धावपळीच्या कल्पनेनेच थकून गेले. शेवटी माझी बोळवण परस्पर बसस्टँडकडे करण्यात आली. तिथे जाण्यासाठीदेखील दोन-तीन प्रचंड चढ चढावे लागले आणि एक उतार उतरावा लागला. माझ्या बिचाऱ्या नवऱ्याने कूलीच्या साहाय्याने रिव्होली टॉकीजजवळचे 'यूनिक हॉटेल' शोधून काढले आणि अक्षरशः दारातूनच सामान आत फेकले. नंतर त्याने टूरिस्ट इनफर्मेशन सेंटरमधून, आम्ही कसौलीहून रिझर्व केलेली टूरची तिकिटे ताब्यात घेतली. ते धावत-पळत स्टँडवर आले, तेव्हा आमची बस दहा वाजताच निघून गेल्याचे समजले; पण टूरिझमचीच दुसरी बस त्याच रूटने जाणार होती, त्यांनी आम्हाला सामावून घेतले आणि पुढल्या स्टॉपला आमच्या मूळच्या बसच्या कंडक्टरच्या ताब्यात दिले. तशा अवतारातच आम्ही दिवसभर साईटसीईंग केले आणि संध्याकाळी सात वाजता शिमल्यात पोचलो. अर्ध्या तासाच्या मेहनतीनंतर मालरोडवर पोचलो आणि मग जवळच असलेल्या हॉटेलचे तोंड पाहिले. शिमल्याच्या मेकअपवाल्या सुंदरी नटूनथटून शॉपिंग करत होत्या, आणि आम्ही थकूनभागून पाय फरपटत हॉटेलच्या दिशेने चाललो होतो. प्रवासात असेही घडते कारण वेळ महत्त्वाचा असतो आणि पैसाही जपून खर्चावा लागतो.

सिमल्याविषयीचे आकर्षण फार जुने होते. शाळेत असताना साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचा 'सिमल्याचे वर्णन' हा निबंध पुन्हापुन्हा वाचला होता. कॉलेजच्या सोनेरी दिवसांमध्ये प्रेम करता करता, 'लव्ह इन सिमला' चित्रपट पाहिला होता आणि तेव्हापासून सिमल्याने मनात घर केले होते. नंतर अनेक चित्रपटांमधून सिमल्याची निसर्गदृश्ये पाहिली. आपण कधीकाळी सिमल्याला जाऊ, असे मात्र त्या वेळी मुळीच वाटले नव्हते. गरीब मुलाशी लग्न केल्यानंतर तर काश्मीर, सिमला या गोष्टी गुलबकावलीच्या फुलासारख्या अप्राप्य वाटल्या होत्या; पण जीवनसंघर्षात आम्ही जिंकलो होतो आणि यंदा सिमल्याला जाण्याचा योग आला होता.

## ब्रिटिशांचे लाडके शिमला

सिमला हे हिमालयातील पहाडी शहर. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांची

राजधानी होते. आता ते हिमाचल प्रदेशाची राजधानी आहे. ते सुमारे १२ कि. मी. क्षेत्रामधे पसरलेले आहे. आसपासची छोटी छोटी निसर्गरम्य उपनगरे लक्षात घेतली, तर त्याचा व्याप पन्नास किलोमीटरचा असेल. सिमल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ६५६२ फूट आहे. एके काळी सिमल्याच्या आसपास हिमालयीन वृक्षांचे घनदाट जंगल होते. आता मात्र तेथील पाईन वृक्ष, देवदार वृक्ष, ओक यांची संख्या कमी होऊन तिथे इमारती निर्माण झाल्या आहेत. १८१९ मध्ये युद्धकाळात, गुरखा लढाईच्या वेळी, अचानक जंगलातील या रम्य स्थळाचा शोध लागला. त्या वेळी इथे 'शामला' देवीचे मंदिर होते. त्यावरून या गावाचे नाव पडले 'शिमला'. हिमाचल प्रदेशातील लोक हा उच्चार 'सिमला' न करता 'शिमला' असाच करतात. प्रारंभीच्या काळात उन्हाने त्रस्त झालेले, ब्रिटिश अधिकारी आणि मिलिटरी ऑफिसर इथे तंबू ठोकून राहत असत. १८२५ मध्ये मेजर केनडी यांनी इथे पहिले पक्के घर बांधले, जे आजही पाहायला मिळते. पहिला गव्हर्नर, लॉर्ड अमहर्स्ट काही काळ या 'केनडी हाऊस'मध्ये राहिला आणि 'सिमला' हे सुरेख हिलस्टेशन होऊ शकेल ही कल्पना प्रथम त्याच्या मनात आली. हळूहळू इथे इमारती आणि बंगले बांधले गेले. लॉर्ड डलहौसी किंवा लॉर्ड लॉरेन्स हे आपला उन्हाळा इथे घालवत असत. नंतरच्या काळात हळूहळू ह्या शहराचा विस्तार झाला. आजूबाजूच्या सुमारे पन्नास कि. मी. परिसरात फागु, मशोबरा, कुफरी, नाळदेरा, नारकंडा— अशी छोटी छोटी गावे निर्माण झाली. १९०४ मध्ये कालका-सिमला रेल्वे सुरू झाली आणि खऱ्या अर्थाने सिमल्याचा विकास झाला. ब्रिटिशांनी बांधलेली चर्चेस, बँडस्टँड, बंगले आजही उत्तम स्थितीत आहेत.

एके काळी सिमल्यामध्ये राजेमहाराजे, ब्रिटिश अधिकारी आणि श्रीमंत लोकच राहत असत. आता मात्र विपुल प्रमाणावर हॉटेल्स व टूरिस्ट होम निर्माण झाल्यामुळे, सिमला हे प्रवाशांचे आकर्षणकेंद्र बनले आहे. दिल्ली, पंजाब आणि हरियाना येथील प्रवासी इथे विशेष गर्दी करतात. सिमल्याहून कुलू, मनाली, चंदीगड, दिल्ली, धर्मशाला इथे बसेस व लक्झरी कोचने जाता येते. दिल्लीहून कालकापर्यंत ब्रॉडगेज आणि नंतर कालका ते सिमला मीटरगेज रेल्वेलाईनही आहे. सिमल्याला एअरपोर्ट मात्र नाही. चंदीगडपर्यंत विमानाने येऊन, तिथून साधारण चार तास बसचा प्रवास करून, १२० किलोमीटर अंतरावरील सिमल्याला पोहोचता येते.

## प्रवास व निवासव्यवस्था

सिमल्याची वस्ती सुमारे ६० हजार असून, तिथे पहाडी, पंजाबी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू या भाषा बोलल्या जातात. मंदिरे, चर्चेस, एक गुरुद्वारा आणि एक मशीद तिथे आहे. हिमाचल प्रदेश टूरिझमचे 'हॉलीडे होम' हे हॉटेल किंवा ब्रिज व्ह्यू, ओबेरॉय हिमलँड, मरीना, मलबार ही पॉश हॉटेल्स मालरोडच्या आसपास आहेत. आम्ही राहिलेल्या 'यूनिक हॉटेल' सारखी डिसेंट, पण मध्यमवर्गीय खिशाला परवडणारीही काही आहेत. नव्याने निघालेल्या 'पंचायत भवन' या स्टँडजवळच्या इमारतीत डॉरमेटरी उपलब्ध असून तिथे विद्यार्थ्यांना फक्त दहा रुपये प्रत्येकी देऊन राहता येते. त्याशिवाय जैन धर्मशाळा, पुनम धर्मशाळा अशा काही धर्मशाळा अल्पखर्चात जागा देतात. खाजगी हॉटेल्स मात्र पूर्णतः व्यापारी आहेत. रजईचे भाडे रोज चार रुपये, गरम पाण्याची बादली दोन रुपये असे बिल लावून प्रवाशांची लूट केली जाते. सिमल्याच्या आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर पाहण्यासाठी, लक्झरी बसने HPTDC तर्फे साईटसीईंग टूरस् अरेंज केल्या जातात. खाजगी टॅक्सीज हव्या तेवढ्या उपलब्ध असतात. एका टॅक्सीतून पाच प्रवासी आरामात प्रवास करतात. काही वेळा सोयीसाठी तीन जोडपी मिळून एक टॅक्सी ठरवतात. टॅक्सीचे भाडे लक्झरी बसच्या सव्वापट असते. आधुनिक सिमल्यामध्ये क्लब, सिनेमागृहे वगैरे सर्व सोयी उपलब्ध आहेत.

## सिमल्याची बदलती रूपे

प्रत्येक ऋतूमध्ये सिमल्याचे रूप बदलते. वसंत ऋतूमध्ये तिथे स्वच्छ सूर्यप्रकाश आणि उबदार ऊन असते. शीतल वारे वाहत असतात. बंगल्यांच्या बागांमधून लाल, पिवळी फुले फुललेली असतात. पावसाळ्यानंतर सगळीकडे हिरवेगार गालीचे पसरले जातात. थंडीची चाहूल लागली की झोंबणारे वारे वाहू लागतात. पहिला हिमवर्षाव होतो तो सौम्य असतो. ड्रिंक्स घेऊन लोक त्याचा आनंद साजरा करतात. दोन-चार वेळा जोरदार हिमवृष्टी झाली म्हणजे सिमल्याचे वृक्ष, रस्ते, बंगले बर्फाच्छादित बनतात. स्केटिंग, स्कीईंग वगैरे बर्फातील हिवाळी खेळांचा मोसम सुरू होतो. हिवाळ्यात तेथील तपमान ५ सेंटिग्रेड एवढे कमी असते. डिसेंबर ते मार्च या काळात ज्या वेळी हिमवर्षाव होईल त्या वेळी, हिवाळी खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. या खेळांचे

प्रशिक्षण देणारे वर्ग चालवले जातात. एप्रिल ते ऑक्टोबर हा वासंतिक सीझन असतो. त्या काळात सिमल्याला येणाऱ्या प्रवाशांचे प्रमाण वाढते. थंडीच्या दिवसांत तर इथे ओव्हरकोट वापरावा लागतो; पण एरवीही जवळजवळ वर्षभर वुलन कपडे वापरावेच लागतात.

## लोअर माल आणि अप्पर माल

सिमल्याचे रस्ते खूपच चढउतारांचे आहेत. आसपासच्या गावांसाठी एक आणि दूरच्या गावांना जाणाऱ्या बसेससाठी एक असे दोन बसस्टँड इथे आहेत. बसस्टँड समपातळीवर आहेत, पण येथील बहुतेक हॉटेल्स मात्र उंचावर आहेत. 'हॉलीडे होम' आणि टूरिझमचे ऑफिसही उंचावर मालरोडला आहे. बाजारपेठेचे लोअर माल व अप्पर माल असे दोन भाग आहेत. साधारणपणे मध्यमवर्गीय मंडळी लोअरमालवरील खाद्यपदार्थांच्या दुकानांना भेटी देतात. थोडेफार शॉपिंगही तिथेच करतात, तर श्रीमंत मंडळी अप्परमालच्या हॅन्डलूम हाऊस, खादी ग्रामोद्योग, बूट हाऊस, स्टुडिओज् इथे गर्दी करताना दिसतात. लोअरमालला चाटभांडारे आहेत, तर अप्परमालला सॉफ्टी आईस्क्रीम, कोल्ड्रिंक्स, चायनीज पदार्थ यांची भपकेबाज दुकाने आहेत. लोअरमालचे रस्ते छोटे, अरुंद व उभ्या चढणीचे असल्याने, तिथून पायीच जावे लागते, पण अप्परमाललाही गाड्या जाऊ शकत नाहीत. खालच्या बाजूला एका चौकात कार्स व टॅक्सीज थांबतात. तिथे दोन उंच टॉवर्स बांधलेले असून, वर जाण्यासाठी दोन लिफ्टस् आहेत. प्रत्येकी एक रुपया देऊन लिफ्टमध्ये चढायचे, की आपण पाच मिनिटांत मालरोडवर येऊन पोहोचतो. शॉर्टकटने गेलो तरी पायी तिथे जायला अर्धा ते पाऊण तास लागतो. उभा चढ चढल्यामुळे जीव थकून जातो ते वेगळेच. या लिफ्टस् जिथे थांबतात तो सिमल्यातला त्यातल्या त्यात सपाट भाग आहे. तो **Ridge**- **'रिज'** या नावाने ओळखला जातो. स्थानिक मंडळींचा हा आवडता भाग आहे. तेथील लजपतराय चौक किंवा स्कॅन्डल पॉ[इंट] नेहमीच गजबजलेला असतो. एका सामान्य माणसाने पैज लावून, भर गर्दीतून [या] ठिकाणाहून, पतियाळाच्या राजकन्येला येथून पळवून नेले होते, [अशी] आख्यायिका आहे, म्हणून त्याला स्कॅन्डल पॉईंट म्हणतात. सिमल्यामध[ील] प्रसिद्ध Gothic चर्च, बॅन्डस्टँड, हवाघर वगैरे प्रसिद्ध ठिकाणे या चौकाज[वळ] आहेत. ती ब्रिटिशकालीन जुन्या वैभवाची आठवण करून देतात. सर्कसमध[्ये]

लोक तिथे बसून, येणाऱ्या-जाणाऱ्यांची गंमत पाहत असतात. सिमल्यातील प्रेमिकांचे हे संकेतस्थळ आहे. मनगटावरील घड्याळात पाहून, ऑफिसात पोचायला जर १५ मिनिटे वेळ असेल, तर तरुण मुले इथे टेकतात आणि मित्रमंडळींशी गप्पागोष्टी करतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियासुद्धा दुसऱ्या दिशेने येणाऱ्या मैत्रिणीची वाट पाहण्यासाठी इथे स्थिरावतात. संध्याकाळच्या वेळी तर हा भाग फारच गजबजून जातो. कारण शेजारीच शॉपिंगसाठी बाजार आहे. बँका, ऑफिसेस व शाळा आहेत. आइस्क्रीम स्टॉल्स आहेत. खालच्या बाजूला जाणाऱ्या आडव्या रस्त्यावर तिबेटी बाजारही आहे. जिथे स्वेटर, शाली, बूट, चामड्याच्या वस्तू व इंपोर्टेड वस्तू स्वस्त मिळतात. एका बाजूला लाकडावर कोरीव काम करणाऱ्या कारागिरांची सात-आठ छोटी दुकाने आहेत. तिथे चार-पाच रुपयांपासून ते दीड-दोनशे रुपयांपर्यंत लाकडी कोरीव वस्तू व पेंटिंग्ज मिळू शकतात. दुकाने रात्री ७.३०-८ वाजताच बंद होतात.

सिमल्यात खास शॉपिंग करण्यासारखे काही नाही. स्वेटर, शाली दिल्लीत जास्त स्वस्त मिळतात. आम्ही सिमल्याची आठवण म्हणून फक्त छोट्या लाकडी कोरीव कामाच्या वस्तू घेतल्या. कुठे उदबत्ती स्टँड, कुठे ॲश ट्रे, फ्लॉवरपॉट वगैरे.

बाजारपेठ सोडली तर बाकीचे सिमला निसर्गरम्य आहे. डोंगरावर विखुरलेली घरे, ओक आणि पाईन वृक्षांच्या आड दडलेले लाल छपरांचे बंगले छान दिसतात. या बंगल्यांची छपरे पत्र्याचीच पण रंगवलेली असतात. आमचा लॉज टेकडीच्या मध्यावर चढणीवर होता. आजूबाजूच्या टेकड्यांवर कुठे उंचावर बंगले होते, तर कुठे खालच्या बाजूला घरे होती. आम्ही सिमल्यात होतो तेव्हा हवाही स्वच्छ व उबदार होती. त्यामुळे सहलीचा आनंद मनसोक्त लुटता आला.

### सिमल्यातील माकडे

सिमल्यात माकडे बरीच आहेत आणि ती चांगली धीटही आहेत. गर्दीच्या वेळी 'रिज' भागात यायलाही ती कमी करत नाहीत. एकदा संध्याकाळी चर्चजवळच्या लाकडी गॅलरीत आम्ही बसलो असताना, त्यांनी आमची चांगलीच फजिती केली होती. भरगर्दीच्या त्या चौकातील ती गॅलरी त्या वेळी

इतकी गच्च भरलेली होती की, आम्हाला अगदी वरच्या रांगेतील पायराच्या टोकावर जागा मिळाली होती. शेजारच्याच आइस्क्रीम स्टॉलवरून कोन आइस्क्रीम आणून, त्याचा मनापासून आस्वाद घेत आम्ही शिळोप्याच्या गप्पागोष्टी करत होतो. 'हे' माझ्याही पलीकडे होते. अचानक त्यांची किंकाळी ऐकू आली आणि केवळ मीच नव्हे, तर माझ्या आजूबाजूच्या तीन-चार बायकाही दचकून उभ्या राहिल्या. एका भल्यामोठ्या वानराने यांचे आइस्क्रीम हातातून खेचून घेतले होते. मी गडबडीने उठले. पायऱ्या उतरले, पण 'मेरी झासी नहीं दूंगी' म्हणणाऱ्या राणी लक्ष्मीबाईचा वारसा सांगून, आइस्क्रीमचा कोन काही हातचा सोडला नाही. आमचे लॉजही थोड्या एकांड्या रस्त्यावरच होते. हातातील पिशवीतून ब्रेड, बिस्किटे किंवा फळे घेऊन जातानासुद्धा, माकडे ती पळवतील, अशी भीती वाटायची. कारण ही माकडे काही अंतरापर्यंत चक्क पाठलाग करायची. शेवटी झाडाची फांदी मोडून, एक छोटी काठी तयार केली आणि ती हातात ठेवली. सुदैवाने माकडे काठीला घाबरतात, असा अनुभव आला.

## शहरात काय पाहावे ?

सिमल्याच्या परिसरातील प्रेक्षणीय स्थळे दाखविण्यासाठी टूर्स आहेतच; पण काही निसर्गरम्य जागा अशा आहेत की, तिथे गाड्या जाऊ शकत नाहीत. कच्च्या रस्त्याने किंवा पायवाटांनी जाऊनच आपल्याला तिथल्या आगळ्यावेगळ्या निसर्गसौंदर्याचा लाभ घ्यावा लागतो. ही स्थळे बसस्टँडपासून ७-८ किलोमीटरच्या आत येतात. त्यांतले एक सुरेख व जवळचे ठिकाण म्हणजे **जक्कूहिल.** रिज भागातील चर्चजवळून जाणाऱ्या रस्त्याने सुमारे दोन किलोमीटर अंतराचा चढ चढून गेले की, आपण जक्कू हिलवर पोहचतो. हे शहरातील सर्वांत उंच ठिकाण आहे असे म्हणतात. तिथे हनुमानमंदिर आहे. खालच्या बाजूला नजर टाकली की, तिथून सिमल्याच्या खऱ्या निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार होतो. याही रस्त्यावर माकडांचा बराच त्रास आहे.

## ग्लीन

हे निसर्गरम्य ठिकाण प्रवाशांचे आवडते ठिकाण असून, ते बसस्टँडपासून सुमारे चार किलोमीटरवर आहे. सेसिल हॉटेल आणि केनडी हाऊसच्या ते

जवळ आहे. पावसाच्या दिवसात सात किलोमीटर अंतरावरील घनदाट जंगलात सुमारे ७० मीटर उंचीचा एक सुरेख धबधबा तयार होतो, त्याचे नाव **'चाडविक फॉल'** आहे. आम्ही गेलो तेव्हा तिथे विशेष पाणी नव्हते, असे समजले त्यामुळे आम्ही काही तिथे गेलो नाही; पण चार-पाच मैलांवर असलेल्या **'संकटमोचन'** नावाच्या हनुमानमंदिराला मात्र भेट दिली. हिमाचल प्रदेशाला देवभूमीच म्हणतात, तेव्हा इथे मंदिरांना तोटा नाही. प्रोस्पेक्ट हिल या टेकडीवर पाच किलोमीटर अंतरावर **कामनादेवी टेंपल** आहे. बॉईलगंज भागातून पंधरा-वीस मिनिटांचा चढ चढल्यावर तिथे पोहोचता येते.

सिमल्याच्या उपनगरात सिमला-कालका रेल्वेलाईनला लागून सुमारे पाच कि. मी. अंतरावर, तेथील प्रसिद्ध **'Institute of Advance Studies'** ही संस्था आहे. ही सर्व ठिकाणे पायी जाऊनच पाहावी लागतात आणि रस्ते इतके चढउतारांचे आहेत की माणूस चटकन थकतो. माझ्या उभ्या आयुष्यात मी जेवढे चढउतार पायाखाली घातले नसतील, तेवढे सिमला आणि डलहौसीला घातले. मनात विचार आला की, महिना-दीडमहिना जर आपण असे रोज चाललो तर कसे छान बारीक होऊ, पण या स्वप्नरंजनात अर्थ नव्हता. सिमल्यासाठी आमच्याकडे फक्त चार दिवस होते. आणखी बऱ्याच हिलस्टेशन्सना भेट द्यायची होती.

## साईटसीईंग टूर्स

HPTDC तर्फे निदान तीन टूर्स आयोजित केलेल्या आहेत, त्यांपैकी पहिल्या टूरचे रिझर्वेशन आम्ही कसौलीहूनच केले होते. आणि ती टूर आल्या दिवशीच पूर्ण केली होती— ही **टूर क्रमांक १**— प्रत्येक प्रवाशाकडून पस्तीस रुपये घेते. दोन-दोन सीट्स असलेल्या आरामगाडीतून सहा-सात निसर्गरम्य स्थळे दाखवली जातात. टूर सकाळी दहा वाजता स्थानिक बसस्टँडहून निघते आणि संध्याकाळी सहाच्या सुमाराला परत येते.

## वाईल्ड फ्लॉवर हॉल

हा या टूरचा पहिला स्टॉप होता. सिमल्याहून तेरा किलोमीटरवर असलेल्या या ठिकाणी, पाईन वृक्षांची दाट गर्दी आहे. तिथे गेल्यानंतर खरोखरच हिमालयात आल्यासारखे वाटले. थंडी मात्र मुळीच नव्हती. वाईल्ड फ्लॉवर हॉल

ही सुरेख ब्रिटिशकालीन बिल्डिंग असून, तिथे एके काळी व्हाईसरॉय राहात असत. आता तिथे राजेशाही हॉटेल आहे. पाईनवृक्षांच्या जंगलात काही कॉटेजेस्‌ही आहेत. चिल्ड्रेन पार्क आहे. प्रवेश फी म्हणून प्रत्येकी पन्नास पैसे घेतात; पण हॉलमध्ये आता हॉटेल झालेले असल्याने, आत प्रवेश मात्र करू देत नाहीत. कोल्ड्रिंक्सचा एक स्टॉल तिथे आहे, आणि बागेत लुडबुडणारे फोटोग्राफर, लोकल ड्रेसमध्ये किंवा कुलूड्रेसमध्ये फोटो काढून देतात. अगदी दुसऱ्या दिवशी तुमच्या हॉटेलवर पोचवतात. हवे तर ड्रेस भाड्याने घेऊन तुम्ही तुमच्या कॅमेऱ्यावर फोटो काढू शकता. इथे आमचा अर्ध्या तासाचा स्टॉप होता. इथून तीन मैलांवर 'कुफ्री' हे प्रसिद्ध ठिकाण असून, तिथे हिवाळी खेळ मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातात. तिथे रेस्टहाऊसही आहे. वाईल्ड फ्लॉवर हॉलमध्ये लॉर्ड किचनेर, कमांडर इन चीफ, इंडिया राहात असत.

### फागु

हा आमचा दुसरा स्टॉप. हे नितांतरम्य ठिकाण सिमल्यापासून बावीस कि. मी. अंतरावर आहे. तिथून हिमाचलाचा व्ह्यू फारच सुंदर दिसतो. या दरीला 'गिरीव्हॅली' म्हणतात. येथून वाहणाऱ्या 'गिरी' नदीमुळे हे नाव तिला मिळाले आहे. आजूबाजूला अनेक पर्वतशिखरे दिसतात. एका डोंगरापलीकडे बद्रीनाथ-केदारनाथ आहे. तिथून उत्तर प्रदेश सुरू होतो. दुसऱ्या एका शिखरापलीकडे डेहराडून आहे, तर एका बाजूला कुलू खोरे आणि रोहतांग पासची हिमाच्छादित शिखरे दिसतात. खालच्या बाजूला नजर टाकली तर भारत-तिबेट रस्ता जाताना दिसतो. इथून सुमारे १०० मैलांवर रामपूर नावाचे गाव आहे. आपण तिथपर्यंत जाऊ शकतो. पुढे जाण्यासाठी मात्र परवानगी व पासपोर्ट लागतो. कारण पलीकडे मिलिटरी एरिया असून, चायना बॉर्डर सुरू होते. फागुची समुद्रसपाटीपासूनची उंची २५१० मीटर आहे. खालच्या बाजूला सफरचंदांच्या बागा आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात 'फागु' नावाच्या इंग्रजाने इथे एक सुरेख रेस्ट हाऊस बनवले होते. त्यावरून त्याला फागु नाव पडले. आता हे रेस्ट हाऊस HPTDC च्या ताब्यात आहे. तिथे ५० ते ७५ रुपयांत डिलक्स रूम्स मिळू शकतात. शांत आयुष्य जगायचे असेल आणि निसर्गाचे खरे सान्निध्य अनुभवायचे असेल, तर तिथे मुक्काम करायला हवा. आम्ही मात्र फक्त कोल्ड्रिंक्स घेऊन पुढे निघालो. दोन नंबरच्या टूरमध्येही फागुचा समावेश असून,

त्याचा तर जेवणाचा हॉल्ट इथे घेतात. जेवण चांगले मिळते, पण रेटस् जास्त आहेत. हिमाचल टूरिझमने मोठ्या कौशल्याने असे हॉल्टस् ठेवून, हॉटेल्स चांगली चालतील अशी व्यवस्था केली आहे. एरवी एवढ्या लांब गिऱ्हाईके कोण मिळणार ?

## कुफ्री

त्यानंतर आमची लक्झरी कुफ्री येथील 'इंदिरा गांधी हॉलीडे होम' येथे थांबली. कुफ्रीच्या रेस्ट हाऊसला हे नाव सुमारे १५ वर्षांपूर्वी देण्यात आले. त्या अगोदर त्याला 'चिनी बंगलो' म्हणत असत. मुळात हे रेस्ट हाऊस पतियाळाच्या महाराजांच्या मालकीचे. महाराजांच्या तीन राण्यांपैकी एक चिनी होती, आणि ती इथे राहायची म्हणून त्याला 'चिनी बंगलो' नाव होते. आता इथे एक डायनिंग हॉल व तीन सूट्स आहेत. सुमारे पन्नास रुपये भाड्याने हा सूट मिळू शकतो.

या स्थळाला महत्त्व येण्याचे आणखी एक कारण म्हणजे कै. इंदिरा गांधी आणि कै. भुत्तो यांच्यातील प्रसिद्ध 'सिमला करार' १९७१ मध्ये या बंगल्यात झाला होता. तिबेटमध्ये आढळणारा 'याक' हा प्राणी इथे पाहायला मिळाला. टूरिझमने याकरायडिंगचीही सोय केली आहे. 'याक'वरून एक छोटी चक्कर मारण्यासाठी दोन रुपये घेतात. लोक हौसेने चक्कर मारतात आणि याकवर बसलेला फोटोही काढतात. इथे खरे म्हणजे फक्त १५ मिनिटांचा स्टॉप होता; पण काहीजण भोजन करत बसले, त्यामुळे उशीर झाला. चौथा स्टॉप म्हणजे **एक स्कीईंग स्लोप** होता. हिवाळ्यात हिमवृष्टी झाल्यानंतर, या उतारावरून स्कीइंग करत थेट सिमल्यापर्यंत जाता येते म्हणे ! वर्षातून एकदा इथे स्कीइंग स्पर्धा होतात आणि जवळच पोटॅटो रिसर्च सेंटरही आहे. नंतरच्या पिकनिक स्पॉटचे नाव लक्षात ठेवायला कठीणच होते. **Cragnono क्रॅगनेनो** असे त्याचे विचित्र नाव होते. मध्ये रेस्टहाऊस. त्यात डायनिंग हॉल आणि काही रूम्स, भोवताली सुरेख गार्डन आणि हिरवीगार लॉनस्. इथेही एक रुपया एंट्री फी होतीच. रेस्ट हाऊसमधील हॉटेलमध्ये तुम्ही खाऊपिऊ शकता किंवा दाराशी असलेल्या स्टॉलवर ॲपल ज्यूस घेऊ शकता. बागेत कुठेही बसलात तरी वेटर तुम्हाला बसल्याजागी कॉफी किंवा कोल्ड्रिंक आणून देतो. चहाची वेळ होती, पण कुठेही चहा मात्र मिळत नव्हता. त्यामुळे ॲपल ज्यूसवर समाधान मानावे लागले.

Cragnonoकडे जाणारा उंच चढाचा रस्ता फारच सुरेख होता. दुतर्फा दाट

हिमालयीन वृक्ष होते. परमेश्वराने मुक्त हस्ताने सौंदर्य उधळले होते. आमची अवस्था 'बघता किती बघशील दो नयनाने' अशी होत होती. येताना आम्ही पायवाटेने घसरत खाली आलो, ते थेट प्रादेशिक फळ संशोधन केंद्रात पोहचलो. सफरचंदांचा सीझन नसल्यामुळे उगाच कसलीतरी फळे नमुना म्हणून खाल्ली झाले.

**नालधेरा (Naldhera)**

येथील नाईन होल्स गोल्फ कोर्ससाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. सिमल्यातील श्रीमंत, रसिक व तरुण मंडळी त्या वेळी तिथे गोल्फ खेळत होती. त्यामुळे आम्हाला त्यांचा खेळ प्रत्यक्ष पाहता आला. हे गोल्फकोर्स एकसंध व समपातळीवर नाही. त्याची काही होल्स चक्क टेकडीवर आहेत. एका बाजूच्या टेकड्यांवर ख्रिसमस ट्रीजचे जंगल, मध्ये हिरवळ, दुसऱ्या बाजूला दरी आणि मधून जाणारा टाररोड असे त्याचे स्वरूप आहे. सिमल्यापासून हे मैदान तेवीस कि.मी. अंतरावर असून ते भारतातील सर्वांत जुने गोल्फकोर्स आहे. इथेही HPTDC चे लॉज व कॉटेजेस आहेत. कॅफेटेरियामध्ये खाण्यापिण्याची सोयही आहे. शेजारीच एका टेकडीवर 'महुनाग' नावाचे मंदिर आहे. आम्ही आता इतके थकलो होतो की, मंदिरात न जाता रस्त्याच्या कडेला बैठक मारली आणि समोरचे लॅन्डस्केपसारखे दिसणारे दऱ्याखोऱ्यांचे सौंदर्य न्याहाळत बसलो.

आमच्या टूरचा शेवटचा स्टॉप होता '**मशोबरा**'. हे ठिकाण सफरचंदांच्या बागांसाठी प्रसिद्ध आहे. सध्या सीझन नव्हताच, पण काही लोकांनी सफरचंदाची झाडेच पाहिली नव्हती म्हणून ते हौसेने खाली उतरले. आम्ही काश्मीरला झाडावरची सफरचंदे हाताने तोडून खाल्लेली असल्याने आम्हाला त्यात नावीन्य नव्हते. मशोबऱ्याहून सिमल्याला येणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा ओक व पाईन वृक्षांचे जंगल होते, ते मात्र सुरेखच होते. संध्याकाळी सात वाजता आम्ही सिमल्यात पोहोचलो.

टॉवरवरील दोन लिफ्टस्च्या साहाय्याने, प्रत्येकी एक रुपयात मालरोडवर पोहोचलो. दुतर्फा नटलेली-सजलेली दुकाने खुणावत होती; पण आता एक पाऊल टाकायची ताकद नव्हती. अवतारही प्रेक्षणीय झाला होता. एका कच्च्या रस्त्याने शॉर्टकट घेऊन, 'यूनिक हॉटेल' मध्ये पोहोचलो आणि प्रथम दिवसभरात कुठेही न मिळालेला गरमागरम चहा घेतला, तेव्हा कुठे माणसात

आलो. माझ्या स्थूल प्रकृतीकडे पाहून मॅनेजर आश्चर्याने विचारू लागला, 'कसौलीहून येऊन डायरेक्ट तुम्ही दिवसभर साईटसीईंग केलेत तरी कसे?' आता त्याला काय सांगायचे की, आम्ही कसौलीहूनच टूरचे रिझर्वेशन केले होते आणि ते पैसे आम्हाला वाया घालवायचे नव्हते. वेळही वाचवायचा होता. म्हणून हॉटेलवरच आम्ही गरमागरम जेवण मागवले आणि ९-९॥ वाजताच गाढ झोपून गेलो.

## टूर नंबर २

दुसऱ्या दिवशी आम्ही दोन नंबरच्या टूरचे रिझर्वेशन केले. ही टूर फक्त बुधवार, शुक्रवार व रविवार असे तीन दिवस असते. त्या दिवशी रविवार होता. बुधवारी आम्ही मनालीला जाणार होतो, तेव्हा ही टूर आजच पूर्ण करणे आवश्यक होते. आदल्या रात्री लौकर झोपल्यामुळे, सकाळी सहा वाजताच जाग आली. हॉटेलवर सारे कसे शांत शांत होते. हिलस्टेशनवर लोक सावकाश उठतात. साईटसीईंगसुद्धा दहा वाजता सुरू होते. ही टूर प्रत्येकी ४५ रुपये घेते.

तिचा पहिला स्टॉप होता **फागु**. तो आम्ही आदल्या दिवशीच पाहिला होता. दुसरा स्टॉप '**मटिआना**'. Matiana हा सिमल्यापासून ४८ कि.मी. वर असून चेरी व सफरचंद यांच्या बागांसाठी प्रसिद्ध आहे. तिथे फारसे पाहण्यासारखे काही नसल्याने फक्त पाच मिनिटेच थांबून, बस पुढे निघाली. नंतर आम्ही पोचलो '**नारकंडा**' या ठिकाणी. सिमल्यापासून ६४ कि.मी. अंतरावर असलेले हे ठिकाण, या भागातील सर्वांत उंच ठिकाण आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ८८५८ फूट आहे. स्कीईंगच्या दृष्टीने ही जागा सर्वोत्कृष्ट मानतात. आमची बस गावातील बौद्ध मॉनेस्ट्रीजवळ थांबली. तिथून डाव्या बाजूला एक फर्लांग अंतर चालत गेल्यावर सुंदर घाट लागला. समोर हिमालयाची उत्तुंग शिखरे खुणावत होती. गावाजवळच रेस्ट हाऊस होते. रेस्टहाऊसच्या रस्त्याच्या विरुद्ध बाजूने, खालच्या दरीचे मनोहर दृश्य दिसत होते. खाली उतरायला जिना होता. मागच्या व्हरांड्यात गार्डन चेअर्सही होत्या. सीझन नसल्यामुळे नॉर्मल रेटस् असूनही ते मोकळेच होते. नारकंडा दरीपासून दोन कि. मी. अंतर चालत गेल्यावर आतल्या बाजूला स्कीईंग पॉइंट आहे. तिथे हिवाळ्यात प्रशिक्षण केंद्र चालवतात. त्या वेळी इथे चार फूट ते दहा फूट उंचीचे हिम असते. आता तिथे हिम नव्हते त्यामुळे आम्ही पुढे गेलो नाही. नारकंडाच्या टेकडीवर टूरिझमचा बंगला आहे.

तिथे जेवणाचा स्टॉप होता. गावात स्वस्त पदार्थ मिळत असूनही, टूरवाले प्रवाशांना भोजनासाठी टूरिस्ट बंगल्यातच आणतात. इथे ड्रिंक्सची सोय आहे. शाकाहारी व मांसाहारी भोजन मिळते. फक्त रेट्स गावातील हॉटेलच्या दुप्पट आहेत. या बंगल्यात चार सूट्स आहेत आणि त्यांचे भाडे ५० ते ७५ च्या दरम्यान आहे. हिमालयातील पहिले सफरचंदाचे झाड या टेकडीवर लावले होते, अशी आख्यायिका सांगतात.

इथून आठ किलोमीटर अंतरावर Hatu Peak आहे. तिथे स्कीपॉईंट्स आहेत. हिवाळ्यात धुक्यात किंवा हिमवर्षावातही दिवे लावून, टूरिस्ट बसेस चालू असतात. क्वचित हिमवर्षावाने एक-दोन दिवस रस्ता बंद होतो. मग मिलिटरीचे लोक बुलडोझरच्या साहाय्याने तो साफ करतात.

### तिओग

आमचा शेवटचा स्टॉप होता तिओग किंवा प्रेमघाट. सिमल्यापासून ३२ किलोमीटर अंतरावरील या ठिकाणाहून, रोहरू व्हॅलीचे सुंदर दृश्य दिसते. हे हिमाचल प्रदेशचे पोटॅटो मार्केट आहे. खाली एक तळे असून ते फिशिंगसाठी प्रसिद्ध आहे. इथे दहा मिनिटांचाच स्टॉप होता. गावातील छोट्या हॉटेलमध्ये चांगला चहा मिळाल्यामुळे आम्ही खूष झालो. संध्याकाळी पाचच्या सुमाराला आम्ही सिमल्याच्या दिशेने निघालो तेव्हा ढग आले होते. पावसाची हलकी सरही येऊन गेली आणि अंधारले. मध्यंतरी काही वेळ तर चक्क ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. वनवेमुळे बस स्टँडवर जात नाही म्हणून ड्रायव्हरने आम्हा सर्वांना लिफ्ट असलेल्या टॉवरजवळ सोडले तेव्हा समजले की पॉवर नसल्यामुळे गेला तासभर लिफ्ट बंद आहे, कधी सुरू होईल ते माहीत नाही. बंद लिफ्टजवळ एक जाडाजुडा पंजाबी वाटणारा माणूस, भडक मेकअप केलेल्या पत्नीसह व मुलासह उभा होता. तो पाकिस्तानातून आला होता. मालरोडवर टॅक्सी नेता येत नाही. ती खालीच सोडावी लागते व लिफ्टने वर जावे लागते. तो मालरोडवरच्या कोणत्यातरी लॉजवर उतरला होता. भला मोठा चढ चढून जाणे त्याला शक्यच नव्हते. लिफ्ट बंद आहे म्हणून तो अक्षरशः शिव्या घालत होता. 'सगळी दुनिया फिरलो पण असे शहर पाहिले नाही. लिफ्ट बंद ठेवतात म्हणजे काय? जनरेटर लावायचा, त्यात डबाभर रॉकेल ओतायचे की झाली लिफ्ट सुरू— अशी त्याची बडबड चालू होती. शेजारी एक फॉरिनर

जोडी होती. तिच्याकडे पाहून तो म्हणाला, "कशाला हे पागल लोक इंडियात येतात अशी फजिती करून घ्यायला कोण जाणे. मला हिंदुस्थानला पन्नास शिव्या द्यायच्या आहेत— पण काय करू? मला इंग्रजी येत नाही— नाहीतर त्यांना सांगितलं असतं की इथे येऊ नका. आम्ही सिमल्यात येऊन फसलो तेवढे पुरे."

एक स्थानिक, श्रीमंत प्रौढ जोडपे आमच्यासमोरच कारमधून उतरले व लिफ्टकडे आले. पुरुष पन्नाशीतला पण सडपातळ आणि बायको पंचेचाळीसची पण जाडजूड. लिफ्ट बंद असल्याने वैतागलेली. तो मिस्कीलपणे विचारू लागला, "मग चढ चढून मालरोडवर शॉपिंगला जायचे की घरी परतायचे?" ती चिडून म्हणाली, "मला आज शॉपिंग करायचेच आहे." आम्ही लिफ्टचा नाद सोडून बसस्टँडकडे निघालो. ते जोडपे आमच्या पुढेच होते. एक चढ चढताच बाईसाहेब थकल्या आणि म्हणाल्या, "जाऊ दे. उद्याच करू शॉपिंग." खिसा खाली होण्याचे तहकूब झाले, या आनंदात पतिराज खुषीत परतले. सहलीची ही गंमत असते. माणसांचे नाना नमुने पाहायला मिळतात. आमच्या टूरिस्ट बसमध्ये मुंबईचे एक जोडपे होते. बरोबर दोन लहान मुले. ऑफिस दोन वर्षांतून एकदा प्रवासखर्च देते. त्याचा फायदा ते घेत होते. तीन-चार वर्षांचा मुलगा ठीक होता; पण दुसरा वर्षभराच्या वयाचा, दर दहा मिनिटांनी कर्णकर्कश किंकाळी फोडत रडत होता. बाप त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत होता, तर आई शांतपणे पर्समधला आरसा काढून लिपस्टिक लावत होती. दोन दिवस ते आमच्याबरोबर साईटसीइंगला होते. त्यापैकी अर्धा ताससुद्धा मुलगा आईकडे नव्हता. पोराला कडेवर घेऊन चढउतारांचे रस्ते तुडवताना बाप मात्र कंटाळला होता.

दुसरे एक जोडपे तर बहाद्दरच होते. एक-दोन वर्षांचा मुलगा आणि दुसरे पाच-सहा महिन्यांचे तान्हे मूल. तिथेही आई मजेत आणि मूल बापाच्या खांद्यावर. पहिल्या पंधरा मिनिटांतच मुलाने बापाच्या खांद्यावर विधी केला आणि त्याच्या स्वेटरचा रंग बदलला. बरोबर त्याची दुपटी, दुधाची बाटली, गरम कपडे— एवढे छोटे मूल संध्याकाळी हिमालयातील थंडीने कुडकुडत होते आणि बाप शांतपणे त्याला मांडीवर घेऊन बसला होता. माझ्या मनात विचार आला— आपल्याकडल्या मराठी बापाने असे केले असते का? इतके लहान मूल घेऊन प्रवास करणे म्हणजे स्वतःचेही हाल आणि त्या पोराचेही हाल. शिवाय आमच्यासारख्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही शांतता मिळू शकत नाही. तुम्ही मस्त

मूडमध्ये गाणे गुणगुणत निसर्गसौंदर्य न्याहाळत असता आणि दर पाच मिनिटांनी किंकाळ्यांचे पार्श्वसंगीत चालू असते- असा सारा प्रकार. लिफ्ट बंद असल्यामुळे चालतच आम्ही आधी बसस्टँडवर गेलो. नंतर लॉजच्या दिशेने, पर्वत चढायला सुरुवात केली आणि तेवढ्यात पावसाची जोरदार सर आली. एका दुकानाच्या शेडमध्ये आम्ही आश्रय घेतला. पाऊस थांबल्यावर पुन्हा ५-१० मिनिटांचा वळणावळणांचा रस्ता ओलांडला, तर पुन्हा मोठी सर आली. त्यात आणखी पायाखालून, वरून वेगाने येणारे पाणी धावत होते. कुठे त्यात उघड्या गटाराची घाण मिसळली होती. लहान मुले धावत रस्ता उतरत होती. पायांतल्या चपला ओल्या झाल्याने सटकत होत्या. मग चक्क एका हॉटेलात घुसलो. चहा आणि गरमागरम शीख कबाब खाल्ले. पाऊस थांबल्यावर शेवटची उभी चढण चढलो. आता टनेलमधून पलीकडे जायचे होते.

## सिमल्यातील टनेल्स

सिमल्यामध्ये असे टनेल्स किंवा बोगदे चार-पाच ठिकाणी आहेत. सात वाजल्यामुळे अंधार झाला होता. टनेलमध्ये मंद दिवे होते; पण सिमल्याची विद्युल्लता कधी रुसेल सांगता येत नाही. 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' या म्हणीप्रमाणे मला सारखी भीती वाटत होती की, हा पाच-सात मिनिटांचा टनेलचा रस्ता ओलांडताना नेमकी मध्येच वीज गेली तर काय करायचे ? त्यात कुठे कुठे पाणी गळत असल्याने, निसरडे झालेले. एरवी हिलस्टेशनला पर्समध्ये छोटा टॉर्च असतो. पण सकाळी दहा वाजता बाहेर पडताना एवढा उशीर होईल, ही कल्पनाच नव्हती. जीव मुठीत धरून टनेल क्रॉस केला. शेवटचा कच्च्या रस्त्याचा चढ चढलो. आमच्या 'युनिक हॉटेल'मध्ये घुसलो. खोलीचे कुलूप उघडून आत पाऊल टाकले आणि त्याच मिनिटाला वीज गेली. नशीब, रस्त्यात गेली नाही. नाहीतर चढउताराचे रस्ते, पायाखालून खळाळणारे पाणी, शेवटचा कच्चा चिखली रस्ता, भिजलेल्या चपला, अर्धवट ओली साडी– सगळी फजितीची वेळ होती, पण नशीब बलवत्तर म्हणून सुखरूप आलो झाले.

## टूर नंबर ३

आता फक्त तीन नंबरची टूर राहिली होती. ही टूर सोमवार, गुरुवार व शनिवार असते. कुफ्री, इंदिरा हॉलीडे होम ही ठिकाणे दाखवून ती **चायल किंवा**

Chail या रम्य ठिकाणी जाते. दहा ते पाच या काळातील या स्थलदर्शनासाठी लक्झरी कोच प्रत्येकी चाळीस रुपये घेतो. यांपैकी अर्धी ठिकाणे आम्ही आधीच पाहिली होती. आम्हाला फक्त चायलला जायचे होते, तेव्हा आम्ही टॅक्सीची चौकशी केली. आणखी दोन जोडपीही मिळवली. टॅक्सी एरवी माणशी पन्नास रुपये घेते; पण आम्ही मात्र प्रत्येकी चाळीस रुपये देऊन, ड्रायव्हरशेजारच्या फ्रंटसीटस् मिळवल्या आणि चायलला निघालो.

## चायल

सिमल्यापासून त्रेचाळीस कि.मी. अंतरावर असून, त्याची समुद्रसपाटीपासून उंची २२५० मीटर आहे. या टेकड्यांवर पतियाळाचे राजे उन्हाळ्यात राहत असत. त्यांच्या तेथील सुंदर व कलात्मक राजवाड्याचे रूपांतर आता 'पॅलेस हॉटेल'मध्ये केले आहे. तिसऱ्या मजल्यावरील महाराजा व महाराणी सूट्सचा दर आहे सहाशे रुपये रोज. खालच्या मजल्यावरच्या सूट्सचे भाडे आहे १५० रुपये. हे सारे खास श्रीमंतांनाच परवडेल असे आहे. पॅलेस हॉटेलचा परिसर, तेथून खालच्या दऱ्यांचे दिसणारे सौंदर्य, भोवतालचे उद्यान, हिरवळ, राजेशाही झूले, कारंजी, कॅफेटेरिया, बार— सारे काही सुंदर आहे, पण मध्यमवर्गीयांना परवडण्यासारखे मात्र नाही.

चायलकडे जाणारा रस्ता इतका छान आहे की, तिथून हलावेसे वाटत नाही. हा भाग वनअभयारण्य असल्याने देवदार, ओक, चेरी वृक्षांची दाट झाडी आहे. विविध प्रकारचे पक्षी आहेत. एका बाजूला हिमालय पर्वताच्या रांगा दिसतात, तर दुसरीकडे रात्रीच्या अंधारात सिमला व कसौली येथील विद्युत्दीपांची ओळ दिसते. इथे हिवाळ्यात पडलेले हिम एप्रिलअखेरपर्यंत असते. चायल तीन टेकड्यांवर मिळून वसलेले आहे. 'पॅलेस हॉटेल' राजगढ हिलवर आहे. दुसरी टेकडी 'पांडवा हिल.' तिथे काही कॉटेजेस आहेत. कॉटेज असे म्हणायचे. प्रत्यक्षात दोन बेडरूम्स, किचन, डायनिंग रूम असलेल्या छोट्या बंगल्याच आहेत त्या. 'हिमनील' नावाच्या हॉटेलमध्ये त्यातल्या त्यात कमी खर्चात खोल्या मिळतात. विद्यार्थ्यांसाठी तिथे सवलतीचे दर आहेत. तिसरी टेकडी म्हणजे 'साध टिब्बा.' तिथे चायल गाव वसलेले आहे. गावातील एका ढाब्यात आम्हाला आठ रुपयांत फुलमिल मिळाले. मक्याची गरमागरम रोटी, पकोडे घातलेली कढी, चणामसाला आणि चावल. रोट्या तर चक्क साजूक तुपातल्या होत्या. सोबत

कांदा, मश्रुम आचार, पापड— इतके छान जेवण दुसरीकडे कुठेच मिळाले नाही.

चायलला राहायला हवे. पाईनवृक्षांच्या जंगलातून भटकायला हवे. लव्हर्स हिल, हनीडेल या निसर्गरम्य छोट्या जागांना भेट द्यायला हवी. सतलज नदीतील फिश खायला हवे, इथून ट्रेकिंग करायला हवे. पण तेवढी सवडही नव्हती आणि ताकदही नव्हती. सिमल्याशी स्पर्धा करून पतियाळाच्या महाराजांनी निर्माण केलेले हे शहर आवर्जून पाहण्यासारखे आहे.

आता आमची टॅक्सी चायलच्या प्रसिद्ध क्रिकेट ग्राऊंडकडे निघाली होती. हे क्रिकेटग्राऊंड जगातील सर्वांत उंच ग्राऊंड आहे. शेजारीच मिलिटरी स्कूल आहे. तेथील मुले येथे हॉलीबॉल, फूटबॉल खेळत होती. या टेकड्यांवर एवढा मोठा सपाट भाग तयार करून बनवलेले हे ग्राउंड उत्तम स्थितीत आहे.

शेजारीच फॉरेस्ट स्कूल व इन्स्पेक्शन बंगलाही आहे. रस्ते कमालीचे सुंदर आहेत. गाडीचे ब्रेक्स् मात्र उत्तम हवेत. वळणावळणांचे रस्ते व टेकड्या ओलांडत, आमची गाडी ५॥ च्या सुमाराला सिमल्यात पोचली. आज फारसे चालावे लागलेच नव्हते, तेव्हा हॉटेलवर वॉश घेऊन आम्ही लगेच बाहेर पडलो. स्कॅंडल पॉइंट, चर्च, हवाघर, रिज भागातून मालरोडला गेलो. सिमल्यातील अखेरची संध्याकाळ मजेत गेली. मनात सारखा विचार येत होता— बरे झाले, आत्ताच सिमल्याला आलो. आणखी पाच-दहा वर्षांनी आलो असतो, तर इथले चढउतारांचे रस्ते चढणे अवघड झाले असते.

काश्मीर, मसुरी, नैनीताल, दार्जिलिंग ही सगळी हिलस्टेशन्स आम्ही पाहिली आहेत. सिमल्याचे स्वरूप मात्र पूर्ण वेगळे वाटले. कमर्शियल पण निसर्गरम्य— आयुष्यात एकदा तरी सिमल्याला जायलाच हवे.

# मनाली

वसंत बापट यांचे 'बारा गावचं पाणी' हे माझे अत्यंत आवडते पुस्तक आहे. त्यांच्या काव्यमय, लालित्यपूर्ण व कलात्मक भाषेत त्यामध्ये अनेक गावांची

निसर्गरम्य वर्णने आहेत. त्यात सर्वांत सुंदर वर्णन आहे मनालीचे. त्याला त्यांनी शीर्षकच दिले आहे– 'मनाली– माझी लाडकी !'

हिमालयाच्या कुशीतील कुलू खोऱ्यातील, खेड्यापेक्षा मोठ्या पण शहरापेक्षा लहान, अशा या नगरीचे सौंदर्य कुणीही प्रेमात पडावे असेच आहे. वसंत बापट म्हणतात– 'मनालीला कुणी जावे ? ज्यांचे हिशोब नेहमी चुकतात, ज्यांची घड्याळे हरवलेली असतात, जे यंत्रातून बाहेर घरंगळतात, प्रकाशझोतांनी चुरचुरणारे डोळे ज्यांना निववायचे असतात. हिमालयात ज्यांना चौपाटी भरवायची नसते, त्यांनी निमूटपणे जावे मनालीकडे. ती या किरकिरणाऱ्या बाळांना थोपटीत अंगाई म्हणेल.'

चाकोरीच्या बाहेर, गर्दीपासून दूर जाऊ इच्छिणाऱ्या रसिकांना 'मनाली' हाकारत असते. एकदा आपण तिथे पोचलो की, ती आपल्यावर मोहिनी टाकते आणि आपण झपाटले जातो.

मनालीला पोचणे मात्र सोपे नव्हते. सिमल्याहून सकाळी आठला डिलक्स कोचने सुरू झालेला आमचा प्रवास संध्याकाळी सहा वाजता संपला. पण हा प्रवास म्हणजे एक अनोखा अनुभव होता. त्यात चित्तथरारकता होती. सपाट रस्ता असा जवळजवळ नव्हताच. सारी डोंगरखोरी आणि तीही नागमोडी वळणांची. बियास किंवा व्यास नदीच्या किनाऱ्याची सोबत धरून, देवदार वृक्षांच्या झाडीतून, चिंचोळ्या नागमोडी रस्त्याने वाट काढत काढत बस जात होती. दोन्ही बाजूला उंच कडे, खाली पाहिले तर डोळे फिरतील असे– विशेषतः मंडी, हे जे जिल्ह्याचे गाव आहे, तिथपासून ते कुलूपर्यंतचा रस्ता फारच अवघड, धोकादायक व वळणावळणांचा होता. मंडी हे मंदिरांचेच शहर– शिवरात्रीला तिथे मोठा उत्सव असतो. हिमाचल टूरिझमचा भलामोठा देखणा टूरिस्ट लॉज तिथे आहे. पण आम्ही मात्र तिथे मुक्काम केला नाही. कुलू खोरे म्हणजे देवभूमी. सगळीकडे मंदिरेच मंदिरे– पाहणार तरी किती ? त्यात मी फारशी आस्तिकही नाही. म्हणून तर आम्ही कुलूलासुद्धा मुक्काम केला नाही. एक दिवस मनालीहून जाऊन कुलूची ठळक प्रेक्षणीय स्थळे पाहिली आणि परत आलो.

## परिसरातील रम्य स्थळे

बालकवींप्रमाणे–

*'सुंदरतेच्या सुमनावरले दव चुंबुनि घ्यावे ।*

*चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे ॥'*
ही माझी वृत्ती. मनालीत चार दिवस राहूनही समाधान झाले नाही ते निसर्गप्रेमामुळेच.

कुलू ते मनाली या तासाभराच्या रस्त्यातसुद्धा कितीतरी निसर्गरम्य गावे आहेत. हिंदू आणि शीख दोघांनाही पवित्र वाटणारे **'मणीकरण'** गाव आहे. हिंदूंच्या मते ते शिवपार्वतीशी संबंधित आहे, तर शीखांचा मोठा गुरुद्वारा तिथे आहे. शिवाय तिथे गरम पाण्याचे झरे आहेत. मनालीहून टूरिस्ट कोचने व्हाया मणीकरण— कुलू अशी एक टूर जाते. त्या टूरने आम्ही ते गाव पाहिले.

दुसरे रम्य ठिकाण म्हणजे **'नग्गर'**. कुलू खोऱ्याची ही जुनी राजधानी. तिथली रोरिच आर्ट गॅलरी प्रसिद्ध आहे आणि किल्ल्याचेच रूपांतर आता टूरिस्ट बंगल्यात केले आहे. आम्ही तिथे एक पूर्ण दिवस घालवला. **'कटरिन'** हे रस्त्यावरचे गावही निसर्गरम्य आहे. तिथल्या टूरिस्ट बंगल्यात राहून नग्गरला जाऊन येता येते. कुलू व्हॅलीतील हा सर्वांत रुंद भाग. नदीकाठी असलेले तेथील 'रिव्हर व्ह्यू गेस्ट हाऊस' फार सुंदर आहे. रूमला ७५ रु. भाडे आहे किंवा चार खोल्यांचे कॉटेज २७५ रु. भाड्याने मिळते. इच्छा असूनही वेळेअभावी तिथे मात्र राहता आले नाही.

'मंडी' शहरापासून सुरू होणारी आणि मनालीला संपणारी ही 'कुलू व्हॅली' ८० कि.मी. लांब आणि जेमतेम १॥ ते २ कि.मी. रुंद आहे. एका बाजूला बियास नदी आणि दुसऱ्या बाजूला हिमालयाची शिखरे असलेली ही दरी, जगातील सर्वांत अरुंद दरी मानली जाते.

## मनालीला कसे जावे ?

कुलू आणि मनाली ही दोन्ही शहरे बसने अनेक मोठ्या शहरांशी जोडलेली आहेत. दिल्ली-कुलू अंतर बसने ७९६ कि.मी. आहे. अंबाला - जालंधर - पठाणकोट व तिथून कुलू असा तो मार्ग आहे. सिमल्याहून बसने व्हाया मंडी-बिलासपूर-कुलू २७२ कि.मी. वर आहे. कुलू व मनाली या दोन्ही ठिकाणांहून चंदीगड, धर्मशाळा, मंडी, सिमला आणि पठाणकोट येथे बसेस जातात. चंदीगड, दिल्ली व सिमला येथून व्ही.डी.ओ. डिलक्स कोचने जाता येते.

भुंतर विमानतळ कुलूपासून फक्त १० कि.मी. अंतरावर आहे. ज्यांच्याकडे वेळ कमी असेल त्यांनी दिल्लीहून किंवा चंदीगडहून विमानाने भुंतरला यावे

आणि सुमारे तासाभराचा बसप्रवास करून किंवा टॅक्सीने मनालीला जावे.

३० एप्रिलला सकाळी ८ ला डिलक्स कोचने आम्ही सिमल्याहून मनालीला निघालो. वाटेत लहान लहान गावे लागत होती. एका धाब्यात गरम आलू पराठे व दहीभात मिळाला. दुपारी चहाबरोबर पकोडे व सामोसे मिळाले. पुन्हा सारे स्वस्त व मस्त. सिमल्याच्या महाग व बेचव पदार्थांच्या पार्श्वभूमीवर हे सारे फारच छान वाटले. सफरचंदांच्या बागांच्या प्रदेशात असल्याने कुठेही थंडगार ॲपल ज्यूस १॥ रुपयात मिळत होता. कोणत्याही कोल्ड्रिंकपेक्षा स्वस्त व चवदार. संध्याकाळी ५ च्या सुमाराला कुलू आले आणि सहा वाजता आम्ही 'मनाली' बसस्टँडवर उतरलो. एजंटांनी आम्हाला घेराओ घातला.

## निवासव्यवस्था

ऑफ सीझन असल्यामुळे हॉटेलमध्ये भरपूर जागा होती. दहा तासांच्या प्रवासाने थकवा आला होता. जवळच्याच एखाद्या हॉटेलात मुक्काम करावा, असे वाटत होते. आमच्या पद्धतीप्रमाणे मी सामानासह स्टँडवर थांबले. 'हे' १०-१५ मिनिटांमध्ये जवळपासची काही लॉजेस् पाहून आले. 'सम्राट' आणि 'शिवालिक' ही दोन लॉजेस् चांगली होती. फरकच सांगायचा तर 'सम्राट'मध्ये गर्दी होती. 'शिवालिक' शांत होते. 'बियास' हॉटेलही छान होते, पण ते नदीपलीकडे थोडे दूर होते. शिवाय हिमाचल टूरिझमचे असल्यामुळे महागही होते. स्टॅन्डपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या 'शिवालिक' हॉटेलमध्ये आम्हाला पन्नास रुपयांत ॲटॅचबाथ रूम मिळाली. ह्याच रूमला सीझनमध्ये १०० रुपये पडतात. दुसऱ्या मजल्यावरची खोली हवी असेल तर, ऑफ सीझनमध्ये ७५ रु. व सीझनमध्ये १५० रु. पडतात. हॉटेल डिसेंट तर होतेच, पण नवे असल्याने सर्व्हिसही छान होती. बाजार अगदी जवळ होता आणि तरीही लॉज आतल्या बाजूला असल्याने गोंगाट नव्हता. स्टॅन्डसमोरच्या लक्ष्मी धाब्यामध्ये शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारचे जेवण उत्तम मिळत होते. दोन चांगल्या बेकऱ्या होत्या. ब्रेड, बिस्किटे उत्तम मिळत होती. लॉजच्या अगदी समोरच 'तिबेटी बाजार' होता. तिथे अनेक आकर्षक, छोट्या वस्तू विक्रीला ठेवलेल्या होत्या. कुलूच्या प्रसिद्ध वुलन शाली अनेक दुकानांतून विक्रीसाठी ठेवलेल्या दिसत होत्या. हे मनालीचे पहिले 'दर्शन'.

हॉटेलमध्ये खोलीत प्रवेश करताच मन प्रसन्न झाले. डबल बेड, यू फोम

गाद्या, व्हेल्वेटच्या दुलया, पायाला गार लागू नये म्हणून पसरलेला गालिचा, टीपॉय, दोन सुरेख खुर्च्या, कपड्यांसाठी आरशाचे कपाट, चारी बाजूंना लॅम्प शेड्स, स्वच्छ व मॉडर्न बाथरूम– शॉवर– गरम पाणी– मनालीतील वास्तव्य सुखद होणार यात शंकाच नव्हती. आणि तसेच झाले. तिथला वेटर 'विजय' तिबेटी होता, पण कामात इतका तत्पर होता की, आपण बेल वाजवून दाराकडे वळेपर्यंत तो दारावर टकटक करायचा. दार उघडताच– 'गुड मॉर्निंग' म्हणून कामाला सुरवात. हॉटेलचे मॅनेजर श्री. थापा जातीने विचारपूस करायचे. त्यांच्याशी गप्पा मारता मारता मी त्यांना सांगितले की मी लेखिका व पत्रकार आहे आणि 'मनाली'वर जो लेख लिहीन, त्यात तुमच्या हॉटेलचा आवर्जून उल्लेख करेन, तेव्हा ते फारच खूष झाले. आपल्या हॉटेलची कीर्ती आता पुण्या-मुंबईपर्यंत जाणार म्हणून आनंदी झाले. निवास व भोजन यात सहलीचे निम्मे यश सामावलेले असते. ते समाधान आम्हाला इथे मिळाले.

निवासाच्या दृष्टीने 'मनाली'त बऱ्याच सोयी आहेत. टूरिझम कार्पोरेशनचे जुना व नवा असे दोन टूरिस्ट बंगले आहेत. त्यातील डबलरूमचे रेटस् शंभर ते सव्वाशे आहेत. 'बियास' लॉजचे भाडे खोलीच्या आकारानुसार पासष्ट ते दीडशे या दरम्यान आहे. टूरिझमची कॉटेजेस् फार सुरेख आहेत. कॉटेजमध्ये दोन सुंदर सूट असतात. एका दोन रूमच्या सूटचे भाडे दीडशे रु. रोज आहे. अशी सहा कॉटेजेस् उपलब्ध आहेत. भोवती गार्डन, झूले वगैरे सोयी आहेत. हे बंगले व ही कॉटेजेस निवांत ठिकाणी 'हिडंबा मंदिरा'च्या पायथ्याशी आहेत. 'यूथ होस्टेल' लांब आहे; पण त्याचे दर फक्त पाच रुपये परहेड असून तिथे चाळीस बेडस्‌ची डॉरमेटरी उपलब्ध आहे. थोडक्यात, सर्वांच्या खिशाला परवडेल अशी निवासव्यवस्था इथे उपलब्ध होऊ शकते.

तोच प्रकार भोजनाचाही आहे. स्टॅन्डसमोर तीन-चार चांगले धाबे आहेत. 'शेरे पंजाब' मध्ये नॉनव्हेज जेवण चांगले मिळते. 'मद्रास हॉटेल'मध्ये इडली डोसे व शाकाहारी राईस प्लेट मिळते. ब्रेड-आमलेटचा नाश्ता मॉडरेट रेटने मिळतो. 'मनाली' सिमल्यापेक्षा जास्त सुंदर असूनही छोटे असल्याने स्वस्त वाटले. अलीकडे मात्र काश्मीरमधील अशांततेमुळे 'मनाली'तही गर्दी व महागाई वाढलेली असण्याची शक्यता आहे.

मनाली गाव चिमुकलेच. त्याची एरिया आहे जेमतेम पाच किलोमीटर आणि स्थानिक लोकसंख्या फक्त दोन हजारांची. एप्रिल ते नोव्हेंबर इथे चांगला

सीझन असतो.

## 'मनाली' नाव कसे पडले?

'मनाली'चे मूळ नाव होते Duff-Danbar (डफ डनबार). डफ डनबार हा मनालीत राहणारा युरोपियन अधिकारी होता. अजूनही धुंग्री भागाजवळच्या टेकडीवर त्याचे 'डफडनबार' याच नावाने ओळखले जाणारे घर आहे. काही लोकांच्या मते या खोऱ्यातून वाहणाऱ्या 'मनालसु' नदीमुळे या गावाला 'मनाली' नाव मिळाले, तर काहींच्या मते मनुस्मृती ग्रंथ लिहिणारा मनु हा प्रलयानंतर बोटीतून या ठिकाणी आला होता. त्याच्यावरून या जागेला 'मनू-आलय' (मनूचे घर) असे नाव पडले आणि नंतर त्याचे रूपांतर 'मनाली'त झाले. जवळच्या खेड्यात आजही मनूचे छोटे मंदिर आहे.

## 'मनाली'तील निसर्ग

'मनाली'चे माऊंटनेअरिंग डिपार्टमेंट (पर्वतारोहण विभाग) प्रसिद्ध असून, इथे हिवाळी खेळांचे प्रशिक्षण देतात. टूरिझमतर्फे ट्रेकिंग स्पर्धा आयोजित केली जाते. ट्रेकिंग करणारे तरुण उघड्या आभाळाखाली तंबू उभारून, निसर्गाच्या सान्निध्यात राहतात. हिरव्यागार कुरणात आणि हिमशिखरांच्या सहवासात मनसोक्त भटकतात. देवदार वृक्षांची जंगले आणि पांढऱ्याशुभ्र पाण्याचे झरे त्यांना खुणावत असतात. त्यांच्या उत्साहाचा अक्षरशः हेवा वाटतो.

मार्चमध्ये प्लमची झाडे फळांनी लगडलेली असतात. उन्हाळ्यात निळ्याजांभळ्या फुलांनी परिसर शोभिवंत होतो. पांढऱ्या रानटी गुलाबांचा मंद सुवास आसमंतात पसरलेला असतो. 'मे' महिन्याच्या मध्यावर मनालीच्या प्रसिद्ध हिडंबा मंदिरात जत्रा भरते– तेव्हाच काय ती गर्दी– नाहीतर एरवी मनाली फारच शांत व निवांत आहे. तिथला निसर्गदेखील शांत आहे. रौद्र नाही. हिमालयाच्या सान्निध्यात असली तरी मनालीत हिम नाही. दोन्ही बाजूला देवदारांची जंगले, मध्ये एकच एक लांबलचक रस्ता, खळाळणारे बियास नदीचे संथ पण फारसे खोल नसलेले पात्र, नदीपलीकडे जाण्यासाठी एक लाकडी नाजूक पूल, कोकरे हातात घेऊन मेंढ्यांपाठीमागे जाणारे धनगर, चिमुकली मंदिरे– असे मनालीचे चित्र रेखाटता येईल. स्टँडशेजारीदेखील मुद्दाम देवदाराचे जंगल राखले आहे. चिमुकल्या पायवाटांनी या जंगलातून फिरताना

किंवा टेकडीवरील हिडंबामंदिरात जाताना जो आनंद मिळतो, तो वर्णनाच्या पलीकडचा आहे. 'सनशाईन', 'पाईनवुड' वगैरे हॉटेल्स या मंदिराच्या आसपास आहेत. सफरचंदांच्या बागाही विपुल आहेत; पण दुर्दैवाने आम्ही गेलो तेव्हा त्यांचा सीझन नव्हता.

### हिडंबा मंदिर

हिमालयाच्या कुशीतील, आडबाजूला असलेल्या, या छोट्याशा गावाचे संरक्षण करणारी संरक्षक देवता मात्र जबरदस्त आहे. पश्चिमेकडच्या जंगलातील एका उंच टेकडीवर, देवदार वृक्षांच्या सान्निध्यात हिडंबा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर एक हजार वर्षांपेक्षा जास्त जुने असून, पॅगोडाटाईप आहे. मंदिराच्या उभारणीत लाकडाचा विपुल वापर केला आहे. या हिडंबा देवीला 'हिरमा देवी' असे दुसरे नाव आहे. धुंग्रीमंदिर अशा नावानेही हे मंदिर ओळखले जाते. मंदिराकडे जाणारा मोटारेबल रोड लांबून वळसे घेत जाणारा आहे. दुसरा रस्ता छोट्या पायऱ्या पायऱ्यांचा, पायवाटेसारखा, देवदारांच्या झाडांमधून वाट काढणारा आहे. देवदारांचे हे गगनचुंबी वृक्ष फारच सुंदर दिसतात. त्यांच्या जंगलातून, काही सूर्यकिरण मधूनच नजर चुकवून, हिरवळीवर पोचतात आणि जमिनीवर रांगोळी रेखाटतात. चारी बाजूंना टेकड्या, त्यांची हिमाच्छादित शिखरे हे दृश्य मनमोहक असते. खाली नजर टाकली तर मनालीची चिमुकली घरे, आकर्षक कॉटेजेस्, टूरिस्ट बंगले नजरबंदी करतात. हे हिडंबा मंदिर म्हणजे मनालीचे आकर्षण केंद्र आहे. दगडी उंच प्लॅटफॉर्म आणि त्यावर लाकडी नक्षीकाम असलेले मंदिर अशी रचना आहे. मंदिराच्या भिंती लाकडी असून त्यावरही थोडेफार कोरीव काम आहे. मंदिराचे प्रवेशद्वार छोटे असल्यामुळे वाकून आणि नम्र होऊनच आत शिरावे लागते. आत गेल्यावरही अंधारात पटकन मूर्ती दिसत नाही. कारण ती गुहेसारख्या खोलवरच्या भागात आहे. एक प्रौढ हिमालयीन सुंदरी मंदिराची माहिती देत होती. ह्या मंदिराची जागा खूपच निसर्गरम्य आहे.

### हॉटेल चंद्रतल व साबा

संध्याकाळी आम्ही बियास नदीकाठच्या 'बियास हॉटेल'च्या बाजूला फिरायला गेलो. तिथून जवळच 'चंद्रतल' असे सुरेख नाव असलेले आकर्षक

हॉटेल दुसऱ्या मजल्यावर आहे. तेथील डायनिंग हॉलला चारी बाजूंनी मोठ्या काचेच्या खिडक्या आहेत— त्यांतून समोरच्या टेकड्या आणि गगनचुंबी वृक्षांचे छान दृश्य दिसते. बियास नदीला आणखी दोन नावे आहेत— एक व्यास आणि दुसरे चंद्रभागा. चंद्रा आणि भागा अशा दोन छोट्या नद्या एकत्र येऊन ती निर्माण होते. तिच्या पायथ्याशी असलेले हॉटेल म्हणून त्याचे नाव 'चंद्रतल' हॉटेल— हॉटेल आहे श्रीमंतांसाठीच. आम्ही तिथे फक्त चहाचा ट्रे मागवू शकलो.

परत येताना गावाच्या बाजूला कॉर्नरवर 'साबा' नावाचे एक छोटे कॅफेटेरिया लागले. जंगलची पार्श्वभूमी असलेले हे चिमुकले हॉटेल तरुणांचे— विशेषतः हनीमूनसाठी येणाऱ्या जोडप्यांचे आवडते आहे. हिरवळीवर गार्डन चेअर्स मांडलेल्या, दोन दिवसांनीच पौर्णिमा असल्याने लख्ख चांदणे पडलेले, अंगावर शिरशिरी आणणारी थंडगार हवा, असे सुरेख वातावरण होते. तिथे चीज पकोडे व आइस्क्रीम छान मिळाले.

### तिबेटी बाजार

आमच्या हॉटेलसमोरच तिबेट बाजार होता. वेगवेगळ्या रंगांचे दगड कट करून तयार केलेले नेकलेस, पर्सेस, फोल्डिंग बॅगस्, पावडर, सेंट, शाम्पू, सुगंधी साबण, छोट्या मुलांचे ड्रेस, खेळणी अशा अनेक इंपोर्टेड वस्तू तिथे उपलब्ध होत्या. बार्गेनिंग केल्यानंतर त्यांच्या किमती कमी होत होत्या. कुलू शाली, स्वेटर, मफलर, तिबेटी ड्रेस, कुलूच्या प्रसिद्ध टोप्या— इतर दुकानांपेक्षा स्वस्त किमतीला होत्या.

### साईटसीईंग टूर्स

मनालीचे टूरिस्ट ऑफिस अगदी स्टॅन्डला लागूनच आहे. तिथून तीन प्रकारच्या टूर्स निघतात. १. कुलू व मणीकरण, २. रोहतांग पासला जाणारी आणि ३. पुरेसे प्रवासी असतील तर नग्गरला जाणारी. तिसरी टूर बंदच होती. आम्ही ४५ रुपये प्रत्येकी देऊन दुसऱ्या दिवशीचे रोहतांग पास टूरचे रिझर्वेशन करून टाकले.

हिमालयाची हवा आणि निसर्ग क्षणाक्षणाला रूप बदलणारे आहेत. 'क्षणात येते सरसर शिरवे । क्षणात फिरूनि ऊन पडे ॥' असा अनुभव तिथे नेहमीच येतो. पाऊस आला म्हणून आपण धावतपळत आडोशाला जाईपर्यंत सर थांबतेही.

**रोहतांग पासटूर** : ही मनालीतील सर्वांत सुंदर टूर आहे. रोहतांग पासला बाराही महिने हिम असते, त्यामुळे खऱ्या अर्थाने हिमालयाचे दर्शन तिथेच घडणार होते. नेहरू कुंड, राहला वॉटर फॉल, मढी, राणी नाला अशी काही ठिकाणे या टूरमध्ये दाखवली जातात.

आमचा पहिला स्टॉप होता **नेहरू कुंड** मनाली-केलाँग रोडवर मनालीपासून ६ कि.मी. वर हे कुंड आहे. त्यात पाहण्यासारखे काही नाही. तीच गोष्ट भृगुझीलची. इथे थंड पाण्याचा छोटा झरा आहे. एक छोटे मंदिर आहे. अशी आख्यायिका सांगतात की, हा झरा प्राचीन असून, चौदा हजार फुटांवरून वाहत येतो. अर्थात हे खरे की खोटे हे समजायला मार्ग नाही. मनाली गाव हे असे मनू, व्यास, वसिष्ठ, भृगु अशा वेगवेगळ्या ऋषीमुनींशी आख्यायिकांनी जोडलेले आहे.

**सोलंग व्हॅली** : नंतर आम्ही सोलंग व्हॅलीत प्रवेश केला. ही व्हॅली मनालीपासून फक्त १३ कि.मी. वर असून तिथे माऊंटनेअरिंग डिपार्टमेंटचे होस्टेल आहे. मनालीची समुद्रसपाटीपासून उंची सहा हजार फूट आहे, तर या व्हॅलीची अकरा ते बारा हजार फूट. बर्फाच्छादित असताना इथे स्कीईंग करायला योग्य असे अनेक स्लोपस् (उतार) आहेत. आम्ही उन्हाळ्यात गेल्यामुळे त्या वेळी ही दरी हिमाच्छादित नव्हती. हिरवीगार कुरणे, मेंढरे घेऊन जाणारे धनगर आणि पर्वतारोहण करणारी तरुण मुले दिसत होती. व्हॅलीत जरी हिम नसले, तरी जवळच हिमाच्छादित शिखरे दिसत होती. रस्ताही नागमोडी वळणांचा झकास टाररोड होता.

**राहला वॉटर फॉल** : हा नंतरचा स्पॉट, मनालीपासून १६ कि.मी. अंतरावर आहे. धबधबा उंचावर असून खाली ग्लेशियर म्हणजेच हिमनदी आहे. मनालीला बूट, मोजे, रेनकोट या गोष्टी भाड्याने मिळतात. टूरिस्ट मंडळी त्या घेऊन आली होती. माझा पोशाख खास प्रवासाला योग्य, सुटसुटीत असा पंजाबी ड्रेसचा होता. पायांत बूटही होतेच. त्यामुळे घट्ट बर्फावरून चढण चढून, फॉलच्या दिशेने जायला मौज वाटत होती. बर्फावरून पाय सटकत असल्यामुळे सारेजण शेजाऱ्याचा आधार घेण्याचा प्रयत्न करत होते. कोणी खाली कोसळत होते, पुन्हा चढत होते. उतरताना तर फारच फजिती झाली. एका साडीवाल्या बाईने हातात छोटी काठी घेऊन, खाली बसून, चक्क घसरायला सुरवात केली. सारे नवरे आपल्या बायकांना आधार द्यायला जात होते आणि त्यांच्याबरोबर आपणही

पडत होते. एक जोडपे कसेबसे तोल सावरीत खाली येत होते. तेवढ्यात वरून वेगाने येणारे एक दुसरे जोडपे त्यांच्यावर आदळले आणि सारेजण एकमेकांच्या पायांत पाय अडकून पडले. बूट न घालता आलेल्यांचे पाय थंडीने काकडले. आमच्याबरोबर मुंबईचे एक महाराष्ट्रीयन कुटुंब होते. त्यातील वडीलधारी मंडळी बसमध्ये बसून फॉलचे सौंदर्य न्याहाळीत होती. आपल्या छोट्या मुलांनाही त्यांनी बर्फात खेळायला मनाई केली होती. आम्ही मोठी माणसे, मोठेपण विसरून एकमेकांच्या अंगावर बर्फाचे गोळे फेकत होतो आणि ती मुले मात्र चिमणीएवढे तोंड करून दुरूनच आमचा खेळ पाहत होती. मला त्या वडीलमंडळींचा संताप आला. बरे, तिथे धोकादायक काहीच नव्हते. पोरे घसरलीच असती, तर घसरत बस जिथे उभी होती तिथेच पोचली असती; पण काही माणसे खऱ्या अर्थाने आनंद लुटूच शकत नाहीत. तासाभराच्या बर्फक्रीडेनंतर, नाइलाजाने, आम्ही बसमध्ये बसलो. या टूरमध्ये इतकी सुरेख निसर्गरम्य स्थळे होती की, आम्ही अर्धा कलर रोल म्हणजे तीस ते चाळीस फोटो इथे संपवून टाकले. हिमवर्षावाचा आणि हिमातील खेळांचा अनुभव इथेच घेता आला. इतरत्र दुरूनच बर्फाच्छादित शिखरे पाहावी लागली.

बसमध्ये चढल्यानंतर खूपच थंडी वाजू लागली, तेव्हा हळूच बरोबरचा छोटा थर्मास उघडून आम्ही गरमागरम चहाचे घुटके घेतले. अख्ख्या बसमध्ये फक्त आमच्याकडेच थर्मास होता. सारे प्रवासी आमच्या वाफाळलेल्या चहाकडे अगदी हेव्याने पाहत होते. कारण आणखी तासभर तरी रस्त्यात कोणतेच हॉटेल लागणार नव्हते.

**मढी** : राहला फॉलच्यावर टेकड्या चढून गेल्यावर, मनालीपासून ३५ कि.मी. अंतरावर मढी गाव येते. रोहतांग पास किंवा लाहौल व्हॅली, यांपैकी कुठेही जाणाऱ्या प्रवाशांना इथे लंचब्रेक घ्यावाच लागतो. मढी गावात दुसरे काही नाही, फक्त सात/आठ धाबे आहेत. आमची बस भोजनासाठी अर्धा तास तिथे थांबली. एका नेपाळी धाब्यात आम्हाला गरमागरम आलूपराठे आणि मसालेदार भाजी मिळाली. थर्मासमध्ये चहा भरून घेता आला. इथली ही हॉटेल्स छोटी असली, पदार्थ मोजकेच मिळत असले तरी ते चवदार होते. राजा रणजितसिंहाच्या काळात इथे युद्ध झाले होते आणि त्या वेळी बऱ्याच जणांचे दफन इथे केले होते, म्हणून या गावाचे नाव 'मढी' पडले, अशी माहिती गाईडने दिली.

**राणी नाला :** हिमाचल प्रदेशात मिलीटरीचे लोक यंत्राच्या व बुलडोझरच्या साहाय्याने, सकाळीच रस्त्यावरील हिम काढून टाकून रस्ते मोकळे करतात; पण पुन्हा काही काळाने हिम घसरत घसरत रस्त्यावर पोचते. रोहतांग पास तर पूर्णतः हिमाच्छादित होते त्यामुळे बस तिथपर्यंत जाणे अशक्य होते. आमच्या ड्रायव्हरने ६ कि.मी. अलीकडे असलेल्या राणी नाल्यापर्यंत बस नेण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजूला बर्फाचे कडे आणि मधून मोकळा केलेला छोटा रस्ता. काही ठिकाणी तर अक्षरशः बर्फ चिरत गाडी चालली होती. शेवटी एका वळणावर त्याने गाडी थांबवली. आम्ही प्रवासी खाली उतरलो आणि अक्षरशः बर्फातून चालू लागलो. मधूनच पावसाचे थेंब पडत होते. त्यापाठोपाठ हलकासा हिमवर्षावही होत होता. हिमकणांच्या त्या वर्षावात चालणे हा आगळाच अनुभव होता. पावसाचे प्रमाण वाढले, तेव्हा आम्ही नाइलाजाने आमच्या फोल्डिंग छत्र्या उघडल्या. पुन्हा इतर प्रवासी वैतागले. कारण ते भिजत होते. आम्ही तीन-चारदा हिमालयात प्रवास केला असल्याने तिथे छत्र्या, थर्मास, हातमोजे, बूट, टॉर्च या गोष्टींचा किती उपयोग होतो हे आम्हाला चांगले माहीत होते. आम्ही त्या तयारीनेच गेलो होतो. राणीनाल्यापासून रोहतांग पास ६ कि.मी. वर आहे, पण आम्ही तिथपर्यंत पोचू शकलो नाही. रोहतांग पास समुद्रसपाटीपासून सुमारे चार हजार मीटर्स उंचीवर आहे. तिथून केलाँगलाही जाता येते. आमची तिथे जाण्याची खूप इच्छा होती; पण मनालीत चार दिवस मुक्काम करूनही शेवटपर्यंत केलाँग बस काही सुरू झाली नाही ती नाहीच.

परत येताना, चहापानासाठी पंधरा मिनिटे बस 'मढी'ला थांबली. पाऊस आणि हिमवर्षाव चालूच होता. टेकड्यांवरचे बर्फ घसरून रस्त्यावर येत होते. त्या ओल्या, निसरड्या, वळणावळणांच्या रस्त्यावरून गाडी चालवणे अवघड होते; पण हिमाचलमधील ड्रायव्हर या कलेत कुशल असतात. आमच्या ड्रायव्हरने संध्याकाळी सहाला आम्हाला सुखरूप मनालीत आणले. तो दिवस व ती सहल अविस्मरणीय होती.

# नग्गर (Naggar)

मनालीतील वास्तव्याचा एक दिवस आम्ही नग्गर आणि कुलू या स्थलदर्शनासाठी राखून ठेवला होता. नग्गरची साईटसीईंग टूर प्रवाशांअभावी सुरूच झाली नाही. टॅक्सी तिथे जाऊन दोन तासांत परत येण्यासाठी २०० रु. मागू लागली, तेव्हा तिचा नाद सोडून देऊन आम्ही सकाळी नऊच्या सुमाराला चक्क एस.टी. बस पकडली आणि २५ कि.मी. वर असलेल्या नग्गर किल्ल्याच्या पायथ्याशी उतरलो. 'बियास' नदीच्या डाव्या किनाऱ्यावर नग्गर आहे, तर उजव्या किनाऱ्यावर कुलू, मनाली. नग्गरचा किल्ला नदीपासून ३०० मी. उंचीवर आहे. टॅक्सीज किल्ल्यावर जाऊ शकतात. मोटरेबल रोडने गेले, तर बऱ्याच लांबून नागमोडी वळणे घेत वर जावे लागते. आम्ही उभी चढण असलेला एक असा शॉर्टकट शोधून काढला की मोजून १० मिनिटांत किल्ल्याच्या दाराशी पोचलो.

नग्गर ही १४०० वर्षे कुलू खोऱ्याची राजधानी होती. सुमारे ४०० वर्षांपूर्वी राजा सिध सिंग याने नग्गरचा किल्ला बांधला. त्यासाठी नदीच्या दुसऱ्या बाजूच्या बारागड नावाच्या किल्ल्यातून दगड आणवले. ग्रहदेख नावाच्या गावापासून हे दगड कामगारांनी एकमेकांच्या हातात देत वर चढवले, असे म्हणतात. या किल्ल्याच्या पायथ्याशी बारागाव येथे राना भोसले यांची छोटी गढी आहे; पण १९०५ च्या भूकंपात त्याची बरीच पडझड झाली होती.

किल्ल्याच्या रस्त्याने जाताना पॅगोडा टाईप असलेले 'जगतीपत टेंपल' लागले. मंदिराशेजारी किल्ल्यातच राहण्यासाठी सात सूट्स् आहेत. रूमचे रेट ५० ते ७५ आहेत. डायनिंग हॉलमध्ये जुने शिसवी लाकडाचे कोरीव काम केलेले देखणे फर्निचर आहे. तिथला अटेंडंट गप्पिष्ट होता. त्याने आम्हाला नग्गरसंबंधी बऱ्याच आख्यायिका सांगितल्या. पहिली होती जगतीपत मंदिराबद्दल. ही जागा देवभूमी करायची असे ठरवून देवांनी काही मधमाशा

तयार केल्या आणि त्यांनी खपून किल्ल्यात देवांसाठी ही जागा तयार केली. अजूनही संकटकाळात कुलू खोऱ्यातील सर्व देवता या ठिकाणी एकत्र येतात.

किल्ल्यातील पॅलेसचेच रूपांतर आता सूट्स्मध्ये केले आहे. त्याच्या चारी बाजूला सहा फूट रुंदीचे लाकडी व्हरांडे आहेत. तिथून आजूबाजूची दऱ्याखोरी, खालची चिमुकली गावे, दुरून जाणारा रस्ता आणि रस्त्यावरची तुरळक वाहने यांचे विहंगम दृश्य दिसते. या व्हरांड्यात बसूनच आम्ही चहानाश्त्याचा आस्वाद घेतला.

**रोरिच आर्ट गॅलरी :** नग्गरला येण्याचे मुख्य आकर्षण होते रोरिच आर्ट गॅलरी पाहण्याचे. निकोलस रोरिच हा रशियन चित्रकार, १९२३ ते ४७ अशी चोवीस वर्षे इथे बंगला बांधून राहत होता. त्याचा मुलगा सोव्हेटोस्लाव्ह याच्याशी एकेकाळची गाजलेली चित्रतारका देविकाराणी हिने विवाह केला होता. सोव्हेटोस्लाव्हही कलाकार आहे. त्याची आर्ट गॅलरी बंगलोरला आहे. निकोलस रोरिच ४७ मध्ये मरण पावला, पण आजही त्याची बंगली उत्तम अवस्थेत ठेवलेली आहे. त्याचा मुलगा वर्षातून एकदा तरी आवर्जून इथे येतो. एरवी सारी व्यवस्था मॅनेजर शर्माजी पाहतात.

उंचावर असलेल्या या छोट्याशा निवांत दुमजली बंगल्यावर सर्व बाजूंनी वेली चढवलेल्या आहेत. बंगलीच्या तळमजल्यावरील तीन दालनांमध्ये, रोरिचची ३२ निवडक पेंटिंग्ज लावलेली आहेत. त्यावरून त्यांच्या कलाकौशल्याची कल्पना येते. एक रशियन चित्रकार भारतात येऊन, हिमालयाच्या कुशीत बंगला बांधून राहतो. इथल्या निसर्गाला आपल्या चित्रांमधून अमर करतो आणि निसर्गाच्या सान्निध्यातच मृत्यूला सामोरा जातो, हे सारेच रसिकांना वेडावून टाकणारे आहे. पंडित नेहरूंचा व या कलाकाराचा चांगला परिचय होता. नेहरूंनी ४७ साली दिलेले एक प्रशस्तिपत्रक तिथे फ्रेम करून लावलेले आहे. १९७४ मध्ये नग्गरला रोरिचची जन्मशताब्दी साजरी झाली. त्याला इंदिरा गांधी उपस्थित होत्या. त्यांचेही प्रशस्तिपत्र तेथे लावलेले आहे. आधुनिक संत व ऋषी अशा शब्दांत त्यांनी रोरिचचा गौरव केला आहे. मला पेंटिंग्जमधले फारसे कळत नाही. पण तरीही काही गोष्टी स्पष्टपणे जाणवल्या. निळा, पांढरा, गुलाबी आणि शेंदरी हे रोरिचचे आवडते रंग दिसले. आश्चर्य म्हणजे त्यात हिरवा रंग जवळजवळ नव्हताच. त्याचप्रमाणे आकाशातील विविधरंगी मेघ, हिमाच्छादित पर्वतशिखरे यांचीच पेंटिंग्ज जास्त दिसली.

हिमालयातील हिरवेगार गगनचुंबी वृक्ष किंवा देखणे स्त्री-पुरुष कुठेही आढळले नाहीत. रोरिचची नजर जमिनीकडे नव्हती तर आकाशाकडे होती, असे त्या प्रतिभावंताबद्दल जाणवले. रोरिच आर्ट गॅलरी पाहण्याचे स्वप्न पुऱ्या झाल्याच्या आनंदात आम्ही झपाझप किल्ला उतरलो. दुपारी तीनच्या सुमाराला कुलूकडे जाणारी बस आली. ती पकडून अर्ध्या तासात आम्ही कुलूला पोचलो. हा रस्ताही बियासच्या काठाकाठाने जाणारा होता.

नदीच्या या तीरावरील मनाली-नग्गर-कुलू हा रस्ता कच्चा आहे आणि त्या तीरावरील कुलू-कटराई-मनाली हा रस्ता टाररोड आहे. दोन्हीकडील निसर्गसौंदर्य मात्र अप्रतिम आहे. कुलूचा बसस्टँड नदीवरील लाकडी पुलाच्या पलीकडे आहे. नग्गरहून येणारी बस अलीकडच्या तीरावरच थांबली. आम्ही तो लाकडी पूल ओलांडून कुलू गावात प्रवेश केला.

# कुलू

कुलू हे हिमालयातील गाव असले, तरी ते उन्हाळ्यात उष्ण असते. इथे पाऊसही कमी पडतो आणि हिमवर्षावही होत नाही, पण तरीदेखील देवदार वृक्ष, बियास नदीचे सान्निध्य, हिरवीगार कुरणे यांमुळे त्याला एक सौंदर्य लाभले आहे. समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उंच असलेले 'कुलू' जिल्ह्याचे गाव आहे. त्याचे मूळ नाव होते कुलंतपीठ. प्राचीन काळी हिंदू लोक असे समजत की ही जागा म्हणजे लौकिक जगाचा अंत आहे आणि येथून पुढे देवभूमी सुरू होणार आहे. कुलू शहर कुलू व्हॅलीच्या साधारण मध्यावर आहे. येथील हिरवीगार कुरणे प्रसिद्ध असून, ट्रेकिंगचे बरेच मार्ग इथून सुरू होतात.

सामान्यतः मनालीला येणारी माणसे एखादा दिवस तरी कुलूमध्ये मुक्काम करतात. HPTC च्या टूरिस्ट बंगल्यामध्ये आठ डबल बेडरूम्स आणि चार डॉरमेटरी उपलब्ध आहेत. ITDC चा टूरिस्ट लॉज तर शहराबाहेरच्या छोट्याशा

टेकडीवरच आहे. तिथे सहा बेडरूम्स आहेत. पी.डब्ल्यू.डी. चे रेस्ट हाऊस आहे. काही ॲल्युमिनियमचे हट्स आहेत. दोन-चार खाजगी हॉटेल्सही आहेत, पण ती विशेष चांगली नाहीत. सीझनमध्ये दिल्ली आणि सिमला या दोन्ही ठिकाणांहून कुलूसाठी डीलक्स व्ही.डी.ओ. कोचने प्रवास करता येतो. शिवाय भुंतर विमानतळ कुलूपासून फक्त १० कि.मी. अंतरावर असून तेथे दिल्ली किंवा चंदीगडहून विमानाने जाता येते.

## मंदिरांचे शहर

कुलू हे मंदिरांचे शहर आहे. ३ कि.मी. अंतरावर एका टेकडीवर 'जगन्नाथीदेवी मंदिर' आहे. तर कुलूपासून ८ कि.मी.वर 'बिजलीमहादेव मंदिर' आहे. या मंदिराचा २० मीटर उंचीचा गगनचुंबी असा जो कळस आहे, तो विजेच्या आकाराचा आणि तेजस्वी आहे, म्हणून त्याचे नाव 'बिजली महादेव'. या मंदिराबद्दल अशी आख्यायिका सांगतात की, येथील महादेवाच्या मूर्तीला बिजलीचे फार मोठे आकर्षण आहे. वर्षातून एकदा कधीतरी या मूर्तीवर वीज कोसळते. मूर्तीचे तुकडे होतात. मग मंदिराचा पुजारी ते तुकडे जुळवतो आणि सातू व लोणी यांनी झाकून ठेवतो. मग मूर्ती पुन्हा जोडली जाते. आध्यात्मिक दृष्टी सोडली तरी नैसर्गिकदृष्ट्याही मंदिर फार सुंदर आहे. नदी व जंगल ओलांडून पायी पायी तिथे जावे लागते.

## वैष्णोदेवी टेंपल

कुलू-मनाली रस्त्यावर कुलूपासून चार कि.मी. अंतरावर बियास नदीच्या काठी उंचावर वैष्णोदेवी मंदिर आहे. नदीकाठी छोटा घाट असून तेथे महादेवीतीर्थ आहे. तिथे स्नान करून रस्ता ओलांडून बऱ्याच पायऱ्या चढून या मंदिरात जावे लागते. वैष्णोदेवी म्हणजेच महादेवी. आवारात शिव, राम आणि कृष्ण यांचीही मंदिरे आहेत. भक्तांना प्रसाद म्हणून भोजनाचा आग्रह केला जातो. नदीकाठी छोटी धर्मशाळा असून तिथे निवासव्यवस्था होऊ शकते.

## रघुनाथ मंदिर

कुलूतील सर्वांत प्रसिद्ध मंदिर म्हणजे रघुनाथ मंदिर. ते रघुनाथपुऱ्यामध्ये आहे. स्टँडपासून सुमारे एक कि.मी. अंतरावर हे छोटे मंदिर आहे. रघुनाथाचे

मोठे मंदिर, कुलू खोऱ्याची प्राचीन राजधानी असलेल्या 'सुलतानपूर' येथे आहे. तेथील मूर्ती दसऱ्याच्या वेळ कुलूमध्ये आणली जाते आणि 'धालपूर' नावाचे कुलूतील प्रचंड आकाराचे हिरवेगार कुरण आहे, तिथे त्याची तात्पुरती स्थापना केली जाते.

कुलूचा **दसरा उत्सव** हिमाचल प्रदेशातच नव्हे, तर भारतात प्रसिद्ध आहे. परदेशी मंडळीही त्याला आवर्जून येतात. कारण त्या वेळी कुलूखोऱ्याचा इतिहास, चालीरीती, लोककला यांचे खरे स्वरूप जवळून न्याहाळता येते. हा उत्सव विजयादशमीला सुरू होतो आणि नंतर सात दिवस चालतो. इथे रावणाच्या प्रतिमेचे दहन केले जात नाही. रघुनाथजी म्हणजे राम अयोध्येहून इथे आले ते दसऱ्याला, म्हणून इथे उत्सव असतो. पहिल्या दिवशी सुलतानपूरहून रघुनाथजींची मूर्ती कुलूत आणली जाते आणि विधीपूर्वक तिची स्थापना लाकडी कोरीव रथामध्ये केली जाते. मग सुरू होते रथयात्रा. लोक अहमहमिकेने, रथाला ओढण्याकरता पुढे सरसावतात. कारण त्यामुळे पुण्य मिळते. प्रथम पुजारी पूजा व प्रार्थना करतो. मग लोक रथ ओढून कुरणाच्या दुसऱ्या टोकाला नेतात आणि तिथे त्याची तात्पुरती प्रतिष्ठापना केली जाते. कुलू व्हॅलीतल्या अनेक देवता, आपले पुजारी व त्यांचे चेले यांच्यासह, बॅन्ड लावून वाजतगाजत या मिरवणुकीत सामील होतात. फुलांनी सजवलेल्या मूर्ती, बॅन्ड, मागे नटलेथटलेले स्थानिक लोक अशी ही मिरवणूक पहिल्या दिवशी संध्याकाळी निघते. कुलूच्या राजांचे कुलदैवत असलेली 'हिंडबादेवी' या यात्रेला मनालीहून येते आणि मगच यात्रेला प्रारंभ होतो. जमलू जमातीचा देव 'मलाना' हाही या जत्रेला येतो, पण तो नदीपलीकडे मुक्काम ठोकून, तिथूनच यात्रेवर लक्ष ठेवतो. त्या रात्री संगीत आणि नृत्य यांचा जल्लोष असतो. वातावरण शहनाईच्या सुरांनी आणि ढोलकीच्या तालाने भारावलेले असते. या यात्रेच्या निमित्ताने प्रदर्शने भरवली जातात, लोकनृत्ये सादर केली जातात. यात्रेसाठी मोठा बाजारही भरतो. ज्यात कुलूच्या प्रसिद्ध शाली, टोप्या, पट्टे वगैरे विक्रीसाठी ठेवतात.

यात्रेच्या अखेरच्या दिवशी सर्व मूर्ती रघुनाथजींच्या शेजारी आणतात आणि 'देवता दरबार' भरतो. नंतर रघुनाथजींचा रथ बियास नदीच्या काठी नेला जातो आणि छोटीशी गवताची पेंढी, लंकादहनाचे प्रतीक म्हणून जाळली जाते. नंतर रघुनाथजी त्या रथातून, आपल्या मूळ स्थानी सुलतानपूरला परत जातात आणि ही यात्रा संपते.

दहा हजार लोकसंख्येचे ७-८ कि.मी.चा विस्तार असलेले 'कुलू' हाताने विणलेल्या शाली व टोप्यांसाठी प्रसिद्ध आहे. वुलनच्या प्रमाणानुसार शालींच्या किमती शे/दीडशे होत्या. मी कुलूची आठवण म्हणून एक सुरेख शाल व कुलू टोपी खरेदी केली आणि कुलूचा निरोप घेतला.

वा. क्र.

# धरमशाला

चार मे ला सकाळी सातच्या मनाली-पठाणकोट डीलक्स व्ही.डी.ओ. कोचने आम्ही धरमशालेला गेलो. संध्याकाळी साडेचार वाजता आम्ही धरमशालेत पोचलो. तेथून पठाणकोट ९० कि.मी. वर आहे. 'उमरकैद', 'धरमवीर', 'चोरी चोरी' असे तीन चित्रपट व्ही.डी.ओ.वर पाहावे लागल्याने आमच्या सहनशक्तीचा अंत झाला होता. त्यात धरमशाळेला आम्हाला जे हॉटेल मिळाले तेही पुढे व्ही.डी.ओ. फिल्मस दाखवणारा हॉल असलेले, 'सन अॅन्ड स्नो' नावाचे. अर्थात आमची खोली मागच्या बाजूला असल्याने आम्हाला आवाजाचा त्रास झाला नाही. रूममध्ये चॅनल म्युझिकची सोय होती, पण म्युझिक ऐकण्याएवढीही ताकद उरली नव्हती.

## निवासव्यवस्था

कांग्रा व्हॅलीमध्ये धौलाधर पर्वत रांगांमध्ये वसलेले हे छोटे हिलस्टेशन दोन भागांत विभागलेले आहे. १. लोअर धरमशाला २. अप्पर धरमशाला. लोअर धरमशालेत नागरी वस्ती आहे. घरे, सार्वजनिक संस्था, शाळा-कॉलेजेस, ऑफिसेस, बाजार वगैरे. अप्पर धरमशाला म्हणजे कॅन्टोनमेंट एरिया. तिथे तिबेटिअन वस्तीही आहे. चीनने ज्या वेळी तिबेटवर ताबा मिळवला, त्या वेळी दलाई लामा व अनेक तिबेटी रिफ्युजी भारतात आले. ते इथे स्थायिक झाले आहेत. इथे मोठी बौद्ध मॉनेस्ट्री तर आहेच, पण 'अप्पर धरमशाला' हे तिबेटी

विद्येचे व कलांचे केंद्र बनले आहे. तिबेटी घरे व संस्कृती यामुळे ते 'लहान तिबेट' म्हणून ओळखले जाते. लोअर धरमशाला समुद्रसपाटीपासून ४१०० फूट उंच आहे, तर अप्पर धरमशाला ६५०० फूट. धरमशालेची अंदाजे लोकसंख्या १५ हजारांची असेल. तिथे पहाडी, हिंदी आणि पंजाबी भाषा बोलल्या जातात, थोडेफार इंग्रजीही चालते. बसस्टँड लोअर धरमशालेला आहे. तिथून ५, ७ मिनिटांच्या रस्त्यावर टूरिझमचे 'हॉटेल धौलाधर' आहे. हॉटेल झकास आहे, पण रेट्स जास्त आहेत आणि ऑर्डिनरी रूम शिल्लकही नव्हती त्यामुळे आम्ही 'सन अॅन्ड स्नो' मध्ये गेलो. तिथे ५० रु. अॅटॅचबाथ रूम मिळाली. रात्री ९.९॥ वाजताच आम्ही झोपलो, प्रवासाचा शीण जाणवत असल्याने दुसऱ्या दिवशी सकाळीही विश्रांती घेतली आणि दुपारी ३.३॥ ला 'अप्पर धरमशाला' बघायला गेलो.

धरमशाला गाव कांग्रा व्हॅलीमध्ये असून, कांग्रा येथील स्कूल ऑफ पेंटिंग प्रसिद्ध आहे. पीच, पिअर, प्लम आणि ॲप्रिकॉट अशी अनेक फळझाडे या खोऱ्यात विपुल प्रमाणात आहेत. धरमशालेच्या आसपास चहाचे मळेही आहेत. या खोऱ्यामध्ये 'पालमपूर' इथे ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी आहे आणि पाईन वृक्षाची जंगले आहेत. कांग्रा येथील मंदिर व वैजनाथ व ज्वालामुखी येथील मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत. या सर्वच ठिकाणांना भेटी देणे शक्य नव्हते, कारण आम्हाला अद्याप चंबा व्हॅलीमध्ये जायचे होते.

### फोरसिथगंज

लोअर धरमशालेपासून आठ कि.मी. वर अप्पर धरमशालेच्या मार्गावर 'फोरसिथगंज' हा भाग लागतो. तिथे लॉर्ड एलिगनचे मेमोरियल आहे. भारताचा हा व्हाईसरॉय १८६३ मध्ये धरमशालेला वारला. त्याचे दफन येथील सेंट जॉन चर्चमध्ये केले आहे. या चर्चच्या मोठ्या काचेच्या खिडक्या असून त्यावर नक्षीकाम आहे. 'फोरसिथगंज' येथून एक ट्रेकिंगचा मार्ग चंबा व्हॅलीकडे जातो.

### मॅकलोडगंज

नंतर आम्ही मिलीटरी एरिया ओलांडून, अप्पर धरमशालेमध्ये ज्या भागाला 'मॅकलोडगंज' म्हणतात, तिथे गेलो. इथून दललेक नावाचे सरोवर जवळच आहे, पण तिथे फारसे पाणी नाही, असे लोकांनी सांगितले. मॅकलोडगंज भागात

तिबेटी वस्ती बरीच आहे. घर, दुकान सगळीकडे तिबेटी लोक दिसतात. बाजारात स्त्रियाच दुकाने चालवतात. ड्रॅगन डिझाईनचे गालिचे, पितळी वस्तू व तिबेटी कलेचे दर्शन येथे घडते. या गालिचांच्या किमती हजारांच्या घरात असल्याने, फक्त नेत्रसुख घेऊनच समाधान मानावे लागते. इथला तिबेट बाजार छान आहे. फॉरिनची हवी ती वस्तू स्वस्तात मिळते.

इथे ८०% वस्ती तिबेटिअन लोकांची आहे. रस्त्याच्या कडेची छोटी दुकाने असोत किंवा मोठ्या शोरूम्स-- सगळीकडे तिबेटी विक्रेते आहेत. त्यातही बऱ्याचशा बायका असतात. येथील पुरुषांना दारूचे जबरदस्त व्यसन आहे. मिळणारा पैसा ते दारूमध्ये उडवतात. त्यामुळे मुलांना चांगले कपडे नाहीत, शिक्षण नाही, अशी त्यांची स्थिती असते. तिथे तिबेटी स्कूल आहे. दलाई लामांच्या मुख्य मंदिराजवळ  धार्मिक शिक्षण देणारी शाळाही आहे. तिबेटी रिफ्युजींची संख्या इथे ८०% आहे. आपण हिंदुस्थानात आहोत हे पटतच नाही, इतके तिथले वातावरण तिबेटी आहे, म्हणून तर त्याला 'लहान तिबेट' म्हणतात. अस्सल जुन्या तिबेटी पोशाखातले म्हातारे स्त्री-पुरुष, मंगोलियन छापाचे चेहरे असणारी पोरे, त्यांच्याबरोबर रस्त्यावर खेळणारे केसाळ कुत्रे वस्तीत दिसतात. संध्याकाळ हातात जपमाळ घेऊन मॉनेस्ट्रीच्या दिशेने चाललेले अनेक स्त्री-पुरुष दिसतात. एकंदर लोक धार्मिक आहेत.

'अप्पर धरमशाला' बस स्टॅन्डवरून आम्ही प्रथम टूरिझमच्या 'हॉटेल भाकसू' मध्ये गेलो. हा निसर्गरम्य बंगला उंचावर आहे. तिथे ऑर्डिनरी रूमचा रेट ७५ रु. आहे. त्यामुळे त्या बहुधा भरलेल्याच असतात. डीलक्स रूमचे भाडे १२५-१५० च्या आसपास असते. तिथल्या डायनिंग रूममध्ये चहा घेऊन एका कच्च्या उतरत्या रस्त्याने शॉर्टकट घेऊन आम्ही दलाई लामांचे निवासस्थान व बुद्ध मंदिर (मॉनेस्ट्री) पाहायला गेलो स्टॅन्डजवळच्या टाररोडने ते दीड कि.मी.वर आहे.

## बुद्ध मंदिर

हे मंदिर प्रशस्त, स्वच्छ व देखणे आहे. भगवान बुद्धाची भव्य पितळी मूर्ती प्रसन्न आहे. मूर्तीच्या चेहऱ्यावर वैराग्य व शांती या भावना आहेत. मूर्तीसमोर मोठ्या पितळी समया तेवत असतात. समयांमध्ये घालण्यासाठी भक्तांनी अर्पण केलेले तेल व प्रसादाच्या वस्तू समोर मांडून ठेवलेल्या असतात. मंदिरामध्ये

ठिकठिकाणी झुंबरे टांगलेली आहेत. आम्ही मंदिराचे निरीक्षण करत होतो तेवढ्यात तेथील संध्याकाळच्या पूजेची वेळ झाली. मूर्तीसमोरच्या सभागृहामधे पूजास्थान होते. पूजास्थानाजवळ भारतीय बैठकीवर छोटी आसने मांडलेली होती. एका बाजूला विशेष अधिकार असलेले दहा लामा बसले होते. इतर भिक्षू त्यांच्याकडे तोंड करून बसले होते. प्रथम अगदी हळू आवाजात गुणगुणल्याप्रमाणे प्रार्थना सुरू झाली. नंतर आवाज वाढत गेला. शेवटी वाद्येही वाजू लागली. पूजेच्या वेळचे हे वातावरण भक्तिपूर्ण होते. मंदिराबाहेर गोल लोखंडी चक्रे होती. त्यावर धार्मिक पाठ लिहिलेले होते. ती चक्रे गोल फिरवली की पुण्य मिळते, अशी समजूत आहे. आम्ही याअगोदर नेपाळ, सिलोन इथे बुद्धमंदिरे पाहिली होती, पण सामुदायिक पूजेचे दृश्य मात्र नवीन होते. गावात राहणारे संसारी स्त्री-पुरुषही, हातातील जपमाळ फिरवीत मंदिराच्या दिशेने येत होते. तिबेट बाजारातील स्त्रियाही जागेवर बसल्या बसल्या जपमाळ फिरवीत होत्या.

## भागसूनाग

अप्पर धरमशालेतील प्रसिद्ध शिवमंदिराचे नाव आहे ‘भागसूनाग’. हे मंदिर बसस्टॅन्डपासून सुमारे तीन कि.मी. अंतरावर आहे. रस्ताही चढ-उतारांचा आहे. पण हवा स्वच्छ असल्याने आणि संध्याकाळची वेळ असल्याने, रमतगमत जायला छान वाटत होते. वाटेत छोट्या तिबेटी वस्त्याही पाहता आल्या. पाठीवर सामान लादून जाणारे तिबेटी, रस्त्यावर ठिकरी खेळणारी गुटगुटीत पोरे, घोडे आणि कुत्री, खाली दरीत दिसणारी चिमुकली खेडी— असे अनोखे वातावरण तिथे होते.

भागसूनाग मंदिराच्या पायथ्याशी एक झरा आहे. तिथे गोमुखीतून पाणी पडते. त्याने पाय धुवायचे आणि मग पायऱ्या चढून मंदिरात जायचे, असा प्रघात आहे. मंदिराच्या कमानीवर ‘भागेश्वर प्रसन्न’ असे लिहिले आहे. प्रवेशद्वाराजवळच्या फलकावर या मंदिरासंबंधी एक प्राचीन आख्यायिका, हिंदीमधून सांगितली आहे. द्वापरयुगाच्या मध्यकाळात दैत्यांचा राजा ‘भागसू’ याची राजधानी अजमेर या ठिकाणी होती. त्या राज्यात बराच काळ पाऊस न पडल्याने पाण्याचे दुर्भिक्ष्य झाले व प्रजा दुःखी झाली. राजा भागसूने प्रजेचे सांत्वन केले व तो स्वतः पाण्याच्या शोधात बाहेर पडला. चार दिवसांच्या

प्रवासानंतर तो आता जिथे मंदिर आहे तिथे असलेल्या 'नागदल' नावाच्या सरोवराजवळ पोचला. हे दोन मैल परिसराचे सरोवर होते. या सरोवरातील पाणी त्याने आपल्या कमंडलूमधे भरून घेतले आणि रात्र झाल्याने तिथेच विश्रांती घ्यायचे ठरवले. रात्री नागदेवता जलक्रीडा करण्यासाठी तिथे आल्या, तेव्हा सरोवर सुकलेले होते. भागसूच्या पाऊलखुणांच्या आधारे त्या तो जिथे झोपला होता तिथे आल्या. त्याच्याबरोबर युद्ध करून त्यांनी त्याला ठार केले. कमडंलूतील पाणी इथे पडले आणि कोरडे झालेले सरोवर पुन्हा पाण्याने भरले. मृत्यूपूर्वी भागसूने नागदेवतेची स्तुती केली, तेव्हा ती प्रसन्न होऊन म्हणाली,"इच्छा असेल ते माग." भागसूने तिच्याकडे दोन वर मागितले. एक म्हणजे, आपल्या देशात पाऊस पडावा आणि दुसरा म्हणजे, माझे नाव अजरामर व्हावे. त्या वेळी नागदेवता प्रसन्न होऊन म्हणाली की, 'या पवित्र स्थानाला प्रथम तुझे नाव मिळेल आणि मग माझे मिळेल.' म्हणून या स्थळाचे नाव आहे 'भागसूनाग'. नंतर कलीयुगाच्या प्रारंभी इथे राज्य करणाऱ्या धरमचंदराजाने या मंदिराची निर्मिती केली, असे मानतात.

मंदिराबाहेर पडल्यावर एका छोट्या दुकानात गरमागरम भजी व चहाचा प्रोग्रॅम झाला आणि टॅक्सीने आम्ही 'लोअर धरमशाले'ला परत आलो.

## वॉर मेमोरियल

लोअर धरमशालेच्या बसस्टॅन्डपासून तीन-चार कि.मी. अंतरावर 'वॉर मेमोरियल' आहे. त्यालाही आम्ही आवर्जून भेट दिली. हिमालयातील ओक आणि पाईन वृक्षांच्या सान्निध्यात, वीरांच्या शौर्याची गाथा सांगणारे हे स्मारक आहे. ४७ च्या काश्मीर युद्धापासून ते चीन-पाकिस्तानबरोबरच्या युद्धापर्यंत युद्धभूमीवर मरण पावलेल्या या भागातील सैनिकांचे हे स्मारक आहे. ही एक वेगळ्याच प्रकारची शिल्पाकृती आहे. उंचावरून जाणाऱ्या रस्त्यावरून काही पायऱ्या उतरून खाली यायचे-सुंदर गगनचुंबी वृक्षांच्या बगिच्यामधून दहा मिनिटे चालायचे, मग पुन्हा गोलाकार पायऱ्या चढायच्या की, आपण स्मारकाजवळ पोचतो. हा एरिया छान आहे. आसपास सुरेख बंगल्या आहेत आणि स्मारकाच्या दाराशी बागेत हिमाचल टूरिझमचे कॅफेटेरियाही आहे.

## धरमशाला परिसरातील देवालये

६ मे चा दिवस हा आमच्या दृष्टीने पुण्यप्राप्तीचा दिवस ठरला. कारण त्या

दिवशी आम्ही या देवभूमीतील महत्त्वाच्या अशा तीन मंदिरांना भेटी दिल्या. मी जरी आस्तिक नसले, तरी मंदिरांचे शिल्पसौंदर्य व मूर्तिकाराचे कलाकौशल्य पाहण्यात मला रस आहे. रोममध्ये गेल्यानंतर रोमन लोकांप्रमाणे वागावे असे म्हणतात. हिमाचल म्हणजे देवभूमी, तेव्हा कोणत्याच मंदिराला भेट न देणे योग्य ठरले नसते. आम्ही एकाच दिवसात वैजनाथ, ज्वालामुखी आणि कांगडा अशा तीन ठिकाणच्या मंदिरांना भेटी दिल्या.

## वैजनाथ

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले हे मंदिर, धरमशालेपासून ४० कि.मी.वर आहे. पश्चिमाभिमुख असलेल्या या मंदिरासमोर मंडप असून, त्यावर कोरीव काम केलेले आहे. मंडपात काही संस्कृत श्लोक कोरलेले आहेत. शिवरात्रीला इथे मोठी जत्रा भरते आणि देशभरातून भाविक लोक येतात.

या मंदिराच्या संदर्भात आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की: लंकाधिपती रावणाने या प्रदेशात शिवाची आराधना केली आणि त्याला काही मस्तके अर्पण केली, तेव्हा शिवजी प्रसन्न होऊन त्याला म्हणाले की,"मी तुला वर देईन. फक्त अट अशी की, तुझ्या बळकट खांद्यावरून तू मला वाहून नेले पाहिजेस. विशिष्ट ठिकाणी जाईपर्यंत वाटेत मला कुठेही खाली उतरवता कामा नये." ते मान्य करून रावण शिवलिंग खांद्यावर घेऊन प्रवासाला निघाला. बरेच अंतर चालल्यानंतर त्याला प्रातर्विधीसाठी थांबावे लागले. आता त्याच्यापुढे दोन मार्ग होते. एक तर शिवलिंग खांद्यावर घेऊनच प्रातर्विधी उरकणे किंवा तेवढा काळ लिंग खाली ठेवणे. त्याने दुसरा मार्ग स्वीकारला. हे शिवलिंग त्याने ज्या ठिकाणी ठेवले, ती जागा म्हणजे 'वैजनाथ'. आज अस्तित्वात असलेले येथील मंदिर इ.स. ८०४ मध्ये बांधलेले आहे.

वैजनाथला मुक्काम करायचा तर पी.डब्लू.डी. चे एक रेस्टहाऊस आहे. बसस्टॅन्डजवळ एक धर्मशाळाही आहे, पण इथे सहसा कोणी मुक्काम करत नाही.

## ज्वालामुखी

वैजनाथहून बस पकडून आम्ही 'ज्वालामुखी'ला गेलो. ते केवळ हिमाचल प्रदेशातीलच नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानातील पवित्र क्षेत्र आहे. या देवीला तिकडचे

लोक ज्वालाजी म्हणतात. लांबून लांबून लोक तिच्या दर्शनाला येतात. देवीच्या पायावर घालण्यासाठी लहान मुलांनाही घेऊन येतात. हे मंदिर धरमशालेपासून ५५ कि.मी. वर असून तेथे हिमाचल टूरिझमचे 'ज्वालाजी' नावाचे टूरिस्ट हॉटेल आहे. त्याच्या काही खोल्या एअरकण्डिशण्ड आहेत. ज्वालामुखीत पाण्याची फार टंचाई आहे. एवढे मोठे हॉटेल पण टॉयलेटमध्ये पाणी नव्हते. ऊन तर इतके कडक होते की, आपण हिमाचलमध्ये आहोत यावर विश्वासच बसत नव्हता. हे जागृत दैवत असून तिथे एप्रिलमध्ये व नवरात्रात- अशी दोन वेळा यात्रा भरते. त्र्यंबकेश्वरप्रमाणे तेथील पुजारी आपल्या चोपड्यांमधून भक्तांची घराणी पाहतात. देवीचा फोटो काढू देत नाहीत. मंदिराचा रस्ता अरुंद व चढाचा असून दुतर्फा श्रीफले, फुले, बांगड्या, प्रसादाच्या वस्तू यांची दुकाने आहेत.

डोंगरामध्ये एका खोलगट गुहेमध्ये निळी तेजस्वी ज्वाला आहे. तेथील साधू ती सतत तेवती ठेवतात. ही ज्वाला म्हणजेच देवी मानली जाते. शक्तिपीठाच्या एक्कावन्न जागांपैकी ही एक जागा मानली जाते. असे सांगतात की, या मंदिरावरील सोन्याचा घुमट मुगल सम्राट अकबर याने अर्पण केलेला आहे. दुपारी १२ला पूजा आणि आरती होते व नंतरच मंदिरात प्रवेश मिळतो. प्रत्येक भक्ताने लंगरमध्ये प्रसाद घ्यावा, असा आग्रह केला जातो आणि गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत लोक आवर्जून तो घेतात. ज्वालाजीच्या दर्शनाला जाऊन येणे, हे सन्मानाचे व पुण्याचे मानले जाते. शीख लोकही या देवीच्या दर्शनाला येतात.

## ब्रजेश्वरी मंदिर

ज्वालामुखीहून धरमशालेला येणाऱ्या रस्त्यावर मंदिरांसाठी प्रसिद्ध असलेले कांगडा शहर लागते. हे शहर पूर्वी या प्रदेशाची राजधानी होते. येथील महाराजा संसारचांद हा कलाप्रेमी होता. त्याच्या राज्यात मिनिएचर व राजपूत पद्धतीची पेंटिंग्ज तयार केली जात. आजही कलेच्या क्षेत्रात 'कांगडा स्कूल ऑफ पेंटिंग्ज' प्रसिद्ध आहे. १८५५ पर्यंत कांगडा हे जिल्ह्याचे गाव होते. नंतर मात्र 'धरमशाला'हे जिल्ह्याचे गाव झाले.

ब्रजेश्वरी मंदिर हे 'बडा मंदिर'या नावानेही ओळखले जाते. महंमद गझनीने या मंदिराचा विध्वंस केला होता. राजा रणजितसिंहाने त्याचा पुनरुद्धार केला. हिमाचल प्रदेशात देवांपेक्षा देवींचे प्रस्थ जास्त आहे. त्याचे कारण या मंदिराच्या

दाराशी जो 'ब्रजेश्वरी देवीचा इतिहास' लिहिला आहे त्यामध्ये वाचायला मिळाले. सत्ययुगामध्ये दक्ष राजाने कनखल येथे मोठा यज्ञ केला आणि त्याला अनेक राजे, ऋषीमुनी, ब्राह्मण यांना आमंत्रित केले. मात्र त्याने आपली कन्या सती व जावई शंकर यांना मात्र बोलावले नाही. महादेव निमंत्रणाशिवाय यज्ञाला गेले नाहीत; परंतु सतीचा आग्रह पाहून तिला मात्र त्यांनी बरोबर काही सैनिक देऊन, वडिलांकडे पाठवले. यज्ञस्थळी आपल्या पतीसाठी जागा ठेवलेली नाही, हे पाहून सतीला क्रोध आला आणि दुःखही झाले. तिने पित्याची कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली आणि अशा अपमानित स्थितीत पतीकडे कसे जायचे, म्हणून यज्ञकुंडात आत्मदहन केले. ही वार्ता सैनिकांकडून समजल्यानंतर भगवान शंकर क्रोधित झाले. यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी त्यांनी वीरभद्राला पाठवले. नंतर भगवान शंकर सतीचा जळलेला देह घेऊन, उन्मादावस्थेत ब्रह्मांडात फिरू लागले. त्यांचा सतीबद्दलचा मोह दूर व्हावा म्हणून भगवान विष्णूंनी, आपल्या सुदर्शनचक्राने, सतीच्या शरीराचे एक्कावन तुकडे केले. हे तुकडे जिथे जिथे पडले त्या त्या जागेला शक्तिपीठ म्हणतात. अशी ही ५१ शक्तिपीठे तयार झाली. ब्रजेश्वरीमध्ये सतीचे वामांग पडले, तर ज्वालाजीमध्ये जीभ पडली. अशी ती कथा आहे.

ब्रजेश्वरीबद्दल आणखी एक कथा अशी सांगतात की, या देवीने राक्षसांवर मोठा विजय मिळवला त्या वेळी देवीला जिथे जिथे जखमा झाल्या होत्या, त्या जखमांवर देवदेवतांनी तुपाचा लेप लावला होता. आजही ही प्रथा पाळली जाते. मकरसंक्रांतीच्या दिवशी पाच मण तूप, मेवा आणि फळफळावळ यांचा लेप देवीच्या शरीरावर लावला जातो. एक आठवडा हे काम चालते. येथील देवी मूर्तीच्या स्वरूपात नाही, तर पिंडीच्या स्वरूपात आहे. सकाळ, संध्याकाळ शृंगार करून तिची पूजा करतात. मंदिर भव्य असून त्याच परिसरात चक्रकुंड, वीरभद्रेश्वरमंदिर, चंद्रभागा, सहस्त्रधारा व गुप्तगंगा अशी काही पवित्र तीर्थे आहेत.

कांगडा येथे चांगला किल्लाही आहे. पण दिवसभर आम्ही उन्हाने तापलो होतो. पुन्हा दुसऱ्या दिवशी 'डलहौसी'ला जायचे होते, म्हणून ७॥ -८ला धरमशालेला परतलो. चार गरम घास खाऊन रात्री ९-९॥ वाजताच झोपून टाकले.

## चार्मिंग चंबा

धरमशाला सोडले आणि लक्ष 'चंबा खोऱ्या'कडे लागले. चंबा शहर ही या राज्याची राजधानी होती. त्या शहरावरून या खोऱ्याला'चंबा खोरे' नाव पडले आहे. येथील दऱ्याखोरी, नद्या, सरोवरे आणि झरे यांच्यामुळे त्याला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे, म्हणून तर त्याचे वर्णन 'चार्मिंग चंबा' अशा शब्दात करतात.

इ.स.९२० मध्ये राजा साहिलवर्मा याने चंबा शहर वसवले. ही जागा त्याने आपली मुलगी चंपावती हिच्या आग्रहामुळे राजधानीसाठी निवडली. चंपावरून 'चंबा' नाव पडले असावे, असे मानतात. तर काही लोकांच्यामते या शहरात व परिसरात असलेल्या चाफ्याच्या (चंपा) सुगंधी झाडांमुळे त्याला चंबा नाव पडले असावे. चंबा खोऱ्यातील गद्दी जमात प्रसिद्ध आहे. ती काहीशी आपल्याकडल्या धनगरांसारखी आहे. हे लोक उन्हाळ्यात गावातील हिरव्या कुरणात आपली मेंढरे चारतात आणि हिवाळ्यात हिमवर्षाव झाला म्हणजे मात्र आपले गाव सोडून, डोंगर उतरून कांग्रा, मंडी, बिलासपूर वगैरे भागात शेतमजुरीसाठी जातात. या जमातीतील स्त्रिया रेखीव चेहऱ्याच्या व हसतमुख असतात. या लोकांना नृत्याची खूप आवड आहे. प्रत्येक सणासमारंभात ते उत्साहाने गातात, नाचतात. हे लोक साधेसुधे, कष्टकरी आणि शांतताप्रिय आहेत. विष्णू, शिव आणि शक्ती ही तिन्ही दैवते येथे पूजली जातात. पण 'शिव' हे दैवत जास्त लाडके दिसते. 'मणीमहेश कैलास' हे ठिकाण शिवाचे वास्तव्यस्थान होते, अशी श्रद्धा असल्यामुळे चंबा व भरमौर हे भाग साक्षात शिवभूमी मानले जातात. चिनाब आणि रावी या दोन नद्या या खोऱ्याला समृद्ध करतात. 'बारालचा पास'या भागात चिनाबचा उगम होतो. चंबा जिल्ह्यातील सुमारे १२५ कि.मी. अंतर या चिनाबने किंवा चंद्रभागेने व्यापले आहे. रावी नदीचे प्राचीन नाव इरावती. ऋग्वेदात तिचा उल्लेख आहे. ती १०० कि.मी. अंतरातून वाहते.

# डलहौसी

चंबा खोऱ्यात तीन ठिकाणे महत्त्वाची आहेत.

१. डलहौसी २. खाज्जीयार ३. चंबा शहर. त्याशिवाय भरमौर ही या राज्याची प्राचीन राजधानी असून, तिथे काही प्राचीन मंदिरे आहेत.

## डलहौसीकडे

सकाळी ८-८॥ ला धरमशालेहून चंबा येथे जायला बस होती. ती पकडावी म्हणून आम्ही ८च्या सुमारास हॉटेल सोडले. लॉजच्या दारातच पठाणकोटकडे जाणारी बस दिसली. हिमाचल प्रदेशामध्ये हात केला की बस थांबवतात. आम्ही बस थांबवली, लगेजसह वर चढलो, पठाणकोटची तिकिटे काढली आणि आमच्या ह्यांच्या– विसरभोळ्या प्राध्यापकांच्या लक्षात आले की, आपला वुलन कोट धरमशालेतील लॉजच्या खुंटीवरच राहिला आहे. कंडक्टरने सांगितले की तुम्ही खाली उतरून कोट घेऊन या. हिमाचल प्रदेशाच्या पुढच्या पठाणकोट बसमध्ये हेच तिकीट चालेल. मात्र पंजाब रोडवेजच्या बसमध्ये चालणार नाही. त्याने बसच्या तिकिटांवर सही करून तारीख टाकली. आम्ही लगेजसह चौकात उतरलो. तिथे कोणतेच वाहन मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे मी चौकातच थांबले. आमचे हे जवळच्या रस्त्याने भराभर चालत गेले आणि १५-२० मिनिटांत कोट घेऊन परतही आले. पाच-दहा मिनिटांत त्या चौकात चंबाकडे जाणारी बस आली. आम्ही आत चढलो. ती व्हाया पठाणकोट जाणार नव्हती. पण आमचे तिकीट पठाणकोटफाट्यापर्यंत चालले. नंतर आम्ही तिथून डलहौसीचे तिकीट काढले. एका बस कंडक्टरने दिलेले तिकीट, दुसऱ्या बसमध्ये चालते, हा पहिलाच अनुभव होता.

धरमशाला ते डलहौसी/चंबा लक्झरी बस नाही. साध्या बसने जवळजवळ आठ-नऊ तासांचा झालेला हा प्रवास फारच कंटाळवाणा झाला. कडक ऊन होते

आणि दर १०-१५ मैलांवर बस थांबत होती. संपूर्ण टाररोडही नव्हता. अधूनमधून कच्चा रस्ता. तोही अरुंद. दुपारी ४॥ वाजता आम्ही डलहौसीला पोचलो.

टूरिस्ट बंगला एका ट्रॅव्हल कंपनीने एंगेज केला होता, तेव्हा आम्ही स्टॅन्डजवळच्या 'कुमार हॉटेल'मध्ये मुक्काम केला. हॉटेल डिसेंट होते. दरही वाजवी होते; पण तिथे जेवण मात्र अगदीच भिकार होते. त्यामुळे आम्ही शक्यतो बाहेर जेवायचे ठरवले. बसस्टॅन्ड जवळ असला तरी 'कुमार हॉटेल' मध्ये जाण्यासाठी मोठ्या व रुंद ३०-३५ पायऱ्या उतराव्या लागत होत्या आणि बाहेर पडताना चढाव्या लागत होत्या. कारण हॉटेल खालच्या भागात होते. खाली मालक राहत होता आणि वरचे तीन मजले प्रवाशांसाठी होते.

## डलहौसी

हे चंबा खोऱ्याचे प्रवेशद्वार आहे. समुद्रसपाटीपासून २०५०मीटर उंचीवरील हे हिलस्टेशन धौलाधर पर्वतरांगांमध्ये आहे. लॉर्ड डलहौसीने ते सॅनिटोरियम म्हणून शोधून काढले, त्यामुळे ते त्याच्या नावाने ओळखले जाते. उत्तरेकडील इतर हिलस्टेशन्सच्या तुलनेने ते स्वस्तही आहे. पठाणकोटपासून ते सर्वांत जवळचे हिलस्टेशन आहे. ८० कि.मी. वरील या ठिकाणी जाण्यासाठी पठाणकोटहून बसेस व टॅक्सीज उपलब्ध आहेत. टूरिझमचा बंगला, पी. डब्लू.डी.रेस्ट हाऊस व खाजगी हॉटेल्समध्ये निवासव्यवस्था उपलब्ध आहे. यूथ होस्टेलमध्ये डॉरमेटरीत् दहा रु. परहेड दर असून, पन्नासजणांची सोय होऊ शकते. विद्यार्थ्यांना तर केवळ सहा रुपये दर आहे.

डलहौसीची थंडगार हवा, उबदार सूर्यकिरणे, गगनचुंबी वृक्ष, शांत वातावरण या नैसर्गिक सौंदर्यामुळे सुट्टी घालवायला ते चांगले ठिकाण आहे. चित्रकार, फोटोग्राफर, शिकारी, बोटिंगची आवड असलेले प्रवासी अशा सर्वांना ते विश्रांतिस्थान म्हणून आवडते. १३ कि.मी. एरियात पसरलेले डलहौसी पाच टेकड्यांवर मिळून वसलेले आहे. बलून, कथॅलोग, पोट्रेयन, तेहरा आणि बकशेरा अशी या टेकड्यांची नावे आहेत. डलहौसीची उंची त्यामुळे दीड हजार ते अडीच हजार मीटर्स आहे. काही रस्ते समपातळीवरचे आहेत, कुठे जंगल आहे, तर कुठे पायवाटा आहेत. आकाश निरभ्र असेल, तर त्या दिवशी डलहौसीहून चिनाब, बियास आणि रावी या तिन्ही नद्यांचे दर्शन खालच्या दऱ्यांमधे होऊ शकते.

## पिकनिक स्पॉट्स

डलहौसीत गांधी चौक आणि सुभाष चौक हे दोन भाग महत्त्वाचे आहेत. सुभाष चौकाजवळ एक सुरेख गार्डन आहे. गांधी चौक हा बाजारपेठेचा भाग असून तिथे दुकाने आहेत. लव्हली धाबा, शेरे पंजाब, क्वालिटी या हॉटेल्समध्ये उत्तम जेवण मिळते. चंबा खोऱ्याची दूध व मध यांसाठी प्रसिद्धी आहे, असे ऐकले होते; पण डलहौसीत आम्हाला कुठेही दही मिळू शकले नाही. 'लव्हली धाबा' किंवा स्टॅन्डजवळचे 'लाल हॉटेल' इथे आम्ही नाश्ता व जेवण घेत होतो.

जवळपास काही पिकनिक स्पॉट्सही आहेत. गांधी चौकापासून एक रस्ता **'पंचपुला'** या ठिकाणी जातो. हा रस्ता समपातळीवरचा आहे. तो अर्धवर्तुळाकार असल्याने, पाठीमागच्या बाजूला उंच टेकडी, डलहौसीचे पब्लिक स्कूल, काही बंगले आणि बाकीच्या तिन्ही बाजूंना दऱ्याखोरी असे निसर्गरम्य दृश्य दिसते. या ठिकाणी पाच छोट्या पुलांखालून छोटे धबधबे वाहतात, म्हणून त्याला 'पंचपुला' म्हणतात. आम्ही गेलो तेव्हा या धबधब्यांमध्ये फारसे पाणी नव्हते. या स्थळाला महत्त्व येण्याचे आणखी एक कारण म्हणजे शहीद भगतसिंग यांचे काका- स्वातंत्र्यसेनानी अजितसिंह- यांचे निधन या ठिकाणी १५ ऑगस्ट ४७ रोजी म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिवशीच झाले. त्यांची समाधी बांधण्याचे काम इथे चालू आहे. या रस्त्यालाही 'अजितसिंह रोड' असे नाव दिले आहे.

**सत्‌धारा** : पंचपुलाच्या रस्त्यावरच सत्‌धारा नावाचे ठिकाण आहे. इथे डोंगरातून वाहणारा एक झरा असून, तेथील पाणी आरोग्याला फार चांगले आहे, असे म्हणतात. रस्त्यावरून जाणारे-येणारे स्त्री-पुरुष तिथे थांबून जलपान करत होते आणि मगच पुढील रस्ता आक्रमत होते. या रस्त्यावरून बसेस जात नाहीत. पायी जावे लागते. दूरच्या खेड्यातले लोक अक्षरशः डोक्यावरून पलंग, दुधाचे कपाट अशा वस्तू वाहून नेत होते.

**कालाटोप** : हे आणखी एक निसर्गरम्य ठिकाण डलहौसी-खाज्जीयार रस्त्यावर आहे. गांधी चौकापासून सुमारे ८ कि. मी. अंतरावर असलेल्या या ठिकाणी फॉरेस्ट रेस्ट हाऊस आहे. त्याचे रिझर्वेशन डलहौसीहून करता येते. याही रस्त्यावर बस जात नाही. जीपेबल रोड आहे. तेथून खालच्या दरीतील सृष्टिसौंदर्य फार सुंदर दिसते. फॉरेस्ट रेस्ट हाऊसच्या आसपास देवदार, ओक वगैरे वृक्षांचे जंगल आहे. विश्रांती घेण्यासाठी जागा छान आहे.

डलहौसी हे नितांतरम्य ठिकाण आहे. कोणत्याही रस्त्याने गेलात, तरी

शेवटी तुम्ही चढावर जाऊन पोचता आणि तिथून खाली असलेल्या दऱ्याखोऱ्यांचे सौंदर्य न्याहाळू शकता. आम्ही डलहौसीत पोचलो त्याच दिवशी संध्याकाळी पायऱ्यापायऱ्यांचे, चढउतारांचे, वळणावळणांचे रस्ते ओलांडत खूप चाललो. टार रोड लांबून जात असला, तरी इथे शॉर्टकट बरेच आहेत. कोपऱ्याकोपऱ्यांवर खालील निसर्गरम्य दृश्ये पाहण्यासाठी व्ह्यू पॉईंट्स आणि शेड्स आहेत. डलहौसी पठाणकोटपासून जवळ असल्याने व फारसे महाग नसल्याने, ३-४ दिवसांच्या मुक्कामात इथे बरीच मराठी मंडळी भेटली. अद्याप सीझन सुरू झाला नसल्याने रस्त्यांवर दिवे फार कमी होते. आमचा चिमुकला टॉर्च पेटवून आम्ही ८.३०-९ वाजता लॉजवर परत आलो.

आम्हाला खाज्जीयारला जायचे होते, पण टूरिझमची बस अद्याप सुरू झाली नव्हती. टॅक्सीवाले पावणेदोनशे/दोनशे रुपये मागत होते. शेअर करायला दुसरे जोडपेही मिळाले नाही. मग टूरिस्ट ऑफिसमधल्या ऑफिसरला कोणी सोबत मिळाल्यास आम्हाला कळवा, असे सांगून आम्ही लॉजवर परतलो.

दुसऱ्या दिवशीही डलहौसीतच भ्रमंती केली. मालरोडवरील गांधी चौक आणि सुभाष चौक ही येथील लोकांची आवडती ठिकाणे आहेत. तिथे कॉर्नरला बाक टाकलेले आहेत. लोक त्यावर गप्पा मारत बसतात. तिथून खालचा व्ह्यू चांगला दिसतो. गांधी चौकात थोडेफार शॉपिंगही केले. ब्लँकेट्स सुरेख होती, पण त्यांचे ओझे झाले असते. भरतकाम केलेल्या बॅग्ज, उशांचे अभ्रे अशा छोट्या गोष्टी घेतल्या. ढगांचा गडगडाट सुरू झाल्याने व पावसाचे थेंब पडू लागल्याने उतारावरून धावतच खाली आलो. हॉटेलवर पोचलो.

## ‘खाज्जीयार’

आमचे नशीब जोरावर असल्याने त्या दिवशी संध्याकाळी आमची ओळख ठाण्याच्या मराठी मंडळींबरोबर झाली. ती तीन जोडपी होती आणि प्रत्येकाची

दोन मुले. आम्ही खाज्जीयारचे आकर्षक वर्णन केल्यामुळे ते लोक आमच्याबरोबर टॅक्सीने यायला तयार झाले. एका टॅक्सीत इतके लोक मावलेच नसते, तेव्हा दोन टॅक्सी करायच्या व दुसऱ्या दिवशी सकाळी जायचे असे ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी नेमका एक ड्रायव्हर आजारी पडला. मग एकाच टॅक्सीने दोन फेऱ्या करायचे ठरवले. पहिल्या फेरीत दोन जोडपी आणि सर्व मुले गेली. दुसऱ्या फेरीत आम्हाला फक्त चौघांनाच आरामात जाता आले.

कितीही प्रतिभावान लेखक असला, तरी खाज्जीयारच्या निसर्गाचे वर्णन करणे त्याला शक्य नाही. 'सेवी तोच चवी जाणे' असे त्याच्या बाबतीत म्हणावे लागेल. बशीच्या आकाराचे, सव्वा मैल लांब आणि एक मैल रुंद असे हिरवेगार कुरण- त्याच्या चारी बाजूंनी नजर पोचणार नाही इतक्या लांबवर देवदार वृक्षांचे घनदाट जंगल, पलीकडे हिमाच्छादित टेकड्या, जंगलाच्या एका बाजूला हिमाचल टूरिझमचा दुमजली आकर्षक बंगला. हिरवळीच्या मध्यावर छोटेसे तळे, तळ्यापर्यंत जायला नाजूक जपानी लाकडी पूल, तळ्यामध्ये बोटिंगची सोय आणि सगळीकडे नीरव शांतता- अक्षरशः स्वर्ग असला तर तो असाच असेल असे वाटले. खाज्जीयारला 'छोटे गुलमर्ग' म्हणतात. मला तर ते गुलमर्गपेक्षाही आकर्षक वाटले. या छोट्याशा तळ्यात एक तरंगते बेट आहे. जोराचा वारा सुटला तर ते अगदी मंद गतीने एका जागेवरून दुसऱ्या जागेवर आपोआप हलते. बोटीत बसून या बेटापर्यंत जाता येते आणि त्यावर चढता येते. तिथल्या लोकांच्या मते ही 'कुदरतकी कमाल' आहे. तळ्याच्या अगदी काठाजवळ जी जमीन आहे, तीदेखील आपण उभे राहिलो की हलते. आत काठी खुपसली तर खाली पाणी लागते. म्हणजे सहा इंच घट्ट जमीन आणि त्याखाली पाणी, असा सारा प्रकार आहे. लहान मुलाच्या उत्साहाने उड्या मारून, जमीन कशी हलते हे आम्ही पाहिले. एवढ्यात पावसाची सर आली. ठाणेकर मंडळी समोरच्या झोपडीतील हॉटेलात शिरली. आम्ही टूरिस्ट बंगल्यात शिरलो.

खाज्जीयारचा टूरिस्ट बंगलासुद्धा फार सुरेख आहे. तिथे कॅफेटेरियाही आहे. साधारणतः टूरिस्ट टॅक्सीने खाज्जीयारला येतात. तास-दोन तास फिरतात. हिरवळीवर लोळतात, घोड्यावरून रपेट मारतात. चहा-कॉफी घेतात आणि परत डलहौसीला जातात. संध्याकाळी चारनंतर टूरिस्ट बंगल्यात हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक उरतात. बरे, या गावाची वस्ती केवढी ? तर २०० लोकांची. संपूर्ण दिवसात सकाळी एक आणि संध्याकाळी एक बस चंबाहून येते. बाकी

वाहनांची जागच नाही.

टूरिस्ट हॉटेलच्या खालच्या मजल्यावरील खोल्यांपुढे मोठा व्हरांडा आहे, गार्डन चेअर्स आहेत. त्यांचा स्वतंत्र डायनिंग हॉल आहे. त्याच्या मोठमोठ्या काचेच्या खिडक्यांमधून बाहेरचे निसर्गरम्य दृश्य दिसते. खाज्जीयारने माझ्यावर अशी मोहिनी घातली की, तिथून तासा-दोन तासांत जाणे योग्य वाटेना. पाऊलच उचलेना. मी तर ह्यांना सांगून टाकले— 'आपण आज इथेच राहायचे. मुक्काम करायचा.' त्यांचीही स्थिती माझ्यासारखीच झालेली. इतके सुंदर ठिकाण आणि तीन-चार तासांत परत जायचे मनाला पटेना. अंगावरच्या कपड्यानिशी आलेलो, बरोबर कंगवा, टॉवेल, साबण, टूथब्रश अशा गोष्टीदेखील नाहीत. सुदैवाने पैसे बरोबर होते. हॉटेल मॅनेजर फारच चांगला होता. तो ह्यांना म्हणाला, "बाईंची एवढी इच्छा आहे तर राहा ना तुम्ही. मी तुम्हाला सोप, टॉवेल सगळे देतो. रूमही कन्सेशनमध्ये देतो." एरवी खालच्या मजल्यावरील रूमला ६० रुपये पडतात. ती तो ४५ रुपयांत द्यायला तयार झाला. नंतर आम्ही दुसऱ्या मजल्यावरची रूम पाहायला गेलो. रूमचे दार उघडले आणि अक्षरशः खिळल्यासारखे उभे राहिलो. समोरच्या बाजूला सर्व काचेच्या मोठमोठ्या खिडक्या होत्या आणि त्यातून पुरे खाज्जीयारचे कुरण, तीन बाजूंची देवदारची झाडे, मधले तळे- त्यातले चिमुकले बेट- सारे काही चित्राप्रमाणे आखीव, रेखीव दिसत होते. या रूमला एरवी ७५ रुपये भाडे असते. मॅनेजरने ती आम्हाला ६० रुपये भाड्यात देऊ केली. आम्ही प्रथमदर्शनीच त्या रूमच्या प्रेमात पडलो होतो. आम्ही मुक्काम करण्याचा निर्णय घेतला.

आमचा टॅक्सीवाला दोन चकरा मारल्यामुळे जास्त पैसे मागत होता. त्याच्याशी आम्ही चर्चा केली. सर्व ठाणेकर मंडळींना एकाच टॅक्सीतून घेऊन जायचे त्याने मान्य केले. आम्ही आमच्या वाट्याचे ठरलेले पैसे देऊन टाकले- जेवणानंतर ते सर्वजण दाटीवाटीने एका टॅक्सीतून निघून गेले. गैरसमज न होता आम्हाला राहायला मिळाले यातच आम्ही खूष होतो. टूरिस्ट बंगल्यातील जेवणही उत्तम व टेस्टी होते. रेट्स थोडे जास्त होते, पण हिलस्टेशनला ते गृहितच होते.

श्रावणमासाप्रमाणे ऊनपावसाचा खेळ चालू होता. मग आम्ही निवांतपणे हिरव्यागार कुरणातून हिंडलो. सोनेरी घुमटाच्या 'खज्जिनाग'च्या मंदिरात गेलो. घोड्यावरून रपेट मारली. कुलूचा ड्रेस घालून फोटो काढून घेतले. चार

वाजल्यानंतर सर्व टॅक्सीज निघून गेल्या आणि टूरिस्ट बंगल्यात आम्ही फक्त तीन-चार जोडपी राहिलो. पुन्हा एकदा देवदार वृक्षांच्या रांगांमधून चक्कर मारली. अंधार पडल्यानंतरही खोलीच्या काचेच्या खिडक्यांतून दिसणारे निसर्गदृश्य डोळे भरून पाहत होतो. आम्ही खाज्जीयारचा सनसेट पाहिला. दुसऱ्या दिवशी पहाटे सूर्योदयही पाहिला. खाज्जीयारने आम्हाला झपाटून टाकले होते. रात्री कडाक्याची थंडी पडली, पण आम्हाला २-२ ब्लँकेट्स दिली होती. अंगावरचे कपडे बदलण्याचा प्रश्नच नव्हता, कारण बरोबर दुसरे कपडेच नव्हते. सोप, टॉवेल, टूथपेस्ट वगैरे गोष्टी मिळवल्या होत्या. तिथल्या अविस्मरणीय निसर्गसौंदर्यापुढे झालेली गैरसोय तुच्छ होती, दुसऱ्या दिवशी सकाळी तेथील नाईन होल्स गोल्फ कोर्स पाहिले. पी. डब्ल्यू. डी.चे रेस्ट हाऊसही पाहिले. डलहौसीला परत जायला डायरेक्ट बस नव्हती, पण दहा वाजता चंबाला जायला बस होती. त्या बसने चंबाला जायचे, शहर पाहायचे आणि तिथून संध्याकाळची बस पकडून डलहौसीला जायचे असे आम्ही ठरवले.

## चंबा शहर

खाज्जीयारहून १० वाजताची बस पकडून आम्ही ११.३० च्या सुमाराला चंबा शहरात पोचलो. रस्ताभर पावसाची रिमझिम चालू होती. दरीमध्ये धुक्याचे लोट दिसत होते. धुक्यामध्ये वाटा हरवल्या होत्या. त्यात रस्त्यात गुरे हाकणारे गवळी व क्वचित एखादी देखणी गवळण रस्ता अडवत होते. वळणावळणांच्या रस्त्याने सावकाश बसने घाट ओलांडला. पावसामुळे चंबामध्ये फिरता येईल की नाही, शंका वाटत होती. पण रावी नदीच्या पात्रावरून, नवा लाकडी ब्रिज ओलांडून आम्ही गावात प्रवेश केला, तेव्हा रिमझिम थांबली होती आणि कोवळी सूर्यकिरणे पडली होती. रस्ते मात्र ओले होते. आधी गरमागरम ब्रेड-आमलेटचा नाश्ता केला आणि शहर पाहायला निघालो.

चंबा हे रावीच्या तीरावर वसलेले मध्ययुगीन शहर आहे. तेथील कोरीव कारागिरी असलेली मंदिरे प्रसिद्ध आहेत. तेथे एक मोठे हिरवेगार कुरण आहे. तिथे आसपासच्या परिसरातील ग्रामीण लोक आपला माल विकण्यासाठी येतात. तिथेच सण आणि उत्सव साजरे केले जातात.

चंबामध्ये टूरिस्ट बंगला, सर्किट हाऊस, पी. डब्ल्यू. डी. रेस्टहाऊस आहे. 'अखंड चंडी' नावाचे खाजगी हॉटेलही चांगले आहे. तेथील प्रेक्षणीय स्थळे तीन-चार तासांत पाहून होतात. आम्हाला तिथे मुक्काम करायचाच नव्हता. हिमाचल प्रदेशातील एकमेव म्युझियमही तिथे पाहायला मिळाले.

## भूरीसिंह म्युझियम

या म्युझियमची इमारत मोठी व नजरेत भरण्यासारखी आहे. म्युझियम पाहण्यासाठी प्रवेश फी नाही. पहिल्या मजल्यावर काही दगडी शिल्पे, कोरीव काम केलेले दरवाजे, पूजापात्रे, प्राचीन नाणी अशा गोष्टींचा राजा भूरीसिंह यांनी केलेला संग्रह आहे. सर्वांत उल्लेखनीय दालन म्हणजे चंबा व कांगडा येथील मिनिएचर पेंटिंग्जचे आहे. ह्या कलाकृती आकाराने छोट्या असतात, पण त्यांत कलात्मक व आकर्षक रंगसंगती असते. त्यांच्या नाजूकपणातच त्यांचे सौंदर्य असते. या चित्रांमधून रामायणाशी संबंधित-दशरथाचा राज्याभिषेक, कैकयीचा रुसवा, राम-लक्ष्मण वनवास असे ठळक प्रसंग होते, तर महाभारतापैकी कृष्ण बालक्रीडा, रासक्रीडा, राधा-कृष्ण, कृष्ण-रुक्मिणीविवाह, कृष्ण-सुदामा भेट असे प्रसंग होते. ही चित्रे कांगडा शैलीतील किंवा गुलेर शैलीतील १८ व्या शतकात काढलेली होती. शिव-पार्वतीची चित्रे चंबा शैलीतील होती. याच मजल्यावर काही सुंदर काष्ठशिल्पे होती. तसेच चंबाचे प्रसिद्ध भरतकाम केलेले रुमाल व चामडी वस्तू होत्या.

दुसऱ्या मजल्यावर चंबाचा राजघराण्याचा इतिहास होता. राजपुरुषांची पूर्णाकृती पेंटिंग्ज होती. तिसऱ्या मजल्यावर या राजांनी काढलेले काही जुने फोटो लावलेले होते. त्यात वेरुळचे मंदिर, सांचीस्तूप यांचेही फोटो होते.

## प्रसिद्ध मंदिरे

चंबाची प्राचीन कोरीव मंदिरे अगदी वेगळी असून या सहा मंदिरांचा एक ग्रूपच आहे. त्यांपैकी तीन मंदिरे शिवाशी संबंधित, तर तीन विष्णूशी संबंधित

आहेत. ही मंदिरे चंबा नगरीचा संस्थापक राजा शैलवर्मा याने १० व्या शतकात निर्माण केली आणि १६ व्या शतकात राजा प्रतापसिंह वर्मा याने त्यांचा पुनरुद्धार केला. बाहेरच्या बाजूची भिंत व गवाक्षेही १५ व्या शतकातील आहेत. शेजारी छोटे कालीमंदिर आहे, तेही नवे दिसते. या सहा मंदिरांपैकी— त्र्यंबकेश्वर, गौरीशंकर, श्रीचंद्रगुप्त महादेव ही तीन मंदिरे शिवाची आहेत, तर लक्ष्मी दामोदर, राधाकृष्ण व लक्ष्मीनारायण ही तीन विष्णूची आहेत. यांपैकी लक्ष्मीनारायण मंदिर सर्वांत मोठे व महत्त्वाचे मानतात. त्याच्या नावानेच हा मंदिरसमूह ओळखला जातो. हे संरक्षित राष्ट्रीय स्मारक आहे. चंद्रगुप्तमहादेव मंदिरासमोर एक मोठा दगडी नंदी आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे शिखरशैलीत निर्माण झालेल्या या मंदिरांपैकी श्रीराधाकृष्णाचे मंदिर राजा जीतसिंहाची विधवा पत्नी शारदा हिने निर्माण केले आहे. ही मंदिरे आवर्जून पाहावीत अशी आहेत.

मंदिर चढावर असून, रस्त्याच्या दुतर्फा बाजार आहे. कापडाची दुकाने, बांगड्यांची दुकाने, सराफ वगैरे आहेत. चंबाचे दोन्ही बाजूंनी सारखे भरतकाम केलेले रुमाल प्रसिद्ध आहेत पण त्यांच्या किमती शंभर रुपयांच्या आसपास होत्या. हिमाचल सरकारचे एम्पोरियमही आम्ही पाहिले. तेथे चंबा शाली ठेवलेल्या होत्या. वुलनचे प्रमाण जास्त असल्याने त्या कुलू शालीपेक्षा जास्त उबदार होत्या. त्यांच्या किमतीही १५० रुपयांच्या पुढेच होत्या. अगोदरच तीन-चार शालींची खरेदी झाल्यामुळे मी आणखी खरेदी केली नाही. चंबाची आठवण म्हणून पट्ट्यांवर भरतकाम केलेला एक चप्पलजोड मात्र खरेदी केला.

### मिंजार यात्रा

प्रत्येक प्रांतामध्ये एखादी जत्रा वा यात्रा वैशिष्ट्यपूर्ण असते, तशी चंबाची श्रावणातील मिंजार जत्रा प्रसिद्ध आहे. श्रावण महिन्यातील तिसऱ्या रविवारी ती भरते. तशी ही जत्रा सात-आठ दिवस अगोदरच सुरू होते, पण तिला खरा बहर येतो तो शेवटल्या दिवशी, ग्रामीण भागातील लोक नृत्ये करीत तेथे येतात त्या वेळी. अखंड चंडी पॅलेसपासून, नदीच्या काठाकाठाने एक मिरवणूक काढली जाते. चंबाच्या राजाचे कुलदैवत असलेले रघुवीरजी मिरवणुकीच्या अग्रभागी असतात. नंतर आजूबाजूच्या परिसरातील ग्रामीण देवता असतात. पूर्वी जलदेवता वरुण हिला एक बैल अर्पण करण्यात येत असे. या जत्रेच्या प्रसंगी बैलाला नदीत ढकलत असत; पण गेली काही वर्षे हा अमानुष प्रकार थांबला

आहे. आता प्रतीकात्मक स्वरूपात, नदीला श्रीफल अर्पण करतात.

मिंजार म्हणजे येथील मैज नावाचे फूल. श्रावणामध्ये मैजाच्या रोपांना खूप फुले येतात, तेव्हा श्रावणऋतूचे स्वागत करण्यासाठी आणि वरुण देवतेच्या सन्मानासाठी भरवण्यात येणाऱ्या या यात्रेला 'मिंजार यात्रा' म्हणतात. गड्डी, भाटी आणि गुजर जमातीचे हजारो लोक या यात्रेला आवर्जून उपस्थित राहतात. यात्रेच्या निमित्ताने नातेवाइकांना व मित्रांना मिठाई वाटली जाते. यात्रेच्या निमित्ताने चंबामध्ये मोठा बाजार भरतो. स्थानिक लोक तर आपला माल विक्रीसाठी आणतातच, पण सरकारतर्फेही विक्रीकेंद्रे चालवली जातात. लोकसंगीत व लोकनृत्ये यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि क्रीडास्पर्धाही होतात.

दुपारी साडेतीनची बस पकडून आम्ही चंबाहून डलहौसीला परत आलो. दुसऱ्या दिवशी आमचा परतीचा प्रवास सुरू व्हायचा होता. तीन आठवड्यांचा हिमाचलप्रदेशचा दौरा संपत आला होता. दिल्लीला परतायचे होते. प्रवासाला निघालो तेव्हा चण्डीगढमध्ये अशांतता होती, पण आता सारे काही निवळले होते. तेव्हा शक्य झाल्यास परत जाताना चण्डीगडला मुक्काम करायचा होता. शेजारचे प्रसिद्ध 'पिंजोरगार्डन' पाहायचे होते. हिमाचल प्रदेशला आम्ही टाटा केला.

# चण्डीगढ - एक नवनिर्मित शहर

चण्डीगढ हे पूर्णपणे वेगळ्या धर्तीचे शहर असल्याचे आम्हाला जाणवले. केंद्रशासित प्रदेश असलेले, हरियाना व पंजाब या दोन राज्यांची राजधानी असलेले चंदीगड पंजाब राज्याला देऊन हरियाना प्रांताची नवी राजधानी निर्माण करायची, अशी घोषणा पूर्वीच झाली असली, तरी ती प्रत्यक्षात येणे कठीण आहे. कारण संपूर्ण पंजाबच अशांत बनला आहे.

१९४७ मध्ये भारताची आणि पर्यायाने पंजाबची फाळणी झाली. त्या वेळी जुन्या पंजाब प्रांताची राजधानी पाकिस्तानात गेली. मग पंजाबी लोकांनी असा विचार केला की, एखाद्या आधीच संपन्न असलेल्या शहराला राजधानी करण्यापेक्षा, नवे शहरच का निर्माण करू नये? आणि त्यांनी नव्या शहरनिर्मितीची तयारी सुरू केली. हिमालयाला समांतर असलेल्या शिवालिक पहाडाच्या पायथ्याशी असलेली एक जागा निवडण्यात आली. नगरीचे डिझाईन बनवण्यासाठी फ्रेंच वास्तुशास्त्रज्ञ ली कार्बूशियर याला पाचारण करण्यात आले. कार्बूशियरने या कामासाठी आपल्या देशी-विदेशी सहकाऱ्यांचे एक सैन्यच उभे केले आणि प्राचीन पहाडाच्या कुशीत ही आधुनिक नगरी तयार झाली. १९४८ मध्ये विमानातून जागेची पाहणी झाली. ४९ मध्ये भूप्रदेशाचा अभ्यास झाला. ५१ मध्ये नगराचा पाया घातला आणि ५३ मध्ये राष्ट्राध्यक्षांनी या नगराचे औपचारिक उद्घाटन केले. नंतर तीन-चार वर्षांतच सरकारी इमारती, हॉस्पिटले, बाजार, बागा, शिक्षणसंस्था सारे काही वसविण्यात आले. हा सारा पसारा १५ मैलांच्या क्षेत्रफळात वसलेला आहे. ही अशी जागा आहे की जिथे मुळात छोटे खेडेसुद्धा नव्हते. उजाड जागेवर हे आटपाटनगर वसवले आहे. विस्तार्ण रस्ते, दोन्ही बाजूंना बांधलेली छानदार घरे शहराचे सौंदर्य वाढवतात.

प्रत्येक शहराला आपले म्हणून एक व्यक्तिमत्त्व असते. रस्ते, गल्ल्या, बाजार, मंदिरे, मशिदी, बागा अशा अनेक घटकांनी ते घडवलेले असते. त्याला एक इतिहास असतो. अनुभवांची, सुखदुःखांची परंपरा असते. याच अर्थाने 'Rome was not built in a day' असे म्हणतात. चंदीगडला मात्र अशी परंपरा, इतिहास किंवा सनातनत्व नाही. हे शहर एकदम नवे, ताजे टवटवीत आहे. विश्वकर्म्याने ब्रह्मांड निर्माण करावे तसे ली कार्बूशियर या फ्रेंच वास्तुशास्त्रज्ञाने हे सुंदर शहर निर्माण केले आहे. आधुनिक वास्तुशिल्पाच्या अभ्यासकांना चंदीगड हे तीर्थक्षेत्रासारखे वाटते. सचिवालय, न्यायालय, आमदारनिवास आणि लोकांची घरे एका वेगळ्याच शैलीत बनवलेली आहेत. त्यांच्या भिंती आणि सनब्रेकरही सुरेख आहेत. समाजाचे वेगवेगळे स्तर लक्षात घेऊन वेगवेगळ्या टाईपची घरे तयार केली आहेत. एक खोली कोणालाच मान्य नाही. कमीत कमी दोन खोल्या आहेतच. या घरांचे तीस सेक्टर आहेत. प्रत्येक सेक्टरमध्ये दैनंदिन गरजा भागवणारा बाजार, उद्यान सारे आहे. ते तीस छोट्या गावांचे बनलेले एक शहरच आहे म्हणा ना! इथली खाजगी घरेसुद्धा शिल्पी महामंडळाकडून परवानगी

घेऊन बांधावी लागतात. त्यामुळे त्यातही एक प्रकारची शिस्त आहे. एक सहा मजली गगनचुंबी इमारत आणि शेजारी छोटे झोपडे, असे दृश्य इथे दिसणार नाही. प्रत्येक बिल्डिंगसमोर चिमुकली बाग आहे. विद्यापीठाच्या इमारती तर फारच आखीवरेखीव आहेत. एका प्रचंड चौकात सचिवालय, विधानसभा व न्यायमंदिर या तीन प्रचंड वास्तू आहेत. या इमारतींना प्लॅस्टर केलेले नाही व रंगही दिलेला नाही. उपयुक्तता व साधेपणा एवढाच विचार तेथे आहे. सचिवालयाची इमारत सर्वांत मोठी— नऊ मजल्यांची आहे. विधानसभा नौकेच्या आकाराची आहे. नाहीतरी ती हरियाना व पंजाब यांच्या वादळात हेलकावे घेतेच आहे. न्यायमंदिराच्या आत सौम्य रंगातील भित्तिचित्रे आहेत आणि त्याच्याभोवती न्यायमंदिराचे प्रतिबिंब पडेल, असा जलाशयही आहे. कृत्रिमरीत्या तयार केलेले 'सुखना लेक' हे चंदीगडचे आणखी एक सौंदर्यस्थान आहे. ही सर्व स्थळे आम्ही पाहिली. संध्याकाळी पाचच्या सुमाराला आम्ही चण्डीगढमध्ये पोचलो.

## निवासव्यवस्था

चंदीगढमध्ये 'माऊंट व्ह्यू हॉटेल', 'हॉटेल अरोमा' यांसारखी सुंदर हॉटेल्स आहेत. त्याशिवाय डाकबंगले व धर्मशाळा आहेत. हरियाना टूरिस्ट बंगलाही आहे. स्टॅन्डच्या आसपास असलेल्या २A व २B ह्या सेक्टरमध्ये खाजगी टूरिस्ट बंगले आहेत. स्टॅन्डजवळच 'विक्रम' आणि 'शिवालिक' नावाची दोन चांगली हॉटेल्स आहेत. आम्हाला 'राधास्वामी सत्संग' नावाच्या २१व्या सेक्टरमधल्या टूरिस्ट बंगल्यात ६० रुपयांत अटॅचबाथ रूम मिळाली. आम्ही चण्डीगडचे खरे दर्शन घ्यायचे, म्हणून मुद्दाम सायकलरिक्षा केली. हा रिक्षावाला आम्हाला वीस रुपयांत चार-पाच स्थळे दाखवणार होता आणि शेवटी १७व्या सेक्टरमध्ये असलेल्या सेंट्रल बाजारात सोडून देणार होता. दुपारी तीनला आम्ही बाहेर पडलो. प्रथमग्रासे माक्षिकापात व्हावा तसे होऊन सोमवार म्हणून म्युझियम बंद होते.

## रोझ गार्डन

मग आम्ही प्रथम गेलो ते रोझगार्डनला. तिथे नजर पोचेल तिथपर्यंत रंगीबेरंगी गुलाबांचे गालिचे पसरलेले दिसत होते. त्यात विविधताही किती !

गुलाबी, शेंदरी, लाल, पिवळे, केशरी, पांढरे अगदी हिरवे आणि काळे गुलाबसुद्धा तिथे हजर होते. पुन्हा प्रत्येकाचा आकार वेगळा, डौल वेगळा. सभोवती हिरवळ, मध्येच एक गुलाबी फुलांचा ताटवा, दुसऱ्या ताटव्यात पांढरीशुभ्र बटणगुलाबाची फुले, सुगंधी देशी गुलाबांचा कोपरा वेगळा. तो बगिचा पाहणे म्हणजे नेत्रसुखाची पर्वणी होती. बागेची निगाही चांगली राखली होती. कुठेही कागदाचा कपटादेखील नव्हता. हिरव्यागार आणि मऊशार हिरवळीवर लोळणफुगडी घेताना फारच छान वाटत होते. इथून हलूच नये असे वाटत असतानाच रिक्षावाला ओरडत आला,"ह्या वेगाने तुम्ही स्थळे पाहू लागलात तर बाजार बंद होईल." अशी भीती त्याने आम्हाला दाखवली. नंतर आमची रिक्षा चण्डीगडच्या प्रसिद्ध 'रॉक गार्डन' कडे निघाली.

### रॉक गार्डन

चण्डीगडचे रॉक गार्डन ही भारतातील एक अलौकिक कलाकृती आहे. आपल्या देशाचे हे भूषण प्रत्येकाने आवर्जून पाहावे, असेच आहे. नेकचंद सैनी या कलाकाराच्या प्रतिभेतून स्फुरलेले हे एक काव्यमय स्वप्न आहे. टाकाऊ वस्तूंमधून केलेली ही कलात्मक निर्मिती आहे. हे एक वेगळेच साम्राज्य आहे. या साम्राज्यात प्रवेश करताना आपल्याला आपले प्रौढत्व बाजूला ठेवून, बाल्यत्व स्वीकारावेसे वाटते. दगडगोटे, फुटक्या बाटल्या, बरण्यांचे तुकडे, ग्लेझ टाईल्सचे तुकडे, फ्यूज उडालेले बल्ब आणि निकामी ट्यूब्स, लाकडाच्या काटक्या, रिकामी मातीची मडकी, बांगड्यांच्या काचांचे विविधरंगी तुकडे अशा मालमसाल्यातून येथील अद्‌भुत सृष्टी निर्माण झाली आहे. या गार्डनचे निर्माते नेकचंद सैनी हे पी.डब्लू.डी.त ऑफिसर होते. सरकारच्या दृष्टीने निरुपयोगी असलेल्या टाकाऊ सामानाचा, स्क्रॅपचा त्यांनी संग्रह केला. शेजारच्या डोंगरातून दगड, गोटे गोळा केले. कारखान्यांतून व दुकानांतून निरुपयोगी गोष्टी मिळवल्या आणि या संग्रहातून हे साम्राज्य साकार केले. इथे साधारणतः दोन हजार मूर्ती किंवा आकृती आहेत. त्यांच्या साहाय्याने भारतातील सण, समारंभ, ग्रामीण लोकजीवन आणि चालीरीती साकार झाल्या आहेत. स्वतः नेकचंद आपल्या साम्राज्याला 'Kingdom of Gods and Godesses' असे नाव देतात. ते कोणत्याही आर्टस्कूलमध्ये गेलेले नाहीत. निसर्गाच्या सहवासातच त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले आहेत.

५० साली चण्डीगड निर्माण झाले. १९६०च्या सुमारास रॉकगार्डनचे काम सुरू झाले. ते ७० साली पूर्ण झाले. मुद्दाम नेकचंदजींनी छंद म्हणून काही छोट्या मूर्ती तयार केल्या होत्या. हळूहळू या निर्मितीत ते इतके गढून गेले की, वर्षानुवर्षे तो त्यांचा ध्यास बनला. कालांतराने सरकारी साहाय्यही मिळाले.

या साम्राज्यात डोंगरदऱ्या आहेत. झुळुझुळू वाहणारा धबधबा आहे. ओढ्यावर छोटा पूल आहे. लाकडाच्या आणि गवताच्या झोपड्या आहेत. इथल्या लाकडी वेलींचे जाळे तर इतके नैसर्गिक आहे की, त्या खऱ्याखुऱ्या वेलीच वाटतात. उंच टेकडीवर उभ्या केलेल्या झोपड्याही अशाच खऱ्या वाटतात. एका बाजूला एक छोटे खेडेगाव साकार केले आहे. अरुंद रस्ते, झाडे, झाडाभोवती पार, पारावर बसलेला दाढीधारी भगव्या कपड्यातील साधू, बैलजोडीमागे उभे असलेले पंजाबी शेतकरी पतिपत्नी, रंगीबेरंगी कपडे घातलेल्या लमाणी स्त्रिया, डोक्यावर पाट्या घेऊन चाललेल्या मुली, वाद्ये वाजविणारे वादक, एका बाजूला चाललेली पालखी अशी विविध दृश्ये तेथे आहेत. रंगीबेरंगी बांगड्यांच्या तुकड्यांच्या साड्या नेसलेल्या स्त्रिया आपले लक्ष वेधून घेतात. अशा सप्तरंगी साड्या कुठल्याही दुकानात विकत मिळणार नाहीत. या बांगड्यांच्या तुकड्यांमध्ये लाल, निळा, हिरवा, पिवळा हे रंग जास्त प्रमाणात आहेत.बायका पांढऱ्या किंवा काळ्या रंगाच्या बांगड्या फारशा वापरत नाहीत. त्यामुळे ते रंग अभावानेच आढळतात. शाळेत जाणारी किंवा कवायत करणारी मुले इथे असून, त्यांच्या कपड्यांसाठी ग्लेझ टाईल्सच्या तुकड्यांचा वापर केला आहे. पार्श्वभूमीसाठी जी भिंत उभी केली आहे, ती लाईट्सच्या निरुपयोगी सामानाने तयार केली आहे.

काही वर्षांपूर्वी एका फ्रेंच म्युझियमचा क्युरेटर इथे आला होता. हे रॉक गार्डन पाहिल्यानंतर त्याने व्हिजीटर्स बुकमध्ये लिहून ठेवले- **'God has a Competitor-Nekchand'.** १९७८ मध्ये वॉशबर्न नावाच्या अमेरिकन अधिकाऱ्याने हे रॉक गार्डन पाहिले आणि तो चकितच झाला. अमेरिकेत परत गेल्यानंतर त्याने या गार्डनची इतकी स्तुतिस्तोत्रे गायली की, वॉशिंग्टनच्या चिल्ड्रन म्युझियमचे डायरेक्टर मिस्टर ल्युईन खास हे गार्डन पाहण्यासाठी भारतात आले. ते इतके प्रभावित झाले की, असेच दुसरे साम्राज्य वॉशिंग्टनमध्ये निर्माण करण्यासाठी त्यांनी नेकचंदना निमंत्रित केले. नंतर पॅरीसमधील 'फेस्टिवल ऑफ इंडिया' चा भाग म्हणून तिथेही फॅन्टसी गार्डन निर्माण

करण्याचे ठरले आणि नेकचंदजी पॅरीस व वॉशिंग्टनला गेले. वॉशिंग्टनच्या चिल्ड्रन्स म्युझियममध्ये फॅन्टसी गार्डन निर्माण करण्यासाठी ते पाच महिने मुक्काम करून राहिले. ५ ऑक्टोबर ८५ रोजी या फॅन्टसी गार्डनचे समारंभपूर्वक उद्घाटन झाले. त्या सोहळ्याचा काही भाग दूरदर्शवर दाखवला होता. परदेशातही नेकचंदजींचा सन्मान झाला. बाल्टीमोरने त्यांना सन्माननीय नागरिकत्व बहाल केले. आपल्या देशाने त्यांना पद्मश्री दिली. आज त्यांच्या वयाची साठी उलटली आहे. असेच गार्डन निर्माण करण्यासाठी त्यांना इस्त्राइलने आमंत्रित केले होते; पण त्यांना चंदीगड सोडण्याची किंवा परदेशात स्थायिक होण्याची इच्छा नाही. रॉक गार्डन पाहताना आपल्या या कलाकार देशबांधवाने भारतीय कलेचा झेंडा अमेरिकेत फडकवल्याच्या भावनेने, मन कसे भरून आले होते. जवळजवळ तासभर आम्ही या गार्डनमध्ये फिरत होतो.

## सुकना लेक आणि सेंट्रल बाजार

नंतर आम्ही 'सुकना लेक' या सरोवराकडे गेलो. एशियाड स्पर्धांच्या वेळी नौकांची शर्यत इथेच झाली होती. शहराला पाणीपुरवठा याच लेकमधून होतो. लेकजवळ जाण्यासाठी उंच बंधारा आहे. त्यावर जवळजवळ १० फूट रुंद रस्ता असून, एका बाजूला तळे तर दुसऱ्या बाजूला झाडी आहे. लोक हौसेने इथे फिरायला येतात. कोणी रनिंग करत असतात. इथे नौकाविहाराची सोयही उपलब्ध आहे. तसेच एका कोपऱ्यात कॅफेटेरिया आहे. आम्ही तिथे गरमागरम चीज पकोडे खाल्ले व तळ्याकाठी बसून सूर्यास्त पाहिला.

शेवटी आम्ही चंदीगडमधील १७व्या सेक्टरमधील सर्वांत मोठ्या बाजारात गेलो. सेंट्रल बाजाराची रचना आयताकृती असून मध्यभागी मोठी मोकळी जागा व चारी बाजूंच्या लेन्समध्ये दुकाने आहेत. मध्यभागी रंगीबेरंगी दिव्यांचे झोत टाकलेले कारंजेही आहे. मी एक नायलॉनचा सुरेख स्वेटर तिथे खरेदी केला. ८॥ ला दुकाने बंद झाली, तेव्हा स्टॅन्डजवळ भोजन करून आम्ही लॉजवर परतलो. आता चण्डीगडचा निरोप घेऊन दिल्लीमार्गे परतीचा प्रवास करायचा होता.

□

विभाग २

# दिल्ली आणि काश्मीर

# दिल्ली

## दिल्ली तेरी बात निराली

उत्तरेकडील बऱ्याचशा हिलस्टेशन्सना जाताना व्हाया दिल्ली जावे लागते. हिमाचलला असो, मसुरीला असो किंवा काश्मीरला जायचे असो, पहिला मुक्काम दिल्लीतच करावा लागतो. नैनीताललाही दिल्लीहून बसने जाता येते. राजस्थानात जातानाही दिल्ली ओलांडावी लागते. एखादा दिवस दिल्लीत भटकायचे, खायचे-प्यायचे, परतीचे रिझर्वेशन करायचे आणि मगच पुढे जायचे, हा आमचा शिरस्ता झाला आहे. पाच-सहा वेळा दिल्लीत जाऊनही, दर वेळी काहीतरी नव्याने पाहायला मिळते. कॅनॉट सर्कलमधील उच्चभ्रूंच्या बाजारात आम्ही थोडे दबकतच वावरतो; पण चांदणी चौकातल्या फूटपाथवर रात्री बार्गेनिंग करताना मजा येते. छोट्या मुलांचे ड्रेसेस, खेळणी, सूटकेसेस, इलेक्ट्रॉनिक उपकरणे तिथे स्वस्त व मस्त मिळतात. पराठे गल्लीत विविध प्रकारच्या पराठ्यांचा आस्वाद घ्यावा– त्यावर मोठ्ठा ग्लास भरून लस्सी किंवा फ्रूट ज्यूस घ्यावा. खवैय्यांच्या दृष्टीने दिल्ली म्हणजे पर्वणीच आहे. मराठी, गुजराथी, मद्रासी, उत्तर हिंदुस्थानी, पंजाबी सर्व प्रकारचे पदार्थ इथे मिळतात. दिल्लीचे हवामान विचित्र आहे. उन्हाळ्यात कडक ऊन, थंडीत कडक थंडी; पण आमच्यासारखे भटके सर्व प्रकारच्या वातावरणाशी जुळवून घेतात.

काश्मीरला जाताना आम्ही एक दिवस दिल्लीत मुक्काम केला. 'मे' महिन्यातील कडक उन्हाळा, पण स्वस्थ बसणे स्वभावातच नाही ना ! काही कारणाने दिल्लीचे बाजार बंद होते. पण साईटसीईंग बस चालू होती. दुसरा काहीच उद्योग नसल्याने आम्ही स्थलदर्शनाला निघालो.

## दिल्ली शहराची वैशिष्ट्ये

यमुना नदीच्या काठावर वसलेले हे प्राचीन शहर आहे. वेगवेगळ्या वंशाचे

किती राजे आले आणि गेले. पांडवांच्या काळात त्याला इंद्रप्रस्थ म्हणत होते. राजा अनंगपालाने त्याचे नाव 'लाल कोट' ठेवले होते. त्याने उभारलेला लोहचाचा प्रचंड खांब ढिला झाला, त्यावरून या जागेला ढिल्ली-दिल्ली असे म्हणू लागले, असे एक मत आहे, तर काहींच्या मते मयूर वंशातील राजा 'दिलू' याच्यावरून या शहराचे नाव दिल्ली पडले असावे. मुगल सम्राट 'शहाजहाँ' याने या नगराचे नाव 'शहॉजहाँबाद' ठेवले होते. पृथ्वीराज चौहान याचीही ही काही काळ राजधानी होती. इंग्रजांनी आपली राजधानी कलकत्त्याला करण्याचे ठरवले होते; पण जॉर्ज पंचमने ती दिल्लीच ठेवली. स्वातंत्र्योत्तर काळातही तीच भारताची राजधानी झाली. या शहराचे क्षेत्रफळ ५७ चौरस मैल आहे आणि येथील लोकसंख्या सुमारे ५० लाख आहे.

उत्तर भारतातील हे महत्त्वाचे जंक्शन आहे. इथे दोन विमानतळ आहेत, आंतरराज्यीय बसस्टँड आहे. राजधानी असल्याने विदेशी राजदूतांची व मंत्र्यांची निवासस्थाने येथे आहेत. शिक्षणक्षेत्रातही दिल्ली विश्वविद्यालय विख्यात आहे. एशियाड स्पर्धांमुळे इथे आता भव्य 'इंद्रप्रस्थ स्टेडियम' तयार झाले आहे. जवळच एशियाडनगर आहे. उद्योगधंद्यांचे ते मोठे केंद्र असून, विशेषतः सोन्याचांदीची आभूषणे, हस्तिदंती कारागिरी याबद्दल ते प्रसिद्ध आहे. श्रीनगरपासून त्रिवेंद्रमपर्यंत विविध प्रांतांच्या राजधान्या मी पाहिल्या आहेत पण तरीही म्हणावेसे वाटते की— 'दिल्ली तेरी बात निराली !'

## लाल किल्ला

लाल किल्ला ही दिल्लीची शान आहे. लाल दगड वापरून बांधलेला हा किल्ला आजही भक्कम आहे. मोगल सम्राट शहाजहाँ याने हा किल्ला १६४१ मध्ये बांधला. नऊ वर्षे त्याचे बांधकाम सुरू होते व त्याला नऊ करोड रुपये खर्च आला. प्रसिद्ध शिल्पशास्त्रज्ञ 'मुकरम्मतखा' याने त्याचे बांधकाम केले आहे. हा किल्ला अष्टकोनी असून, त्याचा विस्तार जवळजवळ दीड मैल आहे. ६० फूट उंचीच्या त्याच्या भिंतीवरून यमुना नदी दिसते. औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव 'किला-ए-मुबारक' ठेवले होते, तर बहादूरशहाने 'किला-ए-मुअला' (प्रतिष्ठित किल्ला) ठेवले होते. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात भूकंपामुळे त्यातील इमारतींचे नुकसान झाले. जाटांनी काही इमारती नष्ट केल्या. तरीही हा किल्ला आजही प्रेक्षणीय आहे.

या किल्ल्याला दोन दरवाजे आहेत— १) लाहौरी दरवाजा : हा चांदणी चौकाजवळ आहे आणि २) दिल्ली दरवाजा : हा अलीकडे मिलिटरीच्या ताब्यात आहे. लाहौरी दरवाजासमोर मुगल काळात 'मीना बाजार' भरत असे. या दरवाजाच्या दोन्ही बाजूंना छत्री असलेले बुरूज आहेत आणि मधल्या बाजूला सात संगमरवरी गोल खिडक्या आहेत. खिडक्यांच्या दोन्ही बाजूंना अष्टकोनी घुमटाकृती मिनार आहेत. दिल्ली दरवाजाची रचनाही साधारणपणे तशीच आहे.

लाहौरी दरवाजातून आत शिरले की, छत्ता चौक, मग नगारखाना आणि नंतर **'दिवाने आम'** ही इमारत लागते. ही इमारत सुस्थितीत आहे. इथे सम्राटांचा दरबार भरत असे. तिच्या भिंतीवर काही इतिहासप्रसिद्ध घटनांची चित्रे आहेत. सुंदर पक्षी-फळे-फुले यांचे नक्षीकाम आहे. पूर्वी तिथे मूल्यवान रत्ने जडवलेली होती. ती अनेकांनी लुटून नेली. एका बाजूला ७ फूट लांब व ३ फूट रुंद संगमरवरी आसन आहे. त्यावर उभे राहून प्रधानमंत्री सम्राटापुढे अर्ज पेश करत असत. इतर सरदार व राजदूत खाली उभे राहत आणि जनता बाहेर उभी राहत असे. रोज प्रातःकाली सम्राट येथे फिर्यादी ऐकत असत.

**'दिवाने खास'** हा बादशहाचा खास दरबार होता. ९० फूट लांब व ७० फूट रुंद अशा या भवनाला बत्तीस संगमरवरी स्तंभांनी तोलून धरले आहे. पूर्वी येथे चांदीचे छत होते. ते १७५९ मध्ये जाटांनी उखडून नेले. याच महालात नऊ करोड रुपयांची रत्ने जडविलेले, शहाजहाँचे सिंहासन होते. त्यासाठी एक लाख तोळे सोने वापरले होते. छतावर हिरे-मोती जडवलेले होते आणि सिंहासनावर चढण्यासाठी चांदीच्या पायऱ्या होत्या, असे सांगतात. हे सिंहासन नादिरशहाने भ्रष्ट केले व लुटले. या भवनात बादशहा फक्त विश्वासू लोकांशी चर्चा करत असे. याच महालात औरंगजेबाने आपल्या भावांचे शिरच्छेद केले. नादिरशहाने कोहिनूर हिऱ्यावर मालकी मिळवली. लाल किल्ला इतिहासाचा साक्षीदार आहे. १८५७ च्या युद्धानंतर इथे बहादूरशहावरील मुकदमा चालला, आझाद हिंद सेनेच्या सैनिकांवरील खटल्याचे काम इथेच झाले आणि महात्मा गांधी खून खटल्याची सुनावणीही इथेच झाली. १५ ऑगस्ट ४७ ला जवाहरलाल नेहरूंच्या शुभहस्ते लालकिल्ल्यावर स्वतंत्र भारताचा तिरंगी झेंडा फडकला. तेव्हापासून प्रतिवर्षी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिन सोहोळा तिथे साजरा होतो. लाल किल्ल्यात मोगलकालीन व ब्रिटिशकालीन वस्तूंचे संग्रहालयही आहे.

### जामा मस्जिद

लाल किल्ल्यापासून जवळच ही भारतातील सर्वांत जास्त प्रसिद्ध मशीद आहे. हिची निर्मितीही शहाजहाननेच केली आणि तिचे अपुरे काम औरंगजेबाने पूर्ण केले. ही मशीद लाल व सफेद संगमरवरी दगडांनी बांधलेली व भव्य आहे. दिल्लीत असताना प्रत्येक शुक्रवारी बादशहा या मशिदीत येत असे. आजही ईदसारख्या प्रसंगी मुस्लीम लोक लाखोंच्या संख्येने येऊन इथे आवर्जून नमाज पढतात.

### जंतर मंतर

संसद मार्गावरील खगोलशास्त्रासंबंधीची ही वेधशाळा, जयपूर नरेश जयसिंह यांनी १७४२ मध्ये बांधली. सम्राट यंत्र, राम यंत्र, जयप्रकाश यंत्र व मिश्र यंत्र अशी महत्त्वाची यंत्रे इथे असून, त्यांच्या आधारे सूर्य, चंद्र व नक्षत्रे यांची स्थिती, वेळ यांचा उलगडा होतो. जयपूर, उज्जैन आणि मथुरा येथेही जंतरमंतर यंत्रे आहेत.

### बिर्ला मंदिर

राजा बलदेवदास बिर्ला याने नव्या दिल्लीच्या धर्मसभेकडे लाखो रुपयांची देणगी दिली, आणि १९३३ मध्ये या मंदिराचा पाया घातला गेला. १८ मार्च १९३९ रोजी महात्मा गांधीजींच्या हस्ते या मंदिराचे उद्घाटन झाले. इथे मध्यभागी लक्ष्मीनारायण मंदिर असून, बाजूला इतर छोटी मंदिरे आहेत. उजवीकडे शिवमंदिर आहे तर डावीकडे दुर्गामंदिर. गीतामंदिरामधील श्रीकृष्णाची मूर्ती विलोभनीय आहे. भगवान बुद्धाच्या मंदिराच्या भिंतीवर त्यांच्या जीवनातील घटना चित्रित केल्या आहेत. येथील बहुतेक मूर्ती व चित्रे जयपूरच्या कलाकारांनी घडविलेली व कलात्मक आहेत. मंदिरातील स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे. मंदिरालगतच धर्मशाळा असून, तिथे अल्पखर्चात यात्रेकरूंची निवासव्यवस्था होऊ शकते. हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख या सर्वांनाच हे स्थान आदरणीय वाटते.

### संसदभवन

रोज दूरदर्शनवरून दिसणारे संसदभवन किंवा पार्लमेंट हाऊस बाहेरूनच

पाहावे लागते. आत प्रवेश करण्यासाठी खास परवानगी घ्यावी लागते. ब्रिटिशकाळात निर्माण झालेली ही दुमजली, गोलाकार इमारत प्रेक्षणीय आहे. १९२१ मध्ये ड्यूक ऑफ कॅनॉटने या इमारतीची कोनशिला बसवली आणि पाच वर्षांनंतर लॉर्ड इरविन ह्यांनी तिचे उद्‌घाटन केले.

संसदभवनाच्या व्हरांड्यात गोलाकार १४४ स्तंभ असून, त्यांची उंची सुमारे १५० फूट आहे. संसदभवनाचा घुमट १०० फूट व्यासाचा असेल. त्यात तीन मोठी सभागृहे आहेत. विधानसभा भवनात चारशे लोक बसू शकतात, तर राज्यपरिषदभवनात दोनशे बसू शकतात. तिसऱ्या सभागृहातही शंभर-सव्वाशे लोकांची बसण्याची व्यवस्था आहे. सुंदर बगिचे-कारंजी या गोष्टींमुळे या भवनाची शोभा वाढली आहे. देशाचे महत्त्वपूर्ण निर्णय याच ठिकाणाहून घेतले जात असतात.

## राष्ट्रपतीभवन

ही दिल्लीतील सर्वांत सुंदर इमारत आहे. राजधानीच्या मध्यावरील या इमारतीला स्तंभ, व्हरांडे यांनी सौंदर्य प्राप्त झाले आहे. वास्तुकलातज्ज्ञ सर एडविन ल्यूटन आणि सर हरबर्ट यांनी १९३० च्या सुमाराला हे भवन निर्माण केले. त्यासाठी पांढरा व लाल संगमरवर वापरला आहे. राष्ट्रपतीभवनाचे क्षेत्रफळ तीनशे एकर असून, त्यांपैकी बारा एकर जागेत उद्याने आहेत. विस्तृत व्हरांडा, तीनशेचाळीस खोल्या, नोकरांसाठी असलेली पंचवीस घरे, लिफ्टस्, विद्युतनिर्मिती केंद्र, उन्हाळ्यात गारवा आणि थंडीत उष्णता निर्माण करण्याची सोय अशी कितीतरी वैशिष्ट्ये तिथे आहेत. यांपैकी मुख्य इमारतीलाच त्या काळात सव्वा कोटी रुपये खर्च आला होता. तेथील फर्निचरसुद्धा ब्रिटिशकालीन व कलापूर्ण आहे. रात्रीच्या विद्युतप्रकाशात हे भवन फारच आकर्षक दिसते. येथील मुगल गार्डन फारच सुंदर आहे, पण ते फक्त फेब्रुवारी महिन्यात लोकांना पाहण्यासाठी खुले असते.

## इंडिया गेट व विजय चौक

इंडिया गेट या नावाने ओळखली जाणारी ही जागा म्हणजे युद्धस्मारक आहे. पहिल्या महायुद्धात जे भारतीय सैनिक मृत्युमुखी पडले, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ब्रिटिशांनी हे स्मारक निर्माण केले. ड्यूक ऑफ कॅनॉटने त्याची कोनशिला बसवली,

आणि लॉर्ड इरविनने उद्‌घाटन केले. जनता पक्षाच्या कारकीर्दीत जयप्रकाशजींच्या हस्ते इथे एक ज्योत प्रज्वलित केली होती. गॅसवरील ही ज्योत आजही तेवती आहे. हा परिसरच नितांत रमणीय आहे. येथील रुंद रस्ते, बगिचे, हिरवळ यांमुळे संध्याकाळी या भागात थोडी वर्दळ असते.

विजय चौकाला महत्त्व येण्याचे कारण म्हणजे २६ जानेवारीची प्रजासत्ताक दिनाची परेड दर वर्षी येथून सुरू होते. इथून राजघाट, शांतिवन आणि शक्तिस्थल ही अनुक्रमे महात्मा गांधीजी, पंडित नेहरूजी आणि इंदिराजी यांची समाधिस्थळे जवळ आहेत. याच परिसरात राजीवजींवरही अंत्यसंस्कार झाले. भारताचे हे चार प्रमुख शिल्पकार इथे चिरविश्रांती घेत आहेत. भारतीय व विदेशी मंडळी आवर्जून या ठिकाणांना भेट देतात आणि पुष्पचक्र वाहून आदरांजली देतात. संजय गांधी यांचे स्मारक म्हणून उभारलेल्या लाल स्तंभाजवळ युवक कार्यकर्तेही श्रद्धेने जातात आणि आदर व्यक्त करतात. जवाहरलालजी व इंदिराजी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले त्रिमूर्तीभवनही इथून जवळच आहे. स्थलदर्शनामध्ये या स्थळांचा समावेश केलेला आहे.

## हुमायूका मकबरा

कुतुबमिनारकडे जाणाऱ्या रस्त्यावर सम्राट हुमायूनची ही कबर आहे. त्याची बेगम हमीदाबानू हिने त्याच्या स्मरणार्थ ही बनवली. तिची जागा त्याने मृत्यूपूर्वीच निश्चित केली होती. ही कबर पाहताना 'ताज'ची आठवण येत होती. ही इमारत पाहून, शहाजहानला ताजमहाल निर्माण करण्याची स्फूर्ती झाली असे म्हणतात. ही इमारत लाल दगडाची आहे, तर ताजमहाल संगमरवरी आहे. या इमारतीचा घुमट ताजसारखाच आहे, पण त्याला मिनार मात्र नाहीत. घुमटाच्या खाली हुमायून आणि त्याची बेगम अशा दोघांच्या कबरी आहेत. हे त्या घराण्याचे कबरस्थान असून तिथे सुमारे १५० जणांचे दफन केले आहे. इमारत निर्माण करणाऱ्या कारागिरांना नंतर ठार करण्यात आले व त्यांचेही दफन याच परिसरात केले, अशी आख्यायिका आहे. इमारतीच्या भोवताली हिरवळ व बगिचा आहे. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून दिल्लीचे दृश्य दिसते.

## कुतुबमिनार

दहा-बारा वर्षांपूर्वी आम्ही कुतुबमिनारला गेलो होतो, तेव्हा पाचही मजले

पाहावे लागते. आत प्रवेश करण्यासाठी खास परवानगी घ्यावी लागते. ब्रिटिशकाळात निर्माण झालेली ही दुमजली, गोलाकार इमारत प्रेक्षणीय आहे. १९२१ मध्ये ड्यूक ऑफ कॅनॉटने या इमारतीची कोनशिला बसवली आणि पाच वर्षांनंतर लॉर्ड इरविन ह्यांनी तिचे उद्घाटन केले.

संसदभवनाच्या व्हरांड्यात गोलाकार १४४ स्तंभ असून, त्यांची उंची सुमारे १५० फूट आहे. संसदभवनाचा घुमट १०० फूट व्यासाचा असेल. त्यात तीन मोठी सभागृहे आहेत. विधानसभा भवनात चारशे लोक बसू शकतात, तर राज्यपरिषदभवनात दोनशे बसू शकतात. तिसऱ्या सभागृहातही शंभर-सव्वाशे लोकांची बसण्याची व्यवस्था आहे. सुंदर बगिचे-कारंजी या गोष्टींमुळे या भवनाची शोभा वाढली आहे. देशाचे महत्त्वपूर्ण निर्णय याच ठिकाणाहून घेतले जात असतात.

## राष्ट्रपतीभवन

ही दिल्लीतील सर्वांत सुंदर इमारत आहे. राजधानीच्या मध्यावरील या इमारतीला स्तंभ, व्हरांडे यांनी सौंदर्य प्राप्त झाले आहे. वास्तुकलातज्ज्ञ सर एडविन ल्यूटन आणि सर हरबर्ट यांनी १९३० च्या सुमाराला हे भवन निर्माण केले. त्यासाठी पांढरा व लाल संगमरवर वापरला आहे. राष्ट्रपतीभवनाचे क्षेत्रफळ तीनशे एकर असून, त्यांपैकी बारा एकर जागेत उद्याने आहेत. विस्तृत व्हरांडा, तीनशेचाळीस खोल्या, नोकरांसाठी असलेली पंचवीस घरे, लिफ्टस्, विद्युतनिर्मिती केंद्र, उन्हाळ्यात गारवा आणि थंडीत उष्णता निर्माण करण्याची सोय अशी कितीतरी वैशिष्ट्ये तिथे आहेत. यांपैकी मुख्य इमारतीलाच त्या काळात सव्वा कोटी रुपये खर्च आला होता. तेथील फर्निचरसुद्धा ब्रिटिशकालीन व कलापूर्ण आहे. रात्रीच्या विद्युतप्रकाशात हे भवन फारच आकर्षक दिसते. येथील मुगल गार्डन फारच सुंदर आहे, पण ते फक्त फेब्रुवारी महिन्यात लोकांना पाहण्यासाठी खुले असते.

## इंडिया गेट व विजय चौक

इंडिया गेट या नावाने ओळखली जाणारी ही जागा म्हणजे युद्धस्मारक आहे. पहिल्या महायुद्धात जे भारतीय सैनिक मृत्युमुखी पडले, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ब्रिटिशांनी हे स्मारक निर्माण केले. ड्यूक ऑफ कॅनॉटने त्याची कोनशिला बसवली,

आणि लॉर्ड इरविनने उद्घाटन केले. जनता पक्षाच्या कारकीर्दीत जयप्रकाशजींच्या हस्ते इथे एक ज्योत प्रज्वलित केली होती. गॅसवरील ही ज्योत आजही तेवती आहे. हा परिसरच नितांत रमणीय आहे. येथील रुंद रस्ते, बगिचे, हिरवळ यांमुळे संध्याकाळी या भागात थोडी वर्दळ असते.

विजय चौकाला महत्त्व येण्याचे कारण म्हणजे २६ जानेवारीची प्रजासत्ताक दिनाची परेड दर वर्षी येथून सुरू होते. इथून राजघाट, शांतिवन आणि शक्तिस्थल ही अनुक्रमे महात्मा गांधीजी, पंडित नेहरूजी आणि इंदिराजी यांची समाधिस्थळे जवळ आहेत. याच परिसरात राजीवजींवरही अंत्यसंस्कार झाले. भारताचे हे चार प्रमुख शिल्पकार इथे चिरविश्रांती घेत आहेत. भारतीय व विदेशी मंडळी आवर्जून या ठिकाणांना भेट देतात आणि पुष्पचक्र वाहून आदरांजली देतात. संजय गांधी यांचे स्मारक म्हणून उभारलेल्या लाल स्तंभाजवळ युवक कार्यकर्तेही श्रद्धेने जातात आणि आदर व्यक्त करतात. जवाहरलालजी व इंदिराजी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले त्रिमूर्तीभवनही इथून जवळच आहे. स्थलदर्शनामध्ये या स्थळांचा समावेश केलेला आहे.

## हुमायूका मकबरा

कुतुबमिनारकडे जाणाऱ्या रस्त्यावर सम्राट हुमायूनची ही कबर आहे. त्याची बेगम हमीदाबानू हिने त्याच्या स्मरणार्थ ही बनवली. तिची जागा त्याने मृत्यूपूर्वीच निश्चित केली होती. ही कबर पाहताना 'ताज'ची आठवण येत होती. ही इमारत पाहून, शहाजहानला ताजमहाल निर्माण करण्याची स्फूर्ती झाली असे म्हणतात. ही इमारत लाल दगडाची आहे, तर ताजमहाल संगमरवरी आहे. या इमारतीचा घुमट ताजसारखाच आहे, पण त्याला मिनार मात्र नाहीत. घुमटाच्या खाली हुमायून आणि त्याची बेगम अशा दोघांच्या कबरी आहेत. हे त्या घराण्याचे कबरस्थान असून तिथे सुमारे १५० जणांचे दफन केले आहे. इमारत निर्माण करणाऱ्या कारागिरांना नंतर ठार करण्यात आले व त्यांचेही दफन याच परिसरात केले, अशी आख्यायिका आहे. इमारतीच्या भोवताली हिरवळ व बगिचा आहे. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून दिल्लीचे दृश्य दिसते.

## कुतुबमिनार

दहा-बारा वर्षांपूर्वी आम्ही कुतुबमिनारला गेलो होतो, तेव्हा पाचही मजले

वर जाता आले होते. आता टूरिस्टना तो खालूनच पाहून, समाधान मानावे लागते. दिल्लीपासून कुतुबमिनार अकरा मैलांवर आहे. अनेक वेळा भूकंपाचे धक्के बसूनही तो सुस्थितीत आहे. त्याचा पहिला मजला सम्राट पृथ्वीराज चौहान याने बांधला, असे म्हणतात. त्याचा दरवाजा हिंदू प्रथेप्रमाणे उत्तरेकडे आहे. इतर मजल्यांचे दरवाजे पूर्वेकडे आहेत. इ. स. १२०० मध्ये मुस्लीम राजवटीत कुतुबशहाने त्याचे नाव कुतुबमिनार ठेवले. १२१० ते ३६ या काळात कुतुबशहाचा जावई अल्तमश याने त्याचा दुसरा व तिसरा मजला बांधला, तर चौथा मजला फिरोजशहा तुघलकने १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्ण केला. असे म्हणतात की, पूर्वी कुतुबमिनारचे सात मजले होते आणि त्याची उंची ३०० फूट होती. आज त्यांतील पाच शिल्लक असून त्याची उंची सुमारे २३८ फूट आहे. प्रत्येक मजल्याला बाहेर सज्जा आहे. ३७९ गोलाकार पायऱ्या चढून वर गेल्यावर वरून पूर्ण दिल्लीचे दर्शन घडते. या मिनारचे खालचे तीन मजले लाल दगडाचे आहेत व कुराणातील वचने कोरलेली आहेत. वरचे दोन मजले संगमरवर व लाल दगड असे मिश्रित आहेत. प्रत्येक दरवाजाच्या वरच्या बाजूला तो कोणी बांधला किंवा त्याचा जीर्णोद्धार कोणी केला, याचे उल्लेख आहेत.

कुतुबमिनारच्या शेजारीच लाल दगडांनी बनवलेला एक सुंदर दरवाजा आहे. तो अल्लाउद्दिन खिलजीने १३१० मध्ये बनवला होता; म्हणून तो अलाई दरवाजा या नावाने ओळखला जातो. अल्लाउद्दिन खिलजीला कुतुबमिनारपेक्षाही रुंद व दुप्पट उंच असा मिनार उभारायचा होता. त्याने २५४ फूट रुंद असा मिनार उभारायला प्रारंभही केला. ८७ फूट उंच उभारून झाल्यावर १३१५ मध्ये त्याचा मृत्यू झाला आणि ती इमारत अपुरीच राहिली. या मिनाराच्या शेजारीच कुतुबमशीद आहे.

## प्रगती मैदान

स्थलदर्शनात समाविष्ट नसलेल्या प्रगती मैदानावर आम्हाला 'अप्पूघर' पाहण्यासाठी जायचे होते. बृहन्महाराष्ट्रभवनाच्या दारातच आम्ही ३१८ नंबर बस पकडली आणि प्रगतीमैदानावर पोचलो. इथे प्रतिवर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवरचे औद्योगिक प्रदर्शन भरते. प्रगती मैदानावरील विविध राज्यांच्या इमारती त्या त्या राज्याचे वैशिष्ट्य दाखविणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, राजस्थानची इमारत गुलाबी रंगाची— सज्जे आणि घुमट असलेली आहे.

महाराष्ट्राच्या इमारतीकडे पाहून पुण्याच्या इतिहासप्रसिद्ध विश्रामबागवाड्याची आठवण होते. कर्नाटक आणि ओरिसा यांच्या इमारतींवर शिल्पाकृती आहेत. हिमाचलची इमारत देखणी व सुबक आहे. परदेशी लोकांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी, म्हणून तिथे कायम स्वरूपात एक खेडेगाव निर्माण केले आहे. गोल झोपड्या, गवताने शाकारलेली घरे, हातमाग, बैलगाडी, पवनचक्की, मोट, तेलाचा घाणा, तळ्यातील होड्या अशा कितीतरी सुबक गोष्टी तिथे पाहायला मिळतात. मैदानावरील रस्त्यांना गंगा, यमुना, सतलज अशी नद्यांची नावे दिली आहेत. सर्व टाररोड्स असून ठिकठिकाणी मार्गदर्शक नकाशे लावले आहेत.

### अप्पूघर

प्रगती मैदानाची एकूण चार प्रवेशद्वारे आहेत. अप्पूघर हे चार नंबर गेटजवळ आहे. डिस्नेलँडप्रमाणे खास मुलांसाठी हे उद्यान तयार केल्याचा दावा केला जातो, पण येथील मनोरंजन फारच खर्चिक वाटले. गरीब तर सोडाच पण मध्यमवर्गीय मुलांनाही इथे सटीसामाशी येणेच परवडेल. कारण प्रगती मैदान शहरापासून दूर म्हणून तिथे येण्याजाण्याचे बसभाडे, मैदानावर प्रवेश करायला एक रुपया तिकीट, अप्पूघराचे १.२५ पैसे तिकीट. छोट्या ट्रेनमध्ये बसून चक्कर मारायची तर प्रत्येकी दोन रुपये, स्ट्रेकिंग कारमध्ये बसायला प्रत्येकी ३.७५ तिकीट आहे. सर्वांत एक्सायटिंग अनुभव येतो तो तुफान एक्स्प्रेसमध्ये. आगगाडीसारखे पण शोभिवंत तीन-चार डबे असलेली ही गाडी खरोखरच तुफान वेगाने धावते. क्षणात वर तर क्षणात खाली. धाडसी माणसाच्या हृदयाची धडकनसुद्धा वाढेल, असा हा अनुभव आहे. शिवाय मुलांसाठी टॉम ट्रेन, मेरी गो राऊंड, पाळणे आहेत. भेळपुरी, इडली/वडे, सॉफ्टी आइस्क्रीम, कोल्ड्रिंक्स वगैरे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आहेत. मिनी ट्रेनमध्ये बसून अर्धा तास मैदानावर चक्कर मारता येते. या ट्रेनचे तीन डबे आहेत. त्यांना हिमालय, विंध्याचल व निलगिरी अशी नावे दिली आहेत. असे हे अप्पूघर नावीन्यपूर्ण निश्चितच आहे.

### कमल मंदिर

आग्र्याला गेल्यावर 'ताज' पाहायलाच हवा, तसे दिल्लीत 'बहाई मंदिर' आवर्जून पाहायला हवे, असेच त्याचे सौंदर्य आहे. बहाई लोक त्याला भारतीय उपखंडातील मातृमंदिर म्हणतात; पण सामान्यांच्या दृष्टीने त्याच्या कमलाकृती

आकारामुळे ते कमलमंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. भारतातीलच नव्हे, तर आशियाखंडातील ते पहिले बहाईमंदिर आहे. या मंदिराशिवाय जगातील पाच खंडांमध्ये पाच बहाई प्रार्थनामंदिरे आहेत. १) उत्तर अमेरिकेतील विलमेट येथे, २) आफ्रिकेत कंपाला येथे, ३) ऑस्ट्रेलियात सिडने येथे, ४) युरोपमध्ये जर्मनीत फ्रँकफुर्ट येथे आणि ५) दक्षिण अमेरिकेत पनामा येथे. या पाचही मंदिरांचे फोटो तेथे पाहायला मिळाले आणि लक्षात आले की, भारतातील मंदिर सर्वांत जास्त सुंदर आहे. जगातील सर्व बहाईंनी या मंदिराला यथाशक्ती देणग्या दिल्या आहेत.

भारतीय संस्कृतीत कमळ हे सौंदर्य व पावित्र्य यांचे प्रतीक मानतात. हिंदू, मुस्लीम, जैन किंवा बौद्ध यांपैकी कोणत्याही संप्रदायातील शिल्पाकृतींमध्ये कमळाला स्थान असतेच. अबूच्या दिलवाडा मंदिरात तर शेकडो प्रकारची कमळे आहेत. दिल्लीचे हे बहाई मंदिर उमलत्या कमळाच्या आकाराचे असून, भोवताली विस्तीर्ण परिसर असल्यामुळे, त्यामध्ये ते अलगद ठेवलेल्या नाजूक फुलासारखे दिसते.

या कमळाला नऊ पाकळ्या आहेत. कारण नऊ धर्मप्रणाली एकत्र येऊन बहाई धर्म बनला आहे, म्हणूनच जगातील कोणत्याही बहाई मंदिराला नऊ प्रवेशद्वारे असतात. त्यातही पुढचे दार, मागचे दार असा प्रकार नाही. तर सर्वधर्मसमभाव दाखविण्यासाठी, प्रार्थनागृहाची रचना गोलाकार ठेवून त्याला सर्व बाजूंनी प्रवेशद्वारे असतात. या मंदिराचे प्रार्थनागृह सुमारे १२०० लोक बसू शकतील एवढे मोठे आहे. हा पंथ धर्म, जात मानत नसल्याने इथे कोणत्याही व्यक्तीला मुक्त प्रवेश आहे.

## मंदिराचे सौंदर्य

मंदिराची उंची ४०८० मीटर्स असून, कमळाचा व्यास ७० मीटर आहे. यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना येईल. लार्सन अॅन्ड टूब्रो कंपनीने त्याचे बांधकाम केले. वास्तूचे शिल्पकार श्री. फरिबूर्झसाहबा स्वतः बहाई आहेत. मंदिराचे बांधकाम सहा वर्षे चालू होते. त्याला पंधरा कोटी खर्च आला आणि आठशे कामगार त्यासाठी राबले. या कमळाच्या पाकळ्या शुभ्र संगमरवरी आहेत. ग्रीसमधून आणलेला संगमरवर, कोरियाचे पांढरे सिमेंट आणि जयपूरची पांढरी वाळू यातून ही शुभ्रता आली आहे. हॉलच्या आतील फरशीसुद्धा पांढरीशुभ्र आहे. इमारतीत प्रार्थनागृहाखेरीज रिसेप्शन सेंटर, लायब्ररी, ऑफिस,

पुस्तकविक्री केंद्र व स्वच्छतागृहे आहेत. खाली तळघरही आहे.

### बहाई धर्म

बहाई धर्म जगभर पसरलेला असून त्याचा प्रारंभ १८४४ मध्ये झाला. पर्शियामध्ये जन्मलेले श्री. बहाउल्लाह हे त्याचे संस्थापक होते. धर्ममार्तंडांनी त्यांचा छळ केला. त्यांना देशातून हद्दपार व्हावे लागले. तुरुंगवास भोगावा लागला. 'अकदस' या धर्मग्रंथात त्यांची शिकवण एकत्रित केली आहे. कोणतीही व्यक्ती बहाई होऊ शकते. त्यासाठी कसलाही समारंभ करावा लागत नाही. फक्त एक फॉर्म भरून द्यावा लागतो आणि काही आचारधर्म पाळावे लागतात. बहाउल्लाहांनी सांगितलेली प्रार्थना म्हणावी लागते. बहाई मंदिरे म्हणजे केवळ प्रार्थनागृहे नाहीत, तर त्या संस्था आहेत. अनाथालये, विद्यालये, दवाखाने चालविणे वगैरे मानवकल्याणाची कामे त्या करतात.

आज मानव युद्धाच्या छायेत आहे. दहशतवादाने थैमान घातले आहे. अशा स्थितीत सर्वधर्मसमभाव व विश्वबंधुत्व यावर श्रद्धा ठेवणारा बहाई धर्म मला आदर्श वाटला. दिल्लीतील ती संध्याकाळ कमलमंदिराच्या पवित्र व उदात्त वातावरणात घालवता आली.

आमचा दिल्लीचा मुक्काम आता संपत आला होता. आम्हाला आता काश्मीरवर स्वारी करायची होती. त्या भूलोकीच्या नंदनवनात जाण्यासाठी मन उत्सुक झाले होते.

# काश्मीर

### काश्मीर– भूलोकीचे नंदनवन

काश्मीर हे भारतातील सर्वांत सुंदर असे निसर्गरम्य स्थळ ! स्वदेशातीलच नव्हे, तर परदेशातीलही लोक हा भूलोकीचा स्वर्ग पाहण्यासाठी इथे येतात.

आम्ही किती भाग्यवान ! हा पृथ्वीवरचा स्वर्ग पाहण्याची संधी आम्हाला दोन वेळा मिळाली– ६९ मध्ये आणि ८७ मध्ये. गेली तीन-चार वर्षे काश्मीर प्रवाशांच्या दृष्टीने बंदच झाल्यासारखे आहे. त्यामुळे आपण अगोदर जाऊन आलो हे किती छान झाले, असे आम्हाला पुन्हा पुन्हा वाटते आहे.

वर्डस्वर्थच्या तीन प्रसिद्ध कविता मला आठवतात– Yarrow Visited, Yarrow Unvisited आणि Yarrow Revisited. तसाच काहीसा प्रकार काश्मीरबाबत झाला. काश्मीरला जाण्यापूर्वी प्रवासवर्णने वाचून आणि चित्रपटातील दृश्ये पाहून काश्मीरबद्दल एक धूसर स्वप्न डोळ्यासमोर तरळत होते. ६९ साली हे स्वप्न प्रत्यक्ष वास्तवात आले आणि ८७ मध्ये त्याचा पुनःप्रत्यय आला. प्रत्येक वेळी अनुभव आला की– A thing of beauty is a joy for ever. मी लग्न होईपर्यंत पुण्या-मुंबईबाहेरचे जग पाहिले नव्हते. बी. ए. ला असताना आंतरजातीय प्रेमविवाह केला. त्या वेळी नवरा १५० रुपये मिळवणारा कारकून होता. हनिमूनला पुण्याहून लोणावळ्याला जायचे म्हटले, तरी तेवढाही पैसा खिशात नव्हता. अशा स्थितीत काश्मीर म्हणजे गुलबकावलीच्या फुलासारखे अप्राप्य होते. नंतर नोकऱ्या करून शिक्षणे पूर्ण करताना दोघांचीही अशी काही दमछाक झाली की, आपण आयुष्यात कधी काश्मीरला जाऊ, असे वाटले नव्हते.

एम. ए. पूर्ण करून प्राध्यापक झालो, आर्थिक स्थिती सुधारली. ६९ साली आमची मुलगी सहा वर्षांची होऊन पहिलीत गेली आणि आम्ही दोघे प्रथम काश्मीरला गेलो. सगळा मिळून दहा दिवसांचा दौरा. दोघांना मिळून सुमारे एक हजार खर्च आणि दोनतीनशे रुपयांची खरेदी. अशी आमची ऐन थंडीतील नोव्हेंबरमधील सहल होती. त्या काळात प्रवासी कमी होते, त्यामुळे कुठेही फार गर्दी जाणवली नाही.

८७ मध्ये मात्र जास्त निवांतपणे गेलो. मुलीचे शिक्षण पूर्ण होऊन लग्नही झाल्यामुळे जबाबदारीतून मुक्त झालो होतो. मन प्रसन्न होते. तीन आठवड्यांच्या सहलीत दिल्ली, जम्मू असे स्टॉप घेत गेलो. खुद्द काश्मीरमध्ये चक्क पंधरा दिवस राहिलो. पाच-सहा हजार खर्च आला, शिवाय हजार-दीडहजारांची खरेदी वेगळीच. ६९ चे काश्मीर व ८७ चे काश्मीर यात खूपच फरक वाटला. आता पर्यटनाच्या सोयी वाढल्या आहेत, पण तेव्हाची शांतता नष्ट झाली आहे. लीव्ह अँड ट्रॅव्हल कन्सेशनमुळे टूरिस्टची गर्दी वाढली आहे. महागाईही वाढली आहे.

तेव्हाचे काश्मीर शांत व सुस्त होते. आताचे कमर्शिअल व गजबजलेले वाटले. तरी आम्ही एप्रिलमध्ये गेलो होतो. खरा सीझन अजून सुरू झाला नव्हता. उत्तरेकडील हिलस्टेशनचा खरा सीझन १५ मे नंतर सुरू होतो आणि दीड-दोन महिने चालतो. काश्मीरमध्ये फळाफुलांचा मोसम ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये, पण त्या वेळी आम्हाला सुट्ट्या नसतात. गर्दी टाळण्यासाठी आम्ही नेहमीच सुट्टी लागताच बाहेर पडतो आणि १५ मेच्या आसपास घरी परत येतो.

दिल्लीत आल्या आल्या आम्ही जम्मूसाठी ट्रेनचे बर्थस् मिळतात का याची चौकशी केली होती, पण पाच-सहा दिवस तरी बर्थस् उपलब्ध नव्हते. बसअड्ड्यावर गेल्यावर समजले की, गव्हर्नमेंटच्या सर्व बसेस ऑर्डिनरी आहेत आणि त्या जम्मूला पोचायला १४-१५ तास लागतात. खाजगी कंपन्यांच्या आराम बसेस व व्ही.डी.ओ कोच आहेत. ते संध्याकाळी निघतात, आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे बारा तासांनी जम्मूत पोचतात, म्हणून आम्ही २६ एप्रिलच्या संध्याकाळच्या व्ही.डी.ओ. कोचचे रिझर्वेशन केले होते. दोन दिवस दिल्लीत भ्रमंती केल्यानंतर आमचा जम्मूप्रवास सुरू झाला. चित्रपटात मला काही रस नव्हता. छान पुशबॅक चेअर होत्या. मी आरामात मागे रेलून बसले होते. बसल्याबसल्या सहप्रवाशांचे निरीक्षण करत होते. आमच्यापुढे खास अहमदाबादहून हनिमूनसाठी आलेली दोन जोडपी होती. त्यांचे चार तारखेचे दिल्लीहून रिटर्न रिझर्वेशन होते, म्हणजे त्यांना श्रीनगरमध्ये जेमतेम चार दिवस मिळणार होते. काश्मीर म्हणजे उत्तरेचे टोक. तिथे पोचायलाच दोन-तीन दिवस लागतात. परतायलाही तेवढेच. खुद्द काश्मीरमध्ये निसर्गरम्य अशी इतकी ठिकाणे आहेत की, तिथे कमीत कमी सात दिवस राहायला हवे. तेव्हा बारा ते पंधरा दिवसांची सवड काढूनच काश्मीरला जावे. नाहीतर उगाच भोज्याला शिवून येण्यात अर्थ नाही. शिवाय काश्मीरचे हवामानही लहरी आहे. एखाद्या दिवशी अचानक मुसळधार पाऊस सुरू होतो. मग तो दिवस लॉजवरच बसून राहावे लागते. आमच्याबरोबर हैद्राबादहून आलेले एक कुटुंब आम्हाला भेटले. चार दिवस जायला, चार दिवस यायला, असा त्यांचा प्रवास होता. खुद्द श्रीनगरमध्ये त्यांना तीन दिवस मिळाले. त्यापैकी दोन दिवस मुसळधार पाऊस. लहान मुले बरोबर असल्याने ते लॉजवरच बसून राहिले. एक दिवस काय फिरले असतील तेवढेच. मग निदान बाय एअर तरी जायचे. काश्मीर सरकारने त्या वेळी विमानदरात २५ टक्के कमिशन जाहीर केले होते. त्यामुळे जम्मू ते

काश्मीर २२५ रुपयांत जाता येत होते आणि हा प्रवास फक्त ४० मिनिटांचा होता. लक्झरीने ८० रुपये देऊन एक पूर्ण दिवस घालवण्यापेक्षा हे चांगले. परंतु दर कमी केल्यामुळे तिथेही गर्दी होती. आम्ही श्रीनगरला गेल्या गेल्या एअरइंडियाच्या ऑफिसमध्ये धावलो, पण आम्हाला पंधरा दिवसांनंतरची तिकिटेसुद्धा मिळू शकली नाहीत. व्यवस्थित प्लॅनिंग असेल, तर मात्र पुणे-मुंबई-दिल्ली-चंदीगड इथून आधी रिझर्वेशन करणे शक्य असते.

६९ मध्ये आम्ही काश्मीरला गेलो होतो, तेव्हा पठाणकोटपर्यंतच रेल्वे होती. तिथून बसने श्रीनगरला जावे लागे. तो प्रवास प्रदीर्घ आणि चांगलाच दगदगीचा होता. रात्री बटोर किंवा बनिहालपासला मुक्काम करावा लागे. दीड दिवसाने आपण श्रीनगरला पोहोचायचो. 'जवाहर टनेल' निर्माण झाला आणि दहा-बारा तासांचा फेरा वाचला.

सत्तावीस एप्रिलला सकाळी सात वाजता आम्ही जम्मूमध्ये पोहोचलो. बसअड्ड्याच्या समोर 'रणबीर यात्रा निवास' आहे. तिथे रूम मिळाली. पंचाहत्तर रुपये भाडे होते, पण सूट छान होता. अटॅच बाथ, डबल बेड्स, सोफा, व्हरांडा वगैरे. पुन्हा मध्यवर्ती. मागच्या बाजूलाच प्रसिद्ध रघुनाथमंदिरे होती. चौकात वाहने होती. रात्रभराच्या प्रवासाने चांगलाच शीण आला होता. तासाभराची विश्रांती घेतल्यानंतर आम्ही बसअड्ड्यावर गेलो. दुसऱ्या दिवशीच्या सकाळी साडेसातच्या श्रीनगर बसची तिकिटे रिझर्व केली. व्ही.डी.ओ. बस सत्तर रुपये आणि डिलक्स कोच साठ रुपये घेतात. दहा तासांचा प्रवास म्हणजे तीन चित्रपट सहन करणे मला शक्य नव्हते, म्हणून मी डिलक्स कोचचाच आग्रह धरला. टूरिस्ट सेंटरजवळ आम्हाला एक एजंट भेटला. त्याने श्रीनगरच्या 'कॅथे' नावाच्या लॉजचे रिझर्वेशन जम्मूहून करून दिले. संध्याकाळी सात-साडेसात वाजता श्रीनगरला पोहोचल्यानंतर हॉटेल शोधण्यापेक्षा एका दिवसाचे रिझर्वेशन इथूनच करावे, असा दूरदर्शी विचार आम्ही केला; पण ते हॉटेल आवडले नाही तर उगाच गुंतून पडायला नको, म्हणून फक्त एकाच दिवसाचे रिझर्वेशन केले. सुदैवाने हे हॉटेल चांगले निघाले. दुसऱ्या मजल्यावरची कॉर्नरची बारा नंबरची अटॅचबाथ रूम आम्हाला मिळाली. आम्ही पुढचे बारा दिवस 'कॅथे' मध्येच मुक्काम केला.

# जम्मू

जम्मूच्या संदर्भात एक प्राचीन कथा सांगितली जाते. असे म्हणतात की, प्रभुरामचंद्राचा वंशज जम्बूलोचन याला शिकारीचा नाद होता आणि शिकारीच्या शोधात तो दूरदूर फिरत असे. एकदा तो या प्रदेशात आला असताना एका सरोवराच्या काठी थांबला. तिथे त्याने सिंह व शेळी यांना एकत्र पाणी पिताना पाहिले. हे अद्‌भुत दृश्य पाहून त्याच्या ह.तातील धनुष्यबाण गळून पडले. हा प्रदेश पवित्र आहे, असा साक्षात्कार त्याला झाला आणि त्याने तिथे एक नगरी वसविण्याचा संकल्प केला. त्याने निर्माण केलेली ती नगरी म्हणजेच जम्मू. त्याच्या नावावरून या गावाला 'जम्बू' असे नाव पडले होते. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन ते जम्मू झाले.

जम्मू ही काश्मीरची हिवाळी राजधानी आहे. हिवाळ्यात श्रीनगरची सर्व ऑफिसेस इथे येतात. जम्मू शहर छोट्या टेकडीवर वसलेले असून टेकडीच्या पायथ्याजवळून 'तावी' नदी वाहते. तिचेच नाव 'जम्मूतावी' ट्रेनला दिले आहे. जम्मू समुद्रसपाटीपासून फक्त १००० फूट उंच आहे. त्यामुळे एप्रिलमध्ये इथे छान उकडत होते. आपण काश्मीर राज्यात आलो आहोत, असे वाटतच नव्हते.

काश्मीर राज्याची एरिया ८४७७१ मैल पसरलेली असून तिचे तीन विभाग आहेत : १) जम्मू, २) काश्मीर व्हॅली, ३) लडाख. यांपैकी काश्मीर व्हॅलीच विशेष प्रसिद्ध आहे. ती १३५ कि.मी. लांब आणि ३२ ते ४० कि.मी. रुंद आहे. झेलम नदीच्या काठी वसलेले श्रीनगर ही उन्हाळी राजधानी असून श्रीनगरमधील सृष्टिसौंदर्याचा मागमूसही जम्मूमध्ये नाही. त्यामुळे टूरिस्ट फार तर एखादा दिवस जम्मूत राहतात. जास्त नाही.

### रघुनाथ मंदिर ग्रूप

ही मंदिरे म्हणजे उत्तर हिंदुस्थानातील शिल्पकलेचा चांगला नमुना आहेत.

संध्याकाळी या मंदिरांच्या आवारात ध्वनिक्षेपकावरून भजने गायली जातात. आम्ही गेलो त्या वेळीसुद्धा एक बुवा तुलसीदासांचे सुरेल भजन गात होते.

मुख्य मंदिरात राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती आहेत. मंदिरासमोर मंदिराकडे मुख करून महर्षी वाल्मीकीजी व महावीर बजरंगजी यांच्या मोठ्या मूर्ती आहेत. परिक्रमेच्या मार्गावर अनेक छोटी मंदिरे आहेत. चार दिशांच्या देवतांच्या मूर्तींपैकी पश्चिम दिशा उंटावर आरूढ आहे आणि इतर तीन दिशांच्या देवी मात्र हत्तीवर बसलेल्या आहेत. राहू, केतू, अग्नी अशा अनेकांच्या मूर्ती तिथे पाहायला मिळाल्या.

आवारात अनेक मंदिरे असून प्रत्येक दालनावर वेगवेगळ्या नावाच्या पाट्या लावलेल्या आहेत. एका दालनात श्रीकृष्णपरिवार आहे. त्यात वासुदेवजी, बलरामजी, प्रद्युम्नजी अशा मूर्ती असून सर्व मूर्ती काळ्या दगडात घडवलेल्या आहेत. कृष्णपरिवारातील स्त्रिया मात्र तिथे नाहीत. दुसऱ्या दालनात विष्णुजी परिवार असून तिथे लक्ष्मणजी, सुग्रीव, भरत, बिभीषण, अंगद यांच्या मूर्ती आहेत. तिसरे दालन श्रीब्रह्माजींचे आहे. मंदिराच्या बाहेर अगस्तीमुनी, विश्वामित्र, गौतम आणि भारद्वाज हे चौघे ऋषी आहेत. पाचवे दालन आहे धर्मराजजींचे. तिथे नलजी, नीलजी, सूर्यजी अशा मूर्ती आहेत. मंदिराच्या आत असंख्य छोटे छोटे पत्थर आहेत. ते ३३ कोटी देव आहेत, अशी माहिती पुजाऱ्याने दिली. ७५ साली बांधलेले दुर्गाभवानीचे छोटे मंदिर असून त्याचे उद्‌घाटन करणसिंहांनी केल्याचा उल्लेख आहे.

आवारात बाहेरूनच परिक्रमा करण्याची अनेक मंदिरे आहेत.

१) शेषशायी भगवान विष्णुजी, २) श्रीगणेशजी, ३) श्रीभरतजी, ४) श्रीशत्रुघ्नजी, ५) श्रीनरसिंहजी, ६) श्रीराधाकृष्णजी, ७) श्रीवराहजी, ८) श्रीवामनजी, ९) श्रीमहालक्ष्मीजी, १०) श्रीविराटजी, ११) श्रीशिवजी, १२) श्रीलक्ष्मी नारायणजी. आता या प्रत्येक मंदिरात कुठे जात बसणार ! तेव्हा 'सर्व देव नमस्कारः । केशवं प्रतिगच्छति ।' अशा भावनेने मी एकच नमस्कार करून टाकला.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी पाच लाख रुपये व्यक्तिगत देणगी देऊन, महाराजा गुलाबसिंह यांनी रघुनाथमंदिराच्या व्यवस्थेसाठी ट्रस्ट निर्माण केला. महाराजा रणबीरसिंह यांनी धर्मार्थफंड निर्माण केला. त्याचा उपयोग मंदिर उभारणी, संस्कृत संशोधन संस्था आणि दुर्मिळ ग्रंथ व कागदपत्रांचा शोध अशा

कार्यांसाठी होतो. या ट्रस्टने १९४७ मध्ये निर्वासितांसाठी धर्मशाळा बांधल्या आणि मदतकार्यासाठी पंधरा लाख रुपये खर्च केले. आज डॉ. करणसिंह हे प्रमुख विश्वस्त आहेत. राज्यातील शंभर मंदिरे या ट्रस्टखाली येतात. ट्रस्टने सहा हजार हस्तलिखिते गोळा केली आहेत. जम्मू, वैष्णोदेवी, वाराणसी, बद्रीनाथ येथे धर्मशाळा बांधल्या आहेत. पहलगाममधील 'गौरीशंकर' हे शिवमंदिर याच ट्रस्टचे आहे. ट्रस्टने समाजसेवेचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

मंदिरपरिसरातील मोठा बाजार 'रघुनाथबाजार' याच नावाने ओळखला जातो. उपाहारगृहे, कापड दुकाने, काश्मिरी शाली, ड्राय फ्रूट्स यांनी बाजारपेठ ओसंडत असते. श्रीनगरहून ओझे आणायला नको असेल, तर जम्मूमध्ये ९२ रु. किलो अक्रोड आणि ५० ते ६० रु. किलो दराने बदाम खरेदी करता येतात. लाकडी कोरीव कामाच्या वस्तूही तिथे मिळतात. जम्मूमध्ये खाजगी व सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या बससेवा उपलब्ध आहेत.

### बाग ए बहू

बसने आम्ही बहू फोर्टला गेलो. या प्राचीन किल्ल्यामध्ये जुने महामातामंदिर आहे. फोर्टच्या जवळच 'बाग ए बहू' नावाचे एक नवे उद्यान निर्माण झाले आहे. टेकडीच्या उताराचा फायदा घेऊन मुगलउद्यानाच्या धर्तीवर ते तयार केले आहे. दूरवर तावी नदीचा प्रवाह दिसतो. उद्यानात विविधरंगी व विविधढंगी फुले आहेत, कारंजी आहेत आणि रात्री विद्युतरोषणाईची सोय आहे. १९८१ मध्ये 'पिकनिक स्पॉट' म्हणून हे उद्यान जम्मूच्या नागरिकांना अर्पण केले. उद्यानात छोट्या दगडी मूर्ती ठेवलेल्या आहेत. त्या प्राचीन आहेत की नाही, हे सांगणे मात्र कठीण आहे.

### वैष्णोदेवी मंदिर

जम्मूपासून ५८ कि.मी.वर वैष्णोदेवी मंदिर आहे. ते समुद्रसपाटीपासून ५३०० फूट उंचीवर आहे. ती एक गुहा असून प्रवेशद्वाराजवळचा रस्ता अरुंद आहे. काही ठिकाणी तर वाकूनच चालावे लागते. दरवर्षी हजारो भाविक येथे येतात. जवळून वाहणाऱ्या 'चरणगंगा' नावाच्या झऱ्यात स्नान करतात आणि 'जय मातादी' करत यात्रेला प्रारंभ करतात. हिंदी चित्रपटांतूनही त्याचा उपयोग करून घेतला आहे. 'चलो बुलावा आया है । माताने बुलाया है ॥' हे प्रसिद्ध

गीत या मंदिरातच चित्रित झाले आहे. नवरात्रीपासून दोन-अडीच महिने इथे यात्रा असते. यात्रेकरूंना श्रीनगरच्या निसर्गसौंदर्यात रस नसतो आणि श्रीनगर त्यांना परवडणारेही नसते. वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन ते परत फिरतात. माझ्यासारख्या नास्तिक बाईला वैष्णोदेवीला जाण्यात रस नव्हता.

दुसऱ्या दिवशीच्या प्रवासाची तयारी म्हणून ब्रेड आणि अमूल बटरची खरेदी करून आम्ही लॉजवर परतलो. जम्मू ते श्रीनगर अंतर २९३ कि.मी. असून डिलक्स कोचने गेले, तरी दहा तास लागतात. वाटेत उधमपूर, बटोद, रामबाण, बनिहाल, काझीगुंड अशी गावे लागतात. या सर्व ठिकाणी डाकबंगले आहेत. स्वतःच्या वाहनाने जाणारे लोक तिथे मुक्काम करू शकतात. जवाहर टनेल ओलांडला म्हणजे हवा एकदम थंड होते. हिमशिखरे दिसू लागतात आणि खरे काश्मीर सुरू होते.

## काश्मीर खोरे

**'काश्मीर' नाव कसे प्रचलित झाले**, यासंबंधी एक कथा सांगण्यात येते. आजचे काश्मीर हा अतिप्राचीन काळात जलप्रदेश होता. तिथे एक प्रचंड आकाराचे सरोवर होते. एकदा उत्तर भारतात तीर्थयात्रा करत असताना कश्यप ऋषी या ठिकाणी आले. एवढ्या सुंदर व निवांत ठिकाणी ऋषीमुनींचे वास्तव्य कसे काय नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटले, तेव्हा या परिसरात राहणाऱ्या नाग लोकांनी त्यांना सांगितले की, या सरोवरात जलोद्भव नावाचा भयानक राक्षस राहतो. तो आम्हाला आणि ऋषीमुनींना त्रस्त करत असतो. हे ऐकल्यावर ऋषिमुनींचे व प्रजाजनांचे संरक्षण करण्याच्या हेतूने, कश्यप मुनींनी या प्रदेशात वास्तव्य करण्याचा निश्चय केला. ह्या राक्षसाचे जीवन पाण्यावर अवलंबून होते. कश्यप मुनींनी पर्वतांची रांग फोडून, सरोवरातील पाणी बाहेर सोडले. जलाशयातील पाणी कमी झाल्यावर, जलोद्भव राक्षसाचे सामर्थ्य कमी कमी होत जाऊन, अखेर तो पर्वताखाली गाडला गेला. 'मीर' म्हणजे पर्वत. काश्यपाने सरोवर नष्ट करून निर्माण केलेली भूमी, म्हणून ते 'काश्यपमीर'. त्याचेच पुढे काश्मीर झाले.

मरू किंवा मार शब्दाचा अर्थ सुंदर, रमणीय प्रदेश, असाही होतो; तेव्हा कश्यपमुनींनी निर्माण केलेला रमणीय प्रदेश 'कश्यपमार' या नावाने ओळखला जाऊ लागला. त्याचे काश्मीर झाले. कश्यपमुनींच्या प्रेरणेने आणि नाग लोकांच्या

प्रयत्नाने या भागात हे परिवर्तन घडून आले, म्हणून येथील अनेक स्थानांना 'नाग' लोकांशी संबंधित नावे आहेत. उदा. कोकरनाग, अनंत नाग, शेषनाग, वैरीनाग वगैरे.

काही लोकांच्या मते काश्मीरचा एक अर्थ होतो स्फटीक. या भागात स्फटिकासारखे शुभ्र हिम असते, म्हणून हे काश्मीर, असा या नावाचा इतिहास आहे.

## काश्मीरचे सृष्टिसौंदर्य

काश्मीर म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य. झेलम किंवा वितस्ता, लीदर किंवा लंबोदरी, चिनाब आणि रावी या इथल्या मुख्य नद्या आहेत. अनेक उपनद्या आणि झरे शेवटी झेलमला येऊन मिळतात आणि मग ही नदी वुलरलेकला मिळते. ही नदी म्हणजे येथील जनतेचे श्रद्धास्थान आहे, त्यांची ती गंगा आहे. वुलरलेक, मानसबल, दललेक, नगीन लेक अशी अनेक प्रचंड सरोवरे येथे आहेत. चिनार, पाईन, फर, देवदार वगैरे गगनचुंबी वृक्षांची जंगले आहेत. फळाफुलांची रेलचेल आहे. बादशहांनी निर्माण केलेली विशाल मुगलगार्डन्स हेही काश्मीरचे खास वैशिष्ट्य आहे. वसंतऋतूमध्ये येथील पर्वतशिखरे हिमगौर असतात. ग्रीष्म ऋतूत सर्वत्र हिरवीगार कुरणे आणि निळसर डोंगर दिसतात. शरद ऋतूत फुले फुललेली असतात. उन्हाळ्यात बदामवृक्ष मोहरलेले असतात. जुलैमध्ये अक्रोडांचा सीझन असतो, तर ऑक्टोबरमध्ये सफरचंदांच्या बागा फळांनी लगडलेल्या असतात आणि पांपूरच्या केशराच्या बागाही बहरलेल्या असतात. काश्मीरचे उन्हाळी आणि हिवाळी सौंदर्य पूर्णतः वेगळे असते. त्याचा आस्वाद घ्यायचा म्हणजे दोन वेळा तरी तिथे जायला हवे. आम्ही सुदैवाने तसे करू शकलो.

## काश्मीरचा इतिहास

जम्मू आणि काश्मीर यांची लोकसंख्या सुमारे साठ ते पासष्ट लाख आहे. श्रीनगरमध्ये मुस्लिमांची संख्या जास्त आहे, तर जम्मूत हिंदू जास्त आहेत, श्रीनगर ही काश्मीरची उन्हाळी राजधानी आहे, तर जम्मू ही हिवाळी राजधानी आहे. शतकानुशतके इथे हिंदू-मुसलमान गुण्यागोविंदाने नांदत आहेत. प्रारंभापासून काश्मीर भारताचाच भाग आहे. सम्राट अशोकाच्या काळात तिथे

बौद्ध धर्माचा प्रसार झाला. सहाव्या शतकात तिथे जैन धर्माचा प्रभाव होता. आठव्या शतकात ललितादित्य या हिंदू राजाचे राज्य इथे होते. सम्राट अकबराने १५६८ मध्ये काश्मीर जिंकले आणि तिथे मोगली साम्राज्य स्थापन केले. जहांगीर व शहाजहान यांच्यावर काश्मीरची जबरदस्त मोहिनी होती. त्यांनी दललेकच्या परिसरात अनेक उद्याने निर्माण केली. जहांगीर व नूरजहाँ यांचा प्रणय 'शालिमार' उद्यानात बहराला आला. आपल्याला काश्मीरमध्येच मृत्यू यावा, अशी जहांगीरची इच्छा होती. बहादूरशहाच्या काळानंतर पंजाबचा राजा रणजीतसिंग याने काश्मीरवर विजय मिळवला. इंग्रजांनी शिखांवर विजय मिळवल्यानंतर जम्मूचे महाराजा 'गुलाबसिंह' यांना ७५ लाख रुपयांना काश्मीर विकले. मग १९४७ सालापर्यंत ते डोगरा राजांच्या ताब्यात होते. २६ ऑक्टोबर ४७ रोजी त्याचे भारतामध्ये विलीनीकरण झाले. काही भाग मात्र मुस्लिमांनी ताब्यात घेतला. आज काश्मीर हे स्वायत्त राज्य आहे. जम्मूपासून पाकिस्तानची हद्द अगदी जवळ असल्यामुळे, आपल्याला नेहमीच सावध राहावे लागते.

## श्रीनगरचे टूरिस्ट रिसेप्शन सेंटर

जम्मूहून सकाळी आठच्या सुमाराला सुरू झालेला आमचा हा प्रदीर्घ पण रोमांचक प्रवास संध्याकाळी साडेसहा वाजता पूर्ण झाला आणि आम्ही श्रीनगरच्या टूरिस्ट रिसेप्शन सेंटरमध्ये घुसलो. जम्मू ते श्रीनगर जाणारे टूरिस्ट कोच थव्याथव्याने जातात. घाटात एखादी गाडी बंद पडली, तर इतरांचे साहाय्य मिळावे, यादृष्टीने ही खबरदारी घेतली जाते. आमच्या बसेस थांबल्याबरोबर रिसेप्शनिस्ट मुलीचे स्टाईलीश हिंदी व इंग्रजीतील स्वागत ध्वनिक्षेपकावरून ऐकू आले. 'वेलकम टू हॅपी व्हॅली' वगैरे वगैरे. काश्मीरमधील टूरिझमसंबंधी हालचाली या सेंटरवरूनच केल्या जातात. टूरिझमची ही इमारत दुमजली व मोठी आहे. डायरेक्टर ऑफ टूरिझम, डायरेक्टर ऑफ फिशरी, इंडियन एअर लाईन, टूरिस्ट बस सर्व्हिस, रेल्वे आऊट एजन्सी, फॉरेस्ट अधिकारी, साईटसीईंग टूर्स या सर्वांची ऑफिसेस तिथे आहेत. हाऊसबोट्स आणि हॉटेल्स याबद्दल मार्गदर्शन करणारा खास काऊंटर आहे. त्याशिवाय स्टेट बँक, पोस्ट ऑफिस व रेस्टॉरंट आहे. बत्तीस रिटायरिंग रूम्स आणि प्रवाशांसाठी डायनिंग हॉलही आहे. रूमस्‌चा रेट सुमारे नव्वद आहे. हॉटेल एजंट्‌सना आवारात येऊ देत नाहीत, पण बाहेर पडताच ते वेढा घालतात. आम्ही 'कॅथे'चे रिझर्वेशन केलेलेच

होते, तेव्हा ऑटो रिक्षाने सरळ तिथे गेलो.

**श्रीनगर**

श्रीचे म्हणजे देवदेवतांचे नगर, म्हणून ह्याचे नाव श्रीनगर. श्री शब्दाचा दुसरा अर्थ आहे सूर्य. सूर्य जिथे सुखद वाटतो, असे हे सूर्यनगर म्हणजे श्रीनगर. हे शहर २८ कि.मी. एरियात पसरलेले आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची आहे १७८६ मीटर. शंकराचार्य हिल आणि हरिपर्वत या दोन टेकड्यांच्या मध्ये हे शहर वसलेले आहे. शहरातून झेलम नदी वाहते. तिच्या दोन्ही काठांवर हे शहर वसलेले आहे. झेलम नदीवर नऊ पूल किंवा तिथल्या भाषेत 'कदल' आहेत. झेलम नदी आणि दललेक यांमुळे या शहराला 'पूर्वेकडील व्हेनिस' म्हणतात. नदीमध्ये आणि दललेकमध्ये हाऊसबोटी उभ्या असतात. या तरंगत्या घरांमध्ये सर्व सोयी उपलब्ध असतात. फर्निचरपासून टी.व्ही.पर्यंतच्या सुखसोयी असतात. नदी किंवा लेक क्रॉस करण्यासाठी 'शिकारा' उपलब्ध असतो आणि तुमच्या इच्छेप्रमाणे शाकाहारी किंवा मांसाहारी इच्छाभोजनही मिळते. या सर्वांसाठी पतीपत्नींना बोटीच्या ग्रेडप्रमाणे २५० ते ३५० रुपये रोज द्यावे लागतात. हाऊसबोट हे खास श्रीनगरचेच वैशिष्ट्य. दुसऱ्या कोणत्याही हिलस्टेशनवर ही मजा नाही. तीच गोष्ट शिकाऱ्यांची. ऐसपैस मऊ गाद्या असलेले, वेलवेटच्या अभ्र्यांनी सजवलेले, रंगीबेरंगी झालरी लावलेले आरामदायी 'शिकारे' येथे आहेत. त्यात पाच-सहा माणसे बसू शकतात, पण जोडप्याने— दोघांनीच त्यातून सहल करण्याची मौज काही न्यारीच. बोटीच्या एका टोकावर बसून बोटमन वल्हवत असतो. आपण खुशाल आरामात पहुडावे आणि भोवतालच्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घ्यावा. काश्मीरच्या मुक्कामात आम्ही दोन-तीन वेळा तरी शिकाऱ्यातून फिरण्याची मौज लुटली. इथले शिकारावाले प्रथम तोंडाला येईल ती रक्कम सांगतात. नवखे प्रवासी फार तर पाच-दहा रुपये कमी करतात. आमच्यासारखे आसेतुहिमाचल फिरलेले मात्र प्रेस्टीजच्या मागे न लागता, घासाघीस करून अर्ध्यावर सौदा करतात. आम्ही 'चारचिनार'ला शिकाऱ्यातून गेलो, तेव्हा सत्तर रुपयांपासून सुरुवात करून शेवटी पस्तीस रुपयांत शिकारा ठरवला आणि छान दोन-तीन तास फिरून आलो. सीझनमध्ये मात्र शिकाऱ्याचे दर तासाला तीस-पस्तीस रुपये असतात.

# साईटसीइंग टूर्स

श्रीनगरला गेले की पहिला दिवस रिझर्वेशन्समध्ये जातो. आम्हीही गेल्या दिवशी आधी इंडियन एअर लाईन्सच्या ऑफिसमध्ये धावलो. आमचे जम्मूतावीचे बारा मे चे रिझर्वेशन होते. त्या दिवशी दुपारी बाराचे व दोनचे अशा दोन उड्डाणांपैकी कोणतेही आम्हाला चालले असते, पण दुर्दैवाने आम्हाला सीट्स मिळू शकल्या नाहीत. अगदी वेटिंग लीस्टवरसुद्धा नाही. मग आम्ही डिलक्स कोचनेच परत जायचे ठरवले.

टूरिस्ट रिसेप्शन सेंटरमध्ये साईटसीइंग टूरचे रिझर्वेशन करण्यासाठी रांग लागली होती. आपण भराभरा कोणकोणत्या टूर्स हव्यात ते सांगायचे. एकजण भराभरा तिकिटे तयार करतो. दुसऱ्याकडे सर्व पैसे एकदम भरायचे. प्रत्येक तिकिटावर बसनंबर, तारीख, सीटनंबर, स्थळाचे नाव, रिपोर्टिंग टाईम आणि डिपार्चर टाईम लिहिलेला असतो. ज्यांच्याकडे दिवस कमी असतात त्यांना कोणती स्थळे पाहायची व कोणती गाळायची याचा विचार करावा लागतो. परंतु सर्वजण मुगलगार्डन्स, पहलगाम आणि गुलमर्ग या टूरची तिकिटे घेतातच. आमच्याकडे भरपूर वेळ असल्यामुळे आम्ही सर्व टूर्सना जाणार होतो. पहलगामला तर एक दिवस राहणारही होतो. साधारणपणे दोन-तीन टूर्सना जाऊन आले की, एखादा दिवस विश्रांती घ्यायची आणि श्रीनगरमध्येच भटकायचे, शॉपिंग करायचे, असे आम्ही ठरवले होते. म्हणजे फार ताण पडला नसता. कारण साईटसीइंग टूर म्हणजे आठ वाजता श्रीनगर सोडायचे आणि संध्याकाळी सात वाजता परतायचे. मग रात्री जेवण आणि झोप एवढाच कार्यक्रम होऊ शकतो. ३० एप्रिल ते ९ मे या काळातील यूसमर्ग, डकसम, वुलर लेक, मुगलगार्डन्स, सोनमर्ग, पहलगाम आणि गुलमर्ग अशा सात टूरचे रिझर्वेशन आम्ही करून टाकले. यापैकी फक्त पहलगामचे तिकीट सिंगल वे होते. बाकी सगळी रिटर्न तिकिटे होती. साडेपाचशे रुपये तिथेच भरावे लागले.

श्रीनगरमध्ये महाराष्ट्रीयन पद्धतीचे भोजन लाल चौकाजवळच्या न्यू महालक्ष्मी हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर मिळू शकते. कारण या लॉजचा मालक मुंबईचा गुजराथी आहे. त्याच प्रकारचे जेवण रीगल चौकात 'सुरती हॉटेल' मध्येही मिळते. लाल चौकातच एका बोळात 'जनता धाबा' आहे. तिथे पंजाबी डिशेस् चांगल्या मिळतात. विशेषतः तिथला पुलाव फार छान होता. झेलमच्या तीन क्रमांकाच्या पुलाजवळच्या कोपऱ्यातील एका छोट्या हॉटेलमध्ये शीक कबाब, मटणपॅटीस वगैरे डिशेस् चांगल्या मिळाल्या. तो चेंज कधीतरी छान वाटायचा. शेवटी पोट महत्त्वाचे.

## शंकराचार्य टेकडी व नेहरू पार्क

संध्याकाळी एका बंगाली जोडप्याबरोबर टॅक्सी शेअर करून आम्ही शंकराचार्य हिलला गेलो. टॅक्सी पायथ्यापर्यंतच जाऊ शकते. नंतर २४२ बांधलेल्या पायऱ्या चढल्यावर आपण प्राचीन मंदिरात पोचतो. विश्वस्त डॉ. करणसिंह यांनी १९७६ मध्ये या मंदिराची पुनर्बांधणी केली आहे. काही संशोधकांच्या मते हे मंदिर संधीमानाने इसवीसनच्या अगोदर बांधले असावे, तर काहींच्या मते सम्राट अशोकाचा पुत्र जालुका याने हे शिवमंदिर इ.स.२०० च्या सुमाराला बांधले असावे. त्याची उंची एक हजार फूट तरी असेल. मंदिरातील शंकराची काळी पिंडी घोटीव आहे. पिंडीवर ताम्रपात्रातून संततधार चालू असते. शेजारीच उंच त्रिशूल, डमरू, मागे नाग आणि जवळच शिव, पार्वती व गणेश यांच्या छोट्या मूर्ती आहेत. मंदिराच्या प्रांगणातून दूरवर नजर टाकली, तर सगळ्या श्रीनगरचे दृश्य पाहायला मिळते. याच टेकडीवर आता टी.व्ही.टॉवर उभारलेला आहे. या परिसरात नीरव शांतता आहे. खरोखरच देवभूमी असेल, तर ती अशीच असणार. तास-दीडतास त्या परिसरात घालवून आम्ही दलगेटजवळ टॅक्सी सोडून दिली.

पावसाची रिमझिम सुरू झाली होती, पण सहा वाजता लॉजवर परतावे असे वाटेना. मग आम्ही आमचा मोर्चा दललेकमध्येच असलेल्या 'नेहरू पार्क'कडे वळवला. हे पार्क प्रवाशांचे आवडते ठिकाण आहे. विशेषतः दलगेटच्या आसपासच्या लॉजमध्ये व हाऊसबोटीत राहणाऱ्या प्रवाशांचे. रात्र पडली तरी प्रवासी तिथे रेंगाळत असतात. दललेकमध्ये असलेल्या एका छोट्या बेटावर हा छोटा बगिचा फुलवला आहे. किनाऱ्यावरून शिकाऱ्यात बसून पार्कमध्ये जायचा

व परत यायचा माणशी एक रुपया घेतात. ज्या शिकाऱ्यातून आपण जातो, तो शिकारेवाला आपली अर्धा तास प्रतीक्षा करतो. नेहरूपार्कवर छानदार हॉटेल आहे. काश्मीरी ड्रेस घालून फोटो काढणारे फोटोग्राफरही असतात. आम्ही त्या दहा-बारा दिवसांत दोन-तीनदा या पार्कमध्ये गेलो. कारण ते आमच्या लॉजपासून जवळ होते. पाच मैल लांब आणि अडीच मैल रुंद असलेले दललेक हे काश्मीरचे सौंदर्यस्थळ आहे. एके काळी तिथे जिवंत झरे होते. त्यामुळे पाणी फारसे कमी होत नसे. उलट जोरदार पाऊस झाला की वाढत असे; पण आता मात्र गाळ साचल्यामुळे आणि हाऊसबोटीतील कचऱ्यामुळे दिवसेंदिवस पाणी कमी होत आहे.

परत येताना पाऊस वाढला. आमच्या छत्र्याही लॉजवरच राहिल्या होत्या, तेव्हा आम्ही ऑटोरिक्षा करून लाल चौकात जेवायला गेलो. जेवल्यानंतर लाल चौक ते दलगेट बसने आलो. रात्री नऊ वाजताच आम्ही झोपून टाकले.

### साईटसीइंग

६९ साली नोव्हेंबरमध्ये आम्ही प्रथम आलो होतो, तेव्हा वेळ कमी असल्याने आम्ही निवडक ठिकाणे पाहिली होती. वुलरलेक, डकसम आणि सोनमर्ग हे भाग त्या वेळी बर्फाच्छादित होते. या वेळीही सोनमर्ग रस्ता आधी बंदच होता; पण पाच मे ला तो सुरू झाला. आम्ही रोज चौकशी करत असल्याने चार तारखेला त्याचे रिझर्वेशन करून टाकले. वेरीनाग बस मात्र शेवटपर्यंत सुरू झाली नाही. ती एक टूर सोडली, तर बाकी सर्व ठिकाणे आम्ही पाहू शकलो.

सकाळी आठ वाजता साईटसीइंग टूर्स सुरू होत असत. आमच्या लॉजपासून बसअड्डा एक कि.मी.वर होता. सकाळी तेवढे अंतर चालत जायला छान वाटत असे. पाऊस असेल तर मात्र आम्ही रिक्षा पकडत असू. टूरिस्टसेंटरशेजारच्या वैष्णौ धाब्यामध्ये इडली-डोसे छान मिळत. तिथे नास्ता करून मगच आमचे साईटसीइंग सुरू होत असे.

## टूर क्रमांक १ - यूसमर्ग

यूसमर्ग आम्ही नव्यानेच पाहत होतो. ते श्रीनगरपासून ४५ कि.मी. वर असून, त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची आहे २०७४ मीटर. ते पीरपंचाल पर्वतरांगांमध्ये आहे. यूसमर्गला एप्रिल, मे आणि जून असे तीनच महिने वस्ती

असते. बाकी नऊ महिने ते हिमाच्छादित असते. गावच्या गाव उठून नऊ महिने दूरवर वस्तीला जाते. अर्थात गावात वस्ती अशी फारशी नाहीच. टूरिस्टसाठी एक रेस्टॉरंट आणि दोन-तीन बंगले आहेत तेवढेच. हिरवीगार कुरणे, सर्व बाजूंनी देवदार वृक्ष, छोटे पाण्याचे तळे असे त्याचे स्वरूप आहे. यूसमर्गहून जवळच 'दूधगंगा' आणि 'नीलनाग' अशी दोन ठिकाणे आहेत. तिथे घोड्यावरून जातात. घोडेवाल्यांमध्ये टूरिस्ट मिळवण्यासाठी चुरस लागलेली असते. घोड्यांचे दर मात्र ठरवून दिलेले आहेत. पाच कि.मी. वर असलेल्या 'दूधगंगा' या छोट्याशा धबधब्यापर्यंत जाऊन परत यायचे असेल, तर आठ रुपये आणि दहा कि.मी. वरच्या 'नीलनाग' या ठिकाणी जिथे झरा आहे तिथे जायचे असेल तर सोळा रुपये, असे दर ठरलेले आहेत. आम्ही यूसमर्गला पोचलो, तेव्हा घोडेवाल्यांनी आम्हालाही घेराओ घातला. घोडेवाल्यांना नंबर दिलेले असतात, तरीही ते गोंधळ करतच असतात. यूसमर्गच्या बसेस आठ-दहा दिवसांपूर्वीच सुरू झाल्यामुळे, घोडेवाल्यांचा धंदा नुकता कुठे सुरू झाला होता, म्हणून ते असे अस्वस्थ होते. पावसाची सर येऊन गेल्यामुळे दुरून हिरव्यागार दिसणाऱ्या कुरणांमध्ये चिखल झाला होता. अशा निसरड्या रस्त्यावरून घोड्यावरून पॉइंट पाहायला जावे की नाही, याबद्दल आम्ही साशंक होतो. कारण दूधगंगेला पायी निघालेले लोकही चिखलात घसरताना दिसत होते. पण शेवटी आम्ही ठरवले की, दूधगंगेपर्यंत जायचा प्रयत्न तर करून पाहू या. माझा घोडा जरा उंचच होता, म्हणून मी पाच रुपये देऊन हेल्पर घेतला. आणि हेल्पर घेतला म्हणूनच मी दूधगंगेपर्यंत पोचू शकले. कारण रस्ता असा नव्हताच, होती ती पाऊलवाट. अनेक चढउतार, दलदल. एका बाजूला दरी, दरीतून खळाळणारा पांढराशुभ्र पाण्याचा प्रवाह, दुसरीकडे चिमुकली टेकडी. घोड्याचे एक पाऊल जरी घसरले तरी कपाळमोक्ष ठरलेला. घोडेवाल्याने आणि हेल्परने आम्हाला संभाळून नेले त्यामुळे आम्ही त्यांना पाच रुपये बक्षिसी दिली. शिवाय चहाही दिला. दूधगंगेच्या पांढऱ्याशुभ्र खळाळत्या प्रवाहाशेजारीच एक छोटेसे चहाचे दुकान आहे. आश्चर्य म्हणजे एक रुपयात चहा, दोन रुपयांत बिस्किटपुडा असे दर आहेत. प्रवाशांचा गैरफायदा घेतला जात नाही. यूसमर्गला भोजनाचे दरही नॉर्मल होते. श्रीनगर ते यूसमर्ग रस्तादेखील सुरेख आहे. रस्त्यात बदाम, सफरचंद यांची झाडे आहेत. वाटेत एक रडारकेंद्र लागले. ते रशियाच्या सहकार्याने काढले आहे. रस्ता नागमोडी वळणांचा असून एका वेळी एकच

वाहन जाऊ शकते. दुतर्फा छोट्या टेकड्या असून, चेरीची विपुल झाडे आहेत. छोटी पिवळी रानफुलेही फुललेली दिसतात. दूधगंगेहून आल्यानंतर आम्ही निवांतपणे जेवलो आणि विश्रामगृहाबाहेरच्या हिरवळीवर खुर्च्या टाकून गप्पा मारत बसलो. भोवतालचे हिरवेगार कुरण, छोटे तळे आणि देवदार वृक्ष पाहून 'हिमालय'मधील खाज्जियारची आठवण झाली. दुपारी साडेतीन वाजता आमची बस परतीच्या वाटेला लागली. साडेपाच-सहा वाजता आम्ही श्रीनगरला पोहोचलो.

### चारी शरीफ

येताना थोडा वेळ आम्ही चारी शरीफ येथील दर्ग्याजवळ थांबलो. नूरउद्दीन वलीचा हा दर्गा सुमारे साडेसहाशे वर्षांपूर्वीचा आहे, असे म्हणतात. हिंदूंच्या मते हा दर्गा नंदऋषींचा आहे. त्यामुळे हिंदू-मुस्लीम दोन्ही धर्मांचे लोक हा दर्गा पवित्र मानतात. आणि आपली मुराद पूर्ण व्हावी, म्हणून येथे येऊन धागा बांधतात. शेजारीच एक पुरातन मशीदही आहे. यूसमर्गच्या या साईटसीईंग टूरसाठी प्रत्येकी अडतीस रुपये दर आहे.

## टूर क्रमांक २ - डकसम

६९ मध्ये आलो, तेव्हा डकसमचे नावही ऐकले नव्हते. या वेळी मात्र या निसर्गरम्य ठिकाणाला आवर्जून भेट दिली. एक मे ला सकाळी बसअड्ड्याकडे निघालो ते पावसाची रिमझिम अंगावर घेतच आणि या पावसाने दिवसभर आमचा पिच्छा पुरवला.

### अच्छाबल

आमची बस प्रथम थांबली अच्छाबल या छोट्या मुगल गार्डनजवळ. ही जागा नूरजहांची फार आवडती होती, असे म्हणतात. इ.स.पूर्व पाचव्या शतकात अक्ष नावाचा राजा येथे राज्य करत होता. त्यावरून या स्थळाचे नाव अक्षाबल असे पडले आणि ते नंतर अच्छाबल झाले, असे म्हणतात. येथील हे उद्यान शहाजहानच्या कन्येने १६४० मध्ये निर्माण केले. पहाडातून वाहत येणारा एक मोठा झरा इथे आहे. या झऱ्याचे पाणी दाट जंगलातून तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून पहाडातून खाली येते. बागेत पश्चिमेकडे काही भग्न अवशेष आहेत.

तिथे झऱ्याचे पाणी गरम आहे. आमची बस अच्छाबलला पोचली तेव्हा धुवाधार पाऊस पडत होता. त्यामुळे दुरूनच हे उद्यान पाहण्यावर आम्हाला समाधान मानावे लागले. रमजानचा महिना. त्यात जुम्मा (शुक्रवार) त्यामुळे सर्व दुकानेदेखील बंद होती. त्यामुळे पावसाळी थंड हवेत तिथे गरम चहाचा कपही मिळू शकला नाही.

## कोकरनाग

श्रीनगरपासून ८० कि.मी. वर असलेल्या या उंच ठिकाणी बोटॅनिकल गार्डन केले आहे. गार्डनमध्ये अनेक प्रकारचे गुलाब आहेत. फिशिंगसाठी ही फार चांगली जागा आहे. काश्मीर टूरिझमचा चांगला बंगला इथे असून तीस रुपयांत खोली मिळते. दोन बेडरूमचा हट साठ रुपयांना मिळतो. इथेही पाऊस सुरूच होता; पण तरीही रेस्टॉरंटमध्ये शिरून आम्ही गरमागरम चहा घेतला. पुण्याचे एक सरदारजी तिथे भेटले. त्यांच्याशी गप्पागोष्टीही केल्या.

डकसमच्या ह्या टूरमध्ये आम्हाला चिं.वि.जोशी या विनोदी लेखकांनी निर्माण केलेले– चिमणराव, काऊ, मोरू आणि मैना हे चौकोनी कुटुंब भेटल्याचा आनंद मिळाला. आता या चिमणरावाने डोक्यावर घेरा ठेवला नव्हता आणि धोतराऐवजी पॅन्ट घातली होती, एवढाच फरक. बाकी धांदरटपणा, बावळटपणा, चिक्कूपणा, स्वतःला शहाणे समजून बडबड करण्याची वृत्ती– सगळे तेच. काश्मीरच्या त्या थंडीत तो भला गृहस्थ चप्पल घालून फिरत होता. बायकोच्या अंगावर साधा स्वेटरसुद्धा नव्हता. त्याने डोक्यावर माकडटोपी घातली होती. ती तो आणि मुलगा आलटून पालटून वापरत होते. त्याची मुले मैना आणि मोरू ही भाबडी, सरळ आणि बाप म्हणेल ते वेदवाक्य मानणारी होती. सर्वांच्या पायांत साध्या चपला असल्याने पाय थंडीने काकडले होते, म्हणून ही मंडळी बसच्या खालीच उतरायला तयार नव्हती. आमच्या शेजारच्या एका हिंदीभाषक जोडप्याने आपली वर्षा-दीडवर्षाची मुलगी चक्क चिमणरावांच्या ताब्यात दिली होती. चिमणराव तिला प्रामाणिकपणे सांभाळत होते आणि आपल्या भयानक हिंदीत,"सफरचंदका झाड देखो, पेरूका झाड देखो." असे म्हणून तिचीच नव्हे, तर सर्वांची करमणूक करत होते. डकसमला पोहोचल्यावर या कुटुंबाने जेवणाखाण्यासाठीही फारसा खर्च केला नाही. बरोबरच्या लाडूचिवड्यावर भागवले.

लीव्ह ॲन्ड ट्रॅव्हल कन्सेशनमुळे लोक प्रवास करतात, पण खाण्यापिण्याचा खर्च करणेही त्यांना काही वेळा जड जाते. काश्मीरला थंडीत गरम कपडे आवश्यक असतात. गरमागरम भोजन आवश्यक असते. थंडीत भूकही जास्त लागते. भोवतालचे प्रवासी भरपूर खर्च करत असतात. खात, पीत मजा करत असतात आणि ह्यांची मुले चिमणीएवढा चेहरा करून अर्धपोटी राहतात. इतर प्रवासी हौसेने खरेदी करत असतात आणि हे आपल्या बायकांना म्हणतात, "मुंबईत सगळे काही मिळते. उगाच ओझे वाढवू नकोस. काश्मिरी ड्रेसमध्ये फोटो कशाला काढायचा? नसता खुळेपणा!" बेताच्या आर्थिक स्थितीमुळे त्यांची अनेकदा पंचाईत होताना दिसते. भारतात इतरत्र सुंदर ठिकाणे आहेत. दक्षिण हिंदुस्थान तुलनेने स्वस्त आहे. अशा लोकांनी तिथे जायला हरकत नाही, कारण ती सहल कमी खर्चात होऊ शकते.

## डकसम

श्रीनगर ते डकसम हे अंतर ८५ कि.मी. आहे. चारी बाजूंनी डोंगर, घनदाट वृक्षांचे जंगल आणि मधल्या बेचक्यात चिमुकला टूरिस्ट बंगला, असे त्याचे स्वरूप आहे. या बंगल्यात पंचवीस रुपयांत खोली मिळते. भोजनव्यवस्थाही चांगली आहे, पण त्याचे रेट्स जरा जास्त आहेत. दोन, तीन बसेस एकदम आल्यामुळे डाकबंगल्यात चांगलीच गर्दी झाली. धुवांधार पाऊस कोसळत होता. आम्ही घाईगडबडीने दोन खुर्च्या पकडल्या आणि आधी चहाची व नंतर पुलाव्याची ऑर्डर दिली. नंतर आलेल्या मंडळींना जेवण कमी पडले.

भोजनोत्तर आम्ही बाहेरच्या लांबरुंद व्हरांड्यात थांबलो. तिथे नेमक्या सोफ्याच्या दोनच जुन्या खुर्च्या होत्या. त्या आम्ही पटकावल्या आणि फार सुंदर दृश्य पाहायला मिळाले. पावसाच्या थेंबांचे रूपांतर हळूहळू हिमकणांमध्ये झाले. हलकासा हिमवर्षाव सुरू झाला. काश्मीरमध्ये बर्फाच्छादित शिखरे पाहायला मिळणे कौतुकाचे नाही. सोनमर्ग आणि गुलमर्ग इथे बर्फाचे थरच्या थर साठलेले असतात. त्यावरून गाड्यांत बसून घसरण्याचा खेळही खेळता येतो, पण प्रत्यक्ष स्नोफॉल होताना क्वचितच पाहायला मिळतो. तो इथे पाहायला मिळाला त्यामुळे दिवसभराच्या पावसामुळे झालेली अडचण, डकसममध्ये फिरायला न मिळाल्याचे दुःख कधीच नाहीसे झाले. आम्ही धावत बाहेरच्या रिमझिमत्या पावसात गेलो आणि हिमवर्षावात न्हाऊन निघालो. ज्यांच्या ज्यांच्याकडे कॅमेरे

होते त्यांचे फ्लॅश फटाफट उडाले. एकमेकांचे फोटो काढण्याची गडबड सुरू झाली. डोंगरांच्या आणि घनदाट वृक्षांच्या पार्श्वभूमीवर हिमवर्षावात सुस्नात होताना घेतलेले हे फोटो डकसमचे चिरस्मरण करून देणारे आहेत. संध्याकाळी साडेपाचला आम्ही श्रीनगरमध्ये परतलो ते डकसमची निसर्गदृश्ये आठवतच.

**श्रीनगर शहरातील फेरफटका**

दोन मे ला आमचा विश्रांतीचा दिवस होता. साईटसीईंगला जायचे नव्हते. त्या दिवशी वातावरणही छान होते. सूर्याची कोवळी किरणे पसरली होती. अशा हवेत शिकाऱ्यातून दललेकमध्ये विहार करायला मजा आली असती. नेहरू पार्क, चार चिनार, मुगल गार्डन्स अशी कितीतरी ठिकाणे शिकाऱ्यातून जाऊन पाहता येतात. आम्ही मुगल गार्डन्सच्या टूरचे रिझर्वेशन आधीच केलेले होते. चार चिनारलाही स्वतंत्रपणे जाणार होतो. तेव्हा तास-दीडतासात पाहता येण्याजोगी काही ठिकाणे आम्ही निवडली आणि पंचवीस रुपयांत एक शिकारा ठरवला. शिकारेवाला बशीर आमच्या हॉटेलसमोरच राहत होता. आम्ही चहानाश्ता आटोपून येईपर्यंत त्याने दलगेटजवळच्या पुलाखाली शिकारा आणून ठेवला होता. प्रथम आम्ही पूर्वपरिचित नेहरूपार्कला गेलो. तिथले रेस्टॉरंट खूपच महाग असल्याने फक्त चहापानावरच भागवले. नंतर बशीरने आम्हाला 'लोटस गार्डन' दाखविले. कमलपुष्पे तुरळकच होती. त्याचे एक कारण म्हणजे इथल्या लोकांना कमळाच्या देठांची भाजी फार आवडते, हे असावे.

दललेकमध्ये 'तरती शेती' पाहण्यासारखी असते. पाण्यावर तरंगणाऱ्या जमिनीवर टोमॅटो, दुधी भोपळा, गाजरे, भाजीपाला, टरबुजे वगैरे पिकवली जातात. ही तरंगती शेती काही वेळा रात्री चोरीलाही जाते.

इतर ठिकाणी तुम्हाला खरेदी करायची असेल, तर उठून बाजारात दुकानात जावे लागते. दललेकमध्ये दुकानेच तुमच्याकडे येतात. छोट्या छोट्या बोटीतून 'दललेक' मध्ये फिरणारे व्यापारी केशर, स्टोनस व खड्यांच्या माळा, शाली, बिस्किटे, चॉकलेट्स, कोल्ड्रिंक्स, फुलेफळे वगैरे वस्तू विकत असतात. त्यांच्याकडे लाकडी, कोरीव कामांच्या वस्तूही असतात. लोटस गार्डनच्या जवळपास बऱ्याच हाऊसबोटी उभ्या दिसतात. त्यांच्याभोवती चक्क कंपाऊंड आहे. मध्येमध्ये छोटे बगिचे आहेत. व्हरांड्यात कुंड्या आहेत. या खास डिलक्स बोटी. इथे बहुदा फॉरिनर मंडळी राहतात. उघड्याबंब अवस्थेत ते डेकवर

सनबाथ घेत असतात. भारतीय मंडळी बी किंवा सी क्लासच्या हाऊसबोटमध्ये राहतात.

या गार्डनच्या मागे स्थानिक बाजार आहे. आमचा शिकारेवाला म्हणाला की, "काश्मीरमध्ये विकल्या जाणाऱ्या शाली, पश्मिने, गालिचे, लाकडी कोरीव वस्तू इतकेच नव्हे, तर भाजीपालासुद्धा इथेच तयार होतो. त्यावर कर बसवून, कमिशन घेऊन नंतर तो लाल चौकात किंवा सेंट्रल मार्केटमध्ये विकला जातो. ज्या वेळी हिम पडलेले असते किंवा मुसळधार पाऊस कोसळत असतो, तेव्हा स्थानिक मंडळी इथे विणकाम, भरतकाम करण्यात मग्न असतात. त्या वेळी तयार केलेला माल मग सीझनमध्ये विकला जातो." त्याने आम्हाला आग्रह करून त्या बाजारात नेले. त्यामुळे मोहाला बळी पडून आम्ही दोन शाली खरेदी केल्या. नंतर मार्केटमध्ये गेल्यावर लक्षात आले की, त्या आम्हाला मुळीच स्वस्त मिळाल्या नाहीत. शिकारेवाल्याला मात्र कमिशन मिळाले असणार.

नंतर आम्ही 'बी' क्लासवाल्या हाऊसबोटीचा शोध घेतला. अद्याप सीझन सुरू झाला नसल्याने अनेक बोटींवर To Let अशा पाट्या होत्या. या वेळी दोन दिवस तरी हाऊसबोटीत राहायचेच, असे आम्ही ठरवले होते. बशीरने आम्हाला रुक्साना (Ruxana) नावाची हाऊसबोट दाखवली. तिच्या मालकाने आम्हाला १५० रुपयांत लॉजिंग-बोर्डिंग देण्याचे मान्य केले, तेव्हा आम्ही दहा व अकरा मे साठी ॲडव्हान्स देऊन तिचे रिझर्वेशन केले.

दलगेटला बस पकडून आम्ही लाल चौकात भोजनासाठी गेलो. जेवण उरकेपर्यंत अडीच-तीन वाजले. आता परत लॉजवर जाण्यापेक्षा रमतगमत पायी सेंट्रल मार्केटला जावे, असे आम्ही ठरवले आणि झेलम नदीचा तिसरा पूल ओलांडून, आमचा बेत प्रत्यक्षातही आणला.

## सेंट्रल मार्केटमधील शॉपिंग

श्रीनगरमध्ये शॉपिंग सेंटर्स बरीच आहेत. दलगेटजवळ दिमाखदार असे Brulevard नावाचे दुकान आहे किंवा रेसिडेन्सी रोडवर गव्हर्नमेंट आर्ट एम्पोरियम आहे; पण ही दोन्ही ठिकाणे उच्चभ्रू, श्रीमंत लोकांसाठी आहेत. गव्हर्नमेंट शॉपमध्ये अस्सल केशराला १० ग्रॅमला १५० रुपये पडत होते आणि जो काश्मीर कोट इतर दुकानांत दोन-अडीचशेला मिळाला असता, तो इथे साडेचारशे रुपयांना होता, तेव्हा आम्ही तिथे थांबलो नाही. लाल चौक आणि

बादशहा चौक येथील साध्यासुध्या दुकानांत मात्र बार्गेनिंग चालू होते.

आम्हाला अनेकांनी सल्ला दिला होता की, खरेदीसाठी तुम्ही सेंट्रल मार्केटमध्येच जा. तिथे फसवणूक होणार नाही. भरपूर व्हरायटी पाहायला मिळेल. तिथल्या किमती निश्चित असतात. प्रत्येक वस्तूवर किमतीचे लेबल असते आणि तुम्ही कितीही माल घेतलात, तरी डिस्काऊंट वगैरे देत नाहीत.

आम्ही एक्झिबिशन ग्राऊंडवर गोलाकार असलेल्या या प्रचंड मार्केटमध्ये जाऊन पोहोचलो. तिथे अनेक दुकाने तर होतीच, मालही खच्चून भरलेला होता आणि मुख्य म्हणजे विक्रेते न कंटाळता तो दाखवत होते. दुकानाच्या दारावरचा पडदा बाजूला करून ते अदबीने 'आईये' ! 'आईये' ! असे म्हणून गिऱ्हाइकांचे स्वागत करत होते. ते इतक्या गोड शब्दांत आपल्या मालाची तारीफ करत होते की, काहीतरी खरेदी केल्याशिवाय ग्राहकाने बाहेर पडूच नये. ह्या मार्केटची मॅनेजमेंट सरकारची आहे. व्यापाऱ्यांच्या व ग्राहकांच्या सोयीसाठी केवळ पंधरा रुपये भाड्याने इथली दुकाने व्यापाऱ्यांना दिली आहेत. काश्मिरी कला व कारागिरीचे पूर्ण दर्शन या बाजारात घडते. सर्व वस्तू एकाच प्रांगणात वाजवी दराने खरेदी करता येतात.

येथील शे-दीडशे दुकानांपैकी अर्ध्याहून जास्त दुकानांमध्ये शाली, पश्मिने, सिल्क कापड, भरतकाम केलेले कपडे व साड्या आहेत. वीस-पंचवीस दुकाने वुड कार्व्हिंग आणि मेटलवर्कची आहेत. आठ-दहा पेपरमॅचीच्या कलात्मक वस्तूंची आहेत. दहा-पंधरा दुकाने फर आणि लेदर वर्कची आहेत. काही खडे व विविधरंगी दगड यांपासून बनवलेल्या अलंकारांची आहेत. तीन-चार दुकाने अक्रोड, बदाम अशा ड्रायफ्रुट्सची आहेत. तर तीन-चार केशर, मध यांची आहेत. चार-पाच दुकानांमधून गालिचे, नमदे, गब्बे आणि टेपेस्ट्री आहे. ८० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत किमतीच्या भरतकाम केलेल्या काश्मिरी शाली होत्या. निळा रंग म्हणजे माझा वीक पॉइंट. त्याच रंगाची शाल आणि पंचू यांची खरेदी झाली. भरतकाम केलेल्या दोन साड्या आणि भाच्यांसाठी भरतकामाचे कमीज घेतले. अक्रोड फोडण्याचा अडकित्ता आणि अक्रोडाच्या लाकडाचा ट्रे घेतला. काही खड्यांचे अलंकारही घेतले. थोडे अक्रोड व बदाम घेतले आणि भरल्या हातांनी आणि हलक्या खिशाने आम्ही बाहेर पडलो. रिक्षा पकडून लॉजवर गेलो. सर्व ओझे रूमवर टाकले आणि दलगेटहून डबलडेकर बस पकडून 'शालीमार गार्डन'ला गेलो.

## शालीमार उद्यानातील ध्वनिप्रकाशयुक्त खेळ

'शालीमार' किंवा तिकडचा उच्चार करायचा, तर 'शालामार' बाग श्रीनगरपासून सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर आहे. जहांगीर बादशहाने खास नूरजहाँच्या इच्छेखातर बनविलेले हे 'प्रेमोद्यान' आहे. तिथे हिवाळ्यात संध्याकाळी सात वाजता, तर उन्हाळ्यात आठ वाजता 'Light and Sound Show' असतो. तो मे ते ऑक्टोबर असे सहा महिनेच असतो. आम्ही गेल्या वेळी नोव्हेंबरमध्ये आल्याने तो पाहू शकलो नव्हतो. काश्मीरमधील सर्व मुगल गार्डन्समध्ये शालीमार सर्वोत्तम व मोठे आहे. या बागेभोवती पूर्वी संगमरवरी तट होता, असे म्हणतात. आता मात्र तिथे विटांची भिंत आहे. जहांगीर व नूरजहाँ यांच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या ह्या उद्यानाचे एकापेक्षा एक उंच असे चार स्तर आहेत. मागे हिमाच्छादित पर्वतशिखरे, उतरत्या पायऱ्या. मध्ये एक मोठा जलप्रवाह व त्याच्या दोन्ही बाजूला समान अंतरावर दोन छोटे प्रवाह असून हे तिन्ही प्रवाह छोट्या धबधब्याप्रमाणे चबुतऱ्यावरून जलकुंडात पडतात आणि तिथून बाहेर पडून शेवटी दललेकला जाऊन मिळतात. जलकुंडात स्नानासाठी दगडी चौथरे आहेत. बागेच्या चारी कोपऱ्यांवर चार गोलाकार मनोरे आहेत. जलप्रवाहावर काही ठिकाणी घुमटाकृती कमानी आहेत. सर्व बागेत मिळून शे-दीडशे कारंजी आहेत. नूरजहाँने हौसेने आणून लावलेले चिनार वृक्ष आहेत. ह्या उद्यानाचा आकार ५३९x१८२ मीटर्स एवढा आहे. चौथ्या मजल्यावर जो भव्य शामियाना आहे तो त्या काळात राजघराण्यातील स्त्रियांसाठी राखीव होता, असे म्हणतात. शालीमारचा Light and Sound Show म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव होता. विवेचन लांबेल याची कल्पना असूनही तो अनुभव विस्तृत वर्णन केल्याखेरीज मला राहवत नाही. शालीमारला जाण्यासाठी दलगेटजवळ आम्ही टॅक्सीची चौकशी केली, तेव्हा त्याने जाऊनयेऊन सत्तर रुपये सांगितले. रिक्षाने चाळीस रुपये मागितले. त्यांना तिथे तासभर वेटिंग करावे लागणार होते. आमची चर्चा चालू असतानाच तिथे डबलडेकर बस आली. आम्ही प्रत्येकी एक रुपयाचे तिकीट फाडून छानपैकी या जनता वाहनातून गेलो आणि शो संपल्यावर बसनेच परत आलो. असेच एकदा बसने 'चष्माशाही' आणि 'निशात' या बागांमध्येही जाऊन आलो. साईटसीईंग बसबरोबर मुगल गार्डन्स पाहताना घाईगडबड होते. कारण ती टूर आठ ते बारा अशी चार तासांची असते. या उद्यानांमध्ये संध्याकाळी जाण्यातच खरी मौज

असते आणि शालीमारचा 'शो' तर रात्रीच असतो.

शालीमारला आम्ही सातच्या सुमाराला पोचलो, तेव्हा अंधुक सूर्यप्रकाश होता. उद्यानात एक चक्कर मारेपर्यंत ढग येऊन, एखादा चुकार पावसाचा थेंब पडू लागला होता. 'शो' होणार की नाही, याबद्दल काळजी वाटू लागली. कारण पावसामुळे आधीचे दोन दिवस तो झाला नव्हता, पण सुदैवाने पाऊस आला नाही. एका उंच उतरत्या चौथऱ्यावर खुर्च्या मांडलेल्या होत्या. 'शो'साठी पाच व दहा रुपयांची तिकिटे होती. आम्ही तिकिटांसाठी मॅनेजरकडे वीस रुपये दिले. जागा चांगली मिळाली. तिकिटे मात्र शेवटपर्यंत मिळालीच नाहीत. पैसे मॅनेजरच्या खिशात गेले असणार.

या ध्वनिप्रकाशयुक्त खेळामध्ये मीनाकुमारी, कबीर बेदी, राज मेहरा, अजित वगैरे कलाकारांनी कामे केलेली असून, चेतन आनंद यांचे दिग्दर्शन व जयदेवांचे संगीत आहे. एक तास चालणाऱ्या या 'शो'ला नावही मोठे आकर्षक दिले आहे. 'मुगल रोमान्स' मध्ये जहांगीर व नूरजहाँ यांची प्रेमकहाणी सांगितलेली असून, जयदेवांचे संगीतही सुंदर आहे.

'शो'ला बरोबर आठला प्रारंभ झाला. हे उद्यान दलसरोवराकाठी आहे, म्हणून प्रारंभी कमळाचे माहात्म्य वर्णन केले. कमल हे सर्वधर्मीयांनी पवित्र कसे मानले आहे, ते सांगून काश्मीरचा थोडक्यात इतिहास सांगितला. तो सांगत असताना काश्मीर हे हिंदू, मुस्लीम व बौद्ध या तिन्ही धर्मांच्या लोकांनी कसे विकसित केले, हे सांगण्यावर भर दिला गेला.

त्यानंतर 'खामोश शाही सवारी आ रही है' असे म्हणून नूरजहाँच्या सौंदर्याचे वर्णन केले. जहांगीरची हुकमत हिंदुस्थानवर होती, पण जहांगीरच्या हृदयावर नूरजहाँची हुकमत चालत असे. ते दोघे ज्या वेळी प्रथम काश्मीरला आले त्या वेळी इथे फक्त पहाड आणि जंगल होते. त्या वेळी नूरजहाँने अशी इच्छा व्यक्त केली की,'यहाँ एक खुबसुरत बाग बनाया जाये !' नूरजहाँचे ते स्वप्न जहांगीरने साकार केले आणि पृथ्वीवर स्वर्ग उभा केला. मोगलांनी अनेक उद्याने व बागा निर्माण केल्या आहेत. 'शालीमार' निर्माण करायचे ठरल्यावर प्रथम भिंती बांधल्या. भिंतींवर अंगूर, अलुबुखार, नाशपाती यांचे वेल चढवले. मग हिरवळ निर्माण केली. शामियाने तयार झाले. बागेमध्ये दुल्हनच्या भांगाप्रमाणे पाणी सोडण्यात आले, ते नंतर दललेकला जाऊन मिळणार होते. वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे लावली. चिनारवृक्षांचे जंगल निर्माण केले,

ज्यातले काही चिनार आजही जिवंत आहेत.

बाग निर्माण झाल्यानंतर जहांगीर व नूरजहाँ दरबारी लोकांसह बागेत येऊन दाखल झाले. शाही नौबत वाजू लागली. बागेचा पहिला हिस्सा दरबारी लोकांसाठी होता. मग होते शाही तख्त. नंतर झरे आणि कारंजी. आकाशाच्या खुल्या मंडपाखाली दरबार भरला. शाहिरांनी स्तुतिस्तोत्रे गायली. त्यांना इनामे मिळाली. दिवस अस्ताला गेल्यानंतर तो दरबार बरखास्त झाला.

उद्यानाचा खास हिस्सा नूरजहाँसाठी राखून ठेवला होता. जहांगीर आणि नूरजहाँ यांनी 'यहाँ प्यारभरी राते अरमानोंके दिन गुजारे ।' या उद्यानाला त्यांच्या प्रेमाचा सुगंध आहे. त्यानंतर त्या दोघांमधील 'अनबनी'चे - लटक्या प्रेमकलहाचे वर्णन करण्यात आले. उर्दूमिश्रित डौलदार हिंदीत ते जे निवेदन केलेले आहे त्याची खुमारी न्यारीच आहे. हा प्रेमकलह मिटला कसा आणि 'बिछडे हुए आशिक मिले कैसे' ह्याचे वर्णन करून निवेदक म्हणाला— 'वो प्यार किस कामका, जिसमें न कोई रुठनेवाला हो न कोई मनानेवाला ।'

१६२७ मध्ये जहांगीर अखेरचा कश्मिरला आला, तेव्हा त्याची तब्बेत ढासळलेली होती. तो नूरजहाँला म्हणाला, 'कश्मीरसे वापस जानेको जी नहीं चाहता ।' परंतु राज्यकारभाराच्या कामासाठी त्याला आग्र्याकडे कूच करावे लागले. जहांगीरने अशी इच्छा व्यक्त केली की, समजा मला रस्त्यातच मृत्यू आला तर माझे दफन वेरीनाग येथे करावे. शाही काफिला प्रवासाला निघाला आणि दुर्दैवाने जहांगीरचे डोळे रस्त्यातच कायमचे मिटले. राजकारणी नूरजहाँने ही बातमी लपविण्याचा प्रयत्न केला, पण काश्मीरबाहेर गेल्यानंतर त्याच्या प्रेताला दुर्गंधी येऊ लागली आणि रस्त्यातच त्याचे दफन करावे लागले. काश्मीरमध्ये चिरनिद्रा घेण्याची त्याची इच्छा पूर्ण झाली नाही.

मुगलांच्या नंतर या उद्यानाकडे दुर्लक्ष झाले. सारा शालीमार बर्फाखाली गाडला गेला.'कोहरेने उसपर मैली चद्दर फैलायी ।' निवेदनाचा इथपर्यंतचा भाग रंजक होता. नंतर मात्र कथानक घाईघाईने गुंडाळल्यासारखे वाटले. निवेदकाने सांगितले की, आझादीच्या लढाईपासून काश्मीर अलग राहिले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'शालीमार'चे भाग्य उदयाला आले. उद्यानाची देखभाल होऊ लागली आणि आनंदाची गोष्ट म्हणजे जी उद्याने पूर्वी केवळ शहेनशहांसाठी होती, ती आता आमजनतेसाठी खुली झाली आहेत. प्रेक्षकांपैकी काहींना उर्दूमिश्रित हिंदी समजत नव्हते. काहींना शास्त्रीय संगीतात रुची नव्हती. त्यामुळे

ते कुजबूजत होते. राष्ट्रगीताच्या वेळी शांत राहणेही काहींना जमले नाही. ते घाईगडबडीने बाहेर पडू लागले.

मला मात्र हा 'शो' खूपच आवडला आणि ज्या वातावरणात आम्ही तो पाहिला व ऐकला, ते तर अभूतपूर्व होते. डावीकडे उत्तुंग पर्वतांच्या रांगा, उजवीकडे खोलवर दिसणारे दललेक, झऱ्यांचा झुळझुळु आवाज, बागेतील डोलणारे इतिहासप्रसिद्ध चिनारवृक्ष, फुलांचा मंद सुगंध, आकाशातील चिमुकली चंद्रकोर, थंडगार झोंबणारे वारे आणि अशा रम्य वातावरणात ऐकलेली काव्यमय भाषेतील संगीतमय प्रेमकहाणी– ते क्षण विसरण्यासारखे थोडेच आहेत ?

शो संपवून मागच्या बाजूच्या दाराने आम्ही बाहेर पडलो तेव्हा दलगेट व लाल चौकाकडे जाणारी बस उभीच होती. आम्हाला बसायला जागाही मिळाली. साडेनऊच्या सुमाराला आम्ही दलगेटला उतरलो आणि चौकातल्या साऊथ इंडियन हॉटेलात जेवून लॉजवर परतलो.

## टूर क्रमांक ३ - इतर मुगल गार्डन्स

दुसऱ्या दिवशी तीन मेला मुगलगार्डन्सच्या अर्ध्या दिवसाच्या टूरला जायचे होते. ही टूर चष्माशाही, निशात आणि शालीमार ही मुगल गार्डन्स आणि हजरतबल ही श्रीनगरमधील ठिकाणे दाखवते आणि साडेबाराला परत येते. दुपारी अडीचला मुगलगार्डनची दुसरी टूर असते. ती सात वाजता परत जाते. या टूरमधील सर्व ठिकाणे दललेकच्या काठावर आहेत.

### चष्माशाही

हे छोटे पण सुरेख उद्यान श्रीनगरपासून फक्त आठ किलोमीटरवर आहे. चष्माशाही म्हणजे Royal spring. इथे जो झरा आहे, त्याचे पाणी शीतल व पाचक आहे. पंडित नेहरूंसाठी ते रोज विमानाने दिल्लीला नेत असत, असे म्हणतात. या पाण्याच्या बाटल्या श्रीनगरच्या दुकानांत विक्रीसाठी ठेवलेल्या असतात आणि फॉरिनर मंडळी त्या विकत घेतात. कारण एरवी श्रीनगरचे पिण्याचे पाणी जड आहे. या उद्यानाला पर्वतराजीची पार्श्वभूमी आहे. पायथ्याशी दललेक आहे आणि उद्यानातील रंगीबेरंगी फुले आणि गुलाबाचे ताटवे प्रवाशांचे मन आकर्षित करतात. शहाजहानच्या सांगण्यावरून मोगल सरदार

अली मर्दन खां याने इ. स. १६३२ मध्ये हे उद्यान निर्माण केले, तर बागेतील कारंजी, शहाजहाचा मुलगा दारा याने तयार करून घेतली. बागेच्या वरच्या बाजूला एक भव्य महिरपी मंडप असून, तिथेच 'शाही चष्मा' आहे. मागच्या बाजूला बाबा गुलामुद्दीन यांचा मकबरा आहे.

'चष्माशाही' जवळ हॉलीडे होमचे हट्स भाड्याने मिळतात. 'राजभवन'ही तिथून जवळच आहे. एक छोटा रस्ता शेजारच्या 'परीमहल'कडे जातो. पूर्वी तिथे बौद्ध विहार होता. शहाजहानचा पुत्र दारा ह्याने तो दुरुस्त केला आणि तिथे तो आपले गुरू मल्लशाह यांच्याबरोबर दर्शनशास्त्रांसंबंधी वादविवाद करत असे, अशी माहिती गाईडने दिली. टूरमध्ये 'परीमहल' मात्र दाखवत नाहीत.

### निशात बाग

'चष्माशाही'पासून तीन कि. मी. अंतरावर हे दुसरे मुगलगार्डन आहे. 'निशात बाग' म्हणजे सुखासमाधानाचे उद्यान. नूरजहाँचा भाऊ आसफखां याने हे उद्यान १६३३ मध्ये निर्माण केले. ते पीरपंजाल पर्वतरांगांमध्ये असून पर्वताचा उतार आणि नैसर्गिक जलप्रवाह यांचा तिथे उपयोग करून घेतला आहे. या उद्यानाचे दहा स्तर आहेत. पहाडातील जलप्रवाह दहा चबुतऱ्यांवरून दहा जलकुंडांत कोसळतो आणि वाहत वाहत दललेकला मिळतो. बागेत ठिकठिकाणी कारंजी आहेत आणि पायऱ्यापायऱ्यांची पायवाट आहे. इथेही मागे एक मोठा मंडप असून, तिथे प्रशस्त जलकुंड आहे. मध्ये जो प्रवाह आहे, त्याचे पाणी एका चबुतऱ्यातून दुसऱ्या चबुतऱ्यात असे खाली खाली येते. वरच्या बाजूच्या चबुतऱ्याजवळ बरेच चिनारवृक्ष आहेत. जहांगीर बादशहाने ज्या वेळी प्रथम हे उद्यान पाहिले, तेव्हा तो स्तिमितच झाला आणि उत्स्फूर्तपणे म्हणाला की, 'हे उद्यानतर शालीमारपेक्षाही सुंदर आहे'. पायऱ्या उतरून खाली आल्यावर दललेकजवळ काही उपाहारगृहे व छोटेसे शॉपिंगसेंटर आहे. इथूनही शिकाऱ्यातून सहल करता येते.

### शालीमार उद्यान

निशातपासून तीन किलोमीटरवर असलेल्या या उद्यानासाठी टूरमध्ये अर्धा तास वेळ देतात. आदल्याच संध्याकाळी आम्ही ते निवांतपणे पाहिले होते. आता पुन्हा एक धावती चक्कर टाकली. काश्मिरी ड्रेस भाड्याने घेऊन आमच्याच

कॅमेऱ्यावर तीन-चार फोटो काढले. पंधरा-वीस रुपये देऊन त्याच्याकडून एक प्रत घेण्यापेक्षा दहा रुपयांत दोघांसाठी ड्रेस भाड्याने घेणे जास्त बरे वाटले. नंतर उद्यानासमोरच्या उपाहारगृहात गरमागरम पकोडे व चहा यांचा समाचार घेतला.

### नसीम बाग

हजरत बलला जाताना वाटेत नसीमबागेचे दुरूनच दर्शन घडले. टूर तिथे थांबत नाही. 'नसीम' म्हणजे प्रातःकाळचा शीतल वारा— ही बाग मुगलगार्डनप्रमाणे फुलबाग नाही, तर ते चिनारवृक्षांचे बन आहे. असे म्हणतात की, मोगल सम्राट अकबराने इथे बाराशे चिनारवृक्ष लावले होते. त्यांपैकी काही आजही आहेत. चिनारवृक्ष दीर्घायुषी आहे. कारण तो श्वासामधून प्राणवायू घेतो आणि उच्छ्वासातून प्राणवायूच बाहेर टाकतो. या बागेतही पाण्याचा नैसर्गिक झरा आहे.

### हजरतबल

महंमद पैगंबराचा बाल (केस) इथे ठेवलेला आहे, म्हणून हे हजरतबाल किंवा हजरतबल. हा बाल इ. स. १११२ मध्ये सय्यद अब्दुल्ला याने मदिनेहून इथे आणला. वर्षातून तीन वेळा प्रत्येकी दहा दिवसांसाठी तो दर्शनाला बाहेर काढतात. मुस्लिमांच्या दृष्टीने हे पवित्र स्थान असून ते 'दुसरी मदिना' म्हणून ओळखले जाते. प्रत्येक शुक्रवारी दुरून दुरून मुस्लीम मंडळी इथे नमाज पढण्यासाठी येतात. आज तिथे जी भव्य घुमटाकार वास्तू उभारलेली आहे, तिचे बांधकाम ८३ सालीच पूर्ण झाले. या मशिदीच्या मागच्या बाजूला हिरवळ आणि दललेक असल्यामुळे ते एक निसर्गरम्य स्थळही बनले आहे. हजरतबल हे दलगेटच्या पश्चिमेकडे, साधारणपणे निशात बागेच्या समोरच्या बाजूला येते. मध्ये लेक असले, तरी त्याची भव्य वास्तू निशात बागेतूनही दिसते. पश्चिमेकडच्या रस्त्याने हजरतबल ते श्रीनगर हे अंतर फक्त सात कि. मी. असून तिथपर्यंत सिटीबसेस जातात.

ही स्थळे पाहिल्यानंतर आम्ही टूरिस्ट सेंटरला बसमधून उतरलो. लाल चौकात भोजन आटोपून लॉजवर गेलो.

### रविवारचा बाजार

वामकुक्षी आटोपल्यानंतर, साडेचार-पाचला आम्ही बाहेर पडलो. त्या

दिवशी रविवार असल्याने सर्व दुकाने बंद होती आणि पाऊसही भरून आला होता. लाल चौकात रविवारी खास बाजार भरतो. खाटा मांडून त्यावर वस्तू विक्रीला ठेवल्या जातात व त्या स्वस्तात मिळतात, असे समजले होते. आम्ही या बाजारात गेलो. पावसापासून संरक्षण करेल असा एक कोट, एक हँड बॅग व भरतकाम केलेल्या दोन काश्मिरी बॅग्ज खरेदी केल्या. पावसाला सुरुवात झाल्याने, इकडेतिकडे न रेंगाळता सरळ लॉजवर परतलो.

## टूर क्रमांक ४– वुलर लेक

चार मे ला आम्ही वुलरलेकची जी टूर केली, तिच्यामध्ये बरीच स्थळे दाखवतात. त्या दिवशी हवाही मोठी छान होती. वुलर लेककडे जाणारा रस्ता प्रारंभी सपाट होता, पण दुतर्फा 'सफेदा'ची झाडे होती. सफेदाच्या झाडांना फळे वगैरे येत नाहीत, पण झाडे उंच आणि डेरेदार असतात. त्याची फुले म्हणजे वाऱ्याने उडणाऱ्या छोट्या पांढऱ्या म्हाताऱ्या असतात. या म्हाताऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या टाररोडला चिकटत नाहीत, पण मातीला मात्र चिकटतात. त्यामुळे रस्त्याच्या कडेला जिथे टाररोड संपला होता तिथे त्यांचा ढीग साठला होता. आमच्या लॉजवरदेखील मागच्या बाजूला दोन-तीन सफेदाची झाडे होती आणि जोरदार वारा सुटला म्हणजे म्हाताऱ्या खोलीत घुसत असत. आमच्या या बसचा म्हातारा मुस्लीम ड्रायव्हर अत्यंत कौशल्याने व सफाईदारपणे गाडी चालवत होता.

### पट्टन

या टूरचा पहिला स्टॉप होता पट्टन. हे गाव श्रीनगर-बारामुल्ला रस्त्यावर आहे. नवव्या शतकात इथे राजा शंकरवर्मन याची राजधानी होती. त्या काळात या गावाचे नाव होते, 'शंकरपुरा'. राजाने महादेवाची दोन मंदिरे बांधली होती. त्यांचे अवशेष इथे पाहायला मिळतात. या भग्न अवशेषांवरून त्या काळातील कारागिरीची कल्पना येते.

### वुलर लेक

वुलर लेकच्या भोवताली बसने एक चक्कर मारली जाते. हे तळे श्रीनगरपासून साठ कि. मी. असून ते भारतातील सर्वांत मोठे लेक आहे. त्याचा

विस्तार ऋतुमानाप्रमाणे कमी-जास्त होतो. थंडीत ते सात मैल पसरलेले अर ।. उन्हाळ्यात तेरा मैल आणि पावसाळ्यात तर त्याचे पाणी शेजारच्या गा ।त घुसते. सकाळी तळ्याचे पाणी शांत असते, पण दुपारी जर जोरदार हवा सुटली, तर पाण्यात मोठमोठ्या लाटा निर्माण होतात. अशा वेळी होड्या चालविणे धोक्याचे असते. या लेकबद्दल अशी आख्यायिका सांगतात की, पूर्वी इथे एक मोठे शहर होते. ते भूकंपात गाडले गेले आणि नंतर झेलम नदीच्या पुरामुळे इथे तळे तयार झाले. आजही झेलम नदी या लेकला येऊन मिळते. पट्टनहून लेककडे येणारा रस्ता झेलम नदीच्या काठाकाठाने, देवदार वृक्षांमधून येतो.

### वॅटलॅब

वॅटलॅब या ठिकाणी आमची बस दहा-पंधरा मिनिटांसाठी थांबली. ही जागा वुलरलेकच्या शेजारच्या टेकडीवर आहे. इथून लेकचा देखावा सर्वांत छान दिसतो. इथे छोटेसे रेस्टॉरंटही आहे. मोठ्या काचेच्या खिडक्यांजवळ बसले की, खालचे तळ्याचे दृश्य छान दिसते. इथे छान गरमागरम चहा मिळाला. बिस्किटांचा पुडा बरोबर होताच. तिथे कॉफी मात्र उपलब्ध नव्हती.

### निशात पार्क–बांदीपूर

लेकच्या भोवती काठाकाठाने बांदीपूर गाव वसलेले आहे. या गावातून जात असताना अगदी कोकणाची आठवण होत होती. तिथे आठवडेबाजार भरला होता. गाव संपल्यावरती डोंगराच्या उताराचा फायदा घेऊन मुगल उद्यानाच्या पद्धतीने 'निशात पार्क' नावाचे छोटे उद्यान इथल्या नगरपालिकेने तयार केले आहे. वरती एक रेस्टॉरंट आहे, पण ते बंद होते. स्थानिक लोकांचे हे आवडते ठिकाण असावे. कारण सकाळची वेळ असूनही लोकांची गर्दी होती.

### मानसबल

चौथा स्टॉप असलेले 'मानसबल' हे छोटे तळे आहे. ते श्रीनगरपासून ३० कि. मी. अंतरावर आहे. त्याचा उच्चार इथले लोक मंसाबल असाही करतात. निळ्या स्वच्छ पाण्यामुळे हे तळे लहान असले तरी सुंदर दिसते. पावसाळ्यात तिथे शेकडो कमळे फुललेली असतात. पक्षीही बरेच येतात. शेजारच्या छोट्या टेकडीवर टूरिस्ट बंगला आहे. टेकडीवर छोटी बाग फुलवलेली आहे. तिथून

खालचे लेकचे दृश्य छान दिसते. टूरिस्ट बंगल्यात भोजनव्यवस्था आहे, पण ती फार महाग आहे. त्या काळात तिथे लिमिटेड थाळीला चौदा रुपये मोजावे लागले. चार-पाच जणांच्या कुटुंबाला हा खर्च जास्तच आहे. हॉटेलचा डायनिंग हॉल लहान असल्यामुळे तुम्ही बाहेर बागेत जरी बसलात, तरी तिथे थाळी आणून दिली जाते. त्यामुळे वनभोजनाचा आनंद लुटता येतो.

तळ्याच्या काठी काही 'शिकारे' उभे असतात. तीन-चार किलोमीटर पाण्यात गव्हर्नमेंटने 'जरोका बाग' या नावाची एक बाग प्रवाशांसाठी तयार केली आहे. शिकाऱ्यातून तिथे जाण्यासाठी माणशी पंधरा रुपये घेतात. बागेत प्रेक्षणीय असे काही नाही, पण जलविहाराचा आनंद मात्र मनसोक्त मिळतो. तिथे जाऊन परत यायला पाऊण तास तरी लागतो. मानससरोवर पाहू न शकणारे लोक 'मानसबल' सरोवर पाहून समाधान करून घेतात. कारण ते तळेही पवित्र मानतात.

### खीरभवानी

खीरभवानी किंवा क्षीरभवानी हा आमचा नंतरचा स्टॉप होता. हे हिंदूंचे पवित्र मंदिर आहे. तिथे झरा आणि गंधकयुक्त पाण्याचे कुंड आहे. स्त्रियांना स्नानासाठी स्वतंत्र जागा आहे. मंदिराचा परिसर मोठा आहे. टाररोडपासून मुख्य मंदिरापर्यंत रस्ता स्वच्छ व रुंद असून, दुतर्फा झाडे आहेत. इथे नेहमी पोलिस पहारा असतो. जून महिन्यात या देवीची जत्रा असते. काश्मीरमध्ये वैष्णोदेवी आणि क्षीरभवानी ही हिंदूंची दोन तीर्थक्षेत्रे महत्त्वाची मानली जातात. मंदिराच्या बाहेर स्टोन्सचे दागिने, काश्मीरमधील स्थळांचे फोटो आणि ड्रायफ्रूटस् विक्रीसाठी ठेवलेली होती. आम्ही बसमध्ये तोंडात टाकण्यासाठी थोडी ड्रायफ्रूटस् घेतली.

बस शेवटी हजरतबल येथेही थांबली. आमचा ड्रायव्हर नमाज पढायला गेला. रमजानचा महिना चालू होता ना. सहा-साडेसहा वाजता आम्ही श्रीनगरला परतलो.

## टूर क्रमांक ५– सोनमर्ग

पाच मेला आम्ही सोनमर्गला भेट दिली. श्रीनगरपासून ८० कि. मी. वर असलेले हे निसर्गरम्य ठिकाण सिंधू नदीकाठी वसलेले आहे. इथल्या पाण्यात

कशाचेही सोने करण्याची ताकद आहे. 'सोनमर्ग' म्हणजे सोन्याचे कुरण. हे गाव ताजिवा पर्वत रेंजमध्ये आहे. निसर्गसौंदर्याच्या बाबतीत गुलमर्गशी बरोबरी करू शकेल, असे हे ठिकाण आहे. ही एकच टूर अशी आहे की, जिथे जाता-येताना दुसरे कुठलेही स्थळ दाखवत नाहीत.

वर्षातील आठ-नऊ महिने या भागात बर्फ असते. आम्ही श्रीनगरला पोहोचलो, तेव्हाही सोनमर्ग रस्ता बंदच होता. आदल्याच दिवशी तो खुला झाला म्हणून आम्हाला तिथे जाता आले.

वाटेत 'कंगन' नावाच्या गावी बस चहापाण्यासाठी थांबली, खरोखरीच गावाचा आकार कंगनासारखा गोल होता. सर्व बाजूंनी पर्वत व त्यांची हिमाच्छादित शिखरे दिसत होती. उपाहारगृहांवर आवर्जून लिहिलेले होते की, इथे टॉयलेटची सोय उपलब्ध आहे. काश्मीरमध्ये ही अडचण फार जाणवत होती. थंडीमुळे टॉयलेटला जावेच लागते. पुरुष कुठेही जाऊ शकतात. बिचाऱ्या स्त्रिया मात्र आडोसा शोधण्यासाठी एकेक फर्लांग फिरत असतात. तेथील हवामान लक्षात घेता लेडीज टॉयलेट्सची गरज आहे.

## बर्फातील खेळ

सोनमर्गला बस थांबल्याबरोबर बर्फातून लाकडी स्लेटर गाड्या चालविणाऱ्यांनी आमच्यावर अक्षरशः हल्ला चढवला आणि उतारूंना ताब्यात घेतले. दोन-तीन पोलिस या गाडीवाल्यांना लाईनमध्ये उभे करत होते आणि नंबरप्रमाणे प्रवासी त्यात बसत होते. आम्हाला पाच नंबर मिळाला. हे लोक प्रवाशाला लाकडी स्लेटर गाडीवर बसवतात. गाडीच्या पुढच्या बाजूला भक्कम दोरी बांधलेली असते. एकजण ती पुढून ओढतो आणि दुसरा गाडी बर्फातून मागून ढकलतो. रस्ता चढाचा आहे. त्यात आमच्यासारखी वजनदार माणसे, त्यामुळे मेहनत बरीच असते. दोन गाड्यांचे तीनशे रुपये द्या, इथपासून सुरुवात करून शेवटी ऐंशी रुपयांवर सौदा झाला. त्याशिवाय गाडी मागून ढकलायला एक हेल्पर जास्त घेतला. त्याला पाच रुपये द्यायचे ठरले. बसअड्ड्याजवळच्या दुकानात भाड्याने बूट, मोजे घेतले. माणसे आपल्याला ओढून नेत आहेत, हे थोडे विचित्र वाटत होते, पण शेवटी तो त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न होता. बिचारे चढ चढताना थकत होते. त्यात त्यांचे रमजानचे उपवास. ते पहाटे चार वाजता जेवलेले असतात. नंतर पाणीसुद्धा पीत नाहीत.

बर्फातून खाली घसरत येताना मजा येते. गाडीवाला पुढे बसतो. आपल्याला मागे बसवतो आणि गाडी वेगात घसरत खाली येते. मध्येच एखादा खड्डा किंवा उंचवटा आला, तर जोरदार धक्का बसतो; पण हे गाडीवाले कुशलतेने पायांचा उपयोग ब्रेकसारखा करतात. गंमत म्हणजे बर्फातून जाताना फारशी थंडी वाजत नाही. बर्फातील खेळ खेळून आल्यानंतर आम्ही बूटमोजे परत केले. तिथल्या रेस्टॉरंटमध्ये जेवण अगदीच सुमार होते, तेव्हा आम्ही बरोबर आणलेल्या ब्रेड, बटरवर भागवले. बरोबर फक्त आमलेट तेवढे मागवले.

### हसमुख ग्लेशियर

नंतर आम्ही एका बाजूला असलेल्या हसमुख ग्लेशियरच्या हिमनदीच्या काठाकाठाने फिरायला गेलो. वाटेत काही मिलिटरीतील लोक भेटले. त्यांच्याशी थोड्या गप्पा मारल्या. ते म्हणाले की, "इथून गुंडपर्यंतचा रस्ता मोकळा आहे. पुढे सर्व बर्फ आहे."

ग्लेशियरवरील लाकडी ब्रिज ओलांडून पलीकडे गेल्यावर फर व पाईन वृक्षांचे जंगल दिसत होते.

टूरिझमच्या कॅफेटेरियात आम्ही चहा घेतला. तिथे लांब फावड्यांनी व्हरांड्यातील बर्फ काढून टाकण्याचे प्रयत्न चालू होते. सोनमर्गला राहण्यासाठी दोन बेडरूम्सचे हट्स दीडशे रुपये भाड्याने मिळतात; पण ते उंचावर असून तिथे रूमसर्व्हिस उपलब्ध नाही. चहा पिण्यासाठीसुद्धा खाली यावे लागते.

सोनमर्गहून अनेक हिमनद्यांना रस्ता जातो. इथून अमरनाथला जाण्यासाठीही शॉर्टकट आहे, पण तो तीनच महिने चालू असतो. पहलगामहून अमरनाथला जायला तीन दिवस लागतात, तर सोनमर्गहून घोड्यावरून सुमारे आठ तासांत अमरनाथला जाता येते. घोडेवाले सीझनप्रमाणे १५० ते ६०० रुपये मागतात. सोनमर्ग ट्रेकिंगसाठीही प्रसिद्ध आहे. इथून विष्णुसागर, कृष्णसागर येथे ट्रेकिंग मार्ग जातात.

काश्मीरला गेलेले सर्व प्रवासी पहलगाम आणि गुलमर्ग यांना भेट देतातच. सोनमर्गदेखील आवर्जून पाहावे असे नितांतरमणीय व शांत स्थळ आहे. आमचे सुदैव म्हणून आम्ही ते पाहू शकलो.

## टूर क्रमाक ६ – पहलगाम

श्रीनगरच्या लॉजमधील खोली तशीच ठेवून, बरोबर एक छोटी सूटकेस

घेऊन, सात मेला आम्ही 'पहलगाम'ला निघालो. आमच्या बसमधले सर्व उतारू 'पहलगाम'ला मुक्काम करणारे— एकेरी वाहतूकवाले होते. श्रीनगर ते पहलगाम लक्झरीचे तिकीट सव्वीस रुपये आहे. आम्हीही पहलगामला एक दिवस मुक्काम करायचा आणि दुसऱ्या दिवशी परत जायचे, असे ठरवले होते.

'पहलगाम' श्रीनगरपासून ९६ कि. मी. अंतरावर असून, त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची २२०० मीटर आहे. लिद्दर नदीच्या दोन्ही काठांवर हे गाव वसलेले आहे. तिथे शेषनाग नावाचे लेक आहे. शेजारून हिमनदी वाहते आहे. आसमंतातील डोंगरांवर पाईन व फरची जंगले असून, पर्वतशिखरे हिमाच्छादित असतात. पूर्वी इथे धनगरांची वस्ती होती. आता ते टूरिस्ट सेंटर झाले असले, तरी तिथे श्रीनगरसारखी गर्दी नाही. हे गाव फिशिंगसाठी प्रसिद्ध आहे. पहलगामला जाणारा रस्ता सुरेख आहे. वाटेत पिवळ्या रानफुलांची कुरणे, तांदळाची शेती, बदाम, सफरचंद व अक्रोड यांची झाडे दिसतात. आजूबाजूला ट्रेकिंगला जायला छान पर्वतशिखरे आहेत. सर्वांच्या खिशाला परवडतील अशी हॉटेल्स इथे उपलब्ध आहेत.

पहलगाम टूरमध्ये रस्त्यात पाम्पूर, अवंतीपूर, बॅटचा कारखाना आणि अनंतनाग अशी काही ठिकाणे दाखवतात.

## पाम्पूर

श्रीनगरहून तेरा किलोमीटरवर झेलम नदीच्या डाव्या बाजूला हे छोटे गाव आहे. भारतातील हे एकमेव असे ठिकाण आहे की, जिथे केशर उगवते. केशराचे रोप टिचभर उंचीचे असते. त्याला केशराची तीन फुले येतात. त्याला केशराचा कांदा म्हणतात. हा कांदा फळाफुलाला येण्यासाठी तीन वर्षे लागतात, पण एकदा तो फुलला म्हणजे चौदा वर्षे फुलत राहतो. या पिकाला खतपाणी लागत नाही. रोपाला जी तीन फुले येतात त्यांपैकी एकाच फुलामध्ये केशरी पराग असतात. दुसऱ्या दोन फुलांमध्ये पिवळे पराग असतात. केशरी परागापासून अस्सल केशर मिळते. केशराचे फूल फिक्या जांभळट रंगाचे आणि एक ते दीड इंच उंच असते. नोव्हेंबरमध्ये कोट्यवधी फुलांनी जमीन आच्छादिली जाते. कार्तिक पौर्णिमेला या केशरबनात यात्रा भरते. केशराचा सौदा करायला लांबून लांबून व्यापारी येतात. ८९ साली तिथे केशराचा भाव, दहा ग्रॅमला दीडशे रुपये होता. आपल्याला असली व नकली केशरामधला फरक समजत नाही, तेव्हा ज्यांना अस्सल केशर

घ्यायचे असेल त्यांनी ते गव्हर्नमेंट शॉपमधून घ्यावे, हे चांगले. ही केशराची रोपे सम्राट अकबराने काबूल-कंदाहारहून आणली होती. या पंचवीस मैलांच्या टापूतच केशर उगवू शकते. सरकारने काश्मीरमध्ये इतरत्र त्याची लागवड करण्याचे प्रयत्न केले, पण ते असफल झाले. 'मे' मध्ये केशराला फुले वगैरे नसतातच, त्यामुळे बसमधूनच ही केशराची झाडे पाहावी लागली. गंमत म्हणजे एकाच शेतात वर बंदामाची आणि खाली केशराची अशी लागवड केली जाते.

## अवंतीपूर

पाम्पूरहून सोळा किलोमीटरवर असलेल्या अवंतीपूर गावी प्राचीन मंदिराचे अवशेष आहेत. राजा अवंतीवर्मन याने ८५३ च्या सुमाराला, अवंतीपूर ही त्याची राजधानी असताना, तिथे भगवान शंकराचे मंदिर बनवले होते. त्या मंदिराचे हे भग्न अवशेष आहेत. तत्कालीन कलेचा नमुना म्हणून ते महत्त्वाचे मानले जातात.

## बॅटचा कारखाना

अवंतीपूरच्या पुढे रस्त्यातच विलोच्या झाडांचे जंगल लागते. या लाकडापासून क्रिकेटच्या बॅट्स तयार केल्या जातात. लहान मुलांच्या बॅट्सपासून क्रिकेटीअर्सच्या बॅटपर्यंत— विविध प्रकारच्या बॅट्स तिथे तयार होतात. त्यांची किंमत दहा रुपयांपासून दोनशे रुपयांपर्यंत असते. ड्रायव्हर आणि कंडक्टर यांनाही एकेक बॅट मिळाली. कमिशन रोख रकमेच्या रूपात न देता, वस्तुरूपात मिळत असावे. इथे शेजारीशेजारी तीन-चार कारखाने आहेत, म्हणून आपल्या कारखान्याजवळ टूरिस्ट बस थांबवल्याबद्दल कमिशन देणे तर आवश्यकच असते. कारण एका बसमध्ये वीस ते पंचवीस बॅट्स खपतात.

## अनंतनाग ऊर्फ इस्लामाबाद

अनंतनाग हे जिल्ह्याचे गाव असून तिथे प्राचीन शिवमंदिर आहे. तिथे बस अर्धा तास थांबणार होती. इथले स्थानिक लोक या गावचे नाव अनंतनाग असतानाही मुद्दाम त्याचा उल्लेख इस्लामाबाद असा करतात, याचे मात्र वाईट वाटले. आमची बस गावातून मंदिराकडे गेली, तेव्हा अस्सल काश्मिरी गाव कसे असेल, याची कल्पना आली. गर्दी, गडबड, चौकातील टांगेवाले, बाजारपेठेतील स्थानिक लोक वगैरे सर्व वातावरण वेगळेच होते.

मंदिराच्या परिसरात अनेक स्थळे पाहण्यासारखी आहेत. 'इंद्रनागकुंड' हे स्थळ अहल्या व इंद्र यांच्या पौराणिक कथेशी संबंधित आहे. इंद्राने गौतमाचे रूप घेऊन अहल्येची प्रतारणा केली त्यामुळे संतापून अहल्या व गौतमऋषी यांनी इंद्राला तू सहस्त्रक्षत होशील, असा शाप दिला, ब्रह्मा, विष्णू आणि महेश हेदेखील इंद्राला पूर्ववत करू शकले नाहीत; परंतु इंद्राने या कुंडातील झऱ्यामध्ये उडी मारल्यानंतर मात्र तो बरा झाला, अशी आख्यायिका आहे.

दुसरे स्थळ आहे, अनंतनागकुंड. कश्यपऋषी आणि नाग लोक यांनी जलोद्भव राक्षसाचा नाश करण्यासाठी सरोवराचे पाणी बाहेर सोडले, अशी जी कथा सांगतात, ते पाणी इथून बाहेर पडले, असे मानतात. ब्रह्मा-विष्णू-महेश यांनी कश्यपमुनींना वरदान दिले होते आणि म्हणून हे कार्य त्यांच्या हातून घडू शकले. भगवद्गीतेत 'अनंतनाग'चा संदर्भ आहे. कृष्ण म्हणतो की नागांमध्ये मी अनंतनाग आहे.

त्याशिवाय रघुनाथमंदिर, गंधककुंड, दिगंबर आखाडा, इच्छापूर्ती वैष्णवदेवी मंदिर अशी अनेक मंदिरे या आवारात आहेत. मंदिरपरिसरात दुकाने आणि उपाहारगृहेही आहेत. मंदिराला लागूनच एक गुरुद्वारा आहे.

## मार्तंडमंदिर

अनंतनागपासून तीन कि. मी. अंतरावर मटन नावाच्या गावी मार्तंडमंदिर आहे. पाचव्या शतकात ते राजा रामदित्य याने निर्माण केले आणि आठव्या शतकात ललितादित्य राजाने त्याचा जीर्णोद्धार केला. हे सूर्यमंदिर कलेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. रस्त्यातील ही चार-पाच ठिकाणे दाखवून आमची बस दुपारी पाऊणच्या सुमाराला पहलगामला पोचली.

## पहलगाम

पहलगाम लीदर खोऱ्यात आहे. इथे मोठा घाट किंवा चढ नाही. त्यामुळे आलो त्या वेळी थंडी कमी वाटत होती; पण संध्याकाळी ती चांगलीच वाढली आणि रात्री तर मुसळधार पाऊस पडला. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहिले तर आसमंतातील सर्व पर्वतशिखरे हिमाच्छादित होती.

पहलगाम हे चित्रपटव्यावसायिकांचे आवडते ठिकाण. अनेक चित्रपटांचे शूटिंग इथे झाले आहे. श्रीनगर-पहलगाम रस्ताही मोठा सुरेख आहे. या

गावाकडे पाहिले म्हणजे परदेशातील टुमदार नगरीचा भास होतो. गावाच्या मधून लीदर ऊर्फ लंबोदरी नदीचा खळाळता प्रवाह वाहतो. डोंगराच्या उतरणीवर टुमदार घरे आहेत. निवासासाठी छोट्या बंगल्या, हट्स आणि हॉटेल्स आहेत आणि हे टूरिस्ट सेंटर असले तरी शांत आहे. टूरिस्ट बंगल्यात पन्नास रुपयाच्या आसपास खोली मिळते. डॉरमेटरीची सोयही आहे. एक बेडरूमचे, दोन बेडरूम्सचे आणि तीन बेडरूम्सचे हट्स् आहेत. इथे 'हिल पार्क', 'हिल व्ह्यू', 'माऊंट व्ह्यू', 'पाईन व्ह्यू' अशी दीडशे ते दोनशे रुपये दर असणारी महागडी हॉटेल्स आहेत. गुजराथी पद्धतीचे भोजन देणारे 'पूर्णिमा हॉटेल' जोडप्याकडून एकशे ऐंशी रुपये घेते. आणि त्यात निवासाखेरीज चहा, नाश्ता, जेवण देते. बस थांबताच हॉटेल एजंट्स आपल्याला वेढा घालतात. बसस्टँडच्या भोवतीच छोटा बाजार आहे. तिथल्या एका दुकानाच्या पायरीवर मी छानपैकी बैठक मारली आणि माझा नवरा लॉज शोधायला गेला. पाच-सात मिनिटांच्या अंतरावर लीदर नदीच्या काठीच 'पहलगाम लॉज' नावाच्या लॉजमध्ये आम्हाला अटॅचबाथ खोली मिळाली. मशिदीला लागून एक छोटा रस्ता नदीकडे जात होता. तिथे एका आडव्या इमारतीत खाली दुकाने आणि दुसऱ्या मजल्यावर दहा खोल्या, असे हे लॉज होते. आम्ही मुद्दाम शेवटली निवांत रूम निवडली. ह्यांनी ज्या वेळी मला तिचा रेट सांगितला तेव्हा मी थक्कच झाले. नदीकाठी निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या या रूमचा दर एजंटने पस्तीस रुपये सांगितला होता आणि ऑफसीझन असल्यामुळे शेवटी ती खोली केवळ पंचवीस रुपये भाड्याने दिली होती. डबलबेड, ड्रेसिंग टेबल, गरम पाणी या सर्व सोयी तिथे होत्या. चहा रूमवर मिळत होता आणि तरीही सर्व्हिस चार्ज नव्हता. खिडकीजवळ किंवा बाहेरच्या छोट्या लाकडी बाल्कनीत बसले की, हिमाच्छादित पर्वतशिखरे, लीद्दर नदी, तिच्यावरचा सुरेख लाकडी पूल, नदीपलीकडचा रस्ता दिसत होता. उजवीकडे पाहिले तर गाव आणि बाजाराकडे जाणारा रस्ता पाहायला मिळत होता. गावापासून जवळ आणि तरीही निवांत असे ते लॉज होते. इथे दहा-पंधरा दिवस राहता आले, तर एखादी छानशी कादंबरी लिहिता येईल, असा विचार माझ्या मनात आला.

रूम ताब्यात घेतल्यावर वॉश घेऊन आम्ही पौर्णिमा हॉटेलमध्ये जेवायला गेलो. तिथे दहा रुपयांत उत्तम शाकाहारी भोजन मिळाले. संध्याकाळी तर खिचडी, कढी आणि पापड असे भोजन मिळाले. पौर्णिमामध्ये पाणीपुरी,

भेळपुरी, खमण, श्रीखंड, गुलाबजाम, मसाला चहा वगैरे, मुंबईकरांना आवडतील असे अनेक पदार्थ मिळतात. पुन्हा भावही वाजवी, त्यामुळे हे हॉटेल कायम भरलेले असते.

काश्मीरमध्ये कोणत्याही बाजारात चक्कर टाका. सगळीकडे त्याच वस्तू-वुलन शाली, भरतकामाच्या व सिल्कच्या साड्या, ज्युवेलरी, पेपरमॅचीच्या व लाकडी कोरीव वस्तू वगैरे. पहलगाममध्ये मी एकाही दुकानात डोकावले नाही.

## प्रेक्षणीय स्थळे

पहलगामला उतरताच कुलींनी आणि घोडेवाल्यांनी घेराओ घातला होता. कुलीला देण्याएवढे सामान आमच्याकडे नव्हतेच. घोडेवाले पस्तीस रुपयांत चार-पाच जागा दाखवतात. नाईन होल गोल्फ कोर्स, बॉबी चित्रपटामुळे प्रसिद्धीला आलेले 'बॉबी हाऊस'-विशेषतः- 'हम तुम एक कमरे मे बंद हो ।' ह्या गाण्याचे चित्रीकरण झालेली रूम- थोड्या उंचीवरचे हॉलीडे होमजवळचे शिवमंदिर, गावाच्या टोकाला असलेले गौरीशंकर मंदिर आणि त्याला लागून असलेला गुरुद्वाराही सर्व ठिकाणे पायी हिंडून पाहण्यासारखी आहेत. आम्ही ती त्याच दिवशी संध्याकाळी पाहिली.

पहलगामला अनेक छोटे लाकडी ब्रिज आहेत. नदीशेजारून पायी फिरणाऱ्यांसाठी खास फरशांचा छोटा रस्ता तयार केला आहे. मात्र इथे विक्रेते निवांतपणे फिरू देत नाहीत. गाठोडी खांद्यावर घेतलेले विक्रेते शाली पाहा, कापड पाहा, साड्या पाहा म्हणून पिच्छा पुरवतात. धंदा कमी असल्याने घोडेवालेही मागे लागतात आणि तिसरे संकट असते फोटोग्राफरचे. बहुतेक फोटोग्राफर सरदारजी असतात. मिठ्ठास बोलून ते हनिमूनसाठी आलेल्या जोडप्यांना अक्षरशः लुबाडतात. ही पोझ घ्या, ती घ्या. या नटाबरोबर फोटो काढून देतो-तुम्ही त्या नटीसारख्या दिसाल-वगैरे बोलून गारद करतो. शेवटी काही'शे'बिल आलेले पाहून ते जोडपे रडकुंडीला येते. मग कोणाकडून तरी पैसे उसने घ्यायचे किंवा घरून मागवायचे.

संध्याकाळी लीदर नदीच्या काठाने रमतगमत फिरत असतानाच पाऊस सुरू झाला. मग आम्ही शॉर्टकट घेऊन लॉजच्या दिशेने पळालो. रात्री मला खूपच थंडी भरून आली. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी मी रेस्ट घेतली. माझा नवरा एकटाच नदीपलीकडच्या टेकडीवरच्या शिवमंदिरात चिखलातून घसरत

जाऊन आला. लीदर नदीचे पाणी थंड व चवदार आहे. त्यामुळे इथे भूक चांगली लागत होती. श्रीनगरचे पाणी मात्र पचायला जड आहे.

रात्री नदीच्या प्रवाहाची झुळझुळ ऐकू येत होती. त्या अंगाईगीताच्या सुरावर कधी झोप लागली कळलेच नाही. पहाटे शेजारच्या मशिदीतील नमाजाच्या आवाजाने जाग आली, तेव्हा पाऊस झिमझिमत होता. पहलगामची हिमाच्छादित शिखरे, नदीच्या काठाकाठाने जाणारा रस्ता, हिरवी कुरणे, लीदरचा पांढराशुभ्र खळाळता प्रवाह, नीरव शांतता हे सर्व वातावरण जादूभरे होते.

पहलगामपासून अकरा कि. मी. वर 'अरू' नावाचे निसर्गरम्य ठिकाण आहे, तर तेरा कि. मी. वर 'चंदनवाडी' आहे. अमरनाथला जाणारे लोक तिथे थांबतातच. ही दोन्ही ठिकाणे पाहण्यासाठी घोड्यावरून जाता येते; पण आम्हाला तेवढा वेळ नव्हता. अमरनाथच्या यात्रेच्या मार्गावरील हे पहिले गाव, म्हणून तर त्याचे नाव 'पहलगाम'. इथून तीन दिवस घोड्यावरून प्रवास केल्यावर अमरनाथला पोचतात. सोनमर्गहून अमरनाथ जवळ आहे; पण यात्रेकरू सामान्यतः पहलगाम-चंदनवाडी या रस्त्याने जातात.

दुसऱ्या दिवशी आम्ही परतीच्या बसची चौकशी केली, पण टूरिस्ट मंडळींनी आल्या आल्याच हुशारीने रिझर्वेशन केल्याने जागा नव्हती. शेवटी दुपारी चारच्या बसमध्ये ड्रायव्हरच्या केबिनमध्ये आम्ही कशीबशी जागा मिळवली आणि श्रीनगरला परत आलो.

## टूर क्रमांक ७– गुलमर्ग

गुलमर्ग ही आमची सातवी आणि शेवटची साईटसीइंग टूर होती, पण तिच्यातच नेमक्या अनेक अडचणी आल्या. जातानाच बसला निघायला उशीर झाला. कलकत्याकडची एक मोठी बंगाली फॅमिली आमच्या बसमध्ये होती. त्यांपैकी एक वयोवृद्ध जोडपे नेमके आमच्या जागांवर जाऊन बसले. त्यांच्याबरोबर लहान मुले होती. काश्मीरमध्ये तीन वर्षापेक्षा मोठ्या मुलाचे तिकीट काढावेच लागते. या मुलांची तिकिटे काढली नव्हती, म्हणून ड्रायव्हर-कंडक्टर एकीकडे आणि ही फॅमिली दुसरीकडे, असे भांडण सुरू झाले. ते लवकर संपेच ना. शेवटी माझा नवराच मध्ये पडला. कंट्रोलरला घेऊन आला आणि शेवटी दोन मुलांपैकी एका मुलाचे तिकीट काढण्यात आले. आणि आमची गाडी एकदाची गुलमर्गकडे निघाली.

गुलमर्ग म्हणजे फुलांचे कुरण– Meadow of flowers. जहांगीर बादशहाने एकदा इथे फुलांचे एकवीस प्रकार गोळा केले होते. गुलमर्ग, श्रीनगरपासून पन्नास कि.मी.वर असून, त्याची उंची २६६० मीटर आहे. विविधरंगी फुले आणि फर व पाईनचे जंगल हे इथले वैशिष्ट्य आहे. बर्फ पडल्यावर स्कीईंगला योग्य असे अनेक उतार इथे तयार होतात आणि हिवाळी खेळांच्या स्पर्धा इथे होतात. जगातील सर्वांत उंच गोल्फकोर्स इथे आहे. हे अठरा होल्सचे गोल्फ मैदान जागतिक खेळाडूंचे आवडते आहे. नंगा पर्वतचे विहंगम दृश्य इथून दिसते. आम्ही गुलमर्गला एखादा दिवस राहायचे असे ठरवून, आधी प्रत्येकी सव्वीस रु.चे एकेरी तिकीट काढले होते; पण श्रीनगरमधील थंडी आणि पावसाळी हवामान लक्षात घेऊन आम्ही त्याचे रूपांतर, दुहेरी तिकिटात करून घेतले आणि आमचा निर्णय योग्यच ठरला. कारण गुलमर्गला पोचल्यापासून ते सोडेपर्यंत पावसाची संततधार चालू होती.

गुलमर्ग हे काश्मीरमधले सर्वांत सुंदर ठिकाण, पण ते सर्वांत महागडेही आहे. 'न्यूडोज हॉटेल' मध्ये अडीचशे रु., 'गुलमर्गइन' मध्ये साडेतीनशे रु. रूमचे रेटस् आहेत. टू बेड रूम्सचा हट त्यातल्या त्यात कमी रेटने म्हणजे दीडशे रुपयांत मिळतो. पण हटमध्ये थंडीचा खूप त्रास होतो. चांगल्या हॉटेलमध्ये चहाचा कप चार-पाच रुपये, थाळी पंधरा-वीस रु. असे रेट्स असतात. शिवाय सर्व्हिसचार्ज वेगळा. लॉजिंगबोर्डिंगसाठी जोडप्याला कमीत कमी तीनशे-साडे तीनशे रु. रोज खर्च येतोच. बर्फातून घसरण्यासाठी स्लेटरला वीस-पंचवीस रु. द्यावे लागतात. घोड्यावरून खिलनमर्गला चक्कर मारायची, तर प्रत्येक घोड्याचा दर तीस-पस्तीस रु. असतो. त्यामुळे गुलमर्गला एक दिवस राहायचे तर पाच-सहाशे रु. खर्च गृहित धरावा लागतो. (हे रेट्स ८७ मधले आहेत.)

## खिलनमर्गकडे घोडदौड

आम्ही साध्या हॉटेलमध्ये दोन आमलेट्स मागवली आणि ब्रेड-बटरबरोबर खाल्ली-वर गरमागरम पुलाव खाल्ला. रूमच्या मध्यावर असलेल्या फायरप्लेसवर शेकून घेतले आणि घोड्यांवर बसून खिलनमर्गच्या दिशेने निघालो. माझ्या नवऱ्याचा घोडा तकलादू दिसत होता. त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला. टाररोड असल्याने मी झाशीच्या राणीच्या तोऱ्यात घोड्यावर स्वार झाले होते खरी, पण घोडे बर्फातून जाऊ लागताच माझे शौर्य पळाले आणि मी

घोडेवाल्याला 'पक्का धर' असे सांगू लागले. खाली टंगमर्गच्या दुकानातून आम्ही दोघांनीही ओव्हरकोट, टोपी, बूटमोजे वगैरे भाड्याने घेतलेलेच होते. तरीही सतत पडणाऱ्या पावसामुळे सलवार भिजून पायांना घट्ट चिकटली होती. चेहऱ्यावरून पाणी ओघळत होते. थंडीने हुडहुडी भरली होती, तरीही आम्ही हौसेने चार कि.मी. वर असलेले खिलनमर्ग सर करायला निघालो होतो.

बर्फातला रस्ता, खाचखळगे, तोंडावर बसणारे पावसाचे सपकारे, घोड्यावरून जाताना आलेले टेन्शन यामुळे मी घाबरले होते. अशा वेळी, भोवतालच्या वातावरणाचा परिणाम म्हणून असेल कदाचित, पण माझा नवरा चित्रपटातील हीरोप्रमाणे घोडेवाल्याला म्हणाला, 'मैं सम्हलके आऊंगा । तुम मेरी चिंता मत करो । मगर मेमसाहबको सम्हालो । देखो मेमसाब हमारी जान है !' खरे म्हणजे असे काहीतरी वेड्यासारखे बोलण्याचा माझ्या नवऱ्याचा स्वभावही नव्हता आणि वयही नव्हते. या वाक्यातील अतिशयोक्ती, नाटकीपणा या सर्वांची कल्पना असूनही, त्या क्षणाला माझ्या डोळ्यांत टचकन पाणी उभे राहिले. वाटले, 'पंचवीस वर्षांपूर्वी वडील माणसांचा विरोध पत्करून आपण या माणसाशी लग्न केले ते योग्यच केले.' पंचवीस वर्षांच्या संसारातील कष्ट, दुःखे, थोडीफार कटुता सारे काही विरघळून गेले. सहजीवनाचे सार्थक झाल्याचा आनंद देणारा तो क्षण हृदयपटलावर कोरला गेला— 'एक क्षण जगण्याचा, बाकी सारे विसरण्याचे' असा अनुभव आला— शेवटी ती घोडदौड संपवून आम्ही टाररोडवर परत आलो. ढगातून संचार केल्याचा आनंद मिळाला होता. बर्फातील खेळ खेळावेत असे मात्र वाटेना. एक म्हणजे पाऊस कोसळत होता आणि दुसरे म्हणजे ती हौस सोनमर्गलाच पुरेपूर भागवून घेतली होती. ६९ मध्ये आम्ही ज्या वेळी गुलमर्गला आलो होतो त्या वेळी बस पायथ्याशी असलेल्या टंगमर्गपर्यंतच येत असे आणि पुढची छोटी टेकडी चार-पाच कि.मी. अंतर घोड्यावरच जावे लागत असे. आता बस गुलमर्गपर्यंत जाते. घोड्यांचे ट्रेकही कायम ठेवले आहेत.

गेल्या वेळी आम्ही हिवाळ्यात आलो होतो. त्यामुळे सारे गुलमर्ग बर्फाच्छादित होते. तिथली हिरवी कुरणे, फुलझाडे, गोल्फकोर्स, मंदिरे काहीच पाहता आले नव्हते. बर्फातले खेळ मात्र भरपूर खेळलो होतो. या वेळी खऱ्या अर्थाने 'गुलमर्गदर्शन' घडले.

मुळामध्ये या गावाचे नाव 'गौरीमार्ग' असे होते. गौरीवरून म्हणजे

पार्वतीवरून ते ठेवले होते. युसफ शहा याने १६ व्या शतकात ते बदलून गुलमर्ग केले. गुलमर्ग म्हणजे पुष्पवाटिका. खरोखरच इथे रंगीबेरंगी फुले भरपूर आहेत. विविधरंगी फुले आणि हिरवीगार कुरणे पाहताना आपली स्थिती 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे ।' अशी होते. पाऊस नसता, तर गुलमर्गच्या सृष्टिसौंदर्याचा आनंद अधिक मोकळेपणाने लुटता आला असता, पण हिमालयात पावसाचा काहीच नेम नसतो. अंगावरचे कपडे अंगावरच कोरडे झाले होते. परत येताना टंगमर्गला कोट-बूट-मोजे वगैरे भाड्याने घेतलेल्या गोष्टी परत केल्या. ओले कपडे अंगावर सुकल्यामुळे रात्री ताप येईल असे वाटत होते, पण सुदैवाने तसे काही झाले नाही. रात्री श्रीनगरला परत आल्यानंतर आम्ही सामानसुमानाची आवराआवर केली. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला लॉज सोडून हाऊसबोटीवर राहायला जायचे होते. 'कॅथे'चे मॅनेजर चक्रवर्ती यांच्याशी आम्ही गप्पागोष्टी केल्या. हॉटेलचा मालक वेगळाच होता आणि तो शेजारच्या बंगल्यात राहत होता. काश्मीरबाहेरच्या माणसाला तिथे जमीन खरेदी करता येत नाही, असा तिथला नियम आहे.

## हाऊसबोटीतील निवास

१० मे ला सकाळीच आम्ही लॉज खाली करून, रिक्षाने न्यू पार्क हॉटेलकडे निघालो. त्याच्यासमोर दललेकमध्ये असलेल्या 'रुक्साना' हाऊसबोटीवर आम्हाला जायचे होते.

हाऊसबोटीवर पोचताच बशीरने आमचे अगत्याने स्वागत केले. आम्हाला ब्रेड-आमलेटचा नाश्ता व चहा दिला आणि हळूच सांगितले की, "आम्ही नाश्ता, दोन चहा, डिनर देतो आणि त्याचे दीडशे रुपये घेतो." सकाळचे जेवण तुम्हाला घ्यायचे असेल, तर तुम्हाला २१० रुपये द्यावे लागतील. आम्ही ज्या वेळी हाऊसबोट ठरवली त्या वेळी दीडशे रुपयांत सर्व द्यायचे असे ठरले होते आणि आता हा असा बदल होत होता, पण छोट्या गोष्टीसाठी झगडा करून मूड घालवण्याची आम्हाला मुळीच इच्छा नव्हती. साठ रुपये देऊन इथे जेवण्यापेक्षा बाहेर भटकायला जाणारच, तर बाहेरच जेवलेले चांगले, असा विचार आम्ही केला. रात्री आम्हाला नॉनव्हेज जेवण हवे आहे, याची मात्र त्याला कल्पना दिली.

दललेकच्या काठावरून शिकाऱ्यात बसून हाऊस बोटीवर जावे लागते. अक्रमग्रूपचा शिकारेवाला आम्हाला पैसे न घेता 'रुक्साना'वर सोडत असे. नंतर

त्याला त्याचे पैसे हाऊसबोटवाल्याकडून मिळत असत. हाऊसबोटींच्या तीन-चार पायऱ्या पाण्यात होत्या. त्या चढून गेले की छोटासा व्हरांडा, मध्ये दार, दाराच्या दोन्ही बाजूंना बसण्यासाठी बाक, तिथे बसले की दललेक, समोरची शंकराचार्य टेकडी, टी.व्ही. टॉवर, रस्ता वगैरे दृश्य दिसत असे. सरकते दार उघडून आत गेले की सीटिंगरूम. त्यात उत्तम अक्रोडाच्या लाकडाचे फर्निचर. शोकेसमध्ये कटग्लासची कटलरी, सोफा, रेडिओ वगैरे. मग डायनिंग हॉल, गोल टेबलाभोवती उंच पाठीच्या चार खुर्च्या. प्रत्येक खोलीत दोन्ही बाजूंना खिडक्या, नंतर दोन बेडरूम्स! आम्ही डायनिंग हॉललगतची बेडरूम पसंत केली होती. दुसरी रिकामीच होती. बेडरूममध्ये डबलबेड, ड्रेसिंग टेबल, टीपॉय, अॅटॅचबाथ, गरम पाण्याची सोय होती. खिडक्यांना काचांच्या झडपा होत्या. शिवाय जाळ्या होत्या. थंडी वाढली तर हीटिंगची सोय होती. हे सगळे पाहून आम्ही खूष झालो. पाऊस कोसळत होता. आम्ही व्हरांड्यातील बाकावर बसून निवांतपणे तो न्याहाळत होतो.

आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण इतके गढलेले असतो की, छोट्या छोट्या गोष्टीतला आनंद विसरून गेलेले असतो. निसर्गाच्या सहवासात आपण किती काळ राहतो ? माझ्या मनात विचार आला, कितीतरी दिवसांत कोसळणारा असा पाऊस आपण निवांतपणे पाहिलाच नव्हता. दुपारी साडेबाराच्या सुमाराला पाऊस थोडा कमी झाला, तेव्हा आम्ही शिकाऱ्यातून लेक क्रॉस केले आणि लाल चौकात जाऊन जेवलो. दुपारी एक वाजता 'रीगल' टॉकीजमध्ये 'एक चद्दर मैलीसी' हा हेमामालिनी व ऋषीकपूर यांचा चित्रपट पाहिला. रविवारी सर्व बाजारपेठा बंद असतात त्यामुळे पाऊस असूनही चित्रपटाला गर्दी होती. श्रीनगरमध्ये चित्रपटांचे खूप वेड आहे.

लेडिजसाठी तिथे वेगळी लाईन होती. काश्मीरला स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूपच आदराचा आहे. त्यांची छेडछाड वगैरे कोणी करत नाही. थिएटरमध्ये लेडिजना सर्वांत आधी आत सोडतात. पडद्याचे प्रमाणही कमी झाले आहे. मात्र इथे 'सहशिक्षण' फारसे नाही. मुलींसाठी स्वतंत्र महाविद्यालये आहेत. सर्व शिक्षणसंस्था सरकारी आहेत. येथील स्त्रिया निसर्गतःच सुंदर असल्याने त्यांना मेकअपची गरज नाही. सलवार, कमीज, ओढणी आणि स्वेटर हा त्यांचा कॉमन ड्रेस. थंडीमुळे पायांत बूट-मोजे असतातच. मोठ्या वयाच्या स्त्रिया थंडीचा बंदोबस्त करण्यासाठी पंजाबी ड्रेसच्या वरून एखादा गडद रंगाचा लांब

कोट घालतात. पुरुषांचा पोषाखही शर्ट-पटवर काश्मिरी टोपी, असा सुटसुटीत असतो. थंडीत ते ओव्हरकोट घालतात. बसच्या ड्रायव्हर-कंडक्टरना इथे युनिफॉर्म नाही. त्यामुळे त्यांना ओळखणे अवघडच असते. मॅनेजर आणि कंडक्टर सारखेच दिसतात. थंडीमुळे वुलनचे कपडेच वापरतात. मोलकरीणसुद्धा गोरीगुलाबी आणि देखणी दिसते. गोरा रंग, धारदार नाक आणि उंच बांधा, हे इथल्या लोकांचे वैशिष्ट्य आहे. सामान्य काश्मिरी माणूस कष्टाळू, सरळ आणि आतिथ्यशील आहे.

चित्रपट सुटल्यानंतर आम्ही सरळ हाऊसबोटीवरच गेलो. पाऊस कोसळत असल्यामुळे मग संध्याकाळी पुन्हा बाहेर पडलो नाही. शंकराचार्य टेकडी, टी. व्ही. टॉवर, रस्ता हे सगळे काही धुक्याच्या पडद्याआड लपले होते. व्हरांड्यात बसल्या बसल्या दललेकमधला व्यापार बघता येत होता. व्यापारी आपल्या बोटी हाऊसबोटजवळ आणून 'शाली पाहता का ? दागिने पाहता का ? केशर घ्यायचे का ? लाकडी वस्तू दाखवू का ?' असे विचारत होते. आम्ही नकार देत होतो.

मध्येच एक भाजीवाला आपली नाव घेऊन आला. मग हाऊसबोटच्या मागे छोट्या बोटीत राहणारी आमची बुटकी मालकीण कांगडी (शेगडी) पोटाशी धरूनच बाहेर आली. भाजीवाल्याशी हुज्जत घालून तिने बटाटे, वाटाणे, टोमॅटो वगैरे खरेदी केली. रात्रीच्या भोजनात आम्हाला जे मटण खाऊ घातले, त्यात मोठमोठ्या बटाट्याचेच तुकडे जास्त होते. त्याशिवाय वाटाणा उसळ, चपात्या, भात, डाळ वगैरे पदार्थही होते. बशीर किंवा त्याचा भाऊ टेबलजवळ उभे राहून जातीने लक्ष ठेवत होते. रूमसर्व्हिसही उपलब्ध होती. दललेकचे पाणी थोडे वाढल्याने थंडीही वाढली. रात्री हिटर सुरू करून दुलया ओढून आम्ही मस्त ताणून दिली.

## शिकाऱ्यातून सहल

११ मे हा आमचा श्रीनगरमधला शेवटचा दिवस. आज मात्र सूर्यदेवांनी कृपा केली होती. छान कोवळे ऊन पडले होते. नाश्ता करून आम्ही नऊ वाजताच बाहेर पडलो. बशीरभाईने आम्हाला पस्तीस रुपयांत 'चार चिनार'साठी शिकारा ठरवून दिला आणि आम्ही जलविहाराला निघालो.

नेहरू पार्क, बाजार, लोटस गार्डन, तरती शेती वगैरे ओलांडत आम्ही

स्वीमिंग क्लबजवळ पोचलो. तिथे मोटरबोट चालवायला देतात. एकजण आपल्याबरोबर येतो आणि सूचना देतो, पण व्हील आपल्या हातात असते. खूप वेगात जायला मजा येते. एका माणसाला एका मिनिटाला दोन रुपये असा दर आहे. आम्ही १० मिनिटे बोट चालवून दूरवर चक्कर मारून आलो.

लेकमध्ये फिरत असताना छोटी छोटी स्थानिक मुले छोट्या होड्यांतून सामोरी येत होती आणि हातातील कमलपुष्पे घेण्याचा आग्रह करत होती. आम्ही पहिल्या एक-दोघांकडून फुले घेतली, तेव्हा शिकारेवाला म्हणाला, "साहेब, इथे शिकारेवाल्यांपेक्षा फुलवाल्या पोरांची संख्या जास्त आहे. तुम्ही एका फुलाला चार आणे देत आहात. दहा पैसे द्यायचे ठरवलेत, तरी दोन-तीनशे रुपये खिशात ठेवावे लागतील." तेव्हा मात्र आम्ही पोरांना नकार देऊ लागलो. वेगवेगळे विक्रेतेही त्रस्त करतच होते.

## चार चिनार

शेवटी आम्ही 'चार चिनार'ला गेलो. 'चार चिनार' हे दललेकमध्ये असलेले एक छोटे बेट आहे. या बेटावर चिनाराचे मोठे व जुने चार वृक्ष आहेत, म्हणून त्याला 'चार चिनार' म्हणतात. त्यांच्यापैकी एक चिनार बिचारा सुकू लागला आहे. बेट खूपच छोटे असल्याने त्या चिमुकल्या बागेखेरीज लाकडी फळ्यांनी बेटाची लांबीरुंदी थोडी वाढवली आहे आणि एका बाजूला टॉयलेट, तर दुसऱ्या बाजूला एक रेस्टॉरंट तयार केले आहे. तिथे आम्ही चहापान केले. जवळजवळ तीन तास लेकमधून जलविहाराचा आनंद लुटल्यानंतर आम्ही हाऊसबोटवर परत आलो. संध्याकाळी गावातून आणि सेंट्रल मार्केटमधून चक्कर मारली. रात्री चांदण्यात डेकवर गप्पागोष्टी केल्या. हाऊसबोटीवरचे शेवटचे जेवण म्हणून बशीरभाईने खास काश्मिरी चिकन केले होते. त्याचा मनसोक्त आस्वाद घेऊन, बशीरभाई व त्याचे वडील यांच्याशी थोड्या गप्पागोष्टी केल्या. 'पुन्हा काश्मीरला येऊ तेव्हा तुमच्या हाऊसबोटीवरच राहू.' असे मनापासून सांगितले. त्यांना पहाटे साडेपाचला उठवण्याची सूचना दिली.

पहाटे नेमके लाईट गेलेले होते. बशीरने त्यांच्या घरातला मोठा काचेचा दिवा आम्हाला आणून दिला. त्या प्रकाशात आम्ही झटपट आवराआवर केली. तेवढ्या सकाळी त्यांनी आम्हाला चहाही पाजला. स्नानाला गरम पाणी दिले. एवढ्या पहाटे शिकारेवाले कुठून असणार? तेव्हा स्वतःच्या वापरासाठी

त्यांच्याकडे जी बोट असते तिच्यातून लेक क्रॉस करून दिले. रस्त्यावरून जाणारी रिक्षा थांबवली. स्वतः बशीर आम्हाला स्टँडवर सोडायला आला आणि पहाटे साडेसहा वाजता आम्ही श्रीनगरचा निरोप घेतला.

## पर्यटक हा काश्मीरचा कणा

पर्यटक हा काश्मीरचा कणा आहे. आज तिथे प्रवासी जाणे बंद झाले असल्याने, मोठ्या प्रमाणावर बेकारी निर्माण झाली आहे. घोडेवाले, टॅक्सीवाले, शिकारेवाले, हॉटेल व्यावसायिक आणि व्यापारी सर्वजण प्रवाशांवर अवलंबून आहेत. तिथले ड्रायव्हर अत्यंत कुशल असून, गाडी सावधगिरीने चालवतात. 'धिज इज नॉट ए रेस नॉर ए रॅली, ड्राइव्ह स्लोली' असे बोर्ड घाटात आहेत. लडाखचा रस्ता तर खूपच अवघड आहे, पण १० टक्के प्रवासीदेखील लडाखला जात नाहीत.

काश्मीरमध्ये येणारे प्रवासी जास्तीत जास्त पाच-सात दिवस राहतात. आम्ही पंधरा दिवस काश्मीरमध्ये आहोत असे सांगितले, तर लोकांचा विश्वास बसायचा नाही. त्याचप्रमाणे सामान्यतः माणूस आयुष्यात एकदाच काश्मीरला जातो. आम्ही दुसऱ्यांदा आलो आहोत, याचेही लोकांना आश्चर्य वाटायचे. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित झाली तर आम्ही पुन्हाही तिथे जाऊ. दाचीगामचे अभयारण्य, अहरबलचा धबधबा, वेरीनाग, जम्मू ते श्रीनगर अशा काही गोष्टी अपुऱ्या राहिल्या आहेत, त्यांची पूर्ती करता येईल.

माणसाने आयुष्यात एकदातरी काश्मीरला जायलाच हवे.

## परतीचा प्रदीर्घ प्रवास-अनपेक्षित अडचणी

परतीच्या प्रवासात आमची स्थिती 'घी देखा लेकीन बडगा नहीं देखा ।' अशा प्रकारची झाली. काश्मीरमध्ये जो आनंद लुटला होता, मौजमजा केली होती, त्याचे उट्टे निघाले.

श्रीनगर ते जम्मू रस्त्यावर आम्ही 'जवाहर टनेल' चटकन ओलांडू शकलो; परंतु नंतर बनिहालच्या पुढे घाटात दरड कोसळल्यामुळे गाड्या अडकून पडल्या. आधी वाटले होते की तासभर लागेल, पण परिस्थिती गंभीर दिसत होती. जवळच्या वस्तीत एक हॉटेल होते तिथे आम्ही चहा घेतला. बरोबर ब्रेड व उकडलेली अंडी होती. त्यावर भरपेट नाश्ताही उरकला, तरी गाड्या उभ्याच.

बाहेर पाऊस कोसळत होता. दुपारी बारा वाजता आमची बस घाटात थांबली होती, ती संध्याकाळ झाली तरी तिथेच. दूरवर घाटाची जेवढी वळणे दिसत होती, त्याच्याही पलीकडेपर्यंत बसेस, ट्रक्स यांची रांग लागलेली होती. ड्रायव्हरने सांगितले की मुख्य रस्ता तुटल्याने बायपास रोडने जावे लागणार आहे आणि तो रस्ता कच्चा असल्याने एका वेळी एकच वाहन जाऊ शकते. समोरून येणाऱ्या सर्व गाड्या जेव्हा संपतील, तेव्हा आपल्या गाड्या सोडतील. जम्मुतावी मिळण्याची आशा तर आम्ही कधीच सोडून दिली होती. मी माझ्या नवऱ्याला दहा वेळा सांगत होते की, एक दिवस आधी निघून जम्मूत थांबू या. लांबचा प्रवास आहे. पण त्याला एक दिवस श्रीनगरमध्ये जास्त राहण्याचा मोह झाला. त्याचा हा परिणाम होता. संध्याकाळी सात वाजता, आमच्या बाजूची वाहतूक सुरू झाली. तोपर्यंत त्या वस्तीतील हॉटेलमधील जेवण, चहा केव्हाच संपला होता. छोटी छोटी मुले घेऊन प्रवास करणाऱ्यांचे हाल पाहवत नव्हते. आमच्या बसमधल्या फॉरिनर बायकांना तर पहिले तास-दोन तास गाडी का थांबली आहे, हेच माहीत नव्हते. त्या शांत चित्ताने पुस्तके वाचत होत्या. गाडी पाच, सहा तास तरी हलणार नाही, हे समजल्यावर त्या खाली उतरल्या. तोपर्यंत हॉटेलमधले चहापाणी संपून गेले होते. थंडीमध्ये सात तास गाडी घाटात थांबली होती. स्त्रियांना बाथरूमला जायलाही कुठे आडोसा नव्हता. घाटातला दोन्ही बाजूंनी बांधलेला रस्ता. कुठेही खाली वा वर जायची सोय नाही आणि पुढेमागे मैलभर गाड्यांची रांग लागलेली– अशी सगळी फजिती होती.

संध्याकाळी सात वाजता आमच्या गाड्यांचा ताफा त्या अरुंद, कच्च्या, अंधाऱ्या रस्त्याने निघाला. पाऊस कोसळतच होता. वाटेत एकीकडे चहासाठी पाच मिनिटे स्टॉप घेतला तेवढाच.

### जम्मूत मुक्काम

जम्मू जवळ आले तेव्हा मात्र पाऊस ओसरून, झकास चांदणे पडले होते. संध्याकाळी चार-साडेचार ऐवजी रात्री दोन वाजता आम्ही जम्मूत पोहोचलो होतो. आमची ट्रेन तर संध्याकाळीच निघून गेली होती, पण आता रात्री दोन वाजता जायचे कुठे, हा खरा प्रश्न होता. त्यामुळे गावात न उतरता आम्ही रेल्वेस्टेशनवर उतरायचा निर्णय घेतला. तीन, चार कोचमधील उतारू एकदम स्टेशनवर पोहोचले. माझ्या नवऱ्याने आधी रिटायरिंग रूमकडे धाव घेतली.

फक्त दोन रूम्स शिल्लक होत्या. रेग्युलर रेटपेक्षा दहा रु. जास्त दिल्यामुळे त्यातली एक आम्हाला मिळाली. त्यामुळे वीस तासांच्या प्रवासानंतर तरी शांत विश्रांती मिळू शकली. आमचे बिचारे इतर सहप्रवासी कोणी प्लॅटफॉर्मवर, तर कोणी फुटपाथवर पथारी पसरत होते. त्यांपैकी काहीजण काश्मीरला रोज २०० रुपयांच्या रूममध्ये राहत होते. त्या फॉरिनर स्त्रियांकडे तर हजारो रुपये होते. खिशात पैसे आहेत पण जागा मिळत नाही, अशी स्थिती होती. मुलाबाळांचे तर फारच हाल होते. टूरिझमची एखादी डॉरमेटरी स्टेशनजवळ हवी म्हणजे काही कारणाने रात्री-अपरात्री प्रवासी आले, तर त्यांना निवारा मिळू शकेल. स्टेशन माणसांनी गच्च भरलेले होते. बायकापोरे सतरंजीवर आडवी तरी झाली होती. बिचारे पुरुष मात्र डोळे ताठ ठेवून सामान राखत बसले होते.

जम्मुतावीचे आमचे तिकीट दुसऱ्या दिवशीही चालले असते, प्रश्न होता तो बर्थचा. जम्मुतावी ते चाळीसगाव दोन रात्रींचा प्रवास आहे. बर्थ किंवा रिझर्व्हड् सीट नसताना तो करणे अशक्य कोटीतले होते. सुट्यांमध्ये व लग्नसराईत डब्यांमध्ये इतकी गर्दी असते की, जागा रिझर्व्ह असतानाही संडासापर्यंत जाता येत नाही, स्टेशनवर खाली उतरून पाणी भरता येत नाही. मग अनरिझर्व्हड् डब्यात काय स्थिती असेल? या कल्पनेनेच अंगावर काटा उभा राहत होता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या, बर्थस् मिळवण्यासाठी काय करता येईल ही चिंता सुरू झाली. कोणीतरी टॅक्सीयुनियनच्या लीडरला भेटण्याचा सल्ला दिला. तो दोन बर्थस्साठी चारशे रु. मागू लागला. ज्याने आम्हाला रिटायरिंग रूम दिली होती त्यानेच धावपळ व खटपट करून शंभर रुपयांत दोन बर्थस् मिळवून दिले. त्याने हे काम केल्याबद्दल आम्ही त्याला पंचवीस रु. भेट म्हणून दिले. प्रवासात नियमावर बोट ठेवून चालत नाही.

जम्मू ते दिल्ली प्रवास चांगला झाला. दिल्लीनंतर मात्र डब्यातली गर्दी वाढतच गेली. इटारसीला समजले की, खांडव्याजवळ एका नदीवरचा पूल नादुरुस्त आहे, तेव्हा गाडी नागपूरला नेण्यात येईल. तिथून बडनेरा अकोलामार्गे भुसावळला जाईल आणि तिथून पुण्याला. त्यामुळे परतीच्या प्रवासातली पहिली दुपार आग्र्याचा प्रखर उन्हाळा आणि दुसरी दुपार खास नागपूर-अकोल्याचे ऊन खात घालवावी लागली. १५ मे ला सकाळी सहाऐवजी संध्याकाळी सहा वाजता, आम्ही चाळीसगावला पोहोचलो. तिथून एस.टी.ने धुळ्यात आलो.

काश्मीरची थंडी आणि नंतर दोन दिवस दिल्ली व नागपूरचा कडक

उन्हाळा, या विषम हवामानामुळे आल्यानंतर दोन दिवस आजारी पडलो. नंतर हळूहळू प्रवासातले हाल विसरले गेले आणि काश्मीरच्या वास्तव्यातील सुखद क्षणांच्या आठवणी काढण्यात मन रमून गेले.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ७५२
२६९८६

## विभाग ३

# बंगाल आणि सिक्कीम

# कलकत्ता

१९८६ च्या 'मे' महिन्यात आम्ही सिक्कीमला जायचे ठरवले. दहा-बारा वर्षांपूर्वी नेपाळला जाताना कलकत्ता-दार्जिलिंग हा भाग पाहून झाला होता; पण वेळेअभावी कॉलीपाँग आणि गंगटोकला जाता आले नव्हते. दार्जिलिंगजवळचे 'मिरीक' हिलस्टेशनही पाहायचे होते, तेव्हा ज्या दिवसापासून कॉलेजला सुट्टी लागणार त्या दिवशीची २० एप्रिलची गीतांजलीची तिकिटे आम्ही काढली आणि भुसावळहून दुपारी दीड वाजता आमचा कलकत्त्याचा प्रवास सुरू झाला.

कलकत्त्यात आम्ही दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता पोहोचलो. आमच्या मूळ प्लॅनप्रमाणे आम्ही त्याच दिवशी संध्याकाळी पुढची ट्रेन पकडून जलपैगुरीला जाणार होतो. धुळ्याच्या स्टेशनमास्तरांनी तीन आठवडे अगोदर तशी तार पाठवल्याने आम्ही निश्चिंत होतो; पण दोन तास खटपट करूनही बर्थ तर सोडाच पण सीट्सचे रिझर्वेशनही मिळू शकले नाही, तेव्हा आम्ही हावरा स्टेशनबाहेर पडलो आणि रिक्षाने भवानीपूर एरियात हाजरा रोडवर असलेल्या 'महाराष्ट्र निवास'मध्ये गेलो.

कलकत्त्याचा 'महाराष्ट्र निवास' हावडा स्टेशनपासून दूर असला, तरी सुरक्षित आहे. पुन्हा तिथे महाराष्ट्रीयन माणसाला अग्रक्रम दिला जातो. प्रत्येकी पन्नास रुपयांत चहा, दोन वेळचे जेवण व निवासव्यवस्था होते आणि खोल्या स्वच्छ व हवेशीर आहेत. आम्हाला छान रस्त्याच्या बाजूची, बाल्कनी असलेली तीन नंबरची रूम मिळाली तोपर्यंत अंधार पडू लागला होता, तेव्हा जवळपास पायी एक चक्कर मारून जेवणखाण आटोपून आम्ही रात्री नऊ वाजताच झोपून टाकले.

### मेट्रो ट्रेन आणि ट्राम वे

२२ तारखेला 'महाराष्ट्र निवास'मध्ये येणारा रेल्वे एजंट ब्रिजनंदन मंडन

याच्यावर जलपैगुरीच्या आणि परतीच्या रिझर्वेशनची जबाबदारी सोपवली आणि भवानीपूर स्टेशनवर जाऊन, भारतातील पहिल्या भुयारी रेल्वेने-- मेट्रो ट्रेनने प्रवास करण्याचा अनुभव घेतला. भवानी ते एक्स्प्लेनड रिटर्न तिकीट त्या वेळी प्रत्येकी दोन रुपये होते. एक्स्प्लनेड स्टेशनपासून कलकत्त्याचा गजबजलेला चौरंगी भाग अगदी जवळ आहे. ही ट्रेन रवींद्रसदन, मैदान, पार्कस्ट्रीट व एक्स्प्लनेड अशी स्टेशन्स घेते. आता कालीघाट हे नवे स्टेशन सुरू झाले आहे. ही ट्रेन इतकी पॉश होती की, आपण भारतात आहोत हे पटतच नव्हते. ॲटोमॅटिक उघडणारे व बंद होणारे दरवाजे, भरपूर फॅन्स, प्रत्येक स्टेशन येण्यापूर्वी स्पीकरमधून होणारी अनाऊन्समेंट आणि गाडीचे कोरे करकरीत, आकर्षक झगमगीत रूप— लहान मुलाच्या उत्साहाने आम्ही दोन वेळा मेट्रो ट्रेनने प्रवास केला. त्याच दिवशी हाजरा रोडवरील दुकाने पालथी घालून कलकत्ता साड्यांची खरेदीही आटोपली.

कलकत्त्यात मॉडर्न मेट्रो ट्रेन जशी आहे तशीच पारंपरिक ट्राम वेही आहे. आमच्या लहानपणी मुंबईत ट्रॅम होती, पण आता ती फक्त कलकत्त्यातच राहिली आहे. त्यामुळे निवांतपणे तासभर ट्रामवेमध्ये बसून आम्ही 'कालीघाट' भागात गेलो. आणि रसगुल्ले आणि कलकत्तेकरांचे आवडते कोल्ड्रिंक आइस्क्रीमसोडा घेतले.

रिझर्वेशन न मिळाल्यामुळे रात्रीच्या ट्रेनचा व बर्थचा मोह सोडून देऊन आम्ही २४ तारखेला सकाळच्या कांचनगंगा एक्स्प्रेसने जायचे, असे ठरवले.

## कलकत्ता साईटसीइंग टूर

सकाळी साडेआठ वाजता साईटसीइंग बसने आम्हाला पिकअप केले. दुपारी हावरा ब्रिजवर खूपच गर्दी असते, म्हणून आधी तो क्रॉस करून पलीकडची ठिकाणे दाखवणार होते. **हावरा ब्रिज** हा कलकत्त्याचा लँडमार्क आहे. २८५ फूट उंच असलेला हुगळी नदीवरील हा पूल १९४१ मध्ये बांधला. रोज निदान एक लाख लोक त्याच्यावरून ये-जा करतात. कलकत्ता हे भारतातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. १९११ पर्यंत ती ब्रिटिशांची राजधानी होती. पश्चिम बंगालची ही राजधानी राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. या शहरात अनेक सुंदर चर्चेस, मंदिरे व सांस्कृतिक केंद्रे आहेत. साहित्य, कला, संगीत आणि तत्त्वज्ञान या चारी क्षेत्रांत

बंगाल आघाडीवर आहे. स्वामी रामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद हे तत्त्वज्ञ इथलेच. या शहरात गांधीजी, नेहरूजी, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र यांचे; तसेच रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चटर्जी आणि अरविंदबाबू घोष या साहित्यिकांचे सुंदर पुतळे आहेत. 'वेलस्ली हाऊस', 'सेक्रेटरीएट', 'रायटरस् बिल्डिंग' अशा प्राचीन इमारती शहराच्या सौंदर्यात भर घालतात.

### बोटॅनिकल गार्डन

येथील बोटॅनिकल गार्डन ३२५ वर्षांचे जुने आहे. तिथे अनेक दुर्मिळ वनस्पती आहेत. शिवाचे झाड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका पवित्र झाडाची मुळे प्रिझर्व्ह केली आहेत. त्यामुळे सव्वादोनशे वर्षांपूर्वीच्या एका झाडाच्या जागी आता अठराशे झाडांचा समूह तयार झाला आहे. इथे काही दुर्मिळ पामवृक्षही आहेत. 'पगला पेड' किंवा Mad tree या झाडाचे प्रत्येक पान वेगळ्या प्रकारचे असते. या औषधी झाडाला फळे-फुले मात्र येत नाहीत. शेजारूनच नदी वाहत असल्याने पिकनिक स्पॉट म्हणून लोक या गार्डनला हौसेने भेट देतात.

### बेलूर मठ

हुगळी नदीच्या पूर्वेला असलेल्या बेलूर मठाचे वास्तुशिल्प उल्लेखनीय आहे. त्याच्याकडे वेगवेगळ्या कोनांतून पाहिले असता, कधी चर्च, कधी मशीद तर कधी मंदिराचा भास होतो. श्री रामकृष्ण परमहंस यांच्या तत्त्वज्ञानाचे ते प्रतीक आहे. १८९९ मध्ये बांधलेल्या या मठाच्या उभारणीत परमहंसांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांचा मुख्य सहभाग होता. त्या काळात त्याला नऊ लाख खर्च आला. हिंदूंचे प्रतीक असलेला ॐ, मुस्लिमांचा चांदतारा आणि ख्रिश्चनांचा क्रूस ही सर्व चिन्हे तेथे कोरलेली आहेत. स्वामी रामकृष्ण सर्वधर्मसमभाव मानणारे होते. याच मठाच्या परिसरात मेडिटेशन करत असताना १९०२ मध्ये स्वामी विवेकानंदांचे निधन झाले. पलीकडच्या एका दुमजली इमारतीत त्यांची खोली व वस्तू पाहता येतात. या परिसरात माणसाचा फोटो काढायला परवानगी नाही. वॉचमन तुमच्यावर नजर ठेवूनच असतो.

### दक्षिणेश्वर टेंपल

१९३० साली हुगळी नदीवर बॅली ब्रीज किंवा विवेकानंद सेतू बांधला

गेला. तो ओलांडून पलीकडे गेले की, बेलूर मठाच्या समोरच्याच बाजूला दक्षिणेश्वर मंदिर आहे. हा एकूण तेरा मंदिरांचा समूह आहे. मुख्य व मोठे मंदिर आहे कालीमातेचे आणि दोन्ही बाजूंना सहा-सहा अशा दोन ग्रूपची सरळ रेषेतील बारा मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिरात शिवाची पिंडी वेगळ्या पद्धतीची आहे. कालीमातेची मूर्तीही उग्र आहे. रामकृष्ण स्वामींना या परिसरातच साक्षात्कार झाला होता. सुमारे २५ एकर जागेत पसरलेली ही मंदिरे, राणी रासमणी हिने १८४७ ते ५५ या काळात बांधली.

## जैन मंदिरे

कलकत्त्यातील सराफ रायबहादूर बद्रिनाथ यांनी सुमारे १२५ वर्षांपूर्वी बांधलेले हे मंदिर आहे. त्यावरील काचकाम व मीनाकाम, छतावरील झुंबरे, रंगसंगती यामुळे ते 'ज्युवेलरी बॉक्स' म्हणून ओळखले जाते. १८६७ मध्ये हे श्वेतांबर संप्रदायाचे मंदिर जेव्हा बांधले, तेव्हा आरसे व काचसामान बेल्जियमहून आणवले होते. मंदिराच्या स्थापनेपासून तेथे अखंड ज्योत तेवते आहे.

## व्हिक्टोरिया मेमोरियल

जेवणानंतर आम्ही हे मेमोरियल पाहिले. या दुमजली संगमरवरी स्मारकाचे बांधकाम लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत सुरू झाले आणि १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स याच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन केले. हे पांढरेशुभ्र संगमरवरी स्वप्न, हा सुंदर राजमहाल निर्माण करण्यासाठी सतरा वर्षे लागली आणि दहा लाख रुपये खर्च आला. असे म्हणतात की, ताजमहालच्या तोडीस तोड म्हणून हे स्मारक निर्माण करण्यात आले. लोक त्याला 'ताज ऑफ ब्रिटिश राज' असे म्हणत असत. सभागृहात प्रवेश करण्यापूर्वी बाहेरच्या बाजूला व्हिक्टोरिया राणीचा आसनस्थ 'वनपीस स्टॅच्यु' आहे. स्मारक आकर्षक व कलात्मक आहे. दोन मजली इमारतीच्या मध्यभागी मोठा घुमट आहे, तर चारी कोपऱ्यांना छोटे पण उंच घुमट आहेत. प्रवेशद्वाराची कमानही आकर्षक आहे. हॉलमध्ये सर रेनॉल्ड आणि रुबेन यांची अमूल्य ओरिजनल पेंटिंग्ज लॉर्ड क्लाईव्हपासून अनेकांचे पुतळे व बस्ट पाहायला मिळतात.

स्मारकाच्या मागील बाजूला सुरेख हिरवळ, दोन छोटी तळी आणि पाचव्या किंग जॉर्जचा पुतळा आहे. स्मारकाच्या दुसऱ्या मजल्यावर अतुल घोष यांनी

काढलेली महात्मा गांधी, सुभाषचंद्र, राजेंद्रप्रसाद, टिळक, राजाराममोहनरॉय, विवेकानंद वगैरेंची सुंदर चित्रे आहेत. भारतातील आकाराने सर्वांत मोठे पेंटिंग येथे पाहायला मिळाले. रस्त्यावरून जाणाऱ्या एका मिरवणुकीचे हे चित्र जयपूरच्या महाराजांनी ब्रिटिशांना प्रेझेंट दिले होते.

**कलकत्त्यातील इतर प्रेक्षणीय स्थळे**

त्यानंतर आम्ही 'झू' ला भेट दिली. ज्यात दहा हजार लोक एका वेळी प्रार्थना करू शकतील, अशी नाखोडा मशीद पाहिली. जपानी बुद्धमंदिर व स्टेडियम असलेली आणि निसर्गरम्य असे रवींद्रसरोवर पाहिले. दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते व पेंटिंग्ज यासाठी प्रसिद्ध असलेली एशियाटिक सोसायटी पाहिली. आज जिथे फूटबॉल व क्रिकेटचे आंतरराष्ट्रीय सामने होतात, असे ईडन गार्डनमधील स्टेडियम पाहिले. कलकत्त्यात प्रेक्षणीय स्थळे खूप आहेत आणि तिथे सतत सांस्कृतिक कार्यक्रमही चालू असतात. टूरिझम डिपार्टमेंटने आम्हाला त्या पंधरा दिवसांचे एक छापील वेळापत्रकच दिले होते. त्यात रवींद्र सदन, ॲकॅडमी ऑफ फाईन आर्ट, शिशिरमंच, कलामंदिर या ठिकाणी होणाऱ्या संगीत-नृत्य व नाट्य यांची माहिती दिली होती. नेहरू रोडवरच्या ओबेरॉय हॉटेलमध्ये रोज होणाऱ्या 'भारतीय नृत्ये' कार्यक्रमाची माहिती होती. वेळेअभावी आम्ही तो पाहिला नाही.

# मिरीक

'मिरीक' हे पश्चिम बंगाल सरकारने नव्याने डेव्हलप केलेले छोटे हिलस्टेशन आहे. तिथे सुमारे दीड किलोमीटर पसरलेले एक सुंदर नैसर्गिक तळे आहे. तळ्याकाठी उत्तुंग हिमालयीन वृक्ष आहेत. त्यामुळे तेथील सौंदर्य अवर्णनीय आहे. Myric is a Lyric किंवा असे म्हणता येईल की, Myric is a

miracle. लोक ठरलेल्या जागी गर्दी करतात; पण ज्यांना शांत, निवांत अशा निसर्गाच्या सान्निध्यात राहायचे असेल, त्यांनी आवर्जून मिरीकला जायलाच हवे, इतके त्याचे सृष्टिसौंदर्य अवर्णनीय आहे. कांचनगंगा एक्स्प्रेसने आम्ही कलकत्त्याहून जलपैगुरीला गेलो. सिलीगुडीच्या रेल्वेस्टेशनचे नाव जलपैगुरी. सिलीगुडीहून बसने आम्ही 'मिरीक' ला गेलो.

## निवासव्यवस्था

मिरीकला सर्वांत उत्तम निवासव्यवस्था आहे. टुरिस्ट होस्टेलमध्ये त्याचे बुकिंग कलकत्त्याहून होते. उंच निसर्गरम्य जागी असलेल्या या होस्टेलमधून सर्व मिरीकचे दर्शन घडते. तिथे डॉरमेटरीत फक्त दहा रुपयांत राहता येते. अधिक चैनीत राहायचे असेल, तर पन्नास रुपये देऊन दोन रूम्सचे झकास, सुसज्ज कॉटेज मिळते. मात्र या होस्टेलला फार गर्दी असते. आम्ही गेलो तेव्हा तर तिथे एक सेमिनार चालू असल्याने कुठेही जागा शिल्लक नव्हती. होस्टेलच्या भल्या मोठ्या डायनिंग हॉलमध्ये कपभर चहा घेण्यावर आणि बाल्कनीतून सृष्टिसौंदर्य न्याहाळण्यावरच आम्हाला समाधान मानावे लागले. मॅनेजरांनी कृपावंत होऊन एका हॉटेलबॉयला लगेज घेऊन आमच्याबरोबर येण्यासाठी परवानगी मात्र दिली. मग होस्टेलच्या मागच्या बाजूने, छोट्या छोट्या पायऱ्यांचा रस्ता उतरून आम्ही मेनरोडवर पोचलो. कृष्णनगर भागातील दोन-तीन लॉजेसमध्ये आम्ही चौकशी केली. 'चंद्रमा' हॉटेल चांगले होते, पण तिथे अटॅचबाथ रूम उपलब्ध नव्हती. 'पारिजात' हॉटेलची रूम मागच्या बाजूला व अंधारी होती आणि तरीही भाडे मात्र पासष्ट रुपये होते.

आमची ही शोधाशोध चालू असतानाच आम्हाला सिलीगुडी ते मिरीक या प्रवासात भेटलेले रंगूनवाला कुटुंब रस्त्यात भेटले. त्यांच्या मालकीचे 'मंजुषा हॉटेल' मिरीकमध्ये आहे. ते आग्रहाने आम्हाला तिथे घेऊन गेले. पन्नास रुपये भाड्यात त्यांनी आम्हाला एक खोली दिली. खोली लहान पण हवेशीर होती. तिच्या मोठ्या काचांच्या खिडक्यांमधून तळ्याची एक बाजू दिसत होती. डायनिंग हॉल खालच्या मजल्यावर होता, पण आम्ही भोजन तिथे घेत नव्हतो.

दोनच बिल्डिंग पलीकडे असलेले 'जगजित हॉटेल' खाण्यापिण्याच्या दृष्टीने उत्तम होते. या हॉटेलमध्ये बार असून, पंजाबी डिशेस चांगल्या मिळतात. मिरीकच्या आसपास चहाचे मळे असल्यामुळे, आम्हाला इथे सुगंधी व ताज्या पत्तीचा चहा प्यायला मिळत होता. इतका सुरेख स्वाद असलेला चहा, आम्हाला

दार्जिलिंगमध्येदेखील मिळाला नाही.

## मिरीक तळे

रूम ताब्यात घेऊन पुन्हा बाहेर पडलो, तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते. तेव्हा जवळच्या रस्त्याने फक्त तळ्यापर्यंत चक्कर मारली. या तळ्यामध्ये सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच बोटिंगची सोय उपलब्ध आहे. बोटक्लबजवळ Day Centre ची आकर्षक दुमजली इमारत आहे. तिथे टॉयलेट, कॅन्टीन वगैरे सोयी उपलब्ध आहेत. दहा रुपयांत अर्धा तास बोटिंग करता येते. बोटमन हवा असेल तर दोन रुपये जास्त द्यावे लागतात. या इमारतीत एका मोठ्या शोकेसमध्ये 'जलपरी' नावाची बोट ठेवलेली आहे. ५ मे १९७२ रोजी या तळ्यात ही पहिली बोट सोडली होती. ती स्मारक म्हणून जपून ठेवली आहे. तळ्यावर एक भक्कम सुरेख ब्रिज आहे. तो ओलांडून पलीकडे गेले की दाट झाडी सुरू होते. आम्ही बोटक्लबजवळ निवांत गप्पागोष्टी करत बसलो असतानाच, त्या बाजूने कोल्हेकुईचा आवाज आला. पौर्णिमेची रात्र होती खरी, पण आसमंतात कोणीच नव्हते, तेव्हा आम्ही नाइलाजाने तिथून उठलो आणि चांदण्यातून रमतगमत लॉजवर परतलो.

दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजताच जाग आली आणि चटकन तयार होऊन आम्ही दोघे फिरायला बाहेर पडलो, त्या वेळचे दृश्य आठवले की, अजूनही अंगावर रोमांच उभे राहतात. मोठ्या आकाराची चंदेरी प्लेट पायाजवळ असावी, तसे उंचावरून दिसणारे तळे, तेही आखीवरेखीव नव्हे, तर नैसर्गिकरीत्या काहीसे अस्ताव्यस्त पसरलेले. पर्वताच्या उतारांवर फुलांचे गालिचे पसरलेले. वरच्या निळ्याशार आभाळाचा तुकडा पाण्यामध्ये प्रतिबिंबित झालेला. तळ्याच्या पश्चिमेकडे गगनचुंबी वृक्षांचे जंगल, जंगल आणि तळे यांच्यामधून जाणारी वळणावळणांची पाऊलवाट. हे जंगल Criptomaria Japanica या वृक्षाचे आहे. मी असे वृक्ष आधी कधी पाहिले नव्हते. या वृक्षाचे प्रतिबिंब पाण्यात पडले होते. Day Centre ची दुमजली इमारत व तळे यामध्ये केलेले सुरेख गार्डन. मग पूल ओलांडून पलीकडे जंगलाच्या बाजूला जायचे आणि Zig Zag Foot Walk करत रमतगमत तळ्याला तीन-साडेतीन मैलांची चक्कर मारायची. सूर्याचा ऊनसावलीचा खेळ चालू होता. मध्येच धुक्याचे लोट या सर्व निसर्गावर आक्रमण करून, सारे काही धूसर बनवीत होते. हे सारे सौंदर्य शब्दातीत होते. 'सेवी तोच

चवी जाणे' अशा प्रकारचे. Myric ची जाहिरात The nest in the hills अशी करतात, ती सार्थच वाटली. आम्ही दोन दिवसच तिथे होतो, पण झपाटल्यासारखे पुन्हापुन्हा तळ्याच्या दिशेने जात होतो. कारण तळे आमच्या लॉजपासून १० मिनिटांच्याच रस्त्यावर होते. तीन-साडेतीन मैलांची चक्कर मारून आम्ही गावात उंच टेकडीवर असलेल्या बसस्टॅन्डवर गेलो. जाताना तळ्याच्या काठाकाठाने पाऊलवाटेने गेलो, तर येताना टाररोडने थोडे लांबून परत आलो. वातावरण ढगाळ असल्याने इतके चालूनही थकवा अजिबात जाणवला नाही. मिरीक म्हणजे कलाकाराला पडलेल्या सुंदर स्वप्नासारखे वाटले. वेलचीच्या झाडांमुळे त्याला सुगंधही होता. येताना जगजित हॉटेलमध्ये ब्रेड-आमलेटचा नाश्ता केला. लॉजवर गरम गरम पाण्याने स्नान केले. दुपारी पुन्हा तळ्यावर आणि टूरिस्ट होस्टेलवर चक्कर मारली. मिरीक हे दार्जिलिंगपासून ४९ कि.मी., तर सिलीगुडीपासून ५२ कि.मी. वर आहे. या दोन्ही ठिकाणाहून शनिवारी व रविवारी एक दिवसाची साईटसीईंग टूर अरेंज केली जाते. त्यासाठी पस्तीस ते चाळीस रुपये घेतात. घाटातील रस्ता असल्यामुळे येण्याजाण्यातच चार तास जातात. म्हणजे मिरीकमध्ये मिळणार फक़्त चार तास. त्यात पुन्हा जेवणाखाण्याचा वेळ जाणार. यात काही मजा नाही. तिथल्या सृष्टिसौंदर्याचा खरा रसास्वाद घ्यायचा, तर तिथे मुक्कामच करायला हवा. बरे, तिथे उत्तम निवास-भोजनव्यवस्था उपलब्ध आहे. आम्ही तर एक दिवस मुक्काम वाढवला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा तळ्याकाठी भटकंतीचा मनसोक्त अनुभव घेतला.

२६ मे ला दुपारी चार वाजता, मिरीकमध्ये मुसळधार पाऊस सुरू झाला, तेव्हा आम्ही गरमागरम सुगंधी चहाचे घोट घेत लॉजवर बसलो होतो. संध्याकाळी साडेसहा-सातच्या सुमाराला जोरदार वादळ सुरू झाले. लाईट्स तर कधीच गेले होते. काहीतरी गरमागरम खाद्यपदार्थ आणावे, म्हणून माझा नवरा 'जगजित हॉटेल'मध्ये गेला होता आणि अशा वेळी धुवाधार पाऊस पडू लागला. आकाशात ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, रस्त्यावर गुडुप अंधार— वाऱ्याचा जोर तर इतका होता की, दारेखिडक्या हादरत होत्या. वाऱ्यामुळे मेणबत्ती सारखी विझत होती. मध्येच जोरदार वाऱ्यामुळे खिडकी जोरात आवाज करून उघडली. अंधारात धावत जाऊन, जोर लावून ती लावेपर्यंत, खिडकीजवळच्या पलंगावरचा बिछाना ओलसर झाला होता. माझ्याही चेहऱ्यावर पाण्याचे सपकारे उडाले होते. हिमालयातल्या वादळाचा तो पहिलाच अनुभव.

अर्धा तास मी जीव मुठीत धरून खोलीत एकटी बसले होते. इकडे हे 'जगजित हॉटेल' मध्ये अडकले होते. वादळाचा जोर लक्षात घेऊन, हॉटेलचा मालक असलेला सरदारजी त्यांना सोडत नव्हता. शेवटी 'बायको एकटी आहे', असे सांगून ते पावसात व अंधारातच बाहेर पडले. जिन्याखाली अंधारात झोपलेल्या कुत्र्यावरच पाय पडणार होता. कुत्रे केकाटत बाहेर पडले आणि चष्मा सावरत, हे कसाबसा जिना चढून धापा टाकत रूमवर पोचले. ह्या अनुभवाने दार्जिलिंगला पहिली ख़रेदी केली ती टॉर्चची. आम्ही त्या रात्री 'मंजुषा' तच जेवलो. हॉटेल मालकाने रात्री साडेदहाला उठवून आम्हाला डाळ-भात आणि अंडाकरी असे जेवण दिले आणि दणदणीत बिलही लावले. हेच जेवण आम्ही 'जगजित' मध्ये घेतले असते, तर अधिक चविष्ट आणि अल्प खर्चात मिळाले असते, पण वादळामुळे इलाज नव्हता.

२७ मे ला आम्ही नऊ वाजता बोटक्लबवर पोचलो. अर्धा तास छान बोटिंग केले. अकरानंतर टूर्स तिथे पोचतात आणि मग बोटिंगला गर्दी होते. स्नान वगैरे उरकून 'जगजित' मध्ये उत्तम भोजन घेतले. एजंटमार्फत दार्जिलिंग बसचे रिझर्वेशन केलेलेच होते. अडीच वाजता आम्ही बसमध्ये बसलो. ३० सीट्सची गाडी होती, पण त्याशिवाय तितकेच लोक उभे होते. गाडीच्या टपावरही लोक बसलेले होते. हे दृश्य बंगालमध्ये सगळीकडेच दिसते. त्या गर्दीतून वळणावळणाच्या घाटाच्या रस्ताने, चहाचे मळे ओलांडत आम्ही दार्जिलिंगच्या दिशेने निघालो. आम्ही चार-साडेचार वाजता दार्जिलिंगला पोचलो.

# दार्जिलिंग

सिलीगुडीहून दार्जिलिंगला जाण्यासाठी लक्झरी बसेस उपलब्ध आहेत किंवा जलपैगुरी स्टेशनवरून टॉयट्रेनने दार्जिलिंगला जाता येते. ही ट्रेन १८८८ पासून चालू आहे. बसचा रस्ता व रेल्वेमार्ग शेजारून जातात. कधी परस्परांवर

आक्रमणही करतात. रस्त्यात छोटीछोटी गावे व बाजार असल्याने हा प्रवास मजेत होतो. दार्जिलिंगला जाण्यात सर्वात चांगला मार्ग म्हणजे कलकत्त्याहून विमानाने बागडोगरा इथे जायचे. कारण कलकत्ता ते दार्जिलिंग अंतर ६६३ कि.मी. म्हणजे बरेच आहे. हा रस्ताही मोठा सुरेख आहे. हिरवीगार कुरणे आणि चहाचे मळे यातून वळणे घेत घेत हा प्रवास होतो.

दार्जिलिंगमध्ये विविध प्रकारचे लोक राहतात. पूर्व नेपाळमधून आलेले गुरखा लोक इथे मोठ्या प्रमाणावर स्थायिक झाले आहेत. अंगभर पिवळे कपडे वापरणारे तिबेटी पुरुष आणि अलंकारांनी नटलेल्या त्यांच्या स्त्रिया आहेत. मेंढपाळ आहेत. सिक्कीममधून आलेले भूतिया आणि लेपचा जमातीचे लोक आहेत. काही भूतानी आहेत आणि व्यापारानिमित्त स्थिरावलेले बंगाली बाबूही आहेत. त्यामुळे दार्जिलिंगमध्ये सिक्कीम, भूतान आणि तिबेट येथील कलात्मकता पाहायला मिळते. गालिचे, अलंकार, लाकडावरील कोरीव काम, हातमागाचा कपडा, ब्लँकेट्स व वुलन कपडे, भरतकाम केलेली फोल्डिंग पार्टिशन्स, वॉल हँगिंग्ज, भूतान पेंटिंग्ज, जॅकेट्स अशा कितीतरी वस्तू इथे मिळतात. बाजारात तिबेटी विक्रेते बरेच आहेत.

दार्जिलिंग हे Dorje Ling चे अपभ्रष्ट रूप आहे. दोर्जेलिंग म्हणजे दोर्जे यांची जागा, लामांचा प्रदेश. पूर्वी येथील ऑबझरव्हेटरी हिलच्यावर एक बौद्ध मॉनेस्ट्री होती. तिच्याभोवती हे शहर वसले गेले, म्हणून हे दार्जिलिंग. हे शहर समुद्रसपाटीपासून सुमारे सात हजार फूट उंचीवर आहे. हिमालयाचे कांचनगंगा शिखर येथून जवळ आहे. हिमाच्छादित डोंगरांचे फार सुंदर दृश्य येथून दिसते. इथे फर आणि पाईन वृक्षांची घनदाट जंगले आहेत. अनेक दुर्मिळ वनस्पती व फुलझाडे आहेत. जलपैगुरीजवळ असलेल्या अभयारण्यात वाघ, कोल्हे, अस्वले, चितळ, हरिणे, ससे वगैरे प्राणी आहेत. इथे सहाशेच्यावर पक्ष्यांच्या जाती आहेत, असे म्हणतात. तिस्ता आणि रणजित या इथल्या मुख्य नद्या आहेत. या अप्रतिम सृष्टिसौंदर्यामुळे हिमालयातील अनेक हिलस्टेशन्सना भेटी दिलेले रसिक प्रवासी दार्जिलिंगला Queen of Hill Stations म्हणतात.

पंजाबमधील गडबड-गोंधळ टाळण्याच्या हेतूने आम्ही काश्मीर सोडून दार्जिलिंगला गेलो होतो, पण तिथेदेखील सभा, मोर्चे, बंद यांचा पाठपुरावा चालूच होता. परत येताना आम्ही सिलीगुडीला पोचलो आणि चारच दिवसांनी चक्क ७२ तास 'दार्जिलिंग बंद' पाळण्यात आला. गुरखा लिबरेशन फ्रंटने बंदचे

आवाहन केले होते. तेथे स्वतंत्र गुरखा लॅन्डची मागणी आहे आणि फ्रंटचा अध्यक्ष सुभाष किशिंग हा स्वतंत्र गुरखा लॅन्डच्या कल्पनेचा प्रवक्ता व लोकप्रिय नेता आहे. त्याच्या सभांना प्रचंड गर्दी होते आणि जिथे तो जाऊ शकत नाही, तिथे लोक त्याच्या भाषणाच्या कॅसेट्स् ऐकतात. सिलिगुडी, दार्जिलिंग आणि कॉलीपाँग येथे स्वतंत्र गुरखा राज्याची मागणी करणाऱ्या घोषणा घराघरांवर लिहिलेल्या आहेत. या घोषणेची अक्षरेसुद्धा नेपाळी लोक वापरतात, त्या 'कुकरी' शस्त्राच्या आकाराची आहेत. पश्चिम बंगाल सरकार आणि मुख्यमंत्री ज्योती बसू यांच्याविरुद्ध या घोषणा आहेत.

'बंगाल इज नॉट अवर मास्टर, वुई आर नॉट स्लेव्हज', 'डाऊन विथ ज्योती बसू' अशा त्या घोषणा आहोत. बंगाल सरकारने कलकत्ता, हुगळी यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करून, पर्यटकांचे केंद्र असलेल्या दार्जिलिंगच्या डोंगराळ भागाकडे दुर्लक्ष केले आहे, अशी या गुरखा लोकांची भावना आहे. आमचा पश्चिम बंगालशी कसलाही भावनिक संबंध नाही, तेव्हा आम्हाला स्वतंत्र राज्य द्या. बंगाली भाषेच्या सक्तीमुळे गुरखा तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. आम्हाला पाणी, वीज, रस्ते या शहरी सोयी नाहीत. बंगाली लोक आमचे शोषण करीत आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. दार्जिलिंग, कॉलीपाँग हा भाग पूर्वी सिक्कीम राज्यात होता. हा इतिहास आहे. वास्तविक पाहता गुरखा जमात ही कष्टाळू व शांत म्हणून प्रसिद्ध आहे. आसाम व मेघालय येथील आंदोलनापासून त्यांना प्रेरणा मिळाली असावी. या आंदोलनाचे प्रतिसाद दार्जिलिंग, कॉलीपाँग भागात उमटले आहेत.

आम्ही संध्याकाळी साडेचारच्या सुमाराला दार्जिलिंगला पोहोचलो. हिलस्टेशनला लोक सकाळी लॉज खाली करतात व रात्री घाटातला प्रवास टाळतात. त्यामुळे आम्हाला लॉज मिळायला थोडा त्रासच झाला. शेवटी स्टॅन्डपासून दहा मिनिटांच्या रस्त्यावर असलेल्या 'नीलकमल' लॉजमध्ये अटॅचबाथ, पण एकच मोठा बेड असलेली छोटी रूम मिळाली. रात्रीचाच प्रश्न होता म्हणून आम्ही ती स्वीकारली. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला डबलबेडची, रस्त्याच्या बाजूची मोठी खोली मिळाली. दार्जिलिंगमध्ये चायनीज डिशेस् मिळणारी हॉटेल्स बरीच आहेत, पण आम्हाला ते पदार्थ फारसे आवडले नाहीत. त्या रात्री आम्ही ब्रेड-आम्लेटवरच काम भागवले. दार्जिलिंगमध्ये जवळजवळ रोज संध्याकाळी लाईट्स जातात. त्यामुळे साडेसात-आठ वाजताच

दुकाने बंद होतात. काही ठिकाणी जनरेटर असल्यामुळे गुडूप अंधार मात्र होत नाही. त्या दिवशीही लाईट गेलेलेच होते. त्यामुळे आम्ही आठ वाजताच लॉजवर परतलो आणि झक्कपैकी ताणून दिली.

२८ तारखेला लवकर जाग आली. स्नान आटोपून, नाश्ता करून आम्ही बाहेर पडलो आणि रमतगमत मालरोडवरच्या टूरिस्ट ब्यूरोमध्ये गेलो. तो साडेनऊ वाजता उघडतो. दार्जिलिंगला सकाळी साडेनऊ वाजता व दुपारी दीड वाजता अशा दोन साईटसीईंग टूर्स आहेत. सकाळची बस फुल होती, पण दुपारी दीडच्या बसचे रिझर्वेशन आम्हाला मिळाले. बस म्हटले ते सवयीने. तिथे जीप्स व लॅन्डओव्हर्स गाड्यांमधून स्थलदर्शन घडवतात. या ब्यूरोमधूनच आम्ही दहा रुपये ट्रंककॉलचा चार्ज देऊन कॉलीपाँगच्या 'मुणाल' लॉजचे रिझर्वेशनही करून टाकले. नंतर गावातील बौद्ध मॉनेस्ट्रीशेजारी असलेले उत्तम पंजाबी डिशेस् मिळणारे 'सिमला हॉटेल' आम्ही शोधून काढले. तिथे उत्तम जेवण माफक दरात मिळाले. बारा वाजता तिथे घंटा वाजू लागल्या. भिक्षू प्रार्थनेला जाऊ लागले. प्रार्थनेचे धीरगंभीर सूरदेखील ऐकू येत होते. वातावरण तर सुरेखच होते. क्षणात ऊन, क्षणात धुके, क्वचित पावसाची रिमझिम-- आम्ही साडेबारा वाजता लॉजवर पोचलो.

## साईटसीइंग टूर

दीड वाजता मालरोडवरून साईटसीइंग टूर निघणार होती. त्यासाठी आम्ही एक वाजता, तीन जिने उतरून लॉजच्या तळमजल्यावर आलो आणि नेमका धुवाधार पाऊस कोसळू लागला. एवढ्या पावसात चढउताराचा एक कि.मी. रस्ता तर सोडाच, पण दहा-पंधरा पावलेही चालणे अशक्य होते. आमच्याकडे छत्र्याही नव्हत्या. प्रत्येकी वीस रुपये देऊन बुकिंग केलेले पैसेही गेले आणि साईटसीईंगही गेले, म्हणून हळहळ वाटत होती; पण तरीही पाऊस थांबेल व अजून जाता येईल, या आशेने वाट पाहत होतो. शेवटी वरुणराजांना आमची करुणा आली. पंधरा-वीस मिनिटांत पाऊस बराच कमी झाला. मग हातातील शालीचा रेनकोटसारखा उपयोग करून सरळ चालायला सुरुवात केली. शॉर्टकट घेऊन एक चढ चढलो आणि कसेबसे चौकात पोचलो, तेव्हा बरोब्बर दीड वाजला होता. कोवळे ऊन पडले होते आणि आमची जीप आमची वाटच पाहत होती. ड्रायव्हरशेजारी दोन सीट्स व मागे सहा सीट्स अशी

बैठकव्यवस्था होती. आम्ही घाईगडबडीने पुढच्या सीट्स पकडल्या. आश्चर्य म्हणजे आमची टूर पूर्ण होईपर्यंत पुन्हा कुठेही पाऊस आला नाही.

## हिमालयन माऊंटनेरिंग इन्स्टिट्यूट

हा आमच्या टूरचा पहिला स्टॉप होता. चौरस्त्यापासून सुमारे दोन कि.मी. अंतरावर असलेल्या जवाहर पर्वतावर ही संस्था आहे. पर्वतारोहण करणाऱ्यांना इथे प्रशिक्षण देतात. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याचा संग्रह असलेले एक सुंदर म्युझियम इथे आहे. एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणारे तेनसिंग नोर्के दार्जिलिंगचे निवासी. त्यांचे फोटो, विविध मोहिमांमध्ये त्यांनी वापरलेले साहित्य, ध्वज, त्यांना सन्मानपूर्वक मिळालेली पारितोषिके इथे ठेवलेली आहेत. हिमालयात मिळणारे प्राणी व पक्षी इथे पेंढा भरून ठेवलेले आहेत. हे म्युझियम नऊ ते पाच उघडे असते. त्याला पन्नास पैसे प्रवेश फी असते. एरवी ते मंगळवारी बंद असते, पण सीझनमध्ये रोज चालू असते. आम्ही दार्जिलिंगहून परत आल्यानंतर सात-आठ दिवसांनी तेनसिंगचे निधन झाले.

इन्स्टिट्यूटला लागूनच झूलॉजिकल पार्क आहे. इंदिरा गांधींच्या हस्ते तो पद्मजा नायडूंच्या स्मृतीला अर्पण करण्यात आला होता. इथे प्राण्यांना नैसर्गिक वातावरणात ठेवले आहे. गंमत म्हणजे रस्त्याच्या दुतर्फा उंच जाळी असल्याने, एका अर्थाने आपण पिंजऱ्यात असतो आणि प्राणी मात्र मुक्त असतात. प्राण्यांना ऊन-पावसापासून संरक्षण मिळावे, म्हणून मध्येमध्ये त्यांच्यासाठी लाकडी घरे बांधली आहेत. अस्वल, याक, सॅबेरियन टायगर, हरिणे आणि काही पक्षी तिथे पाहायला मिळतात. तिथे जाण्यासाठी एक रुपया प्रवेश फी आहे. इन्स्टिट्यूट आणि हा पार्क पाहायला एखादा तास सहज लागतो.

## हॅपी व्हॅली टी इस्टेट

दार्जिलिंग म्हटल्यावर प्रथम आठवण येते ती चहाचीच. या भागात दहा-पंधरा तरी मोठमोठ्या टी इस्टेट्स आहेत. त्यांपैकी ही एक. ती शहरापासून फक्त तीन कि.मी. अंतरावर आहे, म्हणून तिचा समावेश स्थलदर्शनामध्ये केला असावा. चहाच्या मळ्यातून जाणारा रस्ता मात्र कच्चा आहे. जीपच जाऊ शकेल असा— त्यात पाऊस पडल्याने तो आणखी खराब झालेला. एका वेळी एकच वाहन जाऊ शकते. दुतर्फा पसरलेल्या टेकाडांवरील चहाच्या मळ्यामधून

जाताना मन कसे प्रसन्न होते. वातावरणात चहाचा अनोखा सुगंध भरलेला असतो. दार्जिलिंगला मैलोगणती चहाचे मळे पसरलेले आहेत. टी इस्टेटीच्या दुमजली लांबलचक इमारतीत दार्जिलिंग चहाचे प्रोसेसिंग पाहायला मिळते. तोडलेली पाने सुकवतात कशी, चाळणीतून चाळतात कशी इथपासून ते पॅकिंगपर्यंत सर्व प्रक्रिया दाखवली जाते. आठ ते बारा आणि दुपारी एक ते साडेचार ही इस्टेट पाहता येते. सोमवारी ती बंद असते. त्या दिवशी नेमका सोमवार असल्याने सर्व प्रोसेसिंग काही पाहता आले नाही. अर्थात पूर्वी दार्जिलिंगला व सिलोनला आम्ही ते पाहिलेलेच होते. आम्हाला माहिती देणारा गाईड नेपाळी वाटत होता, पण त्याला हिंदी व इंग्रजी या दोन्ही भाषा येत होत्या.

## रणजित व्हॅली रोप वे

दार्जिलिंगच्या उत्तरेकडे तीन कि.मी. वर भारतातील ही पहिली रोप वे आहे. मुळात ती आठ कि.मी. लांब असून सिमला बझार येथे जाते. तिथे फिशिंग स्पॉट आहे. हे आठ मैल आपण हवेत तरंगत असतो. एका वेळी फक्त सहा माणसे जाऊ शकतात. बंद काचेच्या त्या खोलीत समोरासमोर दोन बाक असून प्रत्येक बाजूला तीन माणसे बसू शकतात. दिवसभरात फक्त तेरा ट्रिप्स होतात. लाईटच्या शॉर्टेजमुळे आता ही रोप वे आठ मैल न जाता फक्त तीन कि.मी. वरील एका टी इस्टेटपर्यंत जाते. आपल्याला तिथे पंधरा-वीस मिनिटं थांबता येते आणि दुसरी ट्रीप आल्यावर त्यातून परत येता येते. सकाळी अ.ठ वाजता रोप वेचे ॲडव्हान्स बुकिंग सुरू होते आणि दुसऱ्या दिवशीचे बुकिंग आदल्या दिवशीच संपून जाते. पंधरा रुपये तिकीट असले, तरीही लोक हा नवा अनुभव घ्यायला उत्सुक असतात. त्यामुळे गेल्यागेल्या बुकिंग केले तरच रोपवेचा प्रवास करणे शक्य होते. लॉजवर एजंट्स येतात आणि रिझर्वेशनबद्दल विचारतात आणि त्यांचे कमिशन दिले तर बुकिंग करूनही देतात. सकाळी आठ वाजता उठून रिझर्वेशनला जाण्यापेक्षा तेच परवडते. साईटसीईंगमध्ये फक्त तो पॉईंट दाखवला जातो. फार तर आपण मान उंचावून डोक्यावरून जाणारी रोपवे पाहू शकतो एवढेच. टूर तिथे संध्याकाळी जाते, तेव्हा दुसऱ्या दिवशीचे रिझर्वेशनसुद्धा संपलेले असते. गेल्या वेळी आम्ही दोनच दिवस दार्जिलिंगला थांबलो होतो. त्यामुळे रोपवेमध्ये बसण्याची हौस शिल्लक राहिली होती. आता मसुरी, नैनीताल, गुलमर्ग इथेही रोपवे झाली आहे, पण ती कमी अंतरावर जाते

आणि शहरातूनच जाते. इथे मात्र उंचावरून खाली दऱ्यांमधले निसर्गसौंदर्य आणि चहाचे मळे पाहता येतात. त्यामुळे रोपवेची ट्रिप केल्याशिवाय दार्जिलिंग सोडायचे नाही, असे आम्ही ठरवले होते. दोन दिवसांनी आम्ही रोपवेमधून सहल केलीही.

## तिबेटियन रिफ्युजी हेल्प सेंटर

१९५९ मध्ये दलाई लामांबरोबर तिबेटिअन रिफ्युजी भारतात आले. त्या वेळी तेरावे दलाई लामा या ठिकाणी राहिले होते. दोन झोपड्या व चार माणसांवर हे Self help Centre त्या वेळी सुरू झाले. आता तिथे सात-आठशे तरी तिबेटी राहत आहेत. हे तिबेटी स्वतःला निर्वासित न म्हणवता Refugee म्हणवून घेतात आणि Selfhelp शब्द वापरतात. गालिचे विणणे, लाकडी व चामड्याच्या वस्तू तयार करणे, लोकरी कपड्याची शिलाई करणे अशी कामे येथे केली जातात. स्वेटर, कोट, टोप्या वगैरे लोकरीच्या वस्तू इथे बनविल्या जातात. गालिचांचा विभाग सर्वांत सुंदर आहे आणि तिथे काम करणाऱ्या कारागीर बहुतेक स्त्रिया आहेत. त्या प्रत्यक्ष गालिचे विणत असताना आपल्याला काम पाहता येते. शेजारी शोरूमही आहे. अर्थात तिथली खरेदी श्रीमंतांनाच परवडेल अशी आहे. ६x३ चा गालिचा त्या वेळी १२०० रुपयांना होता. मोठे गालिचे आणखी महाग होते. इतर वस्तू तेवढ्या महाग नव्हत्या. काम करणाऱ्या स्त्रियांभोवती, जिन्यावर, ग्राऊंडवर सगळीकडे मुलेच मुले दिसत होती. या लोकांना फॅमिली प्लॅनिंग माहीत तरी आहे की नाही, याची मला शंका वाटली. हे सेंटर रविवारी बंद असते.

## शूटिंग पॉइंट

तिबेटी सेंटरकडून शहराच्या दिशेने येताना, खालच्या बाजूच्या एका वळणावर टी इस्टेट आहे व एक सुरेख पॉइंट आहे. तिथे चित्रपटांचे शूटिंग होते, म्हणून आमच्या गाईडने त्याला शूटिंग पॉईंट नाव दिले होते. चहाच्या मळयात काम करणाऱ्या स्त्रिया जो ड्रेस घालतात, तसा ड्रेस घालून मी फोटोग्राफरकडून एक झकास रंगीत फोटो काढून घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो त्याने आमच्या लॉजवर पोहोचवला. शेजारच्या छोट्या हॉटेलमध्ये गरमागरम चहाही मिळाला. दार्जिलिंगमध्ये पन्नास पैशापासून पाच रु. कप अशा दराने चहा

मिळतो. तुम्ही तो कुठे पिणार आहात, झोपडीत की पॉश हॉटेलात, यावर किंमत अवलंबून असते. दार्जिलिंगमध्ये चायनीज हॉटेल्स बरीच आहेत. व्ही.डी.ओज् व नाईट क्लब्स आहेत. एक सिनेमाथिएटरही आहे. सर्व हॉटेल्सना जोडून बार आहेत. तिथे विदेशी दारू— अगदी शॅम्पेनसुद्धा सहज मिळते. कोपऱ्याकोपऱ्यांवर तिबेटी व नेपाळी लोक दुकाने मांडून बसतात. स्वेटर, शाली, मफलर याबाबतीत जोरदार बार्गेनिंग चालते. हव्या त्या रंगाचा स्वेटर दोन-चार तासांत विणून द्यायची तयारी असते. कुठलाही पॉइंट पाहायला गेले, तरी तिथे ही दुकाने असतात.

## लेबाँग रेसकोर्स व धीरधम टेंपल

आमच्या परतीच्या वाटेवर आम्हाला जगातले सर्वांत उंच व सर्वांत छोटे असे लेबाँग रेसकोर्स पाहता आले. वसंत ऋतूत इथे लोकल जिमखाना क्लबच्या वतीने रेसेस होतात. गेली तीन वर्षे मात्र त्या झालेल्या नाहीत, अशी माहिती आमच्या गाईडने दिली.

'धीरधम टेंपल' हा आमचा शेवटचा स्टॉप होता. रेल्वेस्टेशनजवळच हे हिंदू मंदिर आहे. ते १९३० मध्ये बांधले. नेपाळमधील पशुपतिनाथ मंदिराच्या स्टाईलने ते बांधलेले आहे. उत्तरेकडे मुख्यद्वार व मोठा नंदी आहे. पशुपतिनाथ मंदिराला चार दरवाजे आहेत. इथे तेवढी जागा नसल्याने ते शक्य नाही, पण त्याऐवजी चार बाजूंना चार कमानी ठेवलेल्या आहेत. मंदिराची रचनाही पॅगोडा टाइप आहे. हे मंदिर पाहून पशुपतिनाथ मंदिराची आठवण व्हावी, एवढे साम्य नक्कीच आहे. दार्जिलिंगमध्ये बौद्ध मॉनेस्ट्रीज जास्त आहेत. त्यामुळे हे हिंदू मंदिर वेगळेपणाने उठून दिसते.

मंदिर पाहिल्यानंतर ड्रायव्हरने आम्हाला पुन्हा मालरोडवर आणून सोडले. 'तुमच्या सहवासात माझा वेळ छान गेला,' असे म्हणून आमचा निरोप घेतला. संध्याकाळचे सहा वाजले होते, तेव्हा लॉजवर न जाता आम्ही परस्परच मालरोडवर गेलो. दार्जिलिंगला शोकेसमध्ये ठेवण्याजोग्या वस्तू छान मिळतात. वॉल हँगिंग्ज पेंटिंग्ज, लाकडी बाहुल्या वगैरे. मी थोडीफार खरेदी केली. जनता हॉटेलमध्ये जेवून आम्ही खोलीवर परतलो. लाईट्स जात-येत होते. रात्री पाऊसही कोसळत होता; पण आता टॉर्च खरेदी केल्यामुळे फारशी चिंता नव्हती.

## टायगर हिलचा सूर्योदय

२९ ला पहाटे चार वाजताच उठावे लागले. कारण आम्हाला टायगर हिलला सूर्योदय पाहायला जायचे होते. त्यामुळे साडेचारला बाहेर पडायचे होते. एक बरे आहे की, पहाटे जीपचे ड्रायव्हर लॉजजवळ जाऊन प्रवाशांना गोळा करतात. ही टूर वीस रुपये घेते आणि टायगरहिलचा सूर्योदय, घूम येथील बौद्ध मॉनेस्ट्री आणि वाटेत दिसणारे रेल्वेच्या इंजिनियर्सनी तयार केलेले 'बत्तासिया लूप' नावाचे एक अवघड वळण— अशी तीन स्थळे दाखवते. खरे म्हणजे पूर्वी हे सर्व आम्ही पाहिले होते, पण आता सात-आठ वर्षांचा काळ मध्ये गेला होता. शिवाय त्या वेळी इतके धुके होते की, सूर्योदय नीट दिसलाच नव्हता. दार्जिलिंगच्या पावसाळी वातावरणाने आणि धुक्यामुळे बऱ्याच वेळा अशी फजिती होते. 'रोपवे' मधून प्रवास करतानासुद्धा जर दाट धुके असेल तर, सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेता येत नाही. आजही पावसाळी वातावरण होतेच, पण तरी आम्ही हौसेने सूर्योदय पाहायला निघालो. दार्जिलिंगला यायचे आणि टायगरहिलला जायचे नाही, याला काही अर्थ नाही. खरे म्हणजे 'टायगरहिल टूरिस्ट लॉज'मध्येच राहायला हवे, पण ते शक्य झाले नव्हते. सुदैवाने आम्हाला सूर्योदय दिसू शकला.

टायगरहिल दार्जिलिंगपासून अकरा कि. मी. वर असून हा सर्वांत सुंदर पॉईंट आहे. आपण जेव्हा तिथे पोचतो तेव्हा पहाटेच्या वेळी हिमालयाची शिखरे, तसेच कांचनगंगा शिखर धुक्यात बुडालेले असते. हळूहळू पहाटेची सूर्यकिरणे त्यांवर पडतात आणि प्रथम शेंदरी, मग रुपेरी असे रंग बदलत कोवळ्या उन्हात, हिमाच्छादित शिखरे प्रकाशमान होतात. तो अविस्मरणीय व अवर्णनीय अनुभव असतो.

टायगरहिलच्या जवळच नाईनहोल गोल्फकोर्स आहे आणि गोल्फकोर्सच्या शेजारी 'टायगरहिल लॉज'. आम्ही घूमला स्वतंत्रपणे जाणार होतो, तेव्हा टायगरहिलहून लॉजवर परतलो. नाश्ता आटोपला आणि दार्जिलिंगच्या रेल्वेप्रवासाचा अनुभव घ्यायचा, म्हणून अकराच्या Toy Train ने घूमला निघालो.

## घूम

दार्जिलिंग ते सिलीगुडी या प्रवासात ट्रेनचे पहिलेच स्टेशन आहे घूम-दार्जिलिंग ते घूम फक्त एक रुपया तिकीट आहे; पण त्यामुळे Toy Train मध्ये

बसल्याचा अनुभव मिळाला. दार्जिलिंगपासून आठ कि. मी. वर असलेले घूम गाव हे समुद्रसपाटीपासून आठ हजार फूट उंचीवर आहे. येथील बौद्ध मॉनेस्ट्री प्रसिद्ध आहे. पंधरा फूट उंचीचा बुद्धाचा बसलेल्या अवस्थेतील पुतळा तिथे आहे. आणि येथील ग्रंथालयात अनेक महत्त्वपूर्ण बौद्ध साहित्याचे ग्रंथ आहेत. तिबेटी भाषेमधे पामवृक्षाच्या पानांवर लिहिलेले दुर्मिळ साहित्य इथे सुरक्षित ठेवले आहे. बुद्धाच्या मूर्तीसमोर रात्रंदिवस ज्योती प्रज्वलित केलेली असते. पिवळा वेष परिधान केलेले लामा भिक्षू या मंदिराची व्यवस्था पाहतात. या तिबेटी मॉनेस्ट्रीचे नाव 'ईगा चोलिंग बुद्धिष्ट मोनेस्ट्री' असे असून, इथे परदेशी लोकांनाही प्रवेश दिला जातो.

घूम गावात याशिवाय 'भुतिया बस्ती मॉनेस्ट्री' आणि 'नेपाळी बुद्धिस्ट मॉनेस्ट्री'ही आहे, पण आम्ही तिथे गेलो नाही. घूममध्ये शोभिवंत नेपाळी कुकरी (हे शस्त्र) तयार केली जाते. आम्ही आठवण म्हणून शोकेसमध्ये ठेवण्यासाठी एक छोटी कुकरी खरेदी केली. स्टेशनपासून एक कि. मी. अंतरावरच्या या मॉनेस्ट्रीत पायरस्त्याने चढ चढून आम्ही गेलो होतो. येताना आम्हाला पोलिस ऑफिसर्सची एक जीप भेटली. त्यांनी आम्हाला पायथ्याशी असलेल्या टॅक्सीस्टॅन्डवर सोडले. पाच मिनिटांतच दार्जिलिंगच्या दिशेने जाणारी जीप-टॅक्सी आम्हाला मिळाली. मला कशीबशी टेकायला जागा मिळाली. ह्यांना तर जीपच्या मागे फूटबोर्डवरच उभे राहावे लागले. आणखीही काही प्रवासी तसेच उभे होते.

## अव्हा आर्ट गॅलरी

घूमपासून साधारण पाच किलोमीटर अंतरावरच्या आणि दार्जिलिंगपासून दोन-तीन कि. मी. वर असलेल्या अव्हा आर्ट गॅलरीजवळ आम्ही उतरलो. दार्जिलिंगला जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाने वाकडी वाट करून, 'अव्हा आर्ट गॅलरी' मध्ये जायला हवे. आणि मॅडम अव्हा यांच्या अप्रतिम कलाकृतींचे सौंदर्य न्याहाळायलाच हवे, इतकी ती सुंदर आहे. वीस पैसे इतकी नाममात्र प्रवेशफी देऊन आम्ही या दुमजली आकर्षक इमारतीत प्रवेश केला आणि तेथील चित्रकलेचे आणि भरतकामाचे नमुने पाहून थक्क झालो.

भूतानी पुरुष, अर्धवस्त्रावृत्त नेपाळी स्त्रिया एम्ब्रॉयडरीतून साकार झालेल्या आहेत, यावर विश्वासच बसेना. कारण चेहऱ्यावरचे सूक्ष्म हावभाव टिपलेले होते

आणि धागा तर इतका नाजूक होता की, ती कुंचल्याची रेषच वाटत होती. भिंगातून पाहिल्यानंतरच ते भरतकाम आहे, यावर विश्वास बसला. तोपर्यंत ती सुंदर चित्रेच वाटत होती. मॅडम अव्हा पन्नाशीच्या आहेत. त्या उत्तम आर्टिस्ट आहेत. काही ऑईल पेंटिंग्जही त्यांनी केली आहेत. भरतकाम व चित्रे यांची किंमत प्रत्येकी हजाराच्या आसपास होती. आपण श्रीमंत नाही याचे मला फार वाईट वाटले. भरपूर पैसे असते, तर मी निदान एकतरी कलाकृती खरेदी करून संग्रही निश्चितच ठेवली असती. या सुंदर कलाकृतींना तेवढीच सुंदर नावेही दिली आहेत. 'तिबेटिअन शेफर्ड', 'तिबेटन व्हिलेजर', 'लास्ट क्रीचर', 'ओल्ड मॅन' आणि 'वाईज मॅन ऑफ द इस्ट' ही पाच थ्रेड पेंटिंग्ज पुरुषांची आहेत. 'वाइज मॅन ऑफ द इस्ट' हे रवींद्रनाथांचे पेंटिंग आहे. स्त्रियांच्या पेंटिंग्जपैकी Anmona उल्लेखनीय आहे. Saram या पेंटिंगमध्ये अर्धी वक्षस्थळे उघडी असलेली, शरमेने मान खाली घातलेली स्त्री आहे. 'मॉडेल' नावाच्या पेंटिंगमधील स्त्रीचा कटिप्रदेश दिसत असून पूर्ण वक्षस्थळे उघडीच आहेत. या सर्व सुंदरी सावळ्या, पण संस्कृत नायिकांप्रमाणे पुष्ट व आकर्षक आहेत. मला स्वतःला 'अनमोना' सर्वांत जास्त आवडली. हात वर करून ती केशरचना करत असल्यामुळे तिच्या बाहूंचे सौंदर्य व्यक्त होते. तिच्या हातातील कंकण, बाजूबंद, नाकातील चमकी व अलंकारांवरील नाजूक नक्षीकाम वेधक आहे. चेहऱ्यावर छायाप्रकाशाचे सौंदर्यही आहे. मॅडम आव्हा यांनी आपल्या या पेंटिंग्जची पिक्चर पोस्टकार्ड बनवून घेतलेली असून, फक्त दहा रुपयांत दहा पोस्टकार्ड्स्चा संच विकत मिळतो. आम्हाला तो खरेदी करण्यावरच समाधान मानावे लागले, पण त्यामुळे ही आर्ट गॅलरी कायमची लक्षात राहिली आहे. अव्हा आर्ट गॅलरीजवळ जीपमध्ये जागा मिळणे अशक्यच होते, तेव्हा आम्ही रमतगमत चालतच जायचे ठरवले. आकाश निरभ्र होते. हवा छान होती आणि रस्ताही उताराचा होता. दुतर्फा निसर्ग खुणावत होता ते वेगळेच. त्यामुळे भर दुपारचा एक-दीड वाजला असूनही काही त्रास झाला नाही. 'सिमला' हॉटेलमध्ये उत्तम नॉनव्हेज जेवण करूनच आम्ही लॉजवर परतलो. दुसऱ्या दिवशी मुक्काम हलवायचा होता, म्हणून संध्याकाळी मालरोडवर चक्कर मारली. चौरस्त्याजवळच्या पार्कमध्ये डोकावलो. लोअरमालच्या दुकानात खरेदी केली आणि रात्री साडेआठ-नऊला लॉजवर परतलो.

## रोप वेचा अनुभव

३० तारखेला पहाटे साडेपाच वाजताच जाग आली. गरम गरम चहा घेतल्यावर, सामानसुमान आवरले आणि साडेसात वाजता सुपर बझारजवळच्या बसस्टँडवर गेलो. तिथून सेंट जॉन स्कूलशेजारी असलेल्या रोप वेजवळ जाण्यासाठी टॅक्सीज मिळतात. गेल्या गेल्या टॅक्सी मिळाली. स्कूलजवळ उतरून, छोटीशी टेकडी चढून आम्ही रोप वे स्टेशनजवळ गेलो, तेव्हा शुकशुकाट होता. आठनंतर तिथे काम करणारे लोक आले. पहिल्या फेरीतून जाऊन एकजण सारेकाही आलबेल असल्याची खात्री करून आला आणि प्रवाशांच्या साडेआठच्या पहिल्या फेरीत आम्ही बसलो. शरीराला व वयाला न शोभणारी चपळाई दाखवून आम्ही दरीच्या बाजूच्या समोरासमोरच्या खिडक्या पकडल्या. आमच्या त्या डब्यात एक पती-पत्नी व त्यांची दोन-तीन मुले होती. ती थोडी हिरमुसली. धुके अजिबात नव्हते, उलट कोवळा सूर्यप्रकाश होता. त्यामुळे दरीतील चहाचे मळे, चिमुकली गावे, मळ्यात काम करणारे रंगीबेरंगी पोषाखातील स्त्री-पुरुष, दूरवरची पर्वतशिखरे हे सारे दिसत होते. वरून खाली असा सुमारे तीन कि. मी. चा प्रवास आम्ही १५-२० मिनिटांत केला आणि पलीकडच्या खेड्यात पोचलो. तिथे टी स्टॉलशिवाय काही नाही; पण पन्नास पावले चालल्यावर सुरेख टी इस्टेट आहे. मळ्यात काम करणाऱ्यांचे फोटो आम्ही काढले. सुमारे अर्ध्या तासाने पुढच्या फेरीतील लोक तिथे उतरले आणि त्यांच्या जागी बसून आम्ही दार्जिलिंगला परतलो. ढगांच्या सहवासातील तो प्रवास चिरस्मरणीय ठरला.

परत आल्यावर कुठेही न रेंगाळता टॅक्सी पकडून आम्ही लॉजवर आलो. लॉजचे रोजी सत्तर रुपयेप्रमाणे झालेले बिल चुकते केले आणि लगेजसह बाहेर पडलो.

## कॉलीपाँगकडे

दार्जिलिंगच्या सुपरबझारजवळील बसस्टँडवर आलो आणि समजले की, बारापर्यंत कॉलीपाँगला जायला बस नाही. समोर एक टॅक्सी म्हणजेच जीप उभी होती. ती अकरा वाजता निघणार होती. तासाभराचा वेळ वाचवण्यासाठी, बसच्या दुप्पट भाडे देऊन आम्ही टॅक्सी पकडली खरी, पण अगदी मागे जागा मिळाल्यामुळे प्रवासात हालच झाले. इथली स्थानिक मंडळी कितीही गर्दीत उभी

राहतात. इथेही मागच्या फूटबोर्डवर माणसे उभी राहिली. बाहेरचे दृश्य दिसतच नव्हते.

दुसरे म्हणजे दार्जिलिंग ते कॉलीपाँग रस्ता खूप कठीण व वळणावळणांचा आहे. वाटेत पेशोक गाव व लापचू टी इस्टेट लागते. 'तिस्ता' गावाच्या पलीकडे एक सुरेख View Point लागतो. तिथून खाली दरीत डोकावले की तिस्ता व रणजित नद्यांच्या संगमाचे सुरेख दृश्य दिसते. मैलोगणती पसरलेले चहाचे मळे दिसतात. या पॉइंटजवळ आमची जीप १० मिनिटे थांबली. दुपारी दीड वाजता आम्ही कॉलीपाँगला पोहोचलो.

# कॉलीपाँग

दार्जिलिंगहूनच आम्ही कॉलीपाँगमधील 'मुणाल' लॉजचे रिझर्वेशन केले होते, तेव्हा आम्ही उतरल्याबरोबर तिथे गेलो. आम्हाला दोन नंबर रूम मिळाली. हॉटेल नवे आणि चांगले आहे. १२X१२ची मोठी रूम-अटॅच बाथ, भरपूर पाणी, उत्तम चहा वगैरे सुखसोयी उपलब्ध होत्या. पंच्याहत्तर रुपये हा दर थोडा जास्त वाटला, पण कॉलीपाँगमध्ये चांगली हॉटेल्स फार कमी असल्याने, तो द्यावाच लागतो. पश्चिम बंगालचे टूरिझमचे 'कॉलीपाँग टूरिस्ट लॉज' चांगले आहे, पण तिथे फक्त पाच-सहाच खोल्या आहेत. 'शांग्रीला' नावाचे Economy Tourist Lodge आहे. तिथे केवळ तीन डबलरूम्स असून बाकी दोन डॉरमेटरी आहेत. ही सर्व हॉटेल्स भरलेली असतात. आम्ही आधी बुकिंग केले होते, म्हणून बरे झाले. स्नान वगैरे आटोपेपर्यंत दोन वाजले. मग बाहेर जेवायला जायची ताकद नव्हती, तेव्हा आमच्याबरोबरचे केक्स, चिवडा, चहा यांच्यावर वेळ भागवली. कॉलीपाँगचे कालीमंदिर प्राचीन असून प्रेक्षणीय आहे. या कालीमंदिरामुळेच या गावाचे नाव कॉलीपाँग पडले आहे.

कॉलीपाँग हे समुद्रसपाटीपासून १२५० मीटर्सवरील म्हणजेच सुमारे चार

हजार फूट उंचीवरील पश्चिम बंगालमधील हिलटाऊन आहे. त्याच्या उत्तरेला सिक्कीम व तिबेट आहे. पश्चिमेला भूतान आहे आणि पूर्वेला पश्चिम बंगाल. दार्जिलिंग ते कॉलीपाँग अंतर आहे ५१ कि. मी. सिक्कीमची राजधानी असलेली गंगटोक किंवा गन्तोकही साधारण तेवढ्याच अंतरावर असेल. इथून कांचनगंगा जवळ आहे. या भागातील आर्कीडस् प्रसिद्ध आहेत. वर्षभर कोणती ना कोणतीतरी फुले असतातच. शहरामध्ये क्युरिओ व स्थानिक हस्तकलांची दुकाने बरीच आहेत. मकर संक्रांतीला भूतानी लोकांची जत्रा तिस्ता नदीकाठी भरते, तर फेब्रुवारीच्या मध्याला तिबेटिअन नवे वर्ष सुरू होते.

कॉलीपाँगमध्ये एकच दिवस मुक्काम करायचा होता, तेव्हा गेल्या गेल्या दुसऱ्या दिवशीच्या दुपारच्या दोनच्या गंगटोक बसचे रिझर्वेशन करून टाकले. कारण गंगटोकला दोनच बसेस जातात. सकाळी सातला पश्चिम बंगालची आणि दुपारी दोनला सिक्कीम गव्हर्नमेंटची. नंतर आम्ही साईटसीईंगच्या दृष्टीने चौकशी केली. साईटसीईगला टॅक्सी पंच्याहत्तर रुपये घेते आणि साधारण तीन-चार तासांत सहा-सात पॉइंट्स दाखवते. स्टॅन्डजवळ एक खाजगी टूर कंपनी आहे. ती प्रत्येकी वीस रुपये घेऊन साईटसीईंगची व्यवस्था करते. प्रवाशांच्या संख्येप्रमाणे जीपची किंवा टॅक्सीची व्यवस्था असते. आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजताच्या ट्रिपसाठी तिचे रिझर्वेशन करून टाकले. आणखी दोनच सहप्रवासी मिळाल्याने आम्हाला कारने साईटसीईंग करता आले.

### बाजार आणि हॉटेल्स

कॉलीपाँगमध्ये दोन मार्केट्स चांगली आहेत. एक मेनरोडवरचे आणि दुसरे १०th mile नावाचे. त्यापैकी मेनरोडवर तिबेटी लोकांची दुकाने आहेत. तिथे शोरूममध्ये ठेवण्याच्या दृष्टीने अनेक आकर्षक वस्तू, लाकडी बाहुल्या, वॉल हँगिंग्ज, माळा वगैरे छान मिळतात, तर १०th mile मार्केटमध्ये लेदरगुड्स चांगले मिळतात. दोरजी मार्केटमध्ये फ्रूट स्पायसेस छान मिळतात. आम्ही त्या दिवशी या तिन्ही मार्केटमधून चक्कर मारली आणि एक हॅवरसॅक बॅग व पर्स खरेदी केली.

कॉलीपाँग नगरपालिकेजवळ एक छान बोर्ड वाचायला मिळाला. त्यावर लिहिलेले होते की– 'ज्या शहरात आपण राहतो त्याचा अभिमान आपल्याला वाटला पाहिजे आणि तुम्ही अशा तऱ्हेने राहायला हवे की शहराला तुमचा

अभिमान वाटेल'. आजच्या भ्रष्टाचार, अत्याचार, हिंसाचार यांच्या युगात नागरिकांना अशी जाणीव करून देणारी नगरपालिका क्वचितच आढळेल. गुरखालॅन्डची मागणी करणारे बोर्डही अधूनमधून दिसत होते.

'आम्ही भारतात राहायला तयार आहोत पण बंगालमध्ये नाही.'

'बंगालने हमको कंगाल बनाया ।'

गुरखा लॅन्ड बिना चैन कहाँ देगा ॥ असे ठासून सांगणारे ते बोर्ड चळवळीची तीव्रता स्पष्ट करत होते.

कॉलीपाँगमध्ये शाकाहारी भोजनाची चांगली हॉटेल्स नाहीत. त्यातल्या त्यात बरे हॉटेल म्हणजे स्टॅन्डजवळचे 'पंजाब हॉटेल.' तिथे भोजन करून आम्ही रात्री आठ-साडेआठला लॉजवर परत आलो.

## साईटसीइंग

१ मेला सकाळी साडेआठ वाजता हेवी ब्रेकफास्ट घेऊन आम्ही कॉलीपाँगच्या साईटसीइंगला निघालो.

आमचा पहिला स्टॉप होता **'बंकीम पार्क.'** आधी मला वाटले की, या बगिचाशी प्रसिद्ध बंगाली लेखक बंकिमचंद्र चटोपाध्याय यांचा काहीतरी संबंध असावा; पण चौकशीअंती असे समजले की, कोणी दुसरेच बंकीम नावाचे ऋषी येथे राहत असत. हा पार्क छोट्याशा टेकडीवर वसलेला आहे. मध्यभागी ग्लास हाऊसमध्ये नर्सरी वगैरे आहे आणि उंचावरून आसपासचे सृष्टिसौंदर्य चांगले दिसते. बाकी आवर्जून उल्लेख करण्यासारखे इथे काही नाही. हा भाग गावाबाहेर असून तिथेच जवळ कॉलेज आहे. मधुबन पॉइंट, गोल्फकोर्स व आर्मी एरिया आहे. आम्ही थोडा वेळ तिथे थांबून, दरीतील निसर्गसौंदर्य न्याहाळले. गाडीतूनच कॉलीपाँगचे दर्शन घडत होते. दीप चौक, सर्किट हाऊस, आर्मी हॉलीडे होम असे भाग ओलांडत ओलांडत आम्ही तेथील प्रसिद्ध मॉनेस्ट्रीत गेलो.

## सांग जु बारी मॉनेस्ट्री

स्टॅन्डपासून सहा कि. मी. अंतरावर असलेली ही मॉनेस्ट्री कॉलीपाँगमधील सर्वांत जुनी असून ती १६९२ मध्ये बांधली. दार्जिलिंगला व सिक्कीमला खूप बौद्ध मॉनेस्ट्रीज पाहायला मिळाल्या. त्या ठराविक पद्धतीच्या असतात. दुमजली

इमारती, खालच्या भव्य सभागृहात गौतमबुद्धाची भव्य मूर्ती, त्यापुढे तेवते दीप, वरच्या मजल्यावर लायब्ररी व वस्तुसंग्रहालये– असे त्यांचे स्वरूप असते. बाहेर धर्मपाठ लिहिलेली चक्रे असतात आणि ती फिरवल्याने पुण्यप्राप्ती होते, अशी श्रद्धा आहे. ही बौद्ध मॉनेस्ट्री तशीच होती.

## दुर्पिणदरा

मॉनेस्ट्रीच्या शेजारीच उंचवट्यावर 'दुर्पिणदरा' हा पॉइंट आहे. कॉलीपॉगमधील ही सर्वांत उंच जागा असून तिथून तिस्ता, रॅली व जलखुला या तीन नद्या दिसतात. आम्ही तिथे गेलो, तेव्हा खालच्या दरीमध्ये धुकेच धुके पसरलेले होते. दहा-पंधरा मिनिटे थांबूनही सनलाईट येईना. इकडे गाईडची तर निघण्यासाठी गडबड चालली होती. त्याच्या मते बहुतेक वेळा हे दृश्य धुक्यामुळे दिसतच नाही. जे काही अस्पष्ट दिसले त्यावर समाधान मानून आम्ही पुढे निघालो.

## पाईन व्ह्यू नर्सरी

ही नर्सरी प्रधान नावाच्या गृहस्थांच्या खाजगी मालकीची आहे. या ठिकाणी कॅक्टसच्या सातशेच्यावर व्हरायटीज आहेत. त्यांपैकी एकाची किंमत आठ हजार असून तो मेक्सिकोतून आणलेला आहे. कोलॅरेडो, साऊथ आफ्रिका इथून आणलेली रोपे येथे आहेत. स्वतः प्रधान हिंडून आम्हाला माहिती देत होते. काठमांडूत प्रधान नावाच्याच गृहस्थांची नर्सरी आम्ही पाहिली होती. तिचा संदर्भ आम्ही दिला, तेव्हा समजले की हे दोघे सख्खे भाऊ आहेत. भावाभावांचा छंद व व्यवसाय एकच असावा, याचे कौतुक वाटले. त्यांच्या Old man नावाच्या कॅक्टसला द्वितीय बक्षीस मिळाले आणि त्या स्पर्धेत इंदिराजी परीक्षक होत्या, हे समजल्यावर आठवण म्हणून आम्ही त्या कॅक्टसचा फोटो काढून घेतला.

## स्विस डेअरी आणि गौरीपूर हाऊस

कॉलीपाँगपासून चार कि. मी. वर असलेली डेअरी स्विस मिशनरी फादर अ‍ॅन्ड्रेस बटी याने सुरू केली होती, म्हणून ती स्विस डेअरी या नावाने ओळखली जाते. आजही तिचा मालक स्विस आहे. तिथे थंडगार छान घट्ट दही प्लॅस्टिक ग्लासमधून खायला मिळाले. ऐंशी पैशाला एक, या दराने उत्तम लॉलीपॉप्स

मिळाले. तसेच पन्नास रुपये किलो उत्तम चीज मिळाले. डेअरीचा परिसर निसर्गरम्य व स्वच्छ होता.

रस्त्यात लागलेली 'गौरीपूर हाऊस' ही जागा रवींद्रनाथ टागोरांची आवडती होती. त्यांनी अनेक वेळा कॉलीपाँगला भेट दिली होती व त्या त्या वेळी ते इथे राहिले होते. आता त्या जागी एक सहकारी संस्था आहे.

## कालीमंदिर व डॉ. ग्रॅहम्स होम

कालीमंदिर उंचावर बांधलेले असून, काही पायऱ्या चढून तिथे जावे लागते. या मंदिरावरूनच या नगराला कॉलीपाँग नाव मिळाले. तेथील कालीमातेची मूर्ती सौम्य आहे. कलकत्त्यासारखी उग्र नाही. कॉलीपाँगचा देखावाही तिथून छान दिसतो. आसमंतात नीरव शांतता आहे. इतर मंदिरांच्या दारात दुकानांचा बाजार असतो, तसा इथे नाही.

डॉ. ग्रॅहम्स होम ही संस्था ग्रॅहम नावाच्या मिशनऱ्याने सुरू केली. प्रारंभी तिथे सहा अनाथ मुलांची शाळा होती. कॉलीपाँगच्या सर्वोच्च हिलवरील ही संस्था आता पाचशे एकर भागात पसरलेली आहे. आता तिथे सातशेच्यावर मुले व मुली छोट्या कॉटेजेसमध्ये राहतात. तिथे डेअरी व पोल्ट्रीफार्म आहे. मे महिन्यात इथे May Fair भरत असते.

## आर्ट्स क्राफ्ट सेंटर

हा शेवटचा पॉइंट आमच्या लॉजच्या समोरच उंचावर होता. सेंटरमध्ये प्रत्यक्ष काम चालू नव्हते, पण शोरूम उघडी होती. गालिचांप्रमाणे विणकाम व पॅचवर्क असलेले उत्तम वॉलपीस तिथे होते. गुंडाळी शंभर रुपयांना आणि फ्रेम असलेले सव्वाशे रुपयांना. चित्रे खूप सुरेख होती. पण ओझे नेणार कसे? लाकडी फ्रेम व मध्ये सुंदर भरतकाम केलेली, पडदे लावलेली पार्टिशन्स सातशे रु. ना होती. ती तर दुर्मिळच होती; पण गाड्या बदलत एवढे ओझे घेऊन जाणे शक्य नव्हते, तेव्हा इच्छा असूनही ती नेत्रसुखद चित्रे घेण्याचा मोह आम्ही टाळला. टीपॉय, लाकडी ट्रे अशा निवडक कलात्मक वस्तू तिथे होत्या. केसांना बांधायचे रुमाल, पर्सेस, बटवे अशा छोट्या छोट्या वस्तू मात्र प्रेझेंट देण्यासाठी आवर्जून घेतल्या.

पावणेबाराला आम्ही लॉजवर परतलो. बाराला चेकआऊट टाइम होते.

रूमचे नवे गिऱ्हाईक वाट पाहत होते, तेव्हा आम्ही सामान पॅक करून मॅनेजरच्या ताब्यात दिले व स्टॅन्डजवळच्या पंजाब हॉटेलमध्ये जेवायला गेलो. आमची गंगटोकची बस दुपारी दोनला निघणार होती—

# गंगटोक किंवा गान्तोक

'नवे ते हवे' या हव्यासाने आम्ही सिक्कीम राज्यात निघालो होतो. कॉलीपाँगचा निरोप घेतला, तेव्हा तेथील गोलाकार स्टेडियमवजा ग्राउंडवर अक्षरशः शेकडो स्त्री-पुरुष हातातल्या छत्र्या उघडून बसले होते आणि ग्राउंडच्या मध्यावर मे दिनानिमित्त चाललेला बांगलागीतांचा कार्यक्रम ऐकत होते. या भागात मे दिन जोरदार साजरा करतात. प्रवासातही गावांमध्ये कमानी उभारलेल्या होत्या आणि घराघरांवर अर्धा लाल, अर्धा पांढरा असे ध्वज फडकत होते.

कॉलीपाँग ते 'गंगटोक'- किंवा तिथला उच्चार करायचा तर 'गान्तोक'— हा रस्ता साधारण तीन तासांचा आहे, तेव्हा दुपारी दोनची बस पाच वाजता तिथे पोचेल, अशी आमची अपेक्षा होती. पहिले दोन तास रस्ता सपाट असल्याने आमची लक्झरी भरधाव वेगाने चालली होती; पण नंतर चढ सुरू झाला आणि साडेचारच्या सुमाराला तर घाटात बस चक्क उभी राहिली. पुढे आणि मागेही गाड्यांची रांग लागली होती. पाच वाजेपर्यंत जंगलात कटिंग चालू असल्याने सर्वच गाड्यांना थांबवतात. हळूहळू चढ चढत आम्ही सहा वाजता गंगटोकला पोचलो. बसस्टॅन्डच्याजवळ बरीच लॉजेस आहेत, पण बहुतेक सगळी चार-पाच मजली. मला आता प्रवासाचा शीण जाणवत होता, तेव्हा फारशा पायऱ्या चढाव्या लागणार नाहीत, असे 'पशुपती' नावाचे हॉटेल आम्ही निवडले. बहुसंख्य हॉटेल्समध्ये एकच रेट होता. पन्नास रुपयांत अटॅचबाथ रूम. लॉजपासून पाच-सात मिनिटांच्या रस्त्यावर असलेल्या 'मारवाडी भोजनालयात' आम्ही

जेवत होतो. तिथे सहा रुपयांत पूर्ण जेवण मिळत होते. भात, रोट्या, दोन भाज्या, चटणी-दही वगैरे. मुख्य म्हणजे तुरीच्या डाळीचे वरण होते. नाहीतर या भागात उडदाची डाळ खातात. ती चिकट असते. सवय नसल्याने आपल्याला खाववत नाही. या भोजनालयात इतकी गर्दी असते की, दोननंतर भोजन मिळत नाही.

गंगटोकची दुकाने आठ-साडेआठलाच बंद होतात आणि मग रस्त्यांवर शुकशुकाट होतो. त्यामुळे आम्हालाही आठ-आठसाडेला लॉजवर यावे लागत असे.

गंगटोक पाहायचे तर दोन दिवस पुरेसे असतात. एक दिवस शहरातील स्थळे पाहायची आणि एक दिवस रुमटेकच्या बौद्धविहारात जाऊन यायचे. हिमालयातील इतर हिलस्टेशन्स पाहिलेल्यांना सिक्कीममध्ये आवर्जून पाहण्यासारखे काही नाही. मात्र सिक्कीम शांत आहे आणि तुलनेने स्वस्त आहे. काहीतरी नवे पाहावे म्हणून आणि दार्जिलिंगपर्यंत आलोच होतो म्हणून आम्ही सिक्कीमलाही गेलो, इतकेच.

सुमारे २५०० हेक्टर एरियामध्ये सिक्कीम राज्य पसरलेले आहे. त्याची एकूण लोकसंख्या फक्त साडेतीन लाख आहे. आणि त्यांपैकी ६४ हजार लोक एकट्या गंगटोकमध्ये राहतात. उन्हाळ्यात इथले उष्णतामान जास्तीत जास्त २२ असते, तर थंडीत जास्तीत जास्त १२ व कमीत कमी ४ सें. असते. मार्च ते मे आणि ऑक्टोबर ते डिसेंबर हा इथला चांगला सीझन असतो. इथे भुतिया, नेपाली, लेपचा, तिबेटियन, इंग्लीश व हिंदी या भाषा बोलल्या जातात.

## प्रवास व निवास

गंगटोकला जायचे तर जवळचे एअरपोर्ट आहे 'बागडोगरा'. ते पश्चिम बंमालमध्ये आहे. तिथून गंगटोक १२४ कि. मी. असून तो पाच तासांचा बसप्रवास आहे. 'बागडोगरा'हून कलकत्ता व दिल्ली येथे विमानसेवा उपलब्ध आहे.

जवळचे रेल्वेस्टेशन आहे सिलीगुडी. सिलीगुडी ते गंगटोक हे ११४ कि. मी. अंतर असून तो बसचा साडेचार-पाच तासांचा प्रवास आहे. गंगटोकहून दार्जिलिंग, कॉलीपाँग, सिलीगुडी येथे रोज बसेस जातात. प्रायव्हेट बससर्व्हिस वा टॅक्सी/जीप्सही आहेत. अप्सरा, संगम, सिक्कीम ब्यूटी, सिक्कीम ग्लोरी अशी या खाजगी आरामगाड्यांची नावे आहेत. सिक्कीममध्ये पेट्रोलचा थोडा प्रश्न आहे. सिलीगुडी ते गंगटोक या रस्त्यावर तिस्ता ब्रिज– रंगपू आणि

सिगटन अशा तीनच ठिकाणी पेट्रोल पंप आहेत. ऑक्टोबर ते जून रस्ते चांगले असतात; पण पावसाळ्यात रस्ता वा दरड कोसळली तर आपण अडकून पडू शकतो; तेव्हा खाजगी वाहनाने जाणाऱ्यांनी सिलीगुडीच्या टूरिझम ऑफिसमध्ये चौकशी करून गेलेले चांगले.

गंगटोकमध्ये लॉजेस बरीच आहेत. सिक्कीम टूरिझमचा 'सिनेओल्चु लॉज' सर्वांत महाग आहे. दीडशे ते पावणेतीनशे या रेटने तिथे डिलक्स रूम्स उपलब्ध आहेत. 'नाशी डिलक्स लॉज' आणि 'तिबेट लॉज' ही महागच आहेत. तिथे सामान्यतः परदेशी प्रवासी उतरतात. मध्यमवर्गीयांना चांगले लॉज म्हणजे आर्कीड लॉज, डिक्वी लॉज, वुडलॅन्ड, कर्म, शेरेपंजाब वगैरे. हे सर्व लॉज पन्नास रुपयांत डबलरूम्स देतात. सर्व लॉजेसच्या चार मजली इमारती आहेत. सिक्कीममध्ये येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येच्या मानाने इथे लॉजेस व टॅक्सीजची संख्या जास्त वाटली. दोन-तीन बौद्धविहार, दोन चर्चेस, ठाकुरबारी हे हिंदू मंदिर, अंजुमान मसजीद अशी सर्व धर्मांची प्रार्थनास्थळे गंगटोकमध्ये आहेत. सिनेमा थिएटर्स आहेत, ऑफिसर क्लब आहे, एक लायब्ररी आहे; पण एकंदरीत इथे प्रगतीचा वेग मंदच आहे. गंगटोक सोडून अन्यत्र तर हे विशेष जाणवते. गंगटोकमध्ये साधी कलर फोटो लॅब नाही. फोटो दार्जिलिंगहून डेव्हलपिंग करून आणतात. दिल्ली, कलकत्ता व सिलीगुडी येथे सिक्कीम टूरिझमची ऑफिसेस आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अनेकांना हे माहीतच नाही की, सिक्कीम हे पूर्वी स्वतंत्र राष्ट्र होते आणि आता ते भारतात विलीन झाले आहे.

## गंगटोक येथील साईटसीइंग

दोन तारखेला दहा वाजता आम्ही टूरिस्ट ऑफिसमध्ये गेलो. बससाठी फ्युएल नसल्याने टूरिस्ट ऑफिसने आम्हाला जीपने पाठवायचे ठरवले, तेव्हा मी हळूच जीपनंबर मिळवला आणि ड्रायव्हरच्या शेजारच्या दोन जागा पकडल्या. नंतर मागच्या जागेत आठ मोठी माणसे व दोन लहान मुले दाटीवाटीने बसली. साईटसीइंगसाठी या टूरला प्रत्येकी पंचवीस रुपये द्यावे लागतात, पण गंगटोकमधील सर्व महत्त्वाचे पॉइंट्स ती दाखवते.

## स्तूप किंवा Chorten

तुलसी रिनोची ह्याने १९४५ मध्ये बांधलेला हा स्तूप महत्त्वाचा आहे.

त्याच्या आत एक पूर्ण मंडलसेट, एक पवित्र पुस्तकांचा सेट, एक मंत्रांचा सेट व धार्मिक वस्तू ठेवलेल्या आहेत. स्तूपाभोवती १०८ प्रार्थनाचक्रे आहेत. शेजारीच तिबेटी शाळा असून गुरू रिन पोची म्हणजेच गुरू पद्मसंभव यांचे दोन मोठे पुतळे आहेत.

### रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ तिबेटॉलॉजी

हा आमचा दुसरा स्टॉप होता. ही इन्स्टिट्यूट जगप्रसिद्ध असून येथील बुद्धिझमवरील तिबेटी पुस्तकांचे कलेक्शन जगातील तिसऱ्या क्रमांकाचे आहे. त्याशिवाय इथे टेपेस्ट्रीचे दोनशेच्यावर नमुने आहेत. त्यांना आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली आहे. जगातील बुद्धिस्ट स्कॉलरसाठी हे एक अभ्यासकेंद्र मानले जाते. ही संस्था सकाळी दहा ते दुपारी चारपर्यंत खुली असते. २९ जुलै ८३ रोजी या संस्थेचा रौप्य महोत्सव स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाला. त्या समारंभाचे जे फोटो काढले, त्यांची पिक्चर पोस्टकार्डस् बनवून, ती इथे विक्रीला ठेवली आहेत. येथे लेपचा मॅनिस्क्रीप्ट्स, मांडीच्या हाडापासून तयार केलेल्या दोन फ्लुट्स, तिबेटियन स्टॅम्पस्, जुनी सिक्कीमची नाणी वगैरे दुर्मिळ वस्तू आहेत. दुसऱ्या मजल्यावर मोठे ग्रंथालय असून तिथे अक्षरशः शेकडो ग्रंथ आहेत.

### गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ कॉटेज इंडस्ट्रीज

या उद्योगसंस्थेत हाताने विणलेले गालिचे, ब्लँकेट्स, शाली; सुंदर कोरीव काम केलेले फर्निचर— उदा. टेबल, दिवाण वगैरे उपलब्ध आहेत. कोरीव काम केलेली टेबले— ज्यांना choktse म्हणतात ती— विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांच्या किमती फक्त तीनशे ते पाचशे असून त्यांवरील कोरीव काम अप्रतिम आहे. बांबूकाम केलेली वॉल हँगिंग्ज, कापडी घोडे, चांदीचे अंलकार अशा वस्तू तिथे होत्या. ओझे नेणे शक्य नसल्याने मला छोट्या खरेदीवर समाधान मानावे लागले. ही इन्स्टिट्यूट साडेनऊ ते साडेबारा आणि दुपारी दीड ते साडेतीन अशी उघडी असते.

### Enchey Monastory

गंगटोकपासून सुमारे तीन कि.मी. उंचावर हा बौद्धविहार आहे. तो उंचावर असल्यामुळे तिथून कांचनगंगा शिखर, पूर्ण गंगटोक शहर, दऱ्याखोरी, शेतेभाते यांचे विहंगम दृश्य दिसते. ही मॉनेस्ट्री आठवा चोगाल नामगयाल याने १८४०

मध्ये बांधली. चीनमधील एका मॉनेस्ट्रीचा नमुना डोळ्यांसमोर ठेवून ती तशा पद्धतीने बांधली आहे. तो स्वतः चीनला जाऊन आला होता. तिथे त्याने डोंगरशिखरे वगैरे पाहून त्यांचे स्केच काढले होते. सिक्कीममध्ये परत आल्यावर त्याच्याशी सादृश्य असलेले हे ठिकाण त्याने शोधून काढले व मॉनेस्ट्री बांधली. तिबेटियन कॅलेंडरच्या अकराव्या महिन्यातील आठव्या व नवव्या दिवशी (इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे साधारणतः डिसेंबरमध्ये) इथे लामांचा वार्षिक नृत्योत्सव असतो. सर्व सिक्कीम राज्यातील विविध विहारांमधील लोक इथे जमतात. या मॉनेस्ट्रीच्या प्रवेशद्वारावर काही चित्रविचित्र भीतिदायक आकृती रंगविलेल्या आहेत. त्या या बुद्धमंदिराच्या संरक्षक देवता असून, त्या पिशाच्चांपासून संरक्षण करतात, अशी श्रद्धा आहे. वरच्या मजल्यावर जायला दोन जिने आहेत— पूर्वेकडे व पश्चिमेकडे. पूर्वेकडील जिन्याने वर गेले की, प्रार्थना हॉल आहे. तिथे वज्रपाणी व अष्टमहापुत्रांचे पुतळे आहेत. हॉलमध्ये मुख्य गुरूंसाठी स्वतंत्र जागा आहे. हेड लामांसाठी राखीव जागा आहे. उरलेल्या जागी इतर लामा बसतात.

## सेक्रेटरीएट व आर्चिड गार्डन

ही इमारत भव्य असून तिच्या मागच्या बाजूला झू व डिअर पार्क आहे. पार्कच्या मध्यावर एका चबुतऱ्यावर, सारनाथच्या बुद्धमूर्तीची पितळी प्रतिकृती ठेवलेली आहे. सेक्रेटरीएटच्या परिसरात जीप्स व गाड्यांची गर्दी होती. सिक्किमी पोषाखातील नोकऱ्या करणाऱ्या तरुणी आत्मविश्वासाने फिरत होत्या. पोर्चमधील शोकेसमध्ये मंत्रिमहाशयांचे फोटो झळकत होते. सेक्रेटरीएटच्या समोरून गंगटोकचा देखावा सुंदर दिसतो. सेक्रेटरीएटपासून जवळच आर्चिड गार्डन आहे. त्यात दोनशेच्यावर आर्चिड्स आहेत. त्यांचा सीझन जुलै ते नोव्हेंबर असतो. आता तिथे पाहण्यासारखे काही नाही, असे म्हणून ड्रायव्हरने तो पॉइंट दाखवणे टाळले. एके काळी सिक्कीममध्ये परदेशी वस्तू स्वस्तात मिळत असत, पण आता तसे आढळले नाही. एकच्या सुमाराला आमचे साईटसीईंग संपले. मारवाडी भोजनालयात जेवण उरकूनच आम्ही लॉजवर परतलो. संध्याकाळी सतत पावसाची झिमझिम चालू असल्याने फारसे कुठे जाता आले नाही. मग आम्ही दुसऱ्या दिवशीच्या सिलीगुडी बसचे रिझर्वेशन केले. लाल मार्केटमध्ये चक्कर मारली. भाजीपाला, कपडे याशिवाय तिथे काहीच नव्हते. सिक्कीमची लीकर प्रसिद्ध आहे. प्रेझेंट देण्यासाठी तिच्या व्हरायटीचा एक गिफ्ट पॅक आणि

स्पायसेसचा एक गिफ्ट पॅक आम्ही खरेदी केला. एकएक पेगच्या छोट्या दहा-बारा कुप्या असलेले हे पॅक पन्नास रुपयांपासून मिळतात. येथील पान लिक्युअर नावाचे मद्य प्रसिद्ध आहे.

## साईटसीइंग टूर नं. २

सिक्कीम टूरिझमने या टूरला Rumtek and Orchidarium Tour असे नाव दिले आहे. साधारणपणे पंधरा-सोळा लोक मावतील अशा मिनीबसने ही टूर निघते. ड्रायव्हरशेजारी एक सीट, मग चार सीट्सचे दोन बाक, नंतर तीन सीट्सचा एक बाक आणि अगदी मागे पुन्हा चार सीट्सचा बाक— अशी बसची रचना होती. मी पहिल्या बेंचवरील चार सीट्सपैकी खिडकीजवळची जागा मिळवली. आमच्या या मिनीबसमध्ये शेवटल्या मिनिटाला एक तरुण जोडपे आले. दोघे होते बंगालीच, पण तिने टाईट जीन पॅन्ट व टीशर्ट घातला होता. केस बॉब केले होते. कोणीच या नवपरिणीत जोडप्याला एकत्र जागा देईना, तेव्हा ते दोघे ड्रायव्हरच्या शेजारच्या एकाच सीटवर बसले. मला काळजी वाटू लागली की, ड्रायव्हर ॲक्सिडेंट करतो की काय, कारण त्याचे लक्ष या जोडप्याच्या प्रेमचेष्टांकडे होते. तो तिच्या गळ्यात हात टाकत होता. तिचे केस नीट करत होता. दोघे डोळ्यांत डोळे घालून बघत होते. हे प्रेमप्रदर्शन सार्वजनिक ठिकाणी चालू होते. अर्ध्या तासानंतर चढावर इंजिन तापले. नवऱ्याला बॉनेटचे चटके बसू लागले. पण करतो काय ? बायकोवरचे प्रेम सिद्ध करायचे, तर वेगळ्या सीटवर बसून कसे चालेल ? बाई छान खिडकीजवळ बसलेली. आमची करमणूक झाली.

## आर्चिड गार्डन

आम्ही प्रथम गेलो आर्चिड गार्डनमध्ये. काही आर्चिड्सचे अर्क काढून त्यांचा उपयोग लॅन्डस्केप्स मध्ये करतात. काहींचे अर्क खाण्यात वापरले जातात. spices ही सिक्कीमची स्पेशालिटी आहे. हे आर्चिड गार्डन सुरेखच आहे. विशेषतः ग्लास हाऊसमध्ये रेअर व्हरायटीज आहेत. शेंदरी, पिवळी व लव्हेंडर कलरची नाजूक फुले मोठी सुरेख दिसत होती. गान्तोकच्या लोकांचा हा आवडता Picnic Spot आहे. गार्डनला जायचे म्हणजे राणीपूल गावाहून खाली जाणाऱ्या रस्त्याने जावे लागते. मग पुन्हा राणीपूलला यायचे आणि रुमटेककडे जाणारा चढ चढू लागायचा. 'रुमटेक'गाव गंगटोकपासून २४ कि.मी. वर आहे. तशी ही दोन्ही गावे

समोरासमोरच्या टेकडीवर आहेत. पण तिथे जाण्यासाठी गंगटोकहून दहा-बारा मैल घाट उतरावा लागतो आणि पुन्हा दुसरा तेवढाच घाट चढावा लागतो. उंचावरून गंगटोकहून रुमटेक दिसते आणि उलट रुमटेकहून गंगटोक दिसते.

## रुमटेक मॉनेस्ट्री

रुमटेकची मॉनेस्ट्री खूपच मोठी आहे. तशा इथे दोन मॉनेस्ट्रीज आहेत. एक जुनी आणि प्रवाशांना दाखवतात ती नवी. मूळ मॉनेस्ट्री चौथ्या चोगालने बांधलेली होती. १६ वा दलाई लामा तिबेटहून जेव्हा भारतात आला, तेव्हा नवी मॉनेस्ट्री बांधून होईपर्यंत जुन्या मॉनेस्ट्रीत राहिला होता. रुमटेकला बौद्ध भिक्षुजींसाठी स्वतंत्र गुंफा आहे. आम्ही मॉनेस्ट्रीच्या दारात पोचलो आणि आमची बस ठेचकाळून बंद पडली. स्टिअरिंग व्हील लॉक दगडाच्या धक्क्याने तुटले. हेच घाटात घडले असते, तर मोठा ॲक्सिडेंट झाला असता. कारण लॉक तुटल्यावर चाक कुठेही वळू शकते. ड्रायव्हर, कंडक्टर वगैरेंनी तासभर खटपट करून गाडी दुरुस्त केली. त्यामुळे आम्ही संध्याकाळी पाचऐवजी सहा वाजता गंगटोकला परतलो.

आम्ही रुमटेक मॉनेस्ट्रीत शिरलो, तेव्हा दुपारी चारची प्रार्थना चालू होती. त्यासाठी सर्व भिक्षू एकत्र जमले होते. दरवाजावरील पडदे पाडले होते. पठण, प्रार्थना, घंटानाद यांनी वातावरण भारलेले होते. या मॉनेस्ट्रीवरील पेंटिंग्ज प्रेक्षणीय आहेत. मॉनेस्ट्रीचे काही नवे बांधकाम चालू आहे. आम्ही तेथील मुख्य ऑर्किटेक्टशी ओळख करून घेऊन गप्पा मारल्या.

रुमटेकला आणखी पाहण्यासारखे काहीच नाही, तेव्हा गाडी दुरुस्त होईपर्यंत कुठे चहा मिळतो का पाहावे, म्हणून आम्ही मॉनेस्ट्रीशेजारच्या 'हॉटेल रुमटेक' नावाच्या, नव्याने निघालेल्या लॉजमध्ये घुसलो. त्याचे मॅनेजर 'कुंगा दलाई' यांच्याशी गप्पागोष्टी केल्या. तळमजल्यावरील दरीत डोकावणाऱ्या डायनिंग हॉलमध्ये बसून चहाही घेतला. मॅनेजरने हॉटेलचा सूटही उघडून दाखवला.

आमच्यापाठोपाठ, आमच्याच बसमधील एक उतारवयीन प्रौढ जोडपे हॉटेलच्या कॅन्टीनमध्ये आले होते. त्यातील पुरुषाने कोणत्यातरी मोदकासारख्या दिसणाऱ्या पदार्थाची ऑर्डर दिली. तो पदार्थ शाकाहारी आहे, असे तो समजत होता. पहिला घास खाताच लक्षात आले की त्यात बीफ आहे. मग बिचाऱ्याला ढवळून आले. तो अक्षरशः थू थू करत बसला. आम्ही त्याला पानपराग दिला,

तेव्हा त्याला थोडे बरे वाटले. तिथले स्थानिक लोक आणि हॉटेलचा मॅनेजरसुद्धा त्याची गंमत पाहून चेष्टामस्करी करत होते. त्या बिचाऱ्या बंगाल्याचा चेहरा मात्र फोटो काढण्यासारखा झाला होता. पाचनंतर आम्ही रुमटेकहून निघालो आणि नॉनस्टॉप गंगटोकला आलो.

**परतीचा प्रवास**

४ मे रोजी आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. गंगटोकहून अकराची बस पकडून आम्ही दुपारी चार वाजता सिलीगुडीत पोचलो. तिथून सायकलरिक्षाने जलपैगुरी स्टेशनवर गेलो. कॅन्टीनमध्ये ब्रेड-आम्लेटवर ताव मारला. सात वाजता सुटणाऱ्या दार्जिलिंग मेलमध्ये आम्हाला सीट्सचे रिझर्वेशन मिळालेले होते. संध्याकाळी साडेसहा वाजता समजले की, आदल्या दिवशी कुठेतरी ॲक्सिडेंट झाला होता आणि त्यामुळे ही मेल रद्द होणार होती. पूर्ण गाडीच कॅन्सल होणार म्हटल्यावर सगळीकडे धावपळ, गडबड-गोंधळ सुरू झाला. काही लोक कामरूप एक्सप्रेसमध्ये घुसले, तर कोणी जनता एक्सप्रेस पकडली. फर्स्टक्लास, डायनिंग कार सगळीकडे गर्दीच गर्दी झाली. तरीही अनेकांना जागा नव्हती, तेव्हा लोकांनी स्टेशनमास्तरला घेराओ घातला. आम्हीही त्यात सामील झालो. शेवटी रात्री दहाच्या सुमाराला स्पेशल ट्रेन सोडली. गर्दी कमी झाल्यामुळे आम्हाला चक्क झोपून येता आले.

ही गाडी हावरा स्टेशनवर न जाता सेलढाला जाते. तेथून टॅक्सी पकडून जायचे ठरवले, तरी आम्ही दुसऱ्या दिवशी दुपारी अडीच-तीनच्या आत हावड्याला पोचणे शक्य नव्हते आणि आमचे तर १-४० च्या गीतांजलीचे बर्थ्स रिझर्व्ह केलेले होते. आता काय करायचे ? टी.सी. ने सल्ला दिला की बारद्वानला उतरा आणि लोकल पकडून हावराला जा. त्याप्रमाणे अकरा वाजता आम्ही बारद्वानला उतरलो. अर्धा तास लोकल नव्हती; पण तेवढ्यात बॉम्बे-हावरा एक्स्प्रेस स्टेशनमध्ये घुसली. ती पकडून सव्वा वाजता धापा टाकत हावरा स्टेशनवर पोचलो. गीतांजली उभीच होती. आमच्या जागा शोधून काढल्या. पुरीभाजी खाल्ली. तोवर गाडी सुटलीही. ट्रेन मिळवण्यात आम्ही अखेर यशस्वी झालो होतो. मग गीतांजलीने भुसावळ आणि भुसावळहून बसने धुळे, असा प्रवास करत सहा तारखेला रात्री आम्ही घरी पोहोचलो. पंधरवड्याचा प्रवास आता संपला होता.

□

विभाग ४

# कुमाऊ प्रदेश

# कुमाऊ भाग

हिमालयातील अनेक सुंदर हिलस्टेशन्सपैकी काश्मीर, दार्जिलिंग आणि नैनीताल या तीन ठिकाणांना आम्ही दोन वेळा भेट दिली आहे. कुमाऊ भागामध्ये नैनीताल-राणीखेत-आल्मोडा आणि कौसानी ही चार हिलस्टेशन्स येतात.

नैनीतालला १९८४ मध्ये आणि १९८९ मध्ये अशा दोन वेळा आम्ही गेलो आहोत.

८४ च्या मे महिन्यात नैनीतालला जाण्याचा बेत ठरवला, तेव्हा फक्त दहा दिवसांची सवड होती. त्यामुळे कानपूर, लखनौ आणि नैनीताल ही तीनच ठिकाणे आम्ही डोळ्यासमोर ठेवली होती. धुळ्याहून बॉम्बे-लखनौ एक्स्प्रेसला दोन बर्थस्‌चा कोटा आहे. आम्ही ते रिझर्वेशन आधीच करून टाकले होते. चाळीसगावला आम्ही ती गाडी पकडली. २७ एप्रिलला कानपूर पाहिले आणि २८ एप्रिलला दुपारी लखनौला पोचलो.

# लखनौ

लखनौ हे इतिहासप्रसिद्ध नबाबांचे शहर. 'चौदहवी का चांद', 'शतरंज के खिलाडी' आणि 'उमराव जान' या चित्रपटांतून या लखनौ शहराचे, तेथील मुस्लीम नबाबी संस्कृतीचे, मुजरा नृत्याचे दर्शन आम्ही घेतले होते. त्यामुळे लखनौबद्दल बऱ्याच काव्यमय कल्पना मनात होत्या; पण चित्रपटांतील लखनौ

आणि प्रत्यक्षातील लखनौ यात बराच फरक जाणवला. मला तर हे गाव बकाल वाटले. लॉजेसही साधारण होती. स्टेशनजवळची बंगाली हॉटेल, शर्मा हॉटेल ही नापसंत करून आम्ही 'कावेरी'त उतरलो. स्टेशनजवळ पण थोड्या आतल्या बाजूला असलेले हे लॉज स्वच्छ होते. सर्व्हिस चांगली होती आणि रेट्स रिझनेबल होते. अटॅच बाथ असलेल्या रूमचे भाडे फक्त पन्नास रु. होते. दुसऱ्या दिवशी बुधवारी लखनौतील दुकाने बंद असतात, असे कळल्यामुळे आम्ही आमची खरेदी त्याच दिवशी उरकली. तिथे चिकनचे भरतकाम केलेले कापड, तयार कपडे व साड्या स्वस्त मिळतात. लखनौचे शॅडोवर्कचे भरतकाम प्रसिद्ध आहे. त्यामुळे खरेदी तर करायचीच होती. फसवणूक होऊ नये म्हणून आम्ही गव्हर्नमेंटच्या दुकानात गेलो. साड्या, पंजाबी सूट, लखनवी झब्बे यांचे मोठे पार्सल हातात घेऊन आम्ही बाहेर आलो. शेजारच्या 'सिंध हॉटेल'मध्ये चिकन, पराठे, पुलाव आणि लस्सी असे भरगच्च जेवण करून, पान चघळत चालू लागलो.

आमचे रिझर्वेशन लखनौपर्यंतचेच होते. पुढे नैनीतालला कसे जावे, बसने की ट्रेनने, याची चौकशी करण्याकरिता आम्ही स्टेशनवर गेलो, तेव्हा समजले की, लखनौहून नैनीतालला सरळ बस नाही. (दिल्लीहून मात्र अशा बसेस आहेत. ८९ मध्ये आम्ही व्हाया दिल्ली नैनीतालला गेलो. त्या वेळी दिल्ली-नैनीताल लक्झरी बसचे तिकीट नव्वद रुपये होते.) आता रेल्वेशिवाय दुसरा मार्गच नव्हता. दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता लखनौ-काठगोदाम गाडीने जायचे ठरवले. आश्चर्य म्हणजे आम्हाला बर्थ्‌सचे रिझर्वेशनही मिळाले.

## लखनौ-साईटसीइंग

लखनौमध्ये स्थलदर्शनासाठी बस नाही. दहा-बारा लोकांची पार्टी असेल, तर स्टेशनवरून एक मेटॅडोर मिळते; पण एरवी मात्र सायकलरिक्षातून गाव पाहावे लागते. सर्व प्रेक्षणीय स्थळे दाखवायला रिक्षावाला वीस-पंचवीस रुपये घेतो. तशी लखनौमध्ये चार-पाच स्थळेच पाहण्यासारखी आहेत. बाकीची रिक्षातून जाताजाता रस्त्यावरूनच नजर टाकावी, अशी आहेत. युनिव्हर्सिटी कॉलेज, छोटे पार्कस, आकाशवाणी केंद्र आम्ही बाहेरूनच पाहिले. ग्लोब पार्कही १५-२० मिनिटांत पाहून झाला.

'शहीद स्मारक' मात्र मला आवडले. नदीकाठी असलेला हा आकर्षक पार्क

नेहरूंचे निधन झाले त्या वर्षी १९६४ मध्ये निर्माण झाला. 'शहीद स्मारक' किंवा 'नेहरू उद्यान' या नावाने तो ओळखला जातो. संध्याकाळी आम्ही पुन्हा तिथे फिरायला गेलो. तशी तिथे बोटिंगची सोय होती, पण त्या गुडघाभर पाण्यात बोटिंग करण्याची इच्छाच नव्हती. कॅन्टीनमध्ये चहा मात्र घेतला. पार्कच्या समोरच्याच 'खादी भवन'मध्ये कॉटनचे रेडिमेड कपडेही खरेदी केले.

लखनौत आवर्जून पाहण्याजोगे ठिकाण म्हणजे इतिहासप्रसिद्ध 'इमामवाडा'. तेथील नबाबांची ही ऐतिहासिक भव्य वास्तू प्रेक्षणीय आहे. अनेक कमानी, घुमट, जिने, छोटे रस्ते असलेला तिथला 'भूलभुलैया' पाहायचा, तर गाईडलाच घेऊन जायला हवे. तसे केले नाही, तर अंधाऱ्या बोळातून, चढउताराचे रस्ते तुडवत कितीही फिरलो तरी मार्ग सापडणार नाही. इमामवाड्याच्या शेजारीच **'जामा मसजिद'** आहे. तिची इमारतही प्राचीन व भव्य आहे; पण तिथे हिंदूंना प्रवेश नसल्याने, ती बाहेरूनच बघण्यात समाधान मानावे लागते. इमामवाड्याच्या आजूबाजूला दाट वस्ती आहे. नबाबाच्या या प्राचीन राजवाड्याच्या ओवऱ्यांमध्ये काही गरीब कुटुंबांनी आश्रय घेतलेला असल्याने सर्वत्र अस्वच्छता व दारिद्र्य यांचे दर्शन घडते. दाराशी काही विक्रेत्यांनी स्टॉल्स मांडले आहेत. तिथे लखनौतील प्रेक्षणीय स्थळांचे फोटो, हस्तिदंताच्या छोट्या वस्तू, साडीपिना, नेकलेस वगैरे विक्रीला ठेवलेल्या होत्या. दिवसभराच्या धावपळीने थकवा आला होता, पण रात्री गाडीत विश्रांती मिळणारच होती. रात्री आठ वाजता आम्ही लखनौ-काठगोदाम रेल्वे पकडण्यासाठी स्टेशनवर हजर झालो. या मीटरगेज रेल्वेसाठी लखनौ स्टेशनजवळचा एक चिमुकला अलग भाग आहे. रात्री नऊ वाजता निघालेली ही ट्रेन दुसऱ्या दिवशी आठ-साडेआठपर्यंत काठगोदामला पोहोचायला हवी होती, ती दहा वाजता पोहोचली. काठगोदाम हे अखेरचे स्टेशन. त्याआधी लागते 'हल्दानी'. बहुतेक लोक हल्दानीलाच उतरतात. तिथून नैनीतालला जाण्यासाठी टॅक्सीज मिळतात. प्रत्येक टॅक्सीत पाच सीट्स घेतात. आम्ही एका सरदारजीच्या टॅक्सीतील पुढच्या दोन सीट्स पकडल्या..मागे दुसरे तीन उतारू बसले. प्रत्येकी बावीस रु. द्यायचे ठरले होते. सरदारजी गाडी छान चालवत होता. घाटातील वळणे घेत वेगाने पण सावधपणे टॅक्सी चालू होती. सरदारजीचे तोंडही चालू होते. तो मोठा गोष्टीवेल्हाळ दिसला. आम्ही मूळ पुण्याचे आहोत हे कळताच तो खूष झाला. कारण दहा-बारा वर्षांपूर्वी तो काही काळ पिंपरीला नोकरी करत होता. ह्यांच्या व

त्याच्या गप्पा चालू होत्या. मागे बसलेले मारवाडी प्रवासी मात्र गुपचूप ऐकत होते. त्याने आम्हाला एस.टी. स्टॅन्डवर सोडले. टॅक्सी गावात न्यायची असेल, तर टोल नाक्यावर २० रु. जादा भरावे लागतात. नैनीतालमध्ये सायकलरिक्षा बऱ्याच आहेत. या रिक्षावाल्यांमध्ये स्पर्धा नसावी आणि सर्वांना काम मिळावे, या हेतूने म्युनिसिपाल्टीने तिथे चांगली सोय केली आहे. एस.टी. स्टँडजवळ एक आणि गावाच्या टोकावर एक अशी नाकी आहेत. तिथे दोन रुपये भरून तिकीट घ्यायचे आणि नाका कारकून ज्याचा नंबर पुकारेल त्या रिक्षात बसायचे. रिक्षावाल्याला पैसे न देता हे तिकीट द्यायचे. आम्ही इतके बावळट की, प्रत्येकी दोन रुपये दर आहे, असे समजून पैसे भरत होतो. दोन दिवसांनी लक्षात आले की, एका रिक्षाला दोन रुपये असा दर आहे. रिक्षात दोन माणसे बसली तरीही दर तोच.

# नयनरम्य नैनीताल

नैनीतालचे वैशिष्ट्य म्हणजे हे गाव निसर्गरम्य अशा भव्य तळ्याभोवती वसलेले आहे. एवढे मोठे तळे दुसऱ्या कुठल्याही हिलस्टेशनवर नाही. तळ्याच्या भोवताली चारी बाजूंनी हॉटेल्स आणि बंगले विखुरलेले आहेत. तलावाच्या दक्षिणेकडील भागाला तल्लीताल म्हणतात, तर उत्तरेकडील भागाला मल्लीताल. बसस्टॅन्ड तल्लीतालला आहे, तर बाजारपेठ व नैनादेवीचे मंदिर मल्लीतालला आहे. मधून मालरोड जातो. मालरोडमध्येही एक वरचा रस्ता आणि एक खालचा रस्ता आहे. वरच्या रस्त्याने मोटारी, सायकलरिक्षा वगैरे वाहने जातात, तर खालच्या रस्त्याने पादचारी आणि घोडे जातात. स्टॅन्ड ते मल्लीताल सायकलरिक्षा धावत असतात. त्यांचा दोन रुपये दर कोणालाही परवडेल असा आहे. त्याशिवाय होडीत बसूनही तल्लीताल ते मल्लीताल जाता येते. इतर हिलस्टेशन्सना वाहतूकखर्च फार येतो. इथे सायकलरिक्षा स्वस्त आहे.

हाताने ओढायच्या रिक्षाही इथे आहेत, पण त्यांना गावात प्रवेश नाही. हनुमानगढीला जाण्यासाठी त्यांना परवाना आहे. दोन माणसे पुढे रिक्षा ओढायला, एक माणूस मागून ढकलायला, अशी तीन माणसांची मेहनत त्यासाठी लागते. या रिक्षात दोन माणसे बसू शकतात. हनुमानगढीला जायला पंचवीस रु. घेतात. छोट्याशा टेकडीवर हनुमानमंदिर आहे. रिक्षा मात्र पायथ्यापर्यंतच जाऊ शकते. मंदिरात प्रेक्षणीय काही नाही, पण रस्ता सुंदर आहे. या बाजूला वस्ती अगदी विरळ आहे. उंचावर दहा-वीस बंगले आहेत तेवढेच. रात्रीच्या अंधारात वळणावरून जाणाऱ्या मोटारींचे फक्त दिवे दिसतात.

## लॉजेस आणि भोजनव्यवस्था

नैनीतालची बरीचशी हॉटेल्स मेनरोडवर आणि लेकच्या शेजारीच आहेत. अलका, एव्हरेस्ट व इंडिया ही शेजारी शेजारी असलेली हॉटेल्स व थोडे पलीकडे असलेले नटराज अशी चार हॉटेल्स आम्ही पाहिली. सगळी चांगली होती. चार-पाच मजली होती. ८९ मध्ये आम्ही दुसऱ्यांदा नैनीतालला गेलो त्या वेळी राहिलो ते 'एलफिन्स्टन'ही चांगले होते. ८४ मध्ये आम्हाला ७० रुपयांत खोली मिळाली होती. ८९ मध्ये सव्वाशे रुपये द्यावे लागले, तरी आम्ही गेलो. तेव्हा खऱ्या अर्थाने सीझन सुरू झाला नव्हता. नुकते कुठे पर्यटक येऊ लागले होते. त्यामुळे रूम चार्जेस, स्थलदर्शनाच्या बसेस, तळ्यामध्ये बोटीतून केलेला प्रवास, घोडे या सर्व गोष्टी आम्हाला वाजवी दराने मिळाल्या. १५ मेनंतर खरा सीझन सुरू होतो आणि प्रत्येक गोष्टीचे भाव दुप्पट होतात. सर्व हॉटेल्स हाऊसफुल असतात. ट्रॅव्हल कंपन्यांच्या गाड्यांत जागा मिळत नाही. रस्त्यावरून चालणे मुष्कील व्हावे इतकी गर्दी असते.

आम्हाला 'अलका' हॉटेलमधील चौथ्या मजल्यावरची खोली मिळाली. सुदैवाने हॉटेलात लिफ्ट होती. तीही स्वयंचलित होती, पण तरीही एक-दोन वेळा वीज गेल्यामुळे चार मजले चढण्या-उतरण्याची कसरत करावी लागली. 'अलका'मध्ये ८० टक्के जोडपी हनीमूनसाठी येतात. त्यामुळे खोल्या फारच सुंदर आहेत. सुंदर डबल बेड, वेल्वेटचा कोच, युरोपियन स्टाईल अटॅच बाथ, चोवीस तास गरम पाणी, रूममध्ये इंटरकॉम व फोन, आदबशीर वेटर्स आणि उत्तम सर्व्हिस. सीझनमध्ये या खोलीचे दर दोनशे रु. रोज असतात. ऑफ सीझनमुळे आम्हाला ती रूम सत्तर रुपयांत मिळाली. हॉटेलच्या प्रत्येक खोलीला

एकेका अप्सरेचे नाव दिले आहे— रंभा, उर्वशी, मेनका, झीनत, जहाँआरा वगैरे. शोकेससारख्या जाड काचा वापरून तयार केलेल्या या खोल्यांना सर्व बाजूंनी सुंदर पडदे लावले आहेत. पडदा बाजूला केला तर खोलीमध्ये बसल्या बसल्या तळ्याचे, पर्वतराजीचे सुंदर दृश्य दिसते. खोलीबाहेरच्या छोट्या बाल्कनीत गार्डनचेअर्स टाकलेल्या आहेत. तुम्ही खाली डायनिंग हॉलमध्ये न जाता तुमचे जेवण किंवा चहा इथे मागवू शकता आणि चांदण्यांत तळ्याकाठी बसून भोजनाचा आनंद लुटू शकता. इथले जेवण चविष्ट असले तरी ख़ूपच महागडे होते. हॉटेलमध्ये जेवलेच पाहिजे., असे बंधन नसल्याने आम्ही दुसऱ्याच दिवशी गावातले 'ग्रीन्स हॉटेल' शोधून काढले आणि अधिक चविष्ट जेवण अर्ध्या दरामध्ये मिळवले. चहा आणि नाश्ता मात्र आम्ही 'अलका'त घेत होतो. जोडप्यांना गप्पागोष्टी करत बसण्यासाठी जो हॉल होता त्याला हॉटेलमालकाने रसिकतेने 'युगलखाना' असे नाव दिले होते. टेरेसवर चिमुकले गार्डन करून कुंड्यांमधून छोटी शोभिवंत झाडे लावली होती. तलावातून संथपणे हिंडणाऱ्या साध्या व शिडाच्या नावा, कलकल करणारी बदके, पलीकडच्या काठावरचे चिमकले हनुमानाचे मंदिर, हिरवीगार पर्वतराजी हे सारे दृश्य हृदयावर अक्षरशः कोरले गेले आहे.

भोजनाच्या दृष्टीने आपल्या खिशाला परवडतील अशी दुकाने तिथे आहेत. तिथले स्थानिक लोक 'लक्ष्मीभवन'चा आश्रय घेताना दिसले. तिथे साडेतीन रुपयांत छोले भटुरे मिळत होते. पाच रुपयांत डबल आमलेट होते. अडीच रुपयांत मोठा ब्रेड मिळत होता. स्टॅन्डजवळ 'अन्नपूर्णा' हॉटेलमध्ये गुजराथी थाळी मिळते. खिचडी-कढीचा बेत असतो. दरही वाजवी आहेत. आम्ही पसंत केलेले 'ग्रीनस् हॉटेल' मल्लीतालच्या बाजारपेठेत होते. सरदारजीच्या या हॉटेलमध्ये मांसाहारी पदार्थ उत्तम मिळतात. मंद दिवे, सुमधुर संगीत, अदबीने वागणारे वेटर्स असे वातावरणही चांगले आहे. तिथल्या कबाबांची चव अजून आठवते आहे. प्रत्येकी वीस रुपये खर्च केले, तर तिथे उत्तम भोजन मिळू शकते.

## शॉपिंग

अलका हॉटेलच्या तळमजल्यावरच क्युरिओ आहे. तिथे अनेक कलात्मक वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. मूर्ती, धातूचे व खड्यांचे अलंकार, पर्सेस, हेअरक्लिप्स, मुरादाबादच्या पितळी व ब्रांझच्या वस्तू तिथे होत्या. नैनीतालचे

खास वैशिष्ट्य म्हणजे विविध रंगांच्या आणि आकारांच्या मेणबत्त्या. त्यांच्यामध्ये वात असते म्हणून त्यांना मेणबत्या म्हणायचे, नाहीतर ते सुंदर मेणाचे पुतळे आणि मूर्तीच होत्या. दोन इंची मेणबत्तीपासून ते तीन-चार फुटी मेणबत्तीपर्यंतचे विविध आकार त्यात होते. आकर्षक रंग. अगदी एकाच मूर्तीत वेगवेगळ्या रंगच्छटा होत्या. श्रीकृष्ण, मीराबाई वगैरे शिल्पाकृती मोहक होत्या. गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त तिथे विराजमान झाले होते. अजंठातील शिल्पाकृती, नग्न स्त्रीचे पुतळे लक्ष वेधून घेत होते. नैनीतालला येणारे प्रवासी मोठ्या प्रमाणावर या कलात्मक मेणबत्त्या खरेदी करतात आणि आपापल्या शहरात परत गेल्यानंतर नातेवाइकांना व मित्रमंडळींना भेट देतात. त्यांची किंमत पाच रुपयांपासून पन्नास-साठ रुपयांपर्यंत असते. मूर्तीचा आकार, रंगसंगती व सौंदर्य यावर किमती अवलंबून असतात. नैनीतालची अशी ही एवढीच खास खरेदी करण्यासारखी वस्तू. बाकी नैनीतालमध्ये काहीच तयार होत नाही.

मालरोडवर मोहात घालणारी अनेक दुकाने आहेत. वुलनच्या वस्तू, स्वेटर्स, शाली, लाकडी कोरीव कामाच्या वस्तू, मुरादाबादी वस्तू, मेणबत्त्या, फोटो व पेंटिंग्ज, नेपाळी वस्तू. या सर्व दुकानांची गर्दी मालरोडवरच आहे. त्याशिवाय थंड पेये आणि आइस्क्रीमची दुकाने– ज्यामध्ये गेलॉर्ड आणि कॉलिटी ही विशेष प्रसिद्ध आहेत. कोणतेही आइस्क्रीम घ्यायचे, तर कमीत कमी पाच रु. पडतात. पायनॅपल ज्यूसच्या स्टॉलवर दोन रुपयात ज्यूसचा चिमुकला ग्लास मिळतो.

नैनीतालमध्ये निवास व भोजन यासाठी किमान दीडशे रुपये रोज खर्च येतो आणि तोही सीझन नसताना. त्याशिवाय स्थलदर्शन, बोटिंग, चहापाणी यासाठी खर्च येतो तो वेगळाच. तल्लीतालला 'विशाल टॉकीज' आणि मल्लीतालला 'कॅपिटॉल' थिएटर आहे. तिथे आम्ही वेळ घालविण्याकरिता– 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यूं आता है ।' हा चित्रपट पाहिला. कॅपिटॉल थिएटरच्या कंपाउंडमध्ये एका हॉलमध्ये स्केटिंग करण्याची सोय आहे. जवळच प्लेग्राऊंड आहे. नैनादेवीचे मंदिरही जवळ आहे. थिएटरच्या कॅन्टीनमध्ये उत्तम केक्स मिळाले.

## साईटसीइंग टूर्स

'अलका' हॉटेलच्या टूरिस्ट बसेस आजूबाजूची स्थळे दाखवतात; पण

त्यांचे दर इतरांपेक्षा जास्त आहेत. मालरोडवर गव्हर्नमेंट टूरिस्ट ऑफिस आहे. त्यांच्याही बसेस आहेत. भीमताल, सतताल, कौसानी, राणीखेत, अल्मोडा वगैरे ठिकाणे त्या दाखवतात. त्या त्या स्थळी त्यांची उत्तम रेस्ट हाऊसेस असल्यामुळे त्यांच्याबरोबर जाणे अधिक फायदेशीर ठरते. त्यांचे दरही वाजवी आहेत. त्याशिवाय क्रांती, हिलटॉप, त्रिशूल, अनामिका, जितू वगैरे प्रवासी कंपन्या नैनीतालमध्ये आहेत. त्यांचे एजंट्स् गावात व स्टॅन्डजवळ फिरत असतात. ऑफ सीझनमध्ये ते आपल्याला सवलतही देतात. आम्ही गव्हर्नमेंटच्या टूरिस्ट बसने एक दिवसाची एक छोटी टूर केली आणि 'अनामिका' बसबरोबर कौसानी, अल्मोडा, राणीखेत ही सहल केली.

'सन व्ह्यू' पॉइंटला घोड्यावरून गेले, तर प्रत्येकी पंधरा रु. पडतात. अलीकडे तिथे 'रोप रेल' सुरू झाली आहे. त्यामुळे घोडेवाल्यांवर संकट आले आहे. आम्ही ८४ मध्ये घोड्यावरून तिथे गेलो होतो, तर ८९ मध्ये 'रोप रेल'ने. रोप रेलचे प्रवासी अर्धा तास तरी तिथे थांबतात. त्यामुळे खाद्यपदार्थांची दुकाने तिथे आहेत. झगमगीत पोषाख घालून फोटो काढून घेण्याची सोयही उपलब्ध आहे. उंचावरून नैनीतालच्या तळ्याचे दृश्य फार छान दिसते. अक्षरशः विहंगमावलोकनाचा आनंद लुटता येतो.

## निवांत नैनीताल

नैनीतालला जाण्याच्या अगोदर आम्हाला बऱ्याच जणांनी सांगितले होते की, हे छोटे हिलस्टेशन तुम्हाला आवडणार नाही. आदल्याच वर्षी आम्ही मसुरीला गेलो होतो, तेव्हा खाणींमुळे तिथले निसर्गसौंदर्य उद्ध्वस्त झालेले पाहून उदास झालो होतो. त्यामुळे नैनीतालबद्दलही साशंक होतो. दोन दिवस तिथे राहून पुढे सिमल्याला पळायचे, असा आमचा बेत होता; परंतु नैनीताल आणि एकंदरच कुमाऊ म्हणून ओळखला जाणारा हा हिमालयाचा भाग आम्हाला इतका आवडला की, पुढे सिमल्याला जाण्याचा विचार रद्द करून, आम्ही आमचा तेथील मुक्काम वाढवला.

खुद्द 'नैनी'त चार-पाच दिवस राहिलो. कौसानी आणि राणीखेत इथेही मुक्काम केला, तरीही पूर्ण समाधान झाले नाही. पुन्हा पाच वर्षांनी आम्ही तिथे गेलो. अबूला किंवा मसुरीला असे वाटले नव्हते. काश्मीरच्या खोऱ्याच्या खालोखाल आम्हाला नैनीतालच आवडले. हिरव्यागार वनराईने नटलेला निसर्ग,

दूरवरची हिमाच्छादित शिखरे, चेरी ख्रिसमस ट्री किंवा पाईन वृक्षांची जंगले, घाटातले वळणावळणांचे पण धोकादायक नसलेले रस्ते, निळ्याशार अथांग पाण्याची सरोवरे, पक्ष्यांचा किलबिलाट हे निसर्गसौंदर्य कोणाच्या मनाला भुरळ घालणार नाही ! नैनीताललला हिम नाही, पण हिमालयातील हिरवेगार उत्तुंग वृक्ष मात्र आहेत. नैनीतालचे तळे मोहिनी घालणारे आहे. तळ्याकाठचे नैनादेवीचे चिमुकले मंदिर लक्षवेधक आहे. सरोवरातील साध्या आणि शिडाच्या बोटी भुरळ घालणाऱ्या आहेत. नैनीतालच्या पाच दिवसांच्या मुक्कामात तेथील सरोवरात आम्ही दहा-बारा वेळा तरी नौकाविहार केला. बदकांना चणे टाकत गप्पागोष्टी केल्या. अंगावर ब्लँकेट्स घेऊन रात्रीच्या चांदण्यात बाल्कनीत बसून गप्पांची मैफल रंगवली. पंचवीस वर्षांतील सहजीवनाच्या आंबट-गोड आठवणी काढल्या. नेहमीच्या चाकोरीबद्ध जीवनाला अर्धविराम देऊन एक वेगळे चैतन्यमय उत्साही जीवन आम्ही जगलो. प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी प्रवास करायलाच हवा, हे मला पुन्हा पटले. पुन्हा आजूबाजूला सगळी तरुण माणसे. आपली चाळीशी जवळ आलीय हे त्या वेळी विसरले गेले. वाटले— अनिलांप्रमाणे म्हणावे— 'अजून यौवनात मी.'

उत्तर प्रदेशातील लोकांचे नैनीताल हे आवडते हनिमूनचे ठिकाण आहे. भरपूर मेकअप केलेल्या, लाल साडीतल्या किंवा झगझगीत-सुळसुळीत पंजाबी ड्रेसमधल्या स्त्रिया आणि कोरे करकरीत सूट घातलेले पुरुष, हातात हात घालून फिरताना दिसत होते. या स्त्रिया काळ्यासावळ्याच असतात, पण बेसुमार नटतात. माझा महाराष्ट्रीय गृहिणीचा अवतार पाहून त्यांचे मनोरंजन झाले असणार हे निश्चित.

## मिनी टूर

दोन-तीन दिवस आराम केल्यानंतर, गव्हर्नमेंटच्या टूरिस्ट बसमधून आम्ही एक मिनी टूर केली. कैची टेंपल, भीमताल, सतताल, गोरखमंदिर वगैरे ठिकाणे पाहिली. या टूरसाठी प्रत्येकी पंचेचाळीस रु. द्यावे लागले. खरे म्हणजे ही सर्व ठिकाणे जवळ आहेत. स्थानिक बसेसनी गेले, तर पंधरा-वीस रुपयांत सारे पाहता येते, पण प्रवाशांना सारेच अपरिचित असल्याने थोडे जास्त पैसे गेले, तरी टूरिस्ट बसमधून जाणेच सुरक्षित वाटते.

## कैची टेंपल आणि गोरखमंदिर

कैची टेंपलला जाण्यासाठी घाटातून थोडे खाली उतरावे लागते. वरून जो टाररोड जातो तिथून मंदिर असलेला भाग कात्रीच्या आकाराचा दिसतो, म्हणून त्याचे नाव कैची टेंपल. मंदिराशेजारूनच एक चिमुकली नदी वाहते. मंदिराकडे जाणारा पायऱ्यापायऱ्यांचा उताराचा रस्ताही सुरेख आहे. हे मंदिर मुळात तिथल्या कोणातरी साधूने बांधले होते. आता त्याची व्यवस्था बिर्ला ट्रस्टतर्फे ठेवली जाते. मंदिर फार स्वच्छ आहे. आवारात सुंदर गुलाबाची झाडे आहेत. फुले तोडायला मात्र मनाई आहे. आत फोटोही काढू देत नाहीत. तिथल्या सर्व मंदिरांत रोज ठराविक वेळी गायक भजने गात असतात आणि लाऊडस्पीकरवरून सर्व आवारात तो आवाज घुमत असतो. कैची मंदिरातही भजन सुरू होते.

'कैची टेंपल'ला पायऱ्या उतरून खाली जावे लागते, तर गोरखमंदिरात चढ चढून जावे लागते. हे मंदिर छोटे व साधेसुधे आहे; पण तरीही भाविक तिथे आवर्जून जातात. कारण आपण परमेश्वराजवळ इथे जे मागतो, ती इच्छा पूर्ण होते. मात्र इच्छा पूर्ण झाल्यावर पुन्हा इथे दर्शनाला यायला हवे. नाहीतर काहीतरी वाईट घडण्याची भीती असते. मला देवाजवळ काहीच मागायचे नसल्याने मी खालूनच हात जोडले. हे मात्र उत्साहाने चढ चढून गेले. मी आसमंतातील सृष्टिसौंदर्य न्याहाळत होते. दूरवर 'भीमताल' हे सरोवर दिसत होते. माझ्या आवडत्या ख्रिसमस ट्रीज तर तिथे शेकड्याने होत्या. फूटभर उंचीच्या रोपापासून ते शंभर फुटांपेक्षा उंच काही झाडे होती. एखादे रोप चोरून न्यावे, असा मोह मला सतत होत होता; पण हिमालयाच्या थंड हवेतील ते उत्तुंग झाड, धुळ्याच्या गरम हवेतील आमच्या पर्णकुटीत जगणार नाही, हे माहीत असल्याने, मोठ्या कष्टाने मी तो मोह टाळला.

## नवताल– भीमताल-सतताल

नैनीताल हे तलावांचेच शहर आहे. भीमताल जवळ असले, तरी आमची बस प्रथम गेली '**नवताल**'ला. त्याला म्हणे नऊ वळणे आहेत. जो ह्या नऊ वळणांच्या जागी जाईल तो लक्षाधीश होईल, अशी आख्यायिका तिथे सांगतात. नैनीतालसारख्या सौंदर्यस्थळांना भेट देणारी माणसे आधीच श्रीमंत असणार, हे गृहित धरून ही आख्यायिका निर्माण झाली असावी. तिथे जवळच मिलिटरीचा छोटा कॅम्प आहे. टूरिस्ट बंगल्यात आधी ऑर्डर दिली, तर चहाची सोय आहे.

तिथले गव्हर्नमेंटचे रेस्ट हाऊस मात्र दूर आहे. तलाव ओलांडून पलीकडे गेल्यावर आपण तिथे पोहोचतो. नवताललला स्वतःच चालवायच्या दोन माणसांसाठी असलेल्या 'पॅडलबोट्स' भाड्याने मिळतात. त्यांचे भाडे बारा रुपये तास आहे. बस थोडाच वेळ थांबणार असल्याने आम्ही पंधरा मिनिटांसाठी बोट भाड्याने घेऊन जलविहाराचा आनंद लुटला.

येताना आम्ही **'भीमताल'**ला थांबलो. श्रीनगरच्या चारचिनारप्रमाणे किंवा नेहरू पार्कप्रमाणे इथे तलावाच्या मध्यभागी छोटे बेट आहे. त्यावर गार्डन रेस्टॉरंट आहे. तिथे नावेतून जाऊन यायचे तर आठ रुपये पडतात. नाव मोठी असल्याने एका वेळी चार-पाच माणसे बसू शकतात. काही शिकारेही आहेत. आमच्या शिकाऱ्यात बसचा बोलघेवडा गाईडच शिरला, त्यामुळे नावेचे पैसे आम्हीच दिले. गार्डन रेस्टॉरंटमध्ये जेवण साधारणच असते. अर्थात त्याची पूर्वकल्पना असल्याने आम्ही बरोबर ब्रेड, बटर, उकडलेली अंडी घेतली होती. तिथे फक्त भात व गरमागरम दालफ्राय मागवले. या चिमुकल्या बेटावर मोठ्या रसिकतेने वेगवेगळी फुलझाडे लावलेली आहेत. विविधरंगी गुलाबपुष्पे तर विपुल आढळतात.

**'सतताल'** या शेवटच्या स्टॉपवर पोहोचेपर्यंत संध्याकाळ झाली होती. सतताललला पाणी अडवून एक छोटे धरण बांधले आहे. बहुतेक धरणांजवळ असते तशी तिथे चिमुकली बाग आहे. फक्त लाकडाचा वापर करून बांधलेले— भिंती, जमीन व छप्पर लाकडाचेच असलेले इथले रेस्ट हाऊस फार सुंदर आहे. उत्तम फर्निचर असलेले दोन-तीन सूट्स तिथे आहेत. केवळ पन्नास रुपयांत सूट मिळू शकतो; परंतु हे रेस्टहाऊस जंगलात असल्याने एकाकी वाटते. दिवसभरात स्थलदर्शनासाठी येणाऱ्या दोन-तीन बसेस सोडल्या, तर इथे रहदारी अजिबात नाही. तेव्हा पाच-सात माणसे असतील तरच इथे राहणे सुरक्षित वाटेल. एरवी एखादे जोडपेच जर तिथे राहिले, तर रात्री भयभीत होण्याची शक्यता जास्त. आम्ही गेलो त्या वेळी ऑफ सीझन असल्यामुळे तिथे चहाव्यतिरिक्त काहीच मिळू शकले नाही.

संध्याकाळी नैनीताललला परतलो, तेव्हा पोटात भुकेने कावळे कोकलत होते. ग्रीन्स हॉटेलमधल्या रुचकर जेवणावर ताव मारला, तेव्हाच खोलीवर परत येता आले. रात्री अकरा वाजले तरी आमच्या गप्पा संपल्या नव्हत्या. शेवटी इंटरकॉमवरून वेटरला दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता उठवायला

सांगितले. कारण दुसऱ्या दिवशी नैनीताल सोडायचे होते. 'अनामिका' ट्रॅव्हल्सच्या बसने आम्ही अल्मोडा, कौसानी आणि राणीखेत पाहायला जाणार होतो. ही टूर दोन दिवसांची असते. एक रात्र कौसानीला मुक्काम करून, दुसऱ्या दिवशी राणीखेत दाखवून संध्याकाळी बस नैनीतालला परत येते. आम्ही मात्र नैनीतालला परत न येता राणीखेतला उतरणार होतो. तिथे एखादा दिवस मुक्काम करून तिकडूनच दिल्लीला परतणार होतो. राणीखेतहून दिल्लीला जाणे आम्हाला जवळ पडले असते.

# अल्मोडा, कौसानी व राणीखेत

## साईटसीइंग टूर

अनामिका ट्रॅव्हल्सच्या बसमधून सकाळी आठ वाजता आमचा प्रवास सुरू झाला. आमचा गाईड तरुण, उत्साही आणि बोलका होता. त्याने दोन-तीन विषयांमध्ये एम.ए. केले होते आणि दुसरी नोकरी मिळत नसल्याने तो गाईडचे काम करत होता. लोकांची चित्रपटविषयक आवड लक्षात घेऊन तो ठिकठिकाणी गाडी थांबवून अमक्या चित्रपटाचे शूटिंग अमुक ठिकाणी झाले, अशी माहिती देत होता. नैनीतालचा घाट उतरताच 'भवाली' गाव दिसू लागले. त्याच्या अलीकडे चार-पाच मैल एक जागा दाखवून तो म्हणाला की 'मधुमती' चित्रपटाचे शूटिंग इथे झाले होते आणि खरोखरच

*'ये आसमा झुक रहा है जमींपर*
*ये मीलन हमने देखा यहींपर ।'*

असे सुंदर दृश्य तिथे पाहायला मिळाले आणि 'सुहाना सफर है ये मौसम हँसी ।' असा अनुभव आला. 'कटी पतंग' या चित्रपटाचे शूटिंगही इथे झाले होते म्हणे.

**'भवाली'** गाव तसे छोटेच आहे, पण ते मध्यवर्ती असल्याने तिथून सर्व

कुमाऊ भागातील बसेस धावतात. तिथे पाईन वृक्ष किंवा तिथल्या भाषेत चेडीची झाडे विपुल आहेत. त्यापासून टर्पेनटाईन करण्याचा व्यवसाय तिथे चालतो. भवालीजवळ टी.बी. सॉनिटोरियम आहे. तिथले औषधोपचार पाईन वृक्षावर आणि निसर्गोपचारावर अवलंबून असतात. इतर औषधे कमी वापरतात. तिथे सफरचंदेही विपुल प्रमाणावर होतात. सफरचंदाच्या पुरवठ्याबाबत भवाली हे भारतातील पाचव्या क्रमांकाचे केंद्र आहे. पीच व बटाटा यांचेही विपुल पीक येथे येते. भवालीचे हे सॅनिटोरियम आशियातील तिसऱ्या क्रमांकाचे आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी कमला नेहरू याच सॅनिटोरियममध्ये होत्या.

कौसानीला जाताना पुन्हा वाटेत 'कैची टेंपल' लागले. 'रानीघाट' नावाच्या गावी दर वर्षी एन.सी.सी. कॅम्पस असतात. त्या बऱ्याच बराकी दिसत होत्या. नंतर 'गरम पानी' नावाचे गाव लागले. पूर्वी तिथे गरम पाण्याचे झरे होते. आता सल्फर दबल्यामुळे ते नाहीत, पण नाव मात्र तसेच राहिले. नंतर 'खैरना' नावाचे गाव लागले. तिथून 'कौसी' नदीची आणि आमची साथ जी सुरू झाली, ती पार कौसानी गाव येईपर्यंत. कौसी नदीवर एक मोठा लाकडी पूल आहे. या गावाजवळून राणीखेत बरेलीकडे फाटे फुटतात. या घाटामधून बद्रीनाथला जायला रस्ता आहे. तिथे पोचायला इथून पाच दिवस लागतात. स्वामी विवेकानंद या 'खैरना' गावाजवळूनच बद्रीनाथला गेले होते. या गावाजवळून कैलासालाही रस्ता जातो.

कौसी नदीवरचा दुसरा एक छोटा ब्रिज ओलांडला की, अल्मोडा जिल्हा सुरू होतो. हिमालयाच्या या भागात 'हिमाचल', 'कूर्माचल' आणि 'गढवाचल' असे तीन विभाग आहेत. कूर्माचल म्हणजेच कुमाऊ भाग. त्यात नैनीताल, अल्मोडा आणि पिथौरगढ असे तीन जिल्हे येतात.

## अल्मोडा

अल्मोडाचे निसर्गसौंदर्य नैनीतालपेक्षा वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. गाईडने आमचे लक्ष दूरवर दिसणाऱ्या पर्वतराजीकडे व हिमाच्छादित शिखरांकडे वेधले. सूर्यप्रकाशात ही शिखरे चमकत होती. ही शिखरे जर लक्षपूर्वक पाहिली नसती, तर ते पांढरे ढगच आहेत, असे वाटले असते. 'करबला' गावी सुप्रसिद्ध नर्तक उदयशंकर यांची नृत्यशाळा होती. सुप्रसिद्ध नट गुरुदत्त आणि आता पाकिस्ताननिवासी झालेली नूरजहाँ या शाळेत होते. अल्मोडा हे

ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे गाव असून पूर्वी ती या भागाची राजधानी होती. त्या काळातील राजांनी इथे मंदिरे बांधली. आताही ते जिल्ह्याचे ठिकाण आहे. तिथे मोठे हॉस्पिटल आहे आणि तिथे रेडिओस्टेशन काढण्याच्या दृष्टीने तयारी चालू होती. हॉटेल नीळकंठ, हॉटेल कैलास किंवा हॉटेल सेव्हॉय ही इथली प्रसिद्ध हॉटेल्स. हॉटेल सेव्हॉयची शाखा नैनीतालला आहे. त्याशिवाय अल्मोडाला मालरोडवर हॉलीडे होम आहे. तसेच आर्यसमाज मंदिर आहे.

अल्मोडाचे हाताने विणलेले कापड, विशेषतः शाली प्रसिद्ध आहेत. 'गांधी खादी भवन' मध्ये त्या मिळतात. उत्तम शाल सुमारे दीडशे रुपयांना— तर पश्मीना चार-पाचशे रुपयांना मिळते. या वस्तू शुद्ध लोकरीच्या असतात खऱ्या, पण काश्मीरप्रमाणे त्यात कलात्मकता आढळत नाही. त्या काहीशा ओबडधोबड व खरखरीत वाटतात. त्यामुळे मी त्या खरेदी करण्याच्या भानगडीत पडले नाही. अल्मोडात खास पाहण्यासारखे स्थळ नाही. नाही म्हणायला बऱ्याच पायऱ्या चढून बोळाबोळांतून आम्ही नंदादेवीचे मंदिर पाहायला गेलो; पण त्या मंदिरात मला तरी उल्लेखनीय असे काही वाटले नाही.

'सोनी' नावाच्या हॉटेलमध्ये आम्ही पंजाबी डिशेस् घेतल्या. तिथली लस्सी प्रसिद्ध असल्याने ग्राहक आवर्जून ती मागवत होते. आम्हीही तिचा आस्वाद घेतला. जवळच असलेले 'ग्लोरी' हॉटेलही जेवणाच्या दृष्टीने चांगले वाटले. अल्मोडा गाव जर विशेष आवडले, तर परत जाताना मुद्दाम तिथे एखादा दिवस मुक्काम करायचा असे आम्ही ठरवले होते, पण आवर्जून राहावे असे काही ते वाटले नाही. टूर अरेंज करणारेही अल्मोडात मुक्काम करत नाहीत. दुपारच्या जेवणानंतर बसेस सरळ कौसानीच्या दिशेने धावू लागल्या.

## कौसानी

आमची उतरण्याची व्यवस्था 'कौसानी' च्या 'पाईन हॉटेल' मध्ये केली होती. हॉटेलचे फक्त नावच सुंदर होते. हे हॉटेल अनामिका ट्रॅव्हल्सच्या मालकाचेच होते. अगदी छोट्या लाकडी पार्टिशन्स घातलेल्या खोल्या, खोलीत दोन बाजा, पांघरायला गोधड्या असा थाट होता. अनामिकावाल्यांनी जेवण मात्र छान दिले. निवास आणि रात्रीचे भोजन त्यांच्या टूरच्या चार्जमध्येच होते. दुसऱ्या दिवशी सकाळी गरमागरम पुरीभाजीचा ब्रेकफास्टही दिला. त्यांची गाडी थोडी गैरसोयीची होती. सीट्समध्ये अंतर कमी असल्याने, पाय लांबवता येत नव्हते

त्यामुळे सर्व उतारू गुडघे दुखत असल्याची तक्रार करत होते.

कौसानीला गव्हर्नमेंटच्या 'पर्वत टूर' बरोबर जावे. त्यांची राहण्याची व्यवस्था सर्वांत उत्तम आहे. ते प्रत्येक जोडप्याला स्वतंत्र रूम देतात आणि तिचा एरवीचा चार्ज चाळीस-पन्नास रुपये असतो. त्यांची चाळीस लोकांची डॉरमेटरीपण आहे.

हॉटेलमध्ये मुक्कामाला जायच्या अगोदर आमची बस सरळ गेली ती 'सनसेट व्ह्यू पॉइंट' वर. कारण आम्ही जर आधी हॉटेलवर गेलो असतो तर लोक वॉश घेणे, चहा पिणे वगैरे गोष्टी आरामात करत बसले असते आणि सूर्यास्त होऊन गेला असता. कन्याकुमारीचा सूर्यास्त हा जसा अविस्मरणीय, तसाच कौसानीच्या सूर्यास्ताचा अनुभवही न विसरण्याजोगा आहे. कन्याकुमारीला सूर्य सागरात विरघळत जातो, तर कौसानीला हिमालयात. सूर्यास्तानंतर सूर्याचे प्रतिबिंब हिमालयावर पडते आणि हिमालयाचा रंगच बदलतो. 'सनसेट व्ह्यू पॉइंट' जवळून हिमालयाची उत्तुंग अशी बर्फाच्छादित शिखरे दिसतात. नीळकंठ, नंदादेवी, गौरी, त्रिशूल, पंचशील असे प्रत्येक शिखर वेगळे दिसते. या शिखरांपैकी नंदादेवी सर्वांत उंच असून त्याची उंची सुमारे पंचवीस हजार फूट आहे, तर इतर शिखरे तेवीस हजाराच्या आसपास आहेत. या शिखरांच्या पलीकडे तिबेट व चीनची बॉर्डर आहे. कौसानीपासून सुमारे ३० कि.मी. अंतरावर रडार केंद्र आहे. तिथून नैनीतालपर्यंत संदेश जातात. कौसानीला हिंदीतील सुप्रसिद्ध कवी सुमित्रानंदन पंत यांचे घर आहे. ते आम्ही दुरूनच पाहिले.

सनसेट पॉइंटजवळच 'महात्मा गांधी आश्रम' आहे. गांधीजी काही काळ तिथे राहिले होते. त्यांचे फोटो, पेंटिंग्ज, बालांना उपदेश करणारी वचने, शिकवण देणारी सुभाषिते भिंतीवर लावलेली आहेत. तेथे राहण्याची सोयही होऊ शकते. गांधीजींच्या परदेशी शिष्या सविताजी तेथे स्त्रियांसाठी एक आश्रमशाळा चालवत होत्या. आम्ही आश्रमात गेलो, तेव्हा त्या अंथरुणाला खिळलेल्या होत्या. नंतर त्यांचे अल्मोडा हॉस्पिटलमध्ये निधन झाल्याची वार्ता वृत्तपत्रात वाचायला मिळाली.

कौसाली गाव अगदी चिमुकले आहे. टूरिस्ट बसबरोबर आल्याने जेवण्याची व्यवस्था चांगली झाली. नाहीतर एरवी या निसर्गरम्य गावात चहाव्यतिरिक्त काही मिळेल की नाही शंका वाटत होती. ८९ मध्ये आम्ही पुन्हा

कौसानीला गेलो त्या वेळी सनराईज पॉइंटजवळ 'सागर हॉटेल' नावाचे कोरेकरीत हॉटेल निघाले होते. तिथे साठ रुपयांत आम्हाला उत्तम रूम मिळाली. हॉटेलच्या गच्चीवरून सूर्योदय पाहायला मिळाला. मागच्या दरीतून लुकलुकणारे दिवे दिसले आणि रात्रीच्या नीरव शांततेत घाट चढणाऱ्या चुकार वाहनांचा आवाजही ऐकू आला. गावात घरगुती भोजन मिळाले. गावातल्या छोट्या वाटांनी भटकता आले. त्या वेळी दोन दिवस मुक्काम करून आम्ही सारे कौसानी गाव पालथे घातले. गव्हर्नमेंट टूरिस्ट बंगल्यात जाऊन नाश्ता घेतला. पावसातही भ्रमंती केली.

कौसानीला पहिल्यांदा गेलो, तेव्हा पहाटे पाच वाजता बेड टी घेऊन पायी पायीच सूर्योदय पाहायला गेलो होतो. गांधी आश्रमाच्या खालच्या रस्त्यावरील एका वळणावर हा पॉइंट आहे. पहाटे लोक आवर्जून सूर्योदय पाहायला येत होते.

अंधाराचे वस्त्र दूर करून सूर्याची कोवळी किरणे हळुवारपणे बाहेर पडली. अंधारात लपलेली हिमाच्छादित शिखरे हळूहळू प्रकाशमान झाली. उन्हामध्ये हिम झळाळू लागले. सावल्यांप्रमाणे अस्पष्ट दिसणारे वृक्ष सुस्पष्ट झाले. त्यांची भव्यता, उत्तुंगता, सौंदर्य आणि हिरवेपणा डोळ्यांना सुख देऊ लागला. हे सारे सौंदर्य डोळ्यांत कसे साठवावे समजेना. पावले तिथेच खिळून राहिली. तो भव्यदिव्य निसर्ग डोळ्यांत साठवता येईना; पण स्नान वगैरे आटोपून आठ वाजता परतीचा प्रवास सुरू करायचा आहे, असे गाईडने अगोदरच बजावले होते त्यामुळे परतावे लागले. खरोखरच आठ-साडेआठ वाजता आम्ही राणीखेतला निघालो. बस राणीखेत दाखवून नैनीतालला परत जाणार होती. आम्ही मात्र राणीखेतला मुक्काम करणार होतो.

नैनीताल आणि राणीखेत या परिसरात ज्यांना आपण देवदार वृक्ष म्हणतो, अशा ख्रिसमस ट्रीज विपुल आहेत. मी या वृक्षांच्या अक्षरशः प्रेमात पडले होते. या झाडाचे बी किंवा रोप फक्त जानेवारीतच नर्सरीत मिळू शकते आणि हे झाड थंड प्रदेशात वाढू शकते, हे समजल्यानंतर मी त्याचा नाद सोडून दिला.

या भागात बटाट्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. बटाटे रुपयाला अडीच-तीन किलो मिळतात. कोबीचा अपवाद वगळला तर इतर भाज्या जवळजवळ नसतातच. त्यामुळे जेवण असो वा नाश्ता, त्यात बटाट्याचा भरपूर वापर असतो. बटाटा पॅटीस, बटाटा भजी हे तिथल्या लोकांचे आवडते पदार्थ आहेत. या भागात उद्योगधंदे जवळजवळ नाहीतच. शिक्षणाचा प्रसार मात्र

चांगला आहे. नैनीतालला 'कुमाऊ युनिव्हर्सिटी' आहे. अल्मोड्यालाही डिग्री कॉलेज आहे. तिथेही १०वी, १२वी ला बोर्डाची परीक्षा असते. लोक खाऊनपिऊन सुखी असून, शेती हाच मुख्य व्यवसाय आहे.

**राणीखेत**

कौसानीहून आम्ही राणीखेतकडे निघालो. वाटेत विपुल प्रमाणात ख्रिसमस ट्रीज होत्या. उंच घनदाट वृक्ष असलेल्या या परिसरात 'गुमराह', 'कटी पतंग', 'मधुमती' अशा अनेक चित्रपटांचे शूटिंग झाले आहे. गावात प्रवेश केल्या केल्या मिलिटरीचे गोल्फ ग्राउंड लागले. त्यानंतर 'कालीमंदिर'. मंदिर तसे साधेसुधेच आहे, पण त्याकडे जाणारा पायऱ्यापायऱ्यांचा रस्ता मात्र सुरेख आहे. दोन्ही बाजूला झाडी आणि मध्ये हा चिमुकला रस्ता. आता मिलिटरी एरिया सुरू झाल्यामुळे सगळीकडे मिलिटरी वाहने दिसत होती.

आमची बस राणीखेतच्या 'मून हॉटेल' समोर जेवणासाठी थांबली. राणीखेतमधील ते जुने व चांगले हॉटेल आहे. ८४ सालीदेखील तेथील सूटचा रेट पंच्याहत्तर रुपये होता. ऑफ सीझनमुळे तो आम्हाला साठ रुपयांत मिळाला. नैनीतालमध्ये हॉटेल्स भरपूर आहेत व चांगली आहेत. राणीखेतमध्ये चांगली हॉटेल्स कमी असल्यामुळे दर जास्त असावेत. मून हॉटेलमध्ये जेवणाचे दरही जास्त होते, तेव्हा नाश्ता व भोजन बाहेरच घ्यायचे, असे आम्ही ठरवून टाकले. ८९ मध्ये पुन्हा राणीखेतला गेलो, तेव्हा खाजगी बसस्टॅन्डजवळच्या 'त्रिभुवन हॉटेल' मध्ये साठ रुपयांत दुसऱ्या मजल्यावरची चांगली खोली मिळाली. हे लॉज रस्त्यावरच आहे. राणीखेतला दोन बसस्टॅन्ड आहेत. एक खाजगी बसस्टॅन्ड आणि दुसरा सरकारी बसस्टॅन्ड. सरकारी बसस्टॅन्डजवळच्या 'मयूर हॉटेल' मध्ये जेवण चांगले मिळते.

राणीखेतचा 'सदर बाजार' चिमुकलाच आहे. इथे लाकडी शोभिवंत वस्तू, मेणबत्त्या आणि लोकर स्वस्त मिळते. अल्मोडाच्या शाली इथेही मिळतात. येथील लोकांना मिष्टान्नाची आवड असावी. रस्त्यात बरीच मिष्टान्नभांडारे दिसली. तिखट पदार्थ फारसे दिसत नव्हते आणि होते ते बटाट्याचे. टिकिया किंवा पॅटीस आणि बटाट्याचे सामोसे लोकप्रिय आहेत. बटाटे स्वस्त असले, तरी कांदे त्या काळात पाच रुपये किलो होते आणि नारळालाही पाच, सहा रुपये पडत होते. तिथे हॉटेलात अलू मटार आणि अलू गोबी या दोनच भाज्या

असतात. तूर डाळ जेवणात नसतेच. दालफ्रायही मसुरीच्या डाळीचे असते. दही उत्तम मिळते, पण उशिरा जेवायला गेले तर ते संपलेले असते.

एका छोट्या हॉटेलमध्ये रात्री आम्ही दहीभात खात होतो, तेव्हा शेजारच्याच टेबलावर दोन मराठी भाषक मिलिटरीतील जवान गप्पा मारत होते. आम्हाला मराठी येत असेल, याची त्यांना कल्पना नव्हती. मनमोकळेपणाने त्यांची चेष्टामस्करी चालू होती. ते वेटरला 'पांडू हवालदार' म्हणत होते. पदार्थांवर टीका करत होते. आम्ही मोठ्या कष्टाने हसू दाबत सारे ऐकत होतो. बऱ्याच दिवसांनी मराठी ऐकताना कानाला बरे वाटत होते. बिल देऊन बाहेर पडताना आम्ही जेव्हा त्यांची शुद्ध मराठीत चौकशी केली, तेव्हा ते खजील झाले. ते दोघे मूळचे पुण्याचे. सात-आठ महिन्यांपूर्वीच ड्रायव्हर म्हणून मिलिटरीत भरती झाले होते. गप्पागोष्टी झाल्यावर आणि आम्हीही मूळचे पुण्याचेच हे समजल्यावर, ते आमच्या प्रेमात पडले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सात किलो मीटर्सवर असलेल्या हेडाबाबांच्या मंदिरात आम्हाला नेण्याचे त्यांनी कबूल केले. खरोखरीच दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता मिलिटरीची मोठ्ठी थोरली ट्रक आम्हाला न्यायला आली. ट्रकमध्ये त्यांनी खास आमच्यासाठी डुगडुगणारा बाक टाकला होता. मूळचे कोल्हापूरचे, आता राणीखेतला राहणारे वासकर नावाचे गृहस्थही सहकुटुंब सहपरिवार आमच्याबरोबर आले. घाटातला तो वळणावळणांचा रस्ता, त्यात इतके हादरे बसत होते की, आम्ही बाक घट्ट धरून बसलो होतो. त्या मंडळींनी असे सुचवले की, दुपारी आमची गाडी हल्दानीला जाणार आहे, आम्ही तुम्हालाही सोडतो. पण जीव मुठीत धरून धक्के खात एवढा प्रवास आपल्याला सोसणार नाही, हे आमच्या लक्षात आले होते. त्यामुळे फुकट प्रवासाची आलेली ही संधी आम्ही चक्क नाकारली.

राणीखेतपासून सात कि.मी. वर असलेले हे **हेडाबाबाचे मंदिर** उत्तुंग आहे. या संगमरवरी मंदिराचे शिखर वर निमुळते होत गेले आहे. भक्तांना राहण्यासाठी स्वच्छ, हवेशीर खोल्या असलेली धर्मशाळा गार्डनशेजारीच आहे. हेडाबाबा म्हणजे रजनीशांसारखे त्या भागातील प्रस्थ आहे. त्यांचेही परदेशी शिष्य आहेत. या शिष्यांनी मंदिरासाठी व धर्मशाळेसाठी देणग्या दिल्या आहेत. मंदिरासारख्या गोष्टीत मुळात मला रस नाही. मंदिरे पाहायला मी जाते ती तेथील कारागिरी व शिल्पसौंदर्य पाहण्यासाठी, एक सौंदर्योपासक म्हणून; भक्त म्हणून नव्हे. त्यामुळे त्या मंदिरापेक्षा, तिथून दिसणाऱ्या सृष्टिसौंदर्यावर मी अधिक

मोहित झाले. तिथून दूरवर झाडांच्या राईत लपू पाहणारे राणीखेत चित्तवेधक दिसत होते. मिलिटरीतील या नव्या स्नेह्यांबरोबर आम्ही आमच्या रोलमधला शेवटचा फोटो काढला. त्यांना एक प्रत पाठविण्याचे आनंदाने मान्य केले. वासकरांच्या घरी चहा, पोहे आणि बटाटा वेफर्स यांचा समाचार घेतल्यानंतर, दुपारी बारा वाजता आम्ही लॉजवर परतलो. राणीखेतमध्ये दोन सुंदर स्थळे प्रेक्षणीय आहेत— शहीद स्मारक आणि चौबाटिया गार्डन.

## शहीदस्मारक

हे शहीदस्मारक ज्या मैदानावर उभारलेले आहे, त्या मैदानाला 'सोमनाथ ग्राउंड' म्हणतात. कै. मेजर सोमनाथ शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे नाव दिले आहे. या मेजरसाहेबांनी १९४७ साली काश्मीरमध्ये श्रीनगरजवळील बदगावग्राम येथे अतुलनीय पराक्रम गाजवला. शत्रू प्रचंड संख्येने गोळीबार करत असतानाही मेजरसाहेबांनी अखेरपर्यंत आपली जागा न सोडता युद्ध संचालन केले व वीरमरण पत्करले. 'सोमनाथ ग्राउंड'वर उभारलेले शहीद स्मारक म्हणजे एक सुंदर शिल्प आहे. पार्श्वभूमीला ख्रिसमस ट्रीचे मोठमोठे वृक्ष, दूरवर दिसणाऱ्या उत्तुंग पर्वताच्या रांगा, भोवताली विविधरंगी सुंदर सुवासिक गुलाबपुष्पे, अशा रम्य व शांत वातावरणात मृतात्मे विश्रांती घेत आहेत, ही कल्पनाच किती रम्य आहे. हे शहीद स्मारक १९७४ मध्ये निर्माण झाले. त्याची प्रतिष्ठापना कुमाऊ रेजिमेंटचे लेफ्टनंट जनरल टी. एन. रैना, ज्यांना महावीरचक्र मिळाले आहे, त्यांनी १४ ऑक्टोबर ७४ रोजी केली. १९४२ सालच्या युद्धापासून चायना वॉर, पाकिस्तान वॉर, बांगला वॉर या सर्व युद्धांमध्ये धारातीर्थी पडलेल्या कुमाऊ रेजिमेंटमधल्या जवानांची नावे तिथे कोरलेली आहेत. सर्व आसमंत शांत, स्वच्छ व निसर्गरम्य आहे.

स्मारकाच्या दाराशी पुढील सुंदर ओळी कोरलेल्या आहेत :

To you from failing hands
we throw the torch
Bo yours to hold it high
If ye break faith with us who die
we shall not sleep
John Meorae– 'slanders fields'

इंग्रजी ओळींच्या खालच्या बाजूलाच या सुंदर काव्याचा सुमित्रानंदन पंत यांनी केलेला, तितकाच सुंदर अनुवाद आहे.

'हम अपने अशक्त हाथोंसे ज्योतिशिखा तुमको दिखलाते ।
उंचा इसको रखोंगे तुम
भंग करोगे यदि विश्वास मृतात्माओंसे
हम न शांतीसे सो पायेंगे ।
अनुवादक— सुमित्रानंदन पंत

परमेश्वराच्या मंदिरातही न रमणारे माझे मन या नितांत रमणीय स्थळी रमले होते. पावलांचा थोडाही आवाज होऊ न देता आम्ही त्या स्थळी गेलो. शहीद स्मारकापुढे नतमस्तक झालो. जवळजवळ तासभर त्या परिसरात काढला. शेवटी नाइलाजाने व कष्टाने पावले उचलली व परतलो.

## चौबाटिया गार्डन

राणीखेतमध्ये आल्यापासून हिमालयाचे वातावरण बदलले होते. जवळजवळ रोज पावसाची झिमझिम येत होती. दुसऱ्या दिवशी थोडी उघडीप दिसताच, आम्ही चौबाटिया गार्डनकडे निघालो. हे बोटॅनिकल गार्डन पाहण्यासाठी, मुद्दाम राणीखेतला एक दिवस मुक्काम करावा, इतकी ती खास चीज आहे. राणीखेत बसस्टॅन्डपासून सुमारे दहा कि. मी. अंतरावर असलेल्या या गार्डनला तासातासाने सिटी बसेस जातात. फक्त दीड रुपया तिकीट आहे. गार्डनच्या दरवाजाजवळ कॅन्टीन आहे. तिथे पोटात काहीतरी टाकावे लागते. कारण आत खाण्यापिण्याची सोय नाही आणि हिंडायफिरायला बराच वेळ लागत असल्याने भूक चांगली कडाडून लागते. अर्थात आम्ही खवय्ये असल्यामुळे, बरोबर खाद्यपदार्थांची पॅकेट्स आणलीच होती. त्यामुळे आमचे काही अडले नाही. हे गार्डन डोंगराच्या उतारावर असून तिथे बदाम, पिस्ते, सफरचंद वगैरे फळझाडे आहेत. त्यांच्या विक्रीचीही व्यवस्था आहे. एक जीपेबल मोठा रोड आहे, पण तो लांबून जातो. त्याशिवाय बऱ्याच छोट्या पायवाटा आहेत. त्या वाटांवरून जाण्यात अधिक मजा वाटते. या भागात मिलिटरीची बरीच ऑफिसेस व प्रयोगशाळा यांच्या इमारती विखुरलेल्या आहेत. त्यामुळे सगळीकडे माणसांची जत्रा असते. शोभिवंत फुलझाडांचे रंगीबेरंगी विविध प्रकार तर इथे आहेतच, पण गुलाबांच्या शेकडो तऱ्हा आहेत. छोट्या-मोठ्या आकारांचे लाल, पिवळे, शेंदरी, गुलाबी, मिश्र रंगांचे, इतकेच

नव्हे, तर जांभळे, काळे, हिरवे गुलाबही पाहायला मिळाले. त्यांचे आकार व रंग वैविध्यपूर्ण होते. मी तरी इतकी विविधता यापूर्वी पाहिली नव्हती. दोन किलोमीटर अंतर ओलांडल्यावर नर्सरी आहे. तिथे विविध प्रकारची रोपे आणि बी विकत मिळते. नर्सरीत जाण्यासाठी अडीच रुपये तिकीट आहे. टेकडीवरून खाली उतरताना उत्साह वाटतो. ठिकठिकाणी गुलाबाचे ताटवे, झुळझुळणारे पाणी, विविध रंगांची फुले मन मोहून घेत असतात. भोवतालचे सृष्टिसौदर्य मोह घालत असते. त्यामुळे किती चाललो हे लक्षात येत नाही, पण परत येताना ऊन पडते, चढ सुरू होतो आणि मग थकवा जाणवतो. आमच्यासारख्या स्थूल माणसांना वजनही जाणवू लागते. वाटेत ठिकठिकाणी पाण्याची सोय आहे आणि बसण्यासाठी सुंदर जागा आहेत. त्यामुळे आम्ही रमतगमत संध्याकाळी वर आलो. बस पकडून चौबाटिया खेड्यापर्यंत गेलो. सारा मिलिटरी एरिया असल्याने स्वच्छता, टापटीप, शिस्त, कोपऱ्याकोपऱ्यांवर पहारे वगैरे व्यवस्था होती. परतीची बस पकडून येताना वाईट वाटत होते, पण आता ट्रीपच संपत आली होती. परतीचे वेध लागले होते.

दुसऱ्या दिवशी दुपारी दीडच्या बसचे रिझर्वेशन आम्ही केले होते. बारा वाजताच नेमका पाऊस कोसळू लागला. पावसाचा जोर कमी झाल्यावर आम्ही कुलीकडे सामान देऊन स्टॅन्डवर गेलो. कंट्रोलरने आम्हाला सल्ला दिला की, शक्य तेवढ्या लवकर तुम्ही घाट उतरून पलीकडे जा. पावसाळ्यात अनेक गाड्या रद्द होण्याची शक्यता असते, तेव्हा आम्ही समोरच उभ्या असलेल्या 'हल्दानी' बसमध्ये चढलो. घाटातून बस संथपणे रमतगमत चालली होती. आधीच हिमालयाचे अवर्णनीय सौंदर्य, त्यात पावसाची रिमझिम. त्या वातावरणाचे संस्कार अवर्णनीय होते. भिजलेल्या रस्त्यावरून गाडी हळुवारपणे वळणे घेत घाट उतरत होती. दोन्ही बाजूंना ख्रिसमस ट्री व पाईन वृक्षांचे जंगल होते. पावसाचा शिडकावा थांबून कोवळी उन्हे पडली म्हणजे दूरवर हिमशिखरांचे दर्शन घडत होते. मला वाटले, आपण मोठ्या आवाजात गात सुटावे—

'जीवनात ही घडी अशीच राहू दे'

संध्याकाळी आम्ही हल्दानीला पोचलो आणि नंतर खचाखच भरलेल्या बसमधून 'दिल्लीला'. दिल्लीहून चाळीसगावचे रिझर्वेशन झालेलेच होते. कुमाऊचा प्रवास आता संपला होता.

# विभाग ५

# हरिद्वार-ऋषिकेष-डेहराडून व मसुरी

आम्हा दोघांच्या पायावर नक्षत्र पडलेले असल्याने, आम्ही आपले सारखे भ्रमण करत असतो; पण आमच्या लेकीला प्रवासाचा उत्साह जरा कमीच आहे. आमच्या भ्रमणात ती आम्हाला कधीतरीच साथ देते. आम्हीही तिला चिडवायला Two is a Company. Three is a croud असे तिला ऐकवतो. हिमालयातील थंडी तिला सोसत नाही, हे आमच्या चांगलेच पथ्यावर पडले आहे. त्यामुळे काश्मीर, हिमाचल, कुमाऊ, दार्जिलिंग वगैरे ठिकाणी आम्ही दोघांनीच प्रवास केला आहे. ती जेव्हा लहान होती, तेव्हा 'काश्मीरमध्ये फक्त जोडप्यांनाच जाऊ देतात. मुलांना प्रवेश नाही.' अशी थाप मारता येत होती. तीही आपल्या आजी-आजोबांकडे आनंदाने राहत होती. पण कॉलेजात जायला लागल्यापासून तिला शिंगे फुटली आणि 'मला हिमालय पाहायचाच आहे,' असा आग्रह तिने धरला. तेव्हा हिमाच्छादित शिखरे तर दिसतील, पण हिमालयातील कडक थंडीचा त्रास होणार नाही, असे हिलस्टेशन आम्ही शोधू लागलो आणि मग 'मसुरी'ची निवड केली. जाताजाता हरिद्वार, ऋषिकेष आणि डेहराडून या ठिकाणांनाही भेट द्यायचे ठरवले. तीर्थक्षेत्रे पाहावीत हा हेतू त्यामध्ये नव्हता, पण आयुष्यात एकदा तरी विशाल अशा गंगेवरचा हरिद्वारचा लक्ष्मणझूला पाहावा; भारतीय संस्कृतीतील पावन मानण्यात आलेल्या गंगेचे भव्य, दिव्य रूप न्याहाळावे; असे वाटत होते.

आग्रा-फत्तेपूरसिक्री, मथुरा, गोकुळ, वृंदावन अशा स्थळांना भेटी देत देत आम्ही दिल्लीला पोहोचलो. अगोदरच रिझर्वेशन केलेले असल्यामुळे महाराष्ट्र मंडळात खोली मिळाली होती. आम्ही दोघे दिल्लीला अनेक वेळा गेलेलो आहोत; पण लेकीसाठी आम्ही पुन्हा एकदा 'दिल्लीदर्शन' केले आणि नंतर हरिद्वारच्या दिशेने निघालो.

## हरिद्वार

दिल्लीहून हरिद्वार रेल्वेने २६३ कि.मी.वर आहे, तर बसने २०५ कि.मी.वर. आम्ही बसनेच प्रवास केला. पर्यटक आवासगृहात दहा डिलक्स खोल्या आहेत आणि चार एअरकूल्ड खोल्याही आहेत. आम्हाला डिलक्स रूममध्ये जागा मिळाली. डबलरूमचा चार्ज ६० रु. होता. टूरिझमच्या या निवासस्थानी डॉरमेटरीही उपलब्ध आहे. दहा रुपयांत बेड मिळतो आणि दहा जणांची सोय होऊ शकते. हरिद्वार हे तीर्थक्षेत्र असल्याने तिथे निवासव्यवस्था चांगली उपलब्ध आहे. टूरिस्ट बंगला आहे. जिल्हा परिषदेचे निवासगृह आहे. वनविश्रामगृह, पी.डब्ल्यू.डी. यांचे बंगले आहेत. गुरुदेव, कैलाश, आरती, हॉलीडे इन, अशोक पॅलेस अशी बरीच हॉटेल्स उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे कालीकमळी, धनदेवी, बसंतीदेवी, गीताभवन वगैरे धर्मशाळाही आहेत. धर्मशाळांमध्ये खोल्या उपलब्ध असल्या, तरीही व्यवस्थापक त्या द्यायला खळखळ करतात. कारण त्यांना जास्त पैसे देणारे गिऱ्हाईक हवे असते. धर्मशाळांमध्ये बऱ्याच वेळा पाण्याची टंचाई असते, स्वच्छताही जेमतेमच असते. त्यामुळे आम्ही कधीच धर्मशाळेच्या वाटेला जात नाही. हरिद्वारमध्ये २५ रुपयांपासून ते १२५ रुपयांपर्यंत खिशाला परवडतील अशा विविध प्रकारच्या खोल्या मिळू शकतात. आम्ही गेल्यागेल्या एका हॉटेलमध्ये चौकशी करायला गेलो होतो. 'खोल्यांमध्ये फॅन कसा नाही,' अशी चौकशी मी केली तेव्हा तिथला मॅनेजर फारच खवळला. गंगेकाठचे हे हिलस्टेशन आहे, बारा महिने हवा थंड असते, फॅन हवा असे म्हणणारे तुम्हीच पहिले, असे त्याने आम्हाला ऐकवले. आम्ही शांत चित्ताने दोन जिने उतरून खाली आलो आणि पर्यटकनिवासात रूम शोधली. हरिद्वारला सव्वा लाख वस्ती आहे असे म्हणतात. वर्षभर यात्रेकरूंची गर्दी असते. त्या मानाने हॉटेल्सची संख्या कमी वाटली. डेहराडून मसुरीकडे जाणारे आमच्यासारखे हौशी प्रवासीसुद्धा, शेजारीच आलो आहोत, तर हरिद्वार-ऋषिकेषहूनही जाऊ या, असा विचार करत असतात. हरिद्वार सहारनपूर जिल्ह्यात येते. कुमाऊ गढवाल किंवा उत्तराखंड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भागात डेहराडून, उत्तरकाशी, टेहरी, पौडो, चामोली, अल्मोडा, पिथोरगड व नैनीताल असे आठ जिल्हे येतात. डेहराडून, हरिद्वार आणि ऋषिकेषचे मैदान सोडले, तर बाकी पहाडी प्रदेश आहे. हरिद्वार हे गंगेच्या उजव्या तीरावर शिवालिक पर्वताच्या पायथ्याशी वसलेले आहे.

पुराणकाळापासून ते तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. इथून बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्री इथे बसेस जातात. बद्रीनाथ म्हणजे हरीचे वास्तव्य, तर केदारनाथ हे हराचे वास्तव्यस्थान. हरी आणि हर यांच्या तीर्थक्षेत्री जाण्याचे हे द्वार, म्हणून कोणी त्याला हरिद्वार म्हणतात, तर कोणी हरद्वार. भगीरथाने तपश्चर्या करून आणलेली गंगा हिमालयात गंगोत्री इथे प्रथम आली आणि हिमालयाच्या अंगाखांद्यावरून उड्या मारत धावू लागली. ती प्रथम भूसपाटीवर आली ती हरिद्वारला. त्यामुळे या नगरीला काही जण 'गंगाद्वार' असेही म्हणतात. पांढराशुभ्र प्रवाह असणारी ही गंगा, वर उत्तुंग हिमालय, भोवतालची सुंदर वनराजी ह्या मनमोहक दृश्यामुळे या क्षेत्राला 'मायापुरी' असेही म्हणतात. चिनी प्रवासी ह्युएनत्संग याच्या ग्रंथात 'मायापुरी' नावाचा उल्लेख आहे. 'तपोवन' या नावानेही पूर्वी ती ओळखली जात असे. 'गमयति भगवत्पदमिति गंगा' जिच्यामध्ये स्नान करणारा जीव भगवंताच्या पायाशी पोचतो ती गंगा, अशी तिची व्युत्पत्ती सांगितली जाते. हरिद्वारचे सर्वांत जुने नाव होते, 'कपिलस्थान'. कारण कपिल ऋषींच्या शापामुळे भगीरथ राजाचे पूर्वज इथेच भस्म झाले होते. भगीरथाने गंगेला पृथ्वीवर आणले म्हणून तिला 'भागिरथी' म्हणायचे आणि 'हरगंगे भागिरथी' असा तिचा जयघोष करायचा. गंगेचा प्रवाह स्वर्ग, मृत्यू, पाताळ तिन्ही ठिकाणी आहे, म्हणून तिला त्रिपथगा म्हणतात.

या स्थळाला हरिद्वार म्हणायचे की हरद्वार याबद्दल वैष्णव आणि शैव साधूंमध्ये कदाचित वाद असेलही. पण एक गोष्ट सर्वांनाच मान्य आहे की, हे देवांच्या साम्राज्यात उघडणारे द्वार आहे. इथूनच गंगा नदी सपाटीवर येते. सुंदर जंगले, हिमाच्छदित शिखरे यांचे सुंदर दृश्य इथे दिसते. इथे गर्दीपासून दूर दूर, एका वेगळ्याच साम्राज्यात आपण प्रवेश करत असतो. ईश्वरावर श्रद्धा असो वा नसो, येथील निसर्गाचे रम्य आणि भव्य स्वरूप पाहून आपण नतमस्तक होतो. पूर्वी आम्ही काशीला गेलो होतो, तेव्हा तिथल्या गंगेच्या पाण्यात स्नान करणे तर दूरच राहिले, पण साधी पावले बुडवावीत, असेसुद्धा वाटले नव्हते. हरिद्वारचा गंगेचा प्रवाह मात्र प्रसन्न आणि वाहता होता. ऋषिकेषला तर गंगेची खरी शोभा पाहता आली. हरिद्वार, ऋषिकेषला फिरत असताना, मला सारखी गंगावतरणाची कथा आठवत होती. नव्या पिढीला या पौराणिक कथा फारशा माहीत नसतातच. तेव्हा मी आमच्या लेकीला कथा सांगण्याची संधी सोडली नाही. ती कथा अशी आहे की —

सूर्यवंशात एक सगर नावाचा राजा होऊन गेला. आपले सार्वभौमत्व सिद्ध करण्याकरिता त्याने अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरवून यज्ञअश्व सोडला. सगरराजाला साठ हजार पुत्र होते. अश्वाला कुणी अडवते का, यावर ते लक्ष ठेवून होते. हा यज्ञ जर पूर्ण झाला, तर आपले स्वर्गातील आसन डळमळीत होईल, अशी भीती इंद्राला वाटू लागली आणि त्याने या मुलांचे लक्ष नसताना तो अश्व चोरला आणि कपीलमुनींच्या आश्रमात नेऊन बांधला. राजाचे पुत्र अश्वाला शोधीत शोधीत कपीलमुनींच्या आश्रमात पोचले. अश्व तिथे बांधलेला पाहून त्यांची अशी समजूत झाली की, आपल्या अश्वाला कपीलमुनींनीच अडवले असेल आणि त्यांनी मुनींवर हल्ला करण्याचे ठरवले. कपीलऋषी त्या वेळी तप करत होते. सगरपुत्रांच्या या गडबडीने त्यांचा तपोभंग झाला आणि त्यांनी रागाने आपले डोळे उघडून सगरपुत्रांकडे पाहिले. त्यांच्या दृष्टीतील तेजामुळे या सर्व सगरपुत्रांचे भस्म झाले.

कालांतराने त्यांचा शोध करीत, सगर राजाचा नातू– अंशुमान– तिथे आला. सर्व हकीगत समजल्यानंतर, तो अनन्यभावाने मुनींना शरण गेला. तेव्हा त्यांनी त्याला सांगितले की, तू स्वर्गातील गंगा पृथ्वीवर घेऊन ये. तिचा प्रवाह या सगरपुत्रांच्या राखेवरून वाहत गेला, तर त्यांचा उद्धार होईल. गंगा पृथ्वीवर आणण्यासाठी अंशुमानाने हिमालयात तपश्चर्या सुरू केली, पण गंगामाता प्रसन्न होईना. त्याच्या पश्चात त्याचा मुलगा दिलीप याने तप केले, पण त्यालाही गंगा प्रसन्न झाली नाही. मग त्याचा पुत्र भगीरथ याने तप सुरू केले. तीन पिढ्यांच्या या तपश्चर्येने प्रसन्न होऊन, गंगामातेने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. ती स्वर्गातून निघाली खरी, पण तिचा वेग इतका प्रचंड होता की, त्यात सगळी पृथ्वी नष्ट झाली असती, तेव्हा भगीरथाने भगवान शंकराची प्रार्थना केली. त्यांनी गंगेला आपल्या माथ्यावर धारण केले आणि ती त्यांच्या जटांमधून सात धारांनी वाहू लागली. भगीरथाने तिला कपीलमुनींच्या आश्रमाजवळ म्हणजेच हरिद्वारला आणले. तिचा प्रवाह सगरपुत्रांच्या रक्षेवरून गेला व त्यांचा उद्धार झाला.

स्कंदपुराण, पद्मपुराण आणि शिवपुराण यांच्या मते, या तीर्थक्षेत्राला ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिन्ही देवतांचा पदस्पर्श झालेला आहे. त्या संदर्भात अनेक आख्यायिका सांगतात. श्वेतु नावाच्या राजाच्या प्रार्थनेमुळे ब्रह्मा इथे अवतरला आणि त्याने 'ब्रह्मकुंड' निर्माण केले. हरी आणि हर यांनी इथे निवास केला. अनेक संत, ऋषी, महात्मे यांनी या तीर्थस्थळाला भेटी दिल्या आहेत. द्वापर

युगात प्रभुरामचंद्रांचा बंधू भरत या मार्गावरून ऋषिकेषला गेला होता. म्हणून त्याच्या नावाने ओळखले जाणारे 'भरतमंदिर' इथे आहे. पांडवही याच मार्गाने स्वर्गाला गेले आणि आपली आठवण म्हणून भीमाने गुडघा दाबून निर्माण केलेला 'भीमगोंडा' तलाव इथून जवळ आहे. धृतराष्ट्र, गांधारी, कुंती आणि विदुर हे याच मार्गाने स्वर्गलोकात गेले होते, असे म्हणतात. ह्या तर फार प्राचीन गोष्टी झाल्या, पण श्रेष्ठ संस्कृत कवी कालीदास इथे आला होता आणि येथील सौंदर्याने प्रभावित झाला होता. चिनी प्रवासी ह्युएनत्संग याने हरिद्वारचा प्रसिद्ध कुंभमेळा पाहिल्याचा उल्लेख आपल्या ग्रंथात केला आहे. मुस्लीम आक्रमणाच्या तडाख्यातून हरिद्वारही सुटले नाही. या आक्रमणांच्या काही खुणा आजही पाहायला मिळतात. अकबर बादशहाने आपला विश्वासू व शूर हिंदू सरदार मानसिंह याच्या स्मरणार्थ बांधलेली इमारत– 'मानसिंह की छत्री'– ब्रह्मकुंडाजवळ आहे. गुरू नानकसाहेब, स्वामी दयानंद सरस्वती, श्रद्धानंदस्वामी असे धर्मक्षेत्रातील दिग्गज तर इथे येऊन गेलेच, पण लॉर्ड डलहौसीनेदेखील या स्थळाला भेट दिली होती. अशा या इतिहासप्रसिद्ध तीर्थक्षेत्राला आम्ही भेट देत होतो.

हरिद्वार हे घाटांचे आणि पुलांचे शहर आहे. अनेक आश्रम आणि मंदिरे यांनी ते भूषविलेले आहे. किती पाहावे आणि किती नको, असे होऊन जाते. तीर्थयात्रेच्या हेतूने आलेले लोक सर्व ठिकाणी आवर्जून जातात. पण आमच्यासारखे प्रवासी एक दोन दिवसांत जेवढे पाहता येईल तेवढेच पाहण्यावर समाधान मानतात. त्यात एक पूर्ण दिवस ऋषिकेषसाठी राखून ठेवावा लागतो. आम्ही विचारपूर्वक काय पाहायचे व काय नाही हे ठरवून टाकले. प्रवासात नियोजन महत्त्वाचे असते. रामघाट, विष्णुघाट, गौघाट, कुशावर्त घाट वगैरे ठिकाणी आम्ही गेलो नाही, पण हरिद्वारला पोचलो त्या संध्याकाळी सुभाष घाटावर मात्र गेलो. फार लांब जाण्याची ताकद नव्हती म्हणून हरिद्वारच्या या चौपाटीवर हवा खायला गेलो इतकेच. तिथे सुभाषचंद्रांचा पुतळा आहे. त्यामुळे हा घाट 'सुभाष घाट' या नावाने ओळखला जातो. चाटवाले, छोलेबटुरे, भेळवाले यांची तिथे गर्दी होती आणि हरिद्वारमधील स्थानिक मंडळीही खाद्यपदार्थांसाठी आणि थंड हवा खाण्यासाठी संध्याकाळी तिथे येत होती. भिकारीही गर्दी करत होते. हरिद्वारमध्ये एक गोष्ट चांगली आहे. इथे अभक्ष्यभक्षण किंवा अपेयपान करायला बंदी आहे.

हरिद्वारला गेले की 'हरीकी पायरी' पाहायलाच हवी आणि ऋषिकेषला 'लक्ष्मणझूला' पाहायला हवा. दुसऱ्या दिवशी सकाळीच टॅक्सीने ऋषिकेषला जाऊन यायचे आणि मग संध्याकाळी 'हरीकी पायरी' चा आश्रय घ्यायचा, असे आम्ही ठरवले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही **ऋषिकेषला** निघालो. हरिद्वारपासून फक्त १६ कि. मी.वर असलेल्या ऋषिकेषला जायला अक्षरशः १०-१५ मिनिटांनी बसेस आहेत. भागीरथीच्या दक्षिणतटावरील हे नगर तीन बाजूंनी पर्वतमालांनी घेरलेले असल्याने, निसर्गरम्य आहे. रैभ्य ऋषींनी इथे घोर तपश्चर्या केली होती आणि त्या वेळी परमेश्वर 'ऋषिकेष' या नावाने अवतीर्ण झाला होता. म्हणून त्याला 'ऋषिकेष' नाव पडले. येथील 'मुन्नीकी रेती' भागातून 'गढवाल मंडळ विकास निगम' तर्फे सहली आयोजित केल्या जातात. गंगोत्री-यमुनोत्रीला जाणाऱ्या सहलीचा मार्ग भागिरथीच्या काठाकाठाने आहे. 'देवप्रयाग' हे ऋषिकेषपासून ७० कि. मी. अंतरावर असून तिथे गंगा व भागिरथीचा संगम आहे. गंगोत्री-यमुनोत्रीची सहल सात दिवसांची असून त्या वेळी तिला पाचशे रुपये प्रत्येकी खर्च घेत होते. बद्रीनाथ सहल चार दिवसांची आहे, तर बद्रीनाथ-केदारनाथ अशा दोन्हींचा प्रवास करायला सात दिवस लागतात. त्याला अलकनंदेच्या तीरावरून जावे लागते. बद्रीनाथ येथे ९ व्या शतकात शंकराचार्यांनी भगवान विष्णूची स्थापना केली. ते मंदिर १०,३५० फूट उंचावर असून, हिवाळ्यात ते पूर्णपणे हिमाच्छादित असते. तिथला केरळी ब्राह्मण पुजारी त्या काळात जोशीमठात राहायला जातो. बद्रीनाथजवळचा वसुंधरा धबधबा प्रेक्षणीय आहे. केदारनाथमंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असून त्याच्या प्रवेशद्वाराजवळ मोठा नंदी आहे. महाभारतातील युद्ध संपल्यानंतर पापक्षालनासाठी हे मंदिर पांडवांनी बांधले, अशी आख्यायिका आहे. हे मंदिर बद्रीनाथापेक्षाही प्राचीन असून त्यात भिंतीवर अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत.

बद्रीनाथजवळच **'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'** किंवा 'फूलोंकी घाटी' आहे. मे महिन्यात बर्फ वितळू लागले की, या दरीत हजारो प्रकारची मोहक व रानटी फुले उमलतात. महिना दोन महिने त्यांचा हंगाम टिकतो. ते ठिकाण पाहण्याची फार इच्छा होती, परंतु तिथे बराच प्रवास घोड्यावरून करावा लागतो असे समजल्याने, आम्ही तो बेत तहकूब केला. बद्रीनाथ-केदारनाथ किंवा गंगोत्री-यमुनोत्री इथे तर आत्ता जायचेच नव्हते. परंतु आमच्या भ्रमंतीच्या

आवडीमुळे, सगळ्या जिल्ह्यांतून प्रवासाला जाऊ इच्छिणारे आम्हाला माहिती विचारायला येतात, म्हणून आम्ही टूरिझम ऑफिसमधून ही सगळी माहिती मिळवली. तिथे गंगा, यमुना व सरस्वती यांचे प्रवाह वाहतात, अशी समजूत आहे. हरिद्वारचे 'ब्रह्मकुंड' जसे पवित्र मानले जाते, तशी इथे ही जागा पवित्र मानतात. ऋषिकेषहून तीन किलोमीटरवर 'लक्ष्मणझूला' आहे. आम्हाला टॅक्सीने तिथे सोडले. पायी जाणारे आणि घोडेवाले यांनाच हा पूल ओलांडायला परवानगी आहे. जवळच रघुनाथाचे मंदिर आहे. असे म्हणतात की प्रभुरामचंद्र स्वतः इथे आले होते. लक्ष्मणाच्या नावाने ओळखला जाणारा 'लक्ष्मणझूला' मोठमोठ्या तारांनी विणलेला आहे. तो पाण्याच्या प्रवाहापासून १५० मीटर उंच आहे. लाकडी पूल असल्याने, आपण चालू लागलो की, त्यामध्ये कंपने निर्माण होतात आणि तो हलू लागतो. तो झुलता पूल आहे. तिथून खाली गंगेच्या खळाळणाऱ्या प्रवाहाचे दृश्य फार सुंदर दिसते. नदीच्या एका तटावर ऋषिकेष गावातील मंदिरे, आश्रम, घरे वगैरे दिसत असतात, तर दुसऱ्या तटावर पायथ्याशी 'गीताभवन' हा मंदिरसमूह आणि उंचावर आठ-नऊ मजली **'स्वर्गाश्रम'** दिसत असतो. या स्वर्गाश्रमाची रचनाही वेगळीच आहे. खाली अरुंद मजला आणि वर अधिकाधिक रुंद होत गेलेले मजले असे त्याचे स्वरूप आहे. ऋषिकेषमधून 'स्वर्गाश्रमा'त जायला दोन रस्ते आहेत. एकतर नावेतून नदी ओलांडून तिथे जाता येते किंवा लक्ष्मणझूल्यावरून पायी जाता येते. लक्ष्मणझूल्यावर जायचेच असल्याने आम्ही जाताना पायीच गेलो. येताना नावेने येऊ असा विचार केला होता. पण नावेसाठी असलेली गर्दी पाहून, आम्ही तो सोडून दिला. ही नावेची सोय बाबाकालीकमळीवाला ट्रस्टतर्फे मोफत उपलब्ध करून दिलेली आहे. 'स्वर्गाश्रम' या नावाने ओळखले जाणारे श्री बद्रीनाथजींचे मंदिरही याच संस्थेतर्फे चालवले जाते. काशीमध्ये छोट्या तांब्याच्या गडूमध्ये गंगेचे पवित्र पाणी भरून देतात. इथे अॅल्युमिनियमचे छोटे फिरकीच्या झाकणाचे तांबे उपलब्ध होते. माझ्या जाऊबाई सश्रद्ध आहेत. तेव्हा त्यांना गंगापूजन करता यावे म्हणून आम्ही तसा एक तांब्या खरेदी केला. प्रसाद वगैरेही घेतला. 'लक्ष्मणझूला' ओलांडून थोडे उजवीकडे गेले की 'स्वर्गाश्रम' येतो. या आठ-नऊ मजली उंच इमारतीतून भोवतालचे उत्तुंग पर्वत, खळाळणारा गंगेचा प्रवाह वगैरे सुंदर दृश्य तर दिसतेच, पण नदीकाठच्या थंड वाऱ्याच्या झुळकांनी मन प्रसन्न होते.

पाऊलवाटेने डोंगराच्या पायथ्याशी गेले म्हणजे **'गीताभवन'** आहे. हा इमारतींचा एक समूहच आहे. गोरखपूरच्या गीता ट्रस्टला ही संस्था जोडलेली आहे. समाजाची नैतिक व आध्यात्मिक उन्नती करणे, हा या संस्थेचा हेतू आहे.

बाबाकालीकमळीवाला ट्रस्ट या भागात खूपच प्रसिद्ध आहे. त्याचे मुख्य ऑफिस ऋषिकेषमध्ये आहे. उत्तराखंडातील बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्री इतकेच नव्हे, तर पार कैलासापर्यंत या संस्थेतर्फे निवास भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते. संस्थेचे एक ऑफिस कलकत्त्यालाही आहे. ही संस्था मुळामध्ये श्रीबाबा विशुदेहनंदजी यांनी सुरू केली होती. आता तिचे ट्रस्टमध्ये रूपांतर केले आहे.

**शिवानंदजींचा** आश्रमही इथे आहे. हे सुप्रसिद्ध योगी होते. या आश्रमातर्फे यात्रेकरूंना मोफत रुग्णसेवा द्यावी, या हेतूने एक हॉस्पिटल चालवले जाते. गरिबांना अन्नवस्त्रही मोफत दिले जाते. आश्रमाचा स्वतःचा प्रेस असून तिथे तत्त्वज्ञानपर व आध्यात्मिक ग्रंथ छापले जातात. आश्रमाजवळ साधूसंतांसाठी काही कॉटेजेस् आहेत आणि योगविद्याही शिकविली जाते.

ऋषिकेषमध्ये योगसंस्था बऱ्याच दिसल्या. डिव्हाईन लाईफ सोसायटी, योगनिकेतन, योगसदन, महर्षी महेश योगी आश्रम वगैरे ठिकाणी परदेशातूनही योगाभ्यास करण्यासाठी शिष्य येतात. यात्रेकरूंसाठी धर्मशाळाही बऱ्याच आहेत. शिवानंद आश्रम, स्वर्गाश्रम, विठ्ठलआश्रम, गीताभवन, अवधूत आश्रम, महानंद आश्रम, परमार्थ निकेतन, भुरीबाई धर्मशाळा, रुक्मिणी धर्मशाळा, देवकीबाई धर्मशाळा वगैरे प्रवाशांसाठी हॉटेल इंद्रलोक, हॉटेल मेनका अशी चांगली हॉटेल्सही दिसली. या एरियातही मद्यपान व मांसाहार निषिद्ध आहे. ऋषिकेषमधील अशी काही स्थळे पाहून आम्ही हरिद्वारला परतलो, तेव्हा संध्याकाळचे चार वाजले होते. पुन्हा बाहेर पडण्याचा कंटाळा आला होता. पण दुसऱ्याच दिवशी आम्हाला डेहराडूनला जायचे होते आणि अजून हरिद्वारमधील प्रसिद्ध **'हरिकी पायरी'** पाहायची राहिली होती. तेव्हा तासाभराची विश्रांती घेऊन आम्ही ५ ॥ च्या सुमाराला पुन्हा बाहेर पडलो. हरिद्वारमध्ये हा घाट सर्वांत महत्त्वाचा मानतात. इथे अनेकजण स्नान करतात. काही पंड्यांनी यात्रेकरूंचे सामान ठेवून घेण्यासाठी दुकाने काढलेली आहेत. स्नानानंतर लोकांना चंदनी टीका लावून ते पैसे उकळतात. दर सहा वर्षांनी इथे अर्धकुंभमेळा भरतो आणि दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो. दूरदर्शनवर त्याची दृश्ये पाहिलेली होती

त्यामुळे थोडी उत्सुकताही होती. 'हरीकी पायरी'कडे जाणारा रस्ताही चांगला आहे. सहा हात असलेल्या मृत्युंजयाच्या पुतळ्यापासून दोन रस्ते फुटतात. एक उजवीकडे वळून 'कनखल' ला जातो, तर दुसरा सरळ गावात जातो. या रस्त्यावर हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस व अनेक धर्मशाळा दिसतात. तिथे खालचा रस्ता आणि वरचा रस्ता असे दोन मार्ग असून, ते 'हरीकी पायरी' जवळ एकत्र येतात आणि पुढे तोच रस्ता भीमगोंडा, सप्तधारा या ठिकाणांवरून ऋषिकेषला जातो. या घाटावर पिंडदान, तर्पण, अस्थिविसर्जन असे विधी केले जात असले, तरी पाणी वेगवान असल्यामुळे स्वच्छ आहे. नैसर्गिक सौंदर्यही चांगले आहे. या घाटावरच भगीरथाचे मंदिर आहे. जवळच पडदानशीन स्त्रियांसाठी स्वतंत्र 'जनाना घाट' आहे. अमृत घाटही प्रसिद्ध आहे. अमृतप्राप्तीसाठी सुर आणि असुर यांनी जे समुद्रमंथन केले, त्या वेळी अमृताचे काही थेंब इथे पडले अशी आख्यायिका आहे. शेजारच्या ब्रह्मकुंडात अस्थिविसर्जन केले जाते. राजा भर्तृहरी याने तपश्चर्या केली आणि इथेच त्याचा स्वर्गवास झाला, तेव्हा त्याचा बंधू विक्रमादित्य राजा, ह्याने आपल्या भावाच्या स्मरणार्थ इथे पायऱ्या बांधल्या, त्या 'हरीकी पायरी' नावाने ओळखल्या जातात. देवाच्या साम्राज्याकडे नेणाऱ्या पायऱ्या म्हणून त्यांना हरीच्या पायऱ्या म्हणायचे. या पायऱ्यांचा जीर्णोद्धार करून त्या रुंद करण्याचे कार्य शेठ सूरजमल बिर्ला यांनी केले. इथे नावेच्या आकाराचा एक सिमेंटचा प्लॅटफॉर्म आहे आणि त्याच्या मध्यभागी टॉवरवर घड्याळ आहे. चारी बाजूंनी पाणी असल्याने त्याचे दृश्य प्रेक्षणीय दिसते. संध्याकाळी हा भाग गर्दीने फुललेला होता. जवळच 'नीलधारापूल' आणि 'फ्लाईंग फॉक्स' नावाचा पूल दिसत होते. यात्रेकरू माशांना खाऊ घालत होते आणि हजारो छोटे छोटे मासे त्यासाठी गर्दी करत होते. आम्ही या वेळी मुद्दाम आलो होतो, ते गंगेची आरती पाहाण्याकरिता. रोज संध्याकाळी इथे गंगामातेची आरती करतात. हजारो भाविक त्या वेळी कर्दळीच्या पानांच्या द्रोणामध्ये गुलाबाची फुले घालून आणि फुलवात प्रज्वलित करून, ते द्रोण गंगेत सोडतात. हजारोंच्या संख्येने संथगतीने प्रवाहातून वाहत जाणाऱ्या या द्रोणांचे दृश्य पाहून, डोळ्यांचे पारणे फिटते. कितीतरी वर्षे झाली तरी आजही ते दृश्य मला डोळ्यापुढे दिसते आहे. **कनखल** हे तीर्थश्रेत्र हरिद्वारपासून जवळच आहे. पार्वतीचा पिता प्रजापती दक्ष याने जिथे यज्ञ केला ती ही यज्ञभूमी आहे. संस्कृत शब्द 'कोऽखल' पासून हा शब्द निर्माण झाला आहे. असा कोण खल-पापी आहे की, जो इथून स्वर्गात प्रवेश करू

शकणार नाही असा प्रश्न 'को खल' मध्ये आहे. ब्रह्माचा पुत्र दक्ष प्रजापती याची कनखल ही राजधानी होती. त्याची कन्या सती हिने भगवान शंकराशी विवाह केला. प्रजापतीने केलेल्या यज्ञात भगवान शंकरांना निमंत्रण नव्हते. सती स्वतःहून यज्ञाला उपस्थित राहिली आणि आपल्या पतीचा अपमान सहन न होऊन तिने यज्ञकुंडात उडी घेतली. संतप्त शंकराने त्या यज्ञाचा नाश केला. ही कथा पुराणात आहे. कनखलमध्ये अनेक आश्रम व साधूंचे आखाडे आहेत. काही आखाड्यांच्या भिंतींवर मुगलकालीन पेंटिंग्जही आहेत. आम्ही मात्र वेळ नसल्याने 'कनखल' ला जाऊ शकलो नाही.

## मनसादेवी मंदिर

हे मंदिरही डोंगरावर असल्याने निसर्गरम्य आहे. शक्तिमाता दुर्गा हिचे हे मंदिर. ही देवता भाविकांच्या मनातील इच्छा पूर्ण करते, म्हणून तिला मनसादेवी म्हणतात. शिवालिक पर्वताच्या शिखरावरील या मंदिरात जाण्यासाठी रतन टॉकीजजवळून रोपवे आहे. तिला दहा रुपये भाडे द्यावे लागते. ८ ते १२ व २ ते ६ ही रोपवे चालू असते. वरून पहाडांचे व वनराजीचे दृश्य फार सुंदर दिसते आणि 'रोपवे'त बसण्याचा अनुभवही मिळतो. आवर्जून भेट द्यावी असे हे निसर्गरम्य ठिकाण आहे.

## चंडीदेवीमंदिर

गंगानदीच्या दुसऱ्या तीरावरील नीलपर्वतावर असलेल्या ह्या मंदिरात जाण्यासाठी तीन कि.मी. चालावे लागते. चतुर्दशीला तिथे दुर्गापूजा केली जाते. त्याशिवाय मायादेवीचे मंदिर, अंजनीदेवीचे मंदिर, कांग्रा मंदिर अशी बरीच मंदिरे तिथे आहेत. आम्ही मात्र ती पाहिली नाहीत. आम्ही सरळ डेहराडूनकडे निघालो.

## डेहराडून

दिल्लीहून डेहराडूनला स्वतंत्र मार्ग आहे आणि तिथून ते २५५ कि. मी. वर आहे. दुसरा मार्ग म्हणजे व्हाया हरिद्वार जाणे. आम्ही तोच पत्करला होता. हरिद्वारहून डेहराडून ५२ कि. मी. वर आहे. हरिद्वार-ऋषिकेष-डेहराडून हा रस्ता मोठा सुरेख आहे. डावीकडे पहाड आणि उजवीकडे गंगा यांचे सौंदर्य न्याहाळीत

बस घाटाची वळणे चढत असते. काही प्रवाशांना बस लागत होती. मग लिंबू, सुपारी, फुटाणे असे पदार्थ खाण्याचे प्रयोग चालू होते. आसमंतात पोपटी शेते डुलत होती. पण जंगले मात्र अभावानेच आढळली. डेहराडूनमध्ये खास पाहण्यासारखे काय आहे, असा प्रश्न जर कोणी विचारला, तर चटकन त्याचे उत्तर देणे कठीण आहे. परंतु हा सगळा परिसरच रम्य आहे. त्याच्या उत्तरेकडे हिमालयाच्या रांगा सुरू होतात, तर दक्षिणेकडे शिवालिक पर्वताच्या रांगा आहेत. पूर्वेकडे गंगा तर पश्चिमेकडे यमुना नदी आहे. 'डेहरा' शब्दाचा अर्थ कॅम्प किंवा छावणी आणि 'डून' म्हणजे व्हॅली किंवा दरी.

दिल्ली-डेहराडून विमानप्रवासाची मौज लुटता येते किंवा दिल्ली, हावरा, मुंबई येथून ब्रॉडगेज रेल्वेने थेट डेहराडूनला जाता येते. गढवालमंडळ विकास निगम यांचे ऋषिकेशला मुनीकी रेती भागात ऑफिस आहे. तेथून गंगोत्री-यमुनोत्री-बद्रीनाथ- केदारनाथ येथे पॅकेज टूर्स नेल्या जातात. दिल्लीहूनही काही प्रवासी कंपन्या हरिद्वार, ऋषिकेष, डेहराडून व मसुरी अशी पॅकेज टूर काढतात. अगदी महाराष्ट्र मंडळातूनदेखील अशा टूरचे रिझर्वेशन करता येते.

डेहराडूनचा एक भव्य इतिहास आहे. प्राचीन काळी हा भाग गढवाल राज्यात समाविष्ट होता. नंतर तो गोरखांनी जिंकून घेतला. १८१४ मध्ये ब्रिटिश लोकांनी 'नालपानी' या ठिकाणी युद्ध करून तो गोरख्यांकडून जिंकून घेतला. 'खलंगा फोर्ट' येथे गोरखा राजा बलभद्रसिंह थापा याच्याशी झालेल्या युद्धात अनेक ब्रिटिश अधिकारी कामास आले.

शिखांचे गुरू 'गुरू राम राई' यांना डेहराडूनमध्ये स्थायिक व्हायला मुगल बादशहा औरंगजेब याने मदत केली आणि १६९९ मध्ये गुरू राम राई यांनी मोठा गुरुद्वारा बांधून त्यावर झेंडा फडकवला. आजही डेहराडूनच्या झेंडा चौकात प्रत्येक वर्षी मार्च महिन्यात होळीनंतर जत्रा भरवली जाते आणि गुरू रामराई यांच्या 'डून' येथील आगमनाची स्मृती काढली जाते.

डेहराडून हे उत्तरेकडील एक सुंदर शहर आहे. इथे अनेक नामांकित शिक्षणसंस्था असून त्यांपैकी संजय गांधी, राजीव गांधी यांनी शिक्षण घेतलेले 'डून स्कूल' प्रसिद्ध आहे. 'राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज,' 'इंडियन मिलिटरी अकॅडमी,' 'फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट'या संस्था आवर्जून भेट द्याव्यात अशाच आहेत. आम्ही शिक्षणक्षेत्रातील लोक असल्याने त्या मुद्दाम पाहिल्या. 'खलंगा फोर्ट,' 'माल्शी डिअर पार्क,' 'रॉबर्स केव्ह,' 'सहस्त्रधारा' अशी काही निसर्गरम्य

स्थळेही या परिसरात आहेत. आमचा मुक्काम केवळ एकच दिवस असल्याने सर्व ठिकाणे आम्हाला पाहता आली नाहीत, किल्ला आणि पार्क पाहायचे नाहीत, असा निर्णय आम्ही घेऊन टाकला. टॅक्सीने फिरून 'डूनस्कूल' आणि 'फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूटला' भेट दिली. ५ ॥ किलोमीटरवरील **'तापकेश्वर मंदिर'** या नावाने प्रसिद्ध असलेले शिवमंदिर पाहिले. टॅक्सी केल्यामुळेच मंदिरापर्यंत जाता आले. कारण बस चार कि.मी. अंतरावर थांबते व पुढील अंतर चालत जावे लागते. शिवरात्रीला या मंदिराच्या परिसरात जत्रा भरते, अशी माहिती मिळाली. 'लक्ष्मणसिद्ध', 'तपोवन' या नावाची मंदिरे १०/१५ किलोमीटरच्या अंतरावर आहेत, पण मला मंदिरांना भेटी देण्यात फारसा रस नसल्यामुळे आम्ही तिथे गेलो नाही.

**सहस्त्रधारा**

या १४ किलोमीटरवरील ठिकाणाला मात्र आम्ही भेट दिली. हे निसर्गरम्य ठिकाण असून तिथे गंधक पाण्याचे झरे आहेत. आश्चर्य म्हणजे हे पाणी गरम मात्र नाही. प्रवाशांना स्नान करायला सोयीचे पडावे, म्हणून इथे बाथरूम्स बांधल्या आहेत. एक ब्रिजही आहे. रेस्टॉरंट व कॅन्टीनची सोय उपलब्ध आहे. 'सहस्त्रधारा' जवळ टूरिस्ट रेस्ट हाऊस व पी. डब्ल्यू. डी. चा बंगला असल्यामुळे, सवड असलेल्या मंडळींच्या मुक्कामाची सोय होऊ शकते.

डेहराडूनमध्ये तर अनेक लॉजेस् आहेत. पी. डब्लू. डी. बंगला आहे. रेल्वे गेस्ट हाऊस आहे. त्याशिवाय जैन धर्मशाळा, अग्रवाल धर्मशाळा, शिवाजी धर्मशाळा अशा काही धर्मशाळाही आहेत.

डेहराडूनपासून ९२ किलोमीटरवर **चक्राता** (Chakrata) नावाचे निसर्गरम्य ठिकाण आहे. तिथून हिमालयाचे सुंदर दर्शन घडते. तिथे अत्युच्च अशी हिमालयातील वृक्षांची वनराजी आहे. डेहराडून, मसुरी आणि सहरानपूर येथून चक्राताला जाण्यासाठी बसेस आहेत, अशी माहिती आम्हाला समजली; परंतु त्याचबरोबर तिथे एकही चांगले हॉटेल नाही. फक्त जिल्हा परिषदेच्या डाकबंगल्यात तीन-चार सूट्स उपलब्ध आहेत असे समजले. तेव्हा निवास व्यवस्था झाली नाही, तर उगाच कटकट नको म्हणून आम्ही तिथे जाण्याचे टाळले. या घटनेला आता बरीच वर्षे झाली आहेत. आता तिथे बसस्टेशनजवळ दोन-तीन हॉटेल्स झाली आहेत असे समजले.

## मसुरी

मसुरी हे छोटे पण सुंदर हिलस्टेशन डेहराडूनपासून केवळ ३५ कि.मी. अंतरावर आहे. मे ते जुलै आणि सप्टेंबर-ऑक्टोबर हा सीझन तिथे चांगला असतो. दक्षिण हिंदुस्थानात उटीला Queen of the Hill Stations म्हणतात, तर उत्तरेत मसुरी ही हिलस्टेशन्सची राणी मानली जाते. हे हिलस्टेशन मध्यमवर्गीय खिशाला परवडेल असे आहे. त्याची व्याप्ती कमी असल्याने दूरदूर अंतरावरचे पॉईंट्स पाहण्यासाठी पायपीट करावी लागत नसल्याने, दमछाक होत नाही. मसुरीचे निसर्गसौंदर्य उल्लेखनीय आहे. उत्तर-दक्षिण पसरलेली हिमाच्छादित पर्वतशिखरे, खाली दिसणारी डून व्हॅली, सहारनपूर व हरिद्वार यांसारखी निसर्गरम्य गावे, हवेतील सुखद गुलाबी थंडी, सुरेख रस्ते- सारे वातावरण मोहक आहे. कॅप्टन यंग नावाच्या साहसी मिलिटरी ऑफिसरने १८२७ मध्ये या निसर्गरम्य स्थळाचा शोध लावला आणि तेव्हापासून हे निसर्गप्रेमी प्रवाशांचे आवडते ठिकाण बनले.

मसुरीमध्ये १५० ते २०० रुपयांत चांगली रूम मिळू शकते. 'कुलरी बझार' भागामध्ये २५-३० तरी चांगली लॉजेस् आहेत. अमर, अप्सरा, हिल व्ह्यू, नाझ, प्रिया, रीगल अशी काही उल्लेखनीय आहेत. 'लायब्ररी बझार'मध्येही इंडिया, इम्पीरिअल, प्रिन्स अशी काही चांगली आहेत. उंटाच्या पाठीसारखा आकार असलेल्या एका टेकडीला Camel's Rock म्हणतात. त्या रस्त्यावरही ब्रॉडवे, माऊंटन व्ह्यू, टूरिस्ट हॉटेल अशी लॉजेस आहेत; पण हा एरिया बाजारपेठेपासून दूर आहे. 'लांडोर बाजार'भागही बसस्टॅन्डपासून दूर आहे. तिथे अनुपम, गणेश, पॅलेस हॉटेल अशी काही चांगली लॉजेस् आहेत. मसुरीत रेस्टॉरंट्स तर अगणित आहेत.

## गनहिल

आम्ही मसुरीला गेलो त्या वेळी हिमालयातील अन्य सर्व थंड हवेच्या ठिकाणांना भेटी दिल्या नव्हत्या. त्यामुळे तेथील रोपवेचा अल्पकालीन अनुभवही आम्हाला रोमांचक वाटला. नंतर नैनीताल, दार्जीलिंग, गुलमर्ग वगैरे ठिकाणी रोपवेचा दीर्घकालीन व लांब पल्ल्याचा अनुभव घेतल्यावर मात्र मसुरीची रोपवे अगदीच छोटी वाटू लागली. या रोपवेचे अंतर फक्त ४०० मीटर्सचे आहे. मालरोडवरील 'हकमनस् हॉटेल' जवळून ही रोपवे निघते आणि

मसुरीतील दुसऱ्या क्रमांकाच्या टेकडीवर— गनहिलवर आपल्याला पोचवते. गनहिलवरून हिमाच्छादित शिखरांचे नयनमनोहर दृश्य दिसते. बंदर पंच, श्रीकांता, पिथवारा आणि गंगोत्री ग्रूपची हिमालयातील शिखरे येथून सुरेख दिसतात. मसुरी शहर आणि डून व्हॅलीचे विहंगमावलोकनही करता येते. या टेकडीवर एक तोफ आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात दुपारी १२ वाजता ही तोफ उडवली जात असे आणि लोक त्यावरून आपली घड्याळे लावत असत. या तोफेवरून या टेकडीला 'गनहिल' नाव मिळाले आहे.

### कॅमल्स बॅक रोड

हा मसुरीतील मला आवडलेला सर्वांत सुंदर रस्ता. कुलरी बाजारातील रिंक हॉलजवळून हा रस्ता सुरू होतो आणि वृक्षराजीतून वळसे घेत कधी छोट्या पायऱ्या चढत-उतरत सुमारे तीन किलोमीटरवरील लायब्ररी बझारजवळ संपतो. या रस्त्यावरून पायी जाण्यात जशी मौज आहे, तशीच घोडदौड करण्यातही आहे. विवेकानंद स्कूलजवळून बघितल्यानंतर हा खडक खरोखरच उंटाच्या पाठीसारखा दिसतो, म्हणून त्याला 'कॅमल रॉक' असे नाव दिले आहे. पर्यटन विभागाच्या पुस्तिकेवर या कॅमल रॉकचाच फोटो छापला आहे.

### म्युनसिपल गार्डन

मसुरीमध्ये हाताने ओढण्याच्या रिक्षा आहेत. तसेच टॅक्सीजही मिळू शकतात. स्टॅन्डपासून ४ किलोमीटर अंतरावर 'म्युनसिपल गार्डन' हे सहलीचे ठिकाण आहे. तिथे छोटेसे लेक असून बोटिंगचीही सोय आहे. पायवाटेने किंवा घोड्यावरून बसून जायचे ठरवले, तर त्याचे अंतर केवळ दोन कि.मी. आहे.

### लाल टिब्बा

टूरिस्ट ऑफिसपासून ५ कि.मी. अंतरावर 'लाल टिब्बा' हे मसुरीचे सर्वांत उंच शिखर आहे. तिथे थेटपर्यंत टॅक्सी मात्र जात नाही. पायी किंवा घोड्यावरून जाता येते. या ठिकाणाला 'चिल्डरस् लॉज' असेही नाव आहे. हे ठिकाण आठ हजार फूट उंचीवर असून तिथून हिमाच्छादित पर्वतराजीचे सुंदर दर्शन होते. तिथे एक मोठी व सुंदर दुर्बीण बसवलेली असून तिच्यातून आसपासचा निसर्ग पाहणे हा अवर्णनीय आनंद आहे. आर्मीचे ट्रेनिंग सेंटर येथून जवळ आहे.

## नाग टिब्बा

ट्रेकिंगची आवड असणाऱ्या तरुण प्रवाशांना ३५ कि.मी. वरील नाग टिब्बा हे ठिकाण चांगले आहे. केम्प्टी फॉलमार्गे तिथे जाता येते. मात्र, तिथे निवासव्यवस्था नसल्याने, आमच्यासारख्यांना त्याचा उपयोग नाही. तंबू बरोबर घेऊन जाणाऱ्या व स्लीपिंग बॅगमध्ये झोपणाऱ्या धाडसी ट्रेकर्सना हे ठिकाण चांगले आहे.

## केम्प्टी फॉल (Kempty Fall)

टूरिस्ट बसेस स्थळदर्शन घडविताना आपल्याला आवर्जून या धबधब्याजवळ घेऊन जातात. मसुरी-चक्राता रोडवर १५ कि.मी.वर हा उत्तुंग धबधबा आहे. त्याची उंची ४५०० फूट आहे. हा या भागातील सर्वांत उंच धबधबा असून त्याची रचना मनोहर आहे. सर्व बाजूंनी उंच डोंगर असलेल्या दरीत तो आहे. धबधब्याच्या पायथ्याशी स्नान करायला योग्य अशी जागा आहे. कोवळ्या सूर्यकिरणांमध्ये इथे जलविहाराचा आनंद लुटण्यात मोठी मौज येते. पाण्याच्या थेंबांवर व प्रवाहावर सूर्यकिरणांमुळे इंद्रधनुषी रंगांची उधळणही काही वेळा झालेली दिसते.

मसुरीच्या आसपासही निसर्गरम्य अशी प्रेक्षणीय स्थळे बरीच आहेत; पण तेवढी सवड नसल्याने आम्ही ती पाहू शकलो नाही. परत येताना आम्ही सरळ ऋषिकेषला आलो. तिथून लक्झरीने दिल्लीला. दिल्लीत मुक्काम करून ट्रेनने धुळ्याला परतलो. ज्यांचे बजेट कमी आहे आणि जे प्रवासासाठी थोडेच दिवस खर्च करू शकतात अशा प्रवाशांसाठी मसुरीची ट्रीप सोयीची आहे. दिल्लीपर्यंत जायचे आणि नंतर तिथून एकतर 'हरिद्वार-ऋषिकेष-डेहराडून व मसुरी' यांची पॅकेज टूर करायची किंवा खिसा गरम असेल तर, 'दिल्ली ते डेहराडून' वायूदूत विमानाने अर्ध्या तासाचा प्रवास करायचा आणि डेहराडून पाहून मसुरीला जायचे. तीर्थक्षेत्रे बघण्यात वेळ न घालवता, सुटसुटीत आनंदयात्रा करू इच्छिणाऱ्यांना हा दुसरा मार्ग नक्कीच पसंत पडेल. पुन्हा मसुरीला जाताना आम्ही तोच स्वीकारायचा ठरवले आहे. कारण 'बचेंगे तो औरभी लढेंगे' अशा ईर्ष्येने नवेनवे प्रदेश पादाक्रांत करण्याची आमची इच्छा आजही प्रबळ आहे. हे प्रवासवर्णन वाचणाऱ्यांच्या मनातही ती निर्माण व्हावी ही सदिच्छा.

ग्रं. क्र. ६५२

REFBK-0026977

REFBK-0026977